(वऱ्हाडची माती व कृष्णेचं पाणी)

म्हणजेच

# न फुलू दिलेलं फूल

## *Flower Born To Bloom Unseen*

# आत्मवृत्त



वा. गो. देवगांवकर

ISBN 978-81-949979-0-0

# न फुलू दिलेलं फूल

## वा. गो. देवगांवकर

कवितासागर साहित्य अकादमी, जयसिंगपूर
02322 - 225500, 9975873569, 8484986064

**KavitaSagar Sahitya Akademi**
**(K**avitaSaga**r D**irect **P**ublishing**)**
**कवितासागर साहित्य अकादमी, जयसिंगपूर**

- **I**nternational **S**tandard **B**ook **N**umber: **978-81-949979-0-0**
- Title - **Flower born to bloom unseen.**
  **न फुलू दिलेलं फूल (आत्मचरित्र)**
- Edition - **First**
- Volume - **One**
- Price - **Rs. 1050/ -**
- Pages - **340+8=348**
- Language - **Marathi**
- Author - **V. G. Deogaonkar**
- Subject - **Autobiography**
- Year of Publication / Date of Issue - **22 October 2025**
- Book Version - **Paperback**
- 
- Published In India by - **Dr. Sunil Dada Patil,**
  Publisher Agency - **KavitaSagar**
  Imprint - **KavitaSagar Sahitya Akademi, Jaysingpur**
  Post Box Number - 69, Jaysingpur - 416101,
  Taluka - Shirol, District - **Kolhapur**, Maharashtra, **India**
  **8484986064, 9975873569, sunildadapatil@gmail.com**
- Printed in India by - **Dr. Sunil Dada Patil**
  On behalf of the **KavitaSagar Printing Services**

# अनुक्रमणिका

# (१) पाणी व माती

कोणी म्हणतील आत्मचरित्राला हे काय नाव दिलंय 'वऱ्हाडची माती व कृष्णेचं पाणी'. माती व पाणी हे पंचमहाभूतातील दोन तत्वं आहेत. आकाश, तेज, वायू, पृथ्वी व पाणी ही पाचही तत्त्वे जीवांच्या निर्मितीला कारणीभूत होणारी आहेत. आकाश, तेज व वायू हे अंतराळात असल्यामुळे सर्व ठिकाणी भरून राहिली आहेत व जीवनाच्या निर्मितीत ही तीन तत्त्वे राहतीलच पण जीवांच्या अथवा जीवनाच्या निर्मितीत वैचित्र्य व विविधता जी दिसून येते ती माती व पाणी यांच्या कमी - जास्त संबंधामुळे.

जीवनाला विशिष्ट आकार देण्यात माती व पाणी यांचा अधिकांश भाग असतो. खरंतर असंही म्हटलं तर चुकणार नाही की, जीवनाला आकार माती - पाण्यातूनच मिळतो. माती - पाण्याच्या संसर्गातून जीवन बनतं. समुद्रात जलचर प्राणी असतात; कारण त्या प्राण्यांचा संसर्ग पाण्याबरोबर तसेच समुद्र तळातल्या मातीशी येतो. नुसत्या मातीत बी पेरलं पण पाणी दिले नाही तर रोपटं कसं येणार? पाऊस पडल्यावरच पेरलेल्या बीचं रोपटं होईल ना? वनस्पती, जीवन, पाणी व माती यांच्या सहकार्यानेच आकाराला येतं - प्रकाश, वायू, तेज हे सर्वत्र आहे; पण पाणी व माती हे विशिष्ट ठिकाणीच मर्यादित राहणार. पाणी मातीच्या गुण वैशिष्ट्यावर वनस्पती जीवनाचे गुण

वैशिष्ट्य अवलंबून राहणार. तीच तऱ्हा मानवी जीवनासंबंधीची. म्हणून मानवी जीवनात पाणी व माती यांच्या गुणधर्मातून मानवी जीवनाचा गुणधर्म तयार होतो. 'माती असशी, मातीतचं मिळशी' यात खरं तर मातीच्या महत्त्वाबद्दलचा अर्थ अभिप्रेत आहे.

मुळात माणूस मातीतून निर्माण झाला, मातीतच त्याचं जीवन घडतं, वाढतं व शेवटी मातीतच त्याच जीवन संपतं व शेवटी तो मातीच असतो. मानव हा पाण्यात मिसळून झालेल्या ओल्या मातीचा निरनिराळे आकार असलेला, निरनिराळ्या साच्याचा गोळा आहे.

जेव्हा तो जीवन जगत असतो तेव्हा त्याच्यात जशी माती असते तसंच पाणीही असतं, जसं - जसा मानव वृद्धावस्थेत जातो तस - तसं त्याच्यातलं पाणी कमी - कमी होत जातं. शेवटी पाणी संपून जातं. देह कोरडा होतो. पंचत्वात विलीन होतो. मानवी जीवनात माती पाण्याचं महत्व फार. मानवी जीवनात मुद्दामहून म्हणतो कारण इतर पशु प्राण्यांपेक्षा मानव भिन्न आहे. त्याला बुद्धी आहे, चांगलं वाईट, सुख - दुःख कळतं, आपण म्हणतो त्या व्यक्तीत किती पाणी आहे किंवा त्यानं आपलं पाणी दाखवलं, यात त्या व्यक्तीचं तेज, सामर्थ्य या गुणांना अनुलक्षुनच असा संप्रदाय आपण वापरतो. (विरोधकाचं पाणी तो ओळखून आहे. यात विरोधकाची शक्ती, कुवत त्याला माहीत आहे, हेच म्हणायचं असतं. पाणी माणसाचा स्वभाव बनवतं, वृत्ती बनवतं, उलट माती माणसाला आकार देत असते. माणसात येणारी उंची, ठेंगूपणा, सडपातळपणा, राकटता मातीमुळे,

लाल मातीत खुजी माणसे, पिवळया मातीत पिवळसर रंगाची, चपट्या नाकाची, काळया मातीत उंच, भरदार, दिसायला सुंदर निकोप, रेताड मातीत भटकी व राकट तर डोंगर दऱ्यांच्या खडकाळ मातीत पण काटक, हातातून एकदम निसटणारी. मावळया मराठ्यांच्या साहाय्याने शिवाजी महाराजांनी स्वराज्याचं तोरण बांधलं ते का तर मावळ आणि मराठे गिरी पहाडात वाढलेले, गिरी पहाडात ज्या नद्यांचे पाणी प्यायलेले. माती माणसाचा आकार आणि स्वरूप बनवतं. पाणी माणसाचं हृदय बनवतं.)

भारतभूच्या सुपीक, सुगंधीत, संस्कारक्षम, अस्मिता बाळगणाऱ्या मातीचा गंगा, यमुना, सिंधू, कृष्णा, कावेरी, गोदावरी इ. नद्यांच्या पवित्र, प्रसन्न, गुणवर्धक पाण्याशी झालेल्या संसर्गातूनच वेळोवेळी असामान्य लोकोत्तर महात्म्यांच, थोर पुरुषाचं जीवन आजपर्यंत आकाराला आलेलं आहे व पुढेही येत राहणार आहे.

तसं पाहिले तर जीवनाला आकार माती - पाण्यातूनच येतात. माती - पाण्याच्या संसर्गातून जीवन बनतं. नुसत्या मातीतून जीवन वाढू शकत नाही. नुसत्या पाण्यातून जीवन आकार घेऊ शकत नाही. समुद्रात जलचर प्राणी असतात पण त्यांचा समुद्रातल्या तळातल्या मातीशी संबंध येतोच. कुंभार माती व पाणी यांच्या साहाय्यानेच निरनिराळी मातीची भांडी, मडकी आकाराला आणतो. नुसत्या मातीत बी पेरलं पण पाणी दिले नाही तर रोपटं कसं येणार? पाऊस पडल्यावरच जमिनीत पेरणी करायची ना? वनस्पती, जीवन, पाणी - माती यांच्या सहकार्यानेच

आकाराला येतं, फुलतं, दिसावतं. अर्थात जोडीला प्रकाश हा हवाच. पण नुसत्या प्रकाशानंही जीवन फुलणार नाही, आकाराला येणार नाही. शिवाय प्रकाश हा सर्वत्र भरला आहे. पण माती व पाणी मर्यादित आहे. म्हणून माती व पाणी मुख्य विधाता तरी काय माती व जल यांच्या साहाय्यानेच जीवन निर्मिती करतो, माती व जल म्हणूनच पंचमहाभूतातील दोन महत्त्वाची तत्त्वं आहेत. **'माती असशी, मातीत मिळशी'** असे म्हणून मातीचं क्षुद्रत्व, शुद्रकत्व सांगण्याचा प्रयत्न होतो. खरं म्हणजे यात क्षुद्रकत्वापेक्षा मातीचा क्षणभंगुरतेचा, नाशवंततेचाच भास अभिप्रेत आहे. जीवन नाशवंत आहे, क्षणभंगुर आहे, पण मग तसं हे सारं जगच नाशवंत आहे. पण नाशवंत जगात जीवन उभ राहतं ते माती - पाण्यामुळेच. मानव हा मातीचा निरनिराळे आकार असलेला, निरनिराळया साच्याचा जसं पाण्यात भिजलेला - प्राणवायू असलेला गोळा आहे. जस - जसा मानव वृद्धावस्थेत जात असतो तसं - तसं त्याच्यातलं पाणी कमी - कमी होत जातं. शेवटी पाणी संपून जातं. देह कोरडा होतो. पंचत्वात विलीन होतो. तात्पर्य, मानवी जीवनात माती - पाण्याचं महत्व फार. मानवी जीवनात मुद्दामहून म्हणतोय कारण इतर प्राण्यांपेक्षा तो भिन्न आहे. कारण मानवाला बुद्धी आहे. चांगले वाईट कळते, सुख - दुःख कळतं, मत तत्व असतं, किती तेज असतं, केवढं सामर्थ्य असतं.

भारतभूला सुजलाम, सुफलाम पुण्यभू म्हणायचं. भारतभूवर इतकी आक्रमणे झाली, परकीयांनी भारतभूचं

स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा इतका प्रयत्न केला तरी प्रत्येक वेळेला गेलेले स्वातंत्र्य परत मिळवण्यात यशस्वी ठरलेले शूर - वीर पराक्रमी राजे असामान्य लोकोत्तर नेते य राष्ट्रीय साधू संत, महात्मे यांना मिळालेला सुसंस्कृतपणा, नीतिमत्ता, अध्यात्मिकता, अहिष्णूता, स्वयंप्रज्ञता, अस्मिता व तेज या गुणांचा वारसा या भारतभूच्या निकोप मातीतूनच व पवित्र नद्यांच्या पाण्यातूनच अशा भारतभूच्या मातीत व पाण्यात ज्याचं जीवन साकार होत गेले ते धन्य होत, भाग्यवान होत.

अशा भारतभूमीमध्ये जन्माला येणं हे जितकं सद्‌भाग्याचं लक्षण आहे त्याहीपेक्षा अधिक सद्‌भाग्याचं लक्षण शिवाजीने जे महान राष्ट्र - महाराष्ट्र - मराठ्यांचे राष्ट्र जन्माला आणलं त्या महाराष्ट्रात जन्माला येणं. केवळ मातीतून राष्ट्र निर्माण करण्याचा गुण महाराष्ट्राच्या मातीतच आहे. या मातीतच शिवाजीचे व्यक्तिमत्व बनले, येथील पाण्यानेचं शिवाजी मावळ मराठ्यात स्वातंत्र्याकांक्षा निर्माण केली. आकर्षक व्यक्तिमत्व, चापल्य, काटकपणा, जिद्द, महत्वाकांक्षा, स्वतंत्र तेजस्वी वृत्ती, बुद्धिमत्ता, स्वामित्व हे महाराष्ट्रातल्या माती - पाण्याचे गुण. पेशव्यातही हे गुण महाराष्ट्रातल्या (पुण्यातल्या) माती पाण्यातूनच नाही का उत्पन्न झाले!

'हे मग अमरपण येते.'

हा गुण महाराष्ट्रातल्याच मातीचा. शिवाजी, पहिला बाजीराव, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, इ. विभूतींनी अनेक मरण प्राय संकटांना - मरणालाच तोंड देऊन, अनेक

मरणांना जिंकून ते अमर ठरते; ते केवळ महाराष्ट्रातल्या पाण्यामुळे, मातीमुळेच आणि म्हणूनच मी म्हणतो की, महाराष्ट्रात जन्माला येणं त्यातल्या त्यात अधिक सौभाग्याचं. अशा या महाराष्ट्राच्या मातीत माझे पूज्य आई - वडील जन्मले, या महाराष्ट्राच्या मातीत वाढले, या महाराष्ट्रातलंच पाणी पिऊन त्यांच जीवन - आकाराला आले, हे यामुळे किती पुण्यवान, भाग्यवान असतील आणि माझाही जन्म या महाराष्ट्राच्या मातीत झाला व महाराष्ट्रातल्या पवित्र नद्याचं पाणी प्यायला मिळालं हे माझ्या परमपूज्य आई - वडिलांच्या पुण्याईमुळेच.

एका पवित्र - अस्तित्वातून निर्माण होणारे अस्तित्व पवित्रच असतं. या तत्वाने विचार करताचं बरोबरच आम्ही सर्वजण (तीन भाऊ व एक बहीण) आमच्या परमपूज्य आई - वडिलांचे शतश: ऋणी आहोत. कारण त्यांचीच पुण्याई आमच्या जीवनाला पुरून उरली आहे.

# (२) ताई आणि भाऊ

माझे आई - वडील जवळ - जवळ एकाच पवित्र भूमीत - मातीत वाढलेले व एकाच पवित्र नदीच्या पाण्यावर पोसले गेलेले. दोघेही पवित्र गोदावरी नदीच्या तीरावर असणाऱ्या नाशिकच्या परिसरातले. गोदावरीच्या पाण्यातून व नाशिकच्या भूमीतून.

ते १९ च्या शतकातले शेवटचं दशक असावं. त्या काळात आगरकरांसारख्या समाज सुधारकाकडून समाज सुधारण्याचं बीजारोपण सुरू होते. पण त्याचं रोपटं व्हायला वेळ लागत होता. या रोपट्याला हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या लोकांकडून खत पाणी मिळत होतं. याउलट लोकमान्य टिळकांनी लावलेलं राजकीय सुधारणाचं रोपटं तरारून फोपाट्याने वाढत होतं. लोकमान्य टिळकांच्या घन गंभीर आवाजापुढे आगरकरांचा आवाज हवेतच विरून जात होता. भारतीयांचं लक्ष्य मुख्यत्वेकरून राजकीय सुधारणा व राजकीय स्वातंत्र्य यावरच केंद्रित झाल होतं. परकीयांच्या ताब्यात गेलेलं आपलं घर एकदा आपण सोडवून घेतलं, जिंकून घेतलं की, मग त्या घरात काय - काय सुधारणा करायच्या याचं स्वातंत्र्य गृहप्रमुखाला मिळून त्या करणं अधिक सुकर व सोईचं होईल - जाईल ही लोकमान्य टिळकांची विचारसरणी बहुसंख्य भारतीयांना जितकी निकोप व सुरक्षित आवाक्यातली वाटत होती तितकीच ती स्वाभाविक व राष्ट्रीय स्वातंत्र्य लवकर मिळवण्याच्या

दृष्टीनं हितकारक व उपयुक्त वाटत होती. अशा या राजकीय सुधारणांवर राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या ध्येयासमोर सामाजिक सुधारणा निष्प्रभ ठरत होत्या, अशा या निष्प्रभ सामाजिक पार्श्वभूमीवर त्या काळी मुला - मुलींची लग्न लहानपणीच होत असत.

माझ्या आईचे नाव 'द्वारका', तिचे वडील दामोदरपंत सबनीस, ते आधी कोर्टात लिपिक होते. पुढे चढत - चढत ते मामलेदार झाले. माझी आई ही त्यांच्या मुलीत सर्वात मोठी मुलगी. धारदार नाक, गोरा वर्ण, तेजस्वी डोळे, सुंदर मुलीतच जमा होणारी शंभर जणीत उठून दिसणारी; पण तिला मंगळ होता. पत्रिका पाहिल्याशिवाय गुण - मिलन झाल्याशिवाय लग्न नाही. त्यातून मुलगी कितीही सुंदर असली तरी तिला मंगळ असल्यास मुलगा मंगळाचाच पाहाण्यावर भर अर्थात ही परिस्थिती अजूनही आहे. माझ्या वडिलांचे नाव गोविंदराव यांचे वडील मार्तंडराव.

आमचे आजोबा निफाड तालुक्यातील म्हणजे नाशिक जिल्ह्यातील देवगांवचे या देवगांवला घर वगैरे त्या वेळेला असलं तर असेल. या देवगांव गावावरून आडनावं पडतात तशी देवगांवकर हे आडनाव पडलेले. गोविंदराव हे पोस्ट खात्यात लागले होते. पोस्ट खात्याची म्हणजे सरकारी नोकरी आणि त्या काळात सरकारी नोकरी आर्थिक दृष्ट्या शाश्वतीची. सुरक्षित व आर्थिक स्थैर्य देणारी. त्या काळात सोन्याचं अंडं देणारी समजली जात होती. मुलीला सरकारी नोकरी करणारं स्थळ मिळणं म्हणजे त्या काळी अमृतसिद्धियोग योग. नाशिकमध्येच नाशिक रोडला माझे

वडील पोस्ट खात्यात असल्यामुळे आईच्या वडिलांनी दामोदरपंतांनी हा योग जमवला, कारण मुलाला ही मंगळ. मुलीकरता द्वारकाबाईकरता दामोदरपंतांना फार जोडे फाडावे लागले नाहीत. सुंदरात जमा होणाऱ्या माझ्या आईला पती म्हणून मिळणाऱ्या गोविंदरावांच व्यक्तिमत्व आकर्षक. वर - वधू म्हणून एकमेकाला खुलून दिसणारं अनुरूप जोडपं जसा विठ्ठल - रखमाईचा जोडा किंवा शंकर - पार्वतीचा म्हणू.

माझ्या वडिलांचे व आईचे नातेवाईक सारे नाशिक जिल्ह्याच्या परिसरातलेच. पुढे आमचे आजोबा - मार्तंडराव वऱ्हाडमध्ये आले व वऱ्हाडमधल्याच एका गावी त्यांना प्राथमिक शाळेत हेडमास्तरची नोकरी मिळाली. आमच्या आजोबांना एकूण पाच मुले व एक मुलगी. माझे वडील गोविंदराव सर्वात मोठा मुलगा. आजोबांनी इकडे वऱ्हाडातचं बिऱ्हाड थाटल्यामुळे व आपली सारी मुलं आपल्याजवळ असावीत म्हणून माझ्या वडिलांना त्यांनी वऱ्हाडात बदली करून घ्यायला सांगितलं. आम्ही वडिलांना (गोविंदरावांना) भाऊ म्हणत असू. वडिलांना भाऊ म्हणायचं कारण आमचे काका - वडिलांच्या खालचे सारे धाकटे नंबर वडिलांना भाऊ म्हणायचे. दामोदरपंतांना एक मोठा मुलगा - नाव भिकाजी व त्याच्या खालच्या साऱ्या माझी आई धरून चार मुली. माझ्या आईच्या खालच्या नंबरच्या तीन मुलींची नावे अनुक्रमे सीता, नागू व शांता. माझ्या आईच्या या तिन्हीही बहिणी आईला ती सर्वात मोठी बहीण असल्यामुळे 'ताई' म्हणून संबोधित

असत. या धाकट्या तीन बहिणीमुळे (माझ्या ३ मावशामुळे) आम्ही आईला 'ताई' म्हणून हाक मारू लागलो. अशा रीतीने वडिलांना (गोविंदरावांना) 'भाऊ' व आईला (द्वारकाबाईना) 'ताई' आमचे आई - वडील म्हणजे आमचे 'ताई - भाऊ'.

आमच्या भाऊंचे आई - वडील, बंधू वऱ्हाडात आल्यामुळे व आई - वडिलांना मुलगा जवळ असावा या आई - वडिलांच्या इच्छेनुसार त्यांनी वऱ्हाडातच बदली करून घेतली. जिथे राम तिथे सीता या आर्यस्त्रीच्या संस्कारानुरूप जिथे आमचे भाऊ तिथे आमची ताई.

लग्नानंतर कोणत्याही मुलीला आपलं सासर आपल्या माहेरापासून जवळ असावं असं वाटणं साहजिकच आहे. काही - काही मुलींची तर हीच महत्वाकांक्षा असते की, गावातल्या गावात माहेर - सासर असलेलं असं स्थळ मिळालं तर बरं या दृष्टीकोनातूनच वर संशोधन सुरू असत. माझ्या पाहण्यात अशी उदाहरण आली आहेत की, स्थळ मुली करता जमण्यासारखी असली तर व एक स्थळ मुलगा उत्तम, चांगल्या पगाराचा, सुंदर, शिकलेला पण ५०० मैलावरचा व दुसरा मुलगा मध्यम, पगार बेतास बीत, साधारण व पहिल्या मुलापेक्षा कमी शिकलेला; पण या मुलाचं स्थळ गावातल्या गावातच तर मुलीचा व मुलीच्या आई - बापांचा कल हा जरा - कमी प्रतिचा पण गावातलाच असल्यामुळे हा मुलगा पसंत करण्याकडे असतो. म्हणजे मुलीला बरं सारखं माहेरी यायला मिळतंय. तेव्हा मला हेच सांगायचं की, आमची ताईसुद्धा नाशिकची माहेरची बाजू

सोडून दूर वऱ्हाडातचं वडिलांनी बदली करून घेतली म्हणून जाण्याच्या वेळेस मनानं कष्टी झाली असेल; पण काय करणार त्या काळात मुलीला आपल्या इच्छा बोलून दाखवण्याच्या दृष्टीने तोंडातून 'ब्र' काढण्याची प्राज्ञा तर नव्हतीच पण या इच्छेचं प्रतिबिंब चेहऱ्यावर दाखवण्याचीसुद्धा चोरी होती आणि मग माहेरी यायचं म्हणजे दोन - तीन वर्षांनी एखादा महिना यायला मिळायचं.... असो.

आमचे भाऊ भावात सर्वात मोठे व कमावते आणि अविभक्त कुटुंब पद्धती. आमच्या भाऊंचे, आई - वडील, एक बहीण, चार भाऊ. ७ - ८ जणांच्या कुटुंबात आमची ताई सर्वांत पहिली व मोठी सून. भाऊंच्या बदल्या होत असत. तेव्हा ते एकटे बदलीच्या गावी जात. तिचं सारं तारूण्य आणि उमेदीचं वय या बारा - पंधरा जणांचा रामरगाडा उपसण्यातच गेले. बोलण्याची सोय नाही. आता लग्न झालेल्या मुलीसारखी नवऱ्याची निवांत गाठ पडली, नवरा ऑफिसमधून परत आला की, सासूच्या, सासऱ्याच्या, दीरांच्या तक्रारीवरून नवऱ्याचं डोकं फिरवायची सोय त्या वेळेला नव्हती.

स्त्री स्वातंत्र्य - स्त्रीचं विचार स्वातंत्र्य या तत्वांचा आमच्या ताईच्या काळात जन्मच झाला नव्हता. त्यातून नवीन नवरी मुलगी आली की, तिच्यावर एखाद्या पोलीस इन्स्पेक्टर सारखी दीरांची, सासऱ्याची नजर राहायची. पहिली गोष्ट म्हणजे नवऱ्याशी चार मनातल्या दिलखुलास गप्पा मारण्याकरिता नवरा क्वचित उपलब्ध व्हायचा.

आमच्या ताईच्या लग्नानंतर १५ - २० वर्षांनी आमच्या भाऊंच्या बदलीच्या गावाला सासू - सासरा, दीर सोडून स्वतंत्र बिऱ्हाड करण्याची संधी मिळे तेव्हाच काय ते पतीशी सुख - दुःखाच्या गप्पा मारायचे काही प्रमाणात स्वातंत्र्य मिळाले असेल तेवढेच; पण याही बदलीच्या गावाला सासू - सासरे किंवा दीर आले की, हे स्वातंत्र्य कुठेतरी दडी मारून बसायचं. सांगायचा मुद्दा हा की, आमचे भाऊ असेच. वऱ्हाडात नोकरी करत असताना त्यांना मुलगा झाला. तसं - पाहिलं तर आमचे ताई - भाऊ भाग्यवान किंवा वऱ्हाडच्या मातीचा पायगुण म्हणा. दोघांनाही अगदी लवकरच्या वयातच पहिलं अपत्य झालं व तेही मुलगा. भाग्यवान याकरिता म्हणतो की, मुलगा झाला म्हणून. पहिला मुलगा झाल्यामुळे त्यांना आनंदाचा आस्वाद त्यांनी अर्थात सद्य:परिस्थितीसारखा त्यांचा आनंद स्वतंत्रपणे व्यक्त करण्याची जुन्या सनातनी संस्कारात मुभा नसावी. लग्न झाल्यानंतर आपल्या संसार वेलीला लवकर फूल आलं म्हणजे कोणत्या नवरा बायकोला आनंद होणार नाही? या आनंदामुळेच पुढे ताईला कमालीचा सासुरवास झाला तरी व भाऊंना एकत्र कुटुंब पद्धतीतील करत्या सवरत्या मुलाला उचलाव्या लागणाऱ्या जबाबदाऱ्या, संकटे व कष्टमय जीवन या सर्वांना न डगमगता तोंड देण्याची हिंमत, धैर्य आले असावे. या आनंदामुळेच म्हणा तर मुलाचं नाव शामसुंदर ठेवलं गेलं. हे नावचं आनंदाच द्योतक आहे. जणू श्यामलवर्णाचा कृष्णच जन्माला आला; किंवा

शामसुंदरचं टोपण नाव 'राजा' (याला राजा याच नावानं हाका मारीत) ठेवण्यात आलं.

आपला हा मुलगा राजमार्गाचं निदर्शक आहे असं त्यांना वाटलं असावं. त्यानंतर दोनचं वर्षानी ईश्वराने आमच्या ताई - भाऊंच्या पदरात दुसरं सुंदर, गोंडस, बालसौदर्याचं गाळून तयार केलेलं फळ टाकलं. या फळाचं अर्थात अपत्याचं नाव वसंत...!



# (३) अस्मादिकांचा अवतार

मी अस्मादिकांचा अवतार झालाय या शब्दप्रयोगात 'अवतार' शब्द मुद्दामहून वापरीत आहे. कारण अवतारी पुरुष अत्यंत संकटमय परिस्थितीत जन्माला येतो किंवा तो जन्माला आल्यानंतरची सामाजिक, सांस्कृतिक अथवा कौटुंबिक परिस्थिती चिंतादायक व संकटमय असते. आम्ही **२८ डिसेंबर** १९१८ या दिवशी पृथ्वीतलावर दर्यापूर येथे अवतरलो. मी जन्माला आलो त्यावेळची परिस्थिती अशीच संकटमय होती. १९१८ साल म्हणजे पहिले महायुद्ध संपत आल्यामुळे युद्धामुळे ब्रिटीश अंमलाखालील असलेल्या आमच्या हिंदुस्थानची जनता संत्रस्त झाली होती. शिवाय याच काळात सर्व देशभर इन् फल्यूएन्झांची साथ पसरली होती. या साथीमुळे हिंदवासीय लोक हवालदील झाले होते. युद्धामुळे महागाई झालीच होती. श्रीकृष्ण जन्माला आला होता; तेव्हा अशाच संकटमय परिस्थितीत वासुदेव - देवकी कंसाच्या तुरुंगात असताना 'कंसाचा मृत्यू वासुदेव - देवकीच्या सातव्या अपत्याकडून होणार' हे आकाशवाणीद्वारे कंसाला भविष्य कळल्यामुळे व कुठून आठवे अपत्य धरायचे याची कंसाला संगती न लागल्यामुळे स्वतःला मृत्युच्या संकटातून वाचविण्याकरता तो देवकीच्या पहिल्यापासूनच्या प्रत्येक अपत्याला मारीत सुटला. यातच आठवा कृष्ण सापडणार कारण या कृष्णावर कंसाकडून हत्या होण्याची टांगती तलवार होतीच. पण कृष्णाची यशोदेकडे पाठवणी होऊन यशोदेच्या नुकत्याच

जन्मलेल्या मुलीशी रद - बदली झाल्यामुळे कंसाचा मृत्यु अटळ ठरलाय व जगउद्धाराकरता श्रीकृष्ण राहिला एवढेच (अर्थात मानवी दृष्टीकोनातून विचार केल्यास.) पण श्रीकृष्ण संकटमय परिस्थितीत व वातावरणात जन्मलेला. त्यागी रामकृष्ण परमहंस अत्यंत दरिद्री व गरीब कुटुंबात जन्मलेले. ऋषी, मुनी व देव रावणासारख्या असुरांकडून यज्ञ विध्वंसामुळे व छळामुळे जेव्हा गांजले जात होते; तेव्हाच रामाचा जन्म झाला. तारकासुराने जेव्हा सर्व देव - गंधर्वांना संत्रस्त केले तेव्हा देव - गंधर्वांना या संकटातून मुक्त करण्याकरिता व तारकासुराचा वध करण्याकरिता कार्तिक याचा जन्म झाला.

तात्पर्य - अत्यंत संकटमय व चिंतामय परिस्थितीत जन्माला येणारा जीव कोणी अवतारी पुरुष होतो असा जर सिद्धांत काढला तर आम्ही कोणीतरी अवतारीच पुरुष होणार या समजुतीने समाधान मानावयास मला वाव मिळावा हे चुकीचे नव्हते. इतकेच काय पण मी जेव्हा आमच्या आईला पुढे समजू लागल्यावर.... “ताई, हे काय, माझा जन्म अत्यंत गांजलेल्या परिस्थितीत, सर्व देशातच काय पण जगात इन्फ्युएन्झाची साथ पसरली असताना व्हावा म्हणजे मी दुर्दैवीच नाही काय?"

असे म्हणायचो तेव्हा ताईचे हे एक ठराविक उत्तर असे की, “अरे वामन, तू कोणीतरी पुढे मोठा (अवतारी म्हणा तर) पुरुष होणार असशील."

असे ताईचे उत्तर ऐकल्यानंतर अंगावर मूठभर मासचं चढायचे म्हणजे अंगाने कृशाकृतीच होतो; पण पुढे मोठा

पुरुष होणार या (खऱ्या की खोट्या) समजुतीच्या समाधानातून येणारा आनंद व्हायचा. कारण खरोखरीचे अंगावर मांस चढले असते तर ते पाहिजेचं होते. त्यामुळे आमच्या कृशाकृतीत भर पडून व्यक्तिमत्वात सुधारणा होण्याच्या दृष्टीने फायदा झाला असता व पुढे - पुढे प्रकृतीच्या तक्रारी ज्या निर्माण झाल्या त्यांचे प्रमाण कमी झाले असते; पण असे व्हायचे नव्हते. कारण मी सर्वसामान्य माणूसचं राहणार होतो. शाळेत शिकत असताना जेव्हा माझ्या हे लक्षात आले की, नाटक कंपनीतले डोअरकीपरचे काम करणारे सारेच नोकर अथवा लोक काही नटसम्राट होत नाहीत; तेव्हा मी सामान्य माणूस का राहिलो याचा उलगडा झाला. असो.

तर आमच्या आई - वडिलांना त्यांच्या पहिल्या दोन मुलानंतर माझ्या जन्मामुळे त्यांना तिसराही मुलगा मिळाला म्हणून त्यांच्या आनंदात ईश्वरकृपा म्हणून भर पडली असेल व त्यांना कृतकृत्य झाल्यासारखे वाटतही असेल; पण माझ्या संवर्धनाच्या व मला वाढविण्याच्या कार्यात माझ्या सतत सुरू असणाऱ्या शारीरिक तक्रारीमुळे, दुखणी, आजार यामुळे त्यांना मिळालेल्या कृतकृत्यतेत वजाबाकीच सुरू झाली असेल. ज्या संकटमय परिस्थितीत मी जन्माला आलो किंवा ईश्वराने मला जन्माला घातलं असं म्हणू या त्यात माझ्या पुढे येणाऱ्या संकटमय जीवनाची ही नांदीच असेच ईश्वराला म्हणायचं असेल.

सैनिकी भाषेत बोलायचं म्हणजे - 'माझा संकटमय अवस्थेत जन्म ही पुढील संकटमय जीवनाला दिलेली पहिली सलामी.'

ईश्वराने इशारा दिला की, "तुझा जन्म झाला, आता तुझ्या पुढील संकटाशी मुकाबला करण्याकरिता तू तयार रहा."

अर्थात - हे तर त्रिकालाबाधित सत्य आहे की, प्रत्येक माणूस जन्माला जो येतो ते सुख - दुःखाने भरलेल्या जीवनाला तोंड देण्याकरिताच. काहींच्या जीवनात सुखाचे प्रमाण जास्त असेल; तर काहींच्या जीवनात दुःखाचं प्रमाण जास्त असेल. हा ज्याच्या त्याच्या नशीबाचा अथवा पूर्वसंचिताचा परिणाम असेल; पण 'जगी सर्व सुखी कोणी नाही' हे निश्चित. त्यामुळे दु:खाचं अथवा अपयशाचं प्रमाण माझ्या जीवनात बरेच जास्त असल्यामुळे मी भाग्यवान ठरलो नाही. तरी दुःखाशिवाय कोणत्याच प्राणीमात्राचे जीवन असू शकत नाही. हा सिद्धांत मला पुढे समजू लागल्यावर, लक्षात आल्यानंतर या एका समाधानातून मी संकटांना यशस्वीपणे तोंड देण्याकरिता लागणारी हिंमत धरू शकलो. असो.

तर विशेष महत्वाचा मुद्दा म्हणजे असा की, आपल्याला मुलंच व्हावीत म्हणून जो एक औत्सुक्याचा व आनंदाभर असतो तो पहिल्या दोन मुलांपर्यंतच सर्वसाधारणपणे असतो. म्हणजे असं की, लग्न झाल्यावर संसारात शिरल्यानंतर पती - पत्नीच्या मनातील प्रारंभीची सुप्त आकांक्षा हीच असते की, पहिला आपल्याला मुलगा

व्हावा, दुसराही मुलगाच असावा आणि ही आकांक्षा जितकी आग्रही असते तितका आग्रहीपणा तिसराही मुलगाच असण्याबद्दल नसते. म्हणजे मुलगा असला तरी चालेल. मुलगी असली तरी चालेल. साधारण मुलगा का मुलगी कोण व्हावं याबद्दल जरा उदासीनता असते. त्यातूनही मुलगी होण्याबद्दल औत्सुक्य जरा अधिकचं असत का तर जावयाकरिता. अर्थात अपत्य हवं असतं.

जुन्या कालमान परिस्थिती संदर्भाला अनुसरून तिसरा मुलगाच असावा असा मानसिक आग्रह नसतो. आता तर लग्न झालेल्या प्रत्येक युवक - युवतीमध्ये अपत्य दोनच असावीत व ती मुलंच असावीत ही महत्वाकांक्षा अथवा उत्कट इच्छा मानसशास्त्रीय दृष्ट्या असते.

तेव्हा माझा जन्म वरील - उदासीन परिस्थितीत झाला असल्यामुळे मी मुलगा म्हणून जन्माला आलो म्हणून आनंद झाला असेल पण पहिल्या दोन मुलांचा जन्म जो विशेष असामान्य आनंदाचा व कौतुकाचा भाग झाला असेल तितका तीव्र व कौतुकाचा वाटा माझ्या जन्मामुळे मिळाला नसावा. यात हेतूत: तसं काहीच नाही ही विशेष परिस्थितीने आखलेली मानसिक प्रक्रिया आहे. तसं मला जन्मतः विशेष बाळसं असावं असं वाटत नाही. सर्वसामान्य मुलाप्रमाणे असेल तेवढेच तसेच ताईच्या (माझ्या आईच्या) सांगण्यावरून मी बाळ असतानाच अतिसाराची - पोटाची मला तक्रार होती व प्रकृती ही तोळा - मासाच होती. तेव्हा मी संकटमय परिस्थितीत सर्वसामान्य गुण (यात दोष

आलेचं) जन्माला आल्यामुळे माझे कौतुक व्हावयास पाहिजे होते असं सामान्य माणूससुद्धा म्हणणार नाही.

**अर्थात** - आईला सारी मुलं सारखीच असतात. उलट दोषासहित असलेल्या मुलाबद्दल आईला जास्त काळजी असते. माझ्यातील सामान्यत:, दोष, उणेपणा यांना सांभाळून विशेष प्रसंगी कौतुकही करून मला माझ्या ताई - भाऊंनी जे वाढवले व माझ्या सामान्यपणाचेही जे उदार मनानं कौतुक केलं असेल याबद्दल तर मी त्यांचा आजन्म ऋणी आहेचं.



# (४) मला विंचू चावतो

लहान बाळ असताना घडलेल्या घटना पुढे समजू लागल्यावर त्याच्या आई - वडीलांकडून त्या कळत असतात. मी एक - दीड वर्षाचा असताना घडलेली घटना की, जी मला माझ्या आईकडूनच कळली अर्थात सविस्तर देत आहे. ही घटना दर्यापूरचीच असावी. देवळात जाण्याकरिता माझ्या ताईकडे काही बाया आल्या. मला ताईने कपडे केले म्हणजे झबले घातले. झबलं चांगलं नवं असावं. लहान बाळाला देवदर्शनाला घेऊन जाण्याचा उद्देश असावा. देवाच्या पायाशी बाळाचं डोकं ठेवलं म्हणजे बाळ सुखी रहात, त्याला बाधा - बिधा होत नाही ही कल्पना.

नवं झबलं, नवीन चड्डी घातली. खुंटीला एक जरीची टोपी (टोपरं म्हणा) होती. नवीन कपडे घातल्यानंतर खुंटीवरची ही जरीची टोपी काढून ती अस्मादिकांच्या (बाळाच्या) डोक्यावर ठेवली. टोपी दाबून घातली पडू नये म्हणून. डोळयात काजळ व गालावर काजळाची टिकली लावलीचं होती.

इतर बायाबरोबर ताई देवळात आली. घरून देवळात येण्यात दहा - पंधरा मिनिट गेली असावीत. ताई देवळात शिरली नी मी रडू लागतो. ताईला बाळ का रडत आहे हे कळेना. मी काकूळतीने रडायला सुरूवात केली. इतका की मी रडून - रडून घामाघूम झालो. ताईला वाटलं बाळाच्या पोटात दुखत असेल आणि मला पोटाची तक्रार होतीच. मी घाबरा होऊन रडायला लागतो. ताई घाबरली,

साऱ्या बाया घाबरल्या कारण मी कासावीस होऊन रडायला लागलो. तो इतका की, मी बेशुद्ध पडतो की काय असे वाटले आणि रडण्याच्या भरात चिमुकले हात खाली वर करीत असताना डोक्यावरची टोपी चुकून खाली पडली ती उलटी. टोपी घ्यायला व उचलायला म्हणून ताई टोपी घेणार तो तिला टोपीच्या तळाशी गोल - गोल फिरताना विंचू आढळला. आता सारा उलगडा झाला, मी का इतका काकुळतीनं रडत होतो याचा. ताई घाबरली; बायकाही घाबरल्या. विंचू केवढा होता हे काही मला आता आठवत नाही; पण एका लहान बाळाला विंचवाने नांगी मारणं व तेही डोक्याच्या टाळूवरील भागाला म्हणले लहान बाळाच्या दृष्टीनं जीवावरचा प्रसंग अर्थात ताई घाबरलीच असेल. मला तर कधी - कधी हा प्रसंग आठवला म्हणजे अजूनही अंगावर शहारे उभे राहतात. पुढे मला जेव्हा वयाने मोठा झालो असताना दोनदा विंचू चावला तेव्हाच्या वेदनाची तीव्रता लक्षात येता मला अजूनही असे वाटतं की, एक छोटे लहान बाळ डोक्याला किंवा टाळूला विंचू चावला असताना जिवंत कसं राहील? घरून निघून येऊन देवळात येईपर्यंत त्या विंचवानं डोक्यात कशी हालचाल केली नाही. आपण टोपी घालताना बाळाला टोपीच्या आत न पाहता टोपी घातली याबद्दल ताईला बरंच वाईट वाटलं असणार व पुढे आता बाळाचं काय होते की, काय नाही याबद्दल सतत काळजीत राहिली असणार.

मनात तिच्या निरनिराळे वाईट विचार आले असणार. पण देवाला तिची नी विशेषतः आमची विशेष

काळजी होती; असं दिसतं अर्थात विंचू चावून कोणी मरत नाही असं म्हटलं तर आयुष्य असलं तर साप चावूनही कोणी मरत नाही आणि आयुष्य सरत असलं तर छातीवर कोमल फूलांची माळ पडूनही जीव दगावतो.

प्रत्यक्ष इंदुमतीचचं उदाहरण घ्या. त्याचे असे झाले की, नारदाच्या वीणेवरील फुलांची माळ तिच्या वक्षःस्थलावर पडली आणि ती गतप्राण झाली. असो.

लहानपणी मी तान्हे बाळ असताना माझ्यावर आलेले मी गंडांतर समजतो. शिवाय लहानपणीच मला विंचवानं दंश केल्यामुळे तुला पुढे तुझ्या हितशत्रूकडून असेच दंश होत राहणार असा देवळातच विंचू चावल्यामुळे देवानं दिलेला तो इशारा असावा. तसं तर मी दर्यापूरला इतका लहान होतो की, वर उल्लेख केल्याप्रमाणे विंचू चावण्याची घटना ही एक गंडांतर म्हणूनच माझ्या ताईनं सांगितली म्हणून व एक अविस्मरणीय म्हणून मीही लिहू शकलो.

बाकीच्या गोष्टी मला मुळीच आठवत नाहीत. साधारणतः मी ४ - ५ वर्षाचा झाल्यावर व मला थोडे कळू लागल्यानंतर काही - काही घटना मला थोड्या फार प्रमाणात आठवतात. वडील (भाऊ) इकडे विदर्भात असल्यामुळे ताई वर्षा - दोन वर्षांनी माहेरी जात असे. तेव्हा मी चार - पाच वर्षाचा असताना ताई आम्हा तिघांना (मी, वसंत व शामसुंदर (टोपण नाव - राजा) घेऊन पहिल्यांदा माहेरी आलेली आठवते. ती नगर - जिल्ह्यातील जामखेड येथे.

# (५) मी मुलींच्या शाळेत जातो

ज्या जामखेड येथे मुलांना घेऊन ताई आली ते जामखेड तहसिलीचे ठिकाण. येथे माझ्या ताईचे वडील म्हणजे माझे आजोबा दामोदर सबनीस हे मामलेदार होते. ते अगदी कारकुनापासून मामलेदाराच्या हुद्द्यापर्यंत चढले होते. मामलेदार म्हणजे मॅजिस्ट्रेट. त्यांना सेकंडक्लास मॅजिस्ट्रेटच्या पॉवर्स होत्या. ते तहसिलीचं (तालुक्याचे) सर्वात वरिष्ठ अधिकारी. तालुक्याचा अनभिषिक्त राजाचं. त्यांना राहण्याकरिता सरकारकडून बंगला दिला होता. तो बंगला माळवदाच्या घरासारखा एक मोठा वाडाच होता. वाड्याला कोटासारखी भिंत वाड्याला पुढचे दिंडी दरवाजासारखं गेट. आत शिरल्याबरोबर डाव्या बाजूला मोठी गॅलरी अथवा ओटा व त्यावर बैठक. खाली फरसबंद अंगण त्यातून आत शिरल्यावर मोठी लांबट हॉलसारखी खोली. या खोलीच्या बाजूला स्वयंपाकघर. खोलीच्या आत माजघर. माजघरावरून जीना व वर एक खोली. आजूबाजूला दोन खोल्या. पाठीमागे सहज जिन्यावरून उडी मारून जाता येईल अशी भिंत. माझे आजोबा मामलेदार असल्यामुळे त्यांचा गावातील लोकांना धाक तर होताच; पण त्यांच्याशी सारं गाव आदबीनं वागे. ते ज्या तहसील कोर्टात - कचेरीत काम करीत असतं ती गावापासून चांगली दोन मैल अशी मोकळयावर असे आणि कचेरी लांब असल्यामुळे त्यांना सरकारकडूनच एक दोन घोड्यांचा टांगा त्यांच्या दिमतीला होता. मी लहान चार - पाच वर्षाचा

असल्यामुळे टांग्यात बसण्यास नेहमी मी उत्सुक असे. टांगा आजोबांना कचेरीत सोडून परत आला की, कधी - कधी आम्ही त्या टांग्यात बसून कचेरीत जात असू. माझ्यापेक्षा माझा मोठा भाऊ वसंत तीन वर्षांनी मोठा तो आठ - नऊ वर्षाचा असावा.

मला एकंदर मावश्या तीन. सर्वात मोठी सीता मावशी व या नंतरचे खालचे नंबर नागू मावशी, शांता मावशी. ही शांतामावशी जवळपास माझ्या मोठ्या भावाच्या - वसंताच्याच वयाची. ती सात - आठ वर्षाची परकरीच होती. आम्ही सारे टांग्याने आजोबांच्या कचेरीत जात असू. या कचेरीच्याच बाजूला एक बाग होती. टांग्यात आई वगैरे घरची मंडळी असली तर या बागेतच आराम करीत असू. अजून मला आठवते की, मी टांग्यातून कचेरीत गेलो असताना मी मामलेदारांचा नातू असल्यामुळे मला शिपाई हाताशी धरून मोठ्या काळजीत घेऊन चालले होते.

मी कचेरीत आल्याबरोबर समोर ३ - ४ पायऱ्यांवर उंच व्हरांड्यासारखी जागा व त्यावर एक उंच आसन, ज्यावर माझे आजोबा दामोदरपंत डोक्याला लाल फेटा बांधलेला, बंद गळयाचा लांब कोट व पांढरे धोतर, डोक्याला चष्मा व हुकूमी आवाजानं बोलणे. त्यांच्यासमोर हातात बेड्या घातलेले तीन - चार चोर - दरोडेखोर. या चोरांनी दरोडा घातला होता म्हणून त्यांच्यावर खटला सुरू होऊन त्यांना माझे आजोबा शिक्षा फर्मावित आहेत. अशा अभिनिवेशात त्यांना पाहिल्यामुळे आजोबांचा माझ्या मनावर इतका जबरदस्त पगडा बसला व भितीयुक्त आदर

निर्माण झाला की, मी कधी - कधी त्यांच्यासमोर यायलासुद्धा भीत असे. त्यांची घरातही शिस्त व धाक. मी त्यावेळेस ५ - ६ वर्षाचा असल्यामुळे मी माझ्या परकरी मावशीबरोबर, ती पोरगीलीशी होती, म्हणून शांता मावशी. या मावशीबरोबर जास्त रहात असे. तिच्याच बरोबर खेळत असे. बहुधा ती जिथे जात असे तिथे जात असे. या जामखेडला एक लहान मुलींसाठी शाळा होती. ही मुलींची शाळा सकाळची असे. काही दिवसांनी सकाळच्या वेळेत ती मला दिसेना. तिला मी खूप शोधलं. मग मला कळलं की, तिनं मुलींच्या शाळेत जाणं सुरू केलं. ती अशीच घरी आल्यावर मी तिच्याशी कट्टी केली. दुपारीही तिच्याबरोबर खेळलो नाही. तिनं माझा राग घालविण्याचा, काहीतरी खायला देऊन प्रयत्न केला. मग मी तिला म्हटलं, "तू मला शाळेत का नाही घेऊन गेलीस?"

“अरे वामन, इतका कसा तू बावळट. मुलींच्या शाळेत तू कसा येतोस, तुला चिडवतील की, मुलीत मुलगा लांबोडा, भाजून खातो कोंबडा...”

मी सहज म्हटलं, "कोंबडी बरोबर कोंबडा गेला तर काय हरकत आहे.”

माझं हे निष्पाप बुद्धीने बोललं गेलेलं वाक्य ऐकून ती म्हणाली, "अरे तू किती लबाड आहेस रे, अरे तू शाळेत जायला फार लहान आहेस बावळटा. मला मास्तर, मुली नावं ठेवतील.”

नंतर दुसऱ्या दिवसाची गोष्ट. तिनेचं माझा हात धरला व म्हणाली, "वामन, चल माझ्याबरोबर शाळेत.”

मला फार आनंद झाला व तिच्याबद्दल आदर पण वाटला. वाटलं आपला हट्ट पुरा करते, किती चांगली आहे माझी मावशी. मग मी या मावशीबरोबर मुलींच्या शाळेत जाऊ लागलो.

माझी मावशी मला रोज शाळेत आणते असे पाहून मास्तरीणबाई ओरडल्या, “या तुझ्या भाच्याला रोज कशाला आणतेस शाळेत?”

मावशी उत्तरली, "तो रोज पाठीमागे लागतो.”

मग माझ्याकडे वळून व मला दटावून मास्तरीणबाई म्हणाल्या, “अरे, काय रे बाळ इथे काय जेवण आहे का की, तू रोज या तुझ्या मावशी बरोबर येतोस? तिथे बाजूला कोपऱ्यात बैस. मुलीबरोबर बसायचं असेल तर पाटी घेऊन येत जा. शिकावे लागेल. मुळाक्षर काढावी लागतील.”

मी मग मास्तरीणबाईंना म्हटलं, "मला मुळाक्षर काढणे नाही जमलं तर....”

मास्तरीणबाई उत्तरल्या, "या छडीने (हातात एक छडी होतीचं) मार खावा लागेल.”

हे ऐकल्यापासून मी माझ्या मावशीबरोबर शाळेत जाणं सोडून दिलं. वाड्यासारख्या घराच्या पाठीमागच्या बाजूला एक ठेंगणी भिंत होती. त्या भिंतीवर चढून पलीकडच्या बाजूला पळून जाण्याचे, शिवाशिवीचे असले खेळ खेळत असू. विशेषतः घोड्याच्या टांग्यांत बसून जाण्याची नेहमी हौस. या टांग्यांत बसून आजोबांच्या कचेरीच्या बाजूला असलेल्या बगीच्यात बराच वेळ उड्या

मारणे, धावणे, पळणे, लपवा - लपवीचे खेळ हेही खेळलो आहोत. असेच अंधुकसे आठवते.

आम्ही बगीच्यातून परत येताना माझ्या शांता मावशीच्या मास्तरीणबाई भेटल्या व त्या माझ्या मावशीला म्हणाल्या की, "तू उद्या शाळेत ये. डबा पार्टी आहे. डब्यात खाण्याचे जिन्नस घेऊन ये."

माझ्याकडे पाहून "याही तुझ्या भाच्याला बरोबर घेऊन ये." हे ऐकून मला फारच आनंद झाला. मला रात्रभर झोपच लागली नाही. जी काय थोडावेळ झोप लागली तर त्या झोपेत स्वप्नात पदार्थांनी भरलेला डबा दिसायचा.

मावशी सकाळी ४ वाजता उठली.

मीही जागा होतोच. मी पण उठलो. मावशीने डब्यात भाजणीचं थालीपीठ, पोळया, भजे, पिठलं, २ - ३ कांदे, लिंबू व रव्याचे लाडू हे सर्व भरलेलं मी पाहिलं.

सर्व आटोपून ती सकाळी ७ ला शाळेला निघाली व मला न विचारताच जाण्याची घाई करु लागली.

तिला मी म्हणालो, "तू मला नाही नेत?"

"तुला नेणं बरं दिसणार नाही." ती उत्तरली.

"अगं, पण मला तुझ्या बाईंनी घेऊन यायला सांगितलं." मी.

"ते उगीच रे. म्हणायचं म्हणून म्हणाल्या त्या." मावशी.

"मी तुझ्या बाईजवळ तक्रार करीन." मी.

"काय तक्रार करणार आहेत रे तू?" माझ्या पाठीत धपाटा घालून मावशी.

"तू बाईंचे ऐकत नाहीस म्हणून.... तुला शिक्षा करायला सांगेन." मी.

"बरं, बरं चावटपणा करू नकोस चल लवकर."

मग मावशीबरोबर मी निघालो.

मावशीच्या शाळेत आल्यावर बाई सर्व मुलींसकट (मुलगा एकटा मीच) गावाबाहेरच्या बगीच्यात गेलो. तेथे सर्वांनी डबे सोडले व जेवण केलं. मग मी बाईंनी म्हणालो, "बाई, तुम्हीच म्हणाला होता इथे जेवण आहे का? आज पहा बरं, खरंतर इथे जेवण आहे."



# (६) बरं झालं, माझी मुंज झाली नाही

जामखेडहून आमची ताई सासरी परत यायला निघाली. तिच्याबरोबर आम्ही तिची तीन मुलं निघालोच; पण निघताना माझी सर्वात मोठी मावशी, सौ. सीता मावशी ही पण ताईबरोबर यायला निघाली. अर्थात आम्ही येणार होतो ते मध्य प्रांतात असणाऱ्या धामणगावला; कारण वडिलांची (भाऊंची) बदली धामणगावला झाली होती. सीतामावशी ताईबरोबर येणार होती याचं कारण म्हणजे तिला ताईबद्दल फार प्रेम, आदर, आपुलकी वाटत होती. आमची ताई तिला आईच वाटायची.

सीतामावशीच्या खालच्या दोन बहिणी नागूमावशी व शांतामावशी यांच्याशी तिचं कधीच पटत नसे. या धाकट्या दोन्ही मावश्या तिच्याशी भांडायच्या. ताई मात्र सीतामावशीशी अगदी प्रेमळपणाने, सहानुभूतीने वागायची, तिचं सर्व करायची. ही सीतामावशी बहुधा आजारी असे. तिला क्षयाची भावना होती असे म्हणतात. जवळ - जवळ नवऱ्याने तिला टाकलचं होत. ती नेहमी मनात कुढायची. ताई एकदम तिला बरोबर न्यायला तयार झाली. आम्ही धामणगावला आलो. धामणगावला आल्यानंतर मात्र सीतामावशीची प्रकृती फार बिघडली. ती इतकी की दुखण्यात ती दगावलीच. आमची ताई फार रडली. अश्रू ढाळत होती; पण उपाय नव्हता, सीतामावशीच्या अंगावरचं जे सोनं - नाणं होतं ते ताईनं

सर्व तिच्या वडिलांकडे अर्थात तिच्या दादाकडे (दामोदर पंतांकडे) पोचतं केलं.

नंतर या घटनेनंतर ६ - ७ महिन्यांनंतरची घटना. राजा व वसंत या दोघांची मुंज करायचं ठरलं. राजा असेल ९ वर्षाचा व वसंत ७ वर्षाचा अर्थात वय नक्की आठवत नाहीत; मी पण असेन ४ - ५ वर्षाचा. माझीही मुंज करा म्हणून मी हट्ट धरला; पण तिघांची मुंज एकदम करता येत नाही हे एक कारण व दुसरं मी फार लहान, मुंज करण्याच्या वयाचा नव्हतो. मला फार वाईट वाटलं. मी रडू लागतो. राजा - वसंत, दोघांची मुंज म्हणून त्यांची वरवर, त्याचं कौतुक. त्यांना नवीन कपडे, नवीन रेशमी लंगोट, नवीन त्यांच्या करता मुंडावळया आणल्या होत्या. आपल्या वडील दोन भावांचा किती थाट, कौतुक. मी बसलो हिरमुसला होऊन. झालं मुंजीचा दिवस आला. अर्थात मलाही नवीन कपडे होते. पण त्या दोघांचेच कौतुक. मी फार लहान नंबर. वडील भावांची मजा असते. लहान्याला, धाकट्याला कोण विचारतो. ‘नकटं व्हावं पण धाकटं होऊ नये’ हे खरं.

उत्सव सुरू झाला. वाजंत्री वाजू लागली. नातेवाईक पाहुणे मंडळी जमू लागली. सकाळची वेळ होती. पहिल्यांदा मोठ्या भावाची (राजाची) मुंज लागली. मुंज लागल्यानंतर भाऊंच्या (वडिलांच्या) मांडीवर बसले. नंतर होम - हवन झाले. मुंज्या मुलांना भिक्षावळ - कोणी चांदीचे भांड, कोणी पळी, कोणी ताम्हण, कोणी पाकिटात बंद करून मिळत होती. मला वाटलं आपली मुंज केली असती तर

आपल्यालाही भिक्षावळ मिळाली असती; मग राजा आणि वसंताची मुंज झाल्यावर त्यांना गुरूजी सकाळ - संध्याकाळ संध्या म्हणावयास सांगत असत. त्यांना सारी संध्या संस्कृतमध्ये म्हणावी लागत असे. रोज हे संधेचे सोपस्कार. मी पाहात होतो. मला मनात वाटायचं हा काय जबरदस्तीचा मामला रोजचा त्रास. वडील कडक होते. ते रोज राजा व वसंताकडून म्हणवून घ्यायचे. दोन - तीन दिवस त्यांना बरं वाटलं, नवीन म्हणून; पुढं त्यांनाही कंटाळा येऊ लागला. मी हे पाहत असताना माझ्याजवळ कोणीतरी गृहस्थ (आमच्या वडिलांचे मित्र) उभे होते. ते माझ्या पाठीवर हात फिरवित म्हणाले, "वामन, बरं झालं की नाही तुझी मुंज झाली नाही ते...! अरे या दोघांची रोजची ही कटकट, मंत्र म्हणणं, जमलं नाही म्हणजे पुन्हा गुरुजींनी म्हणवून घेणे, रोज लंगोटी घालून म्हणणं, जानव्याचा दोरखंड हातांनी खाली वर करीत बसणं”

आणि हे झाल्यावर मी त्यांना म्हटले, "पण हे दोघे ब्रम्हचारी आहेत."

“अरे ब्रम्हचारी म्हणजे तुला कोण वाटले?” गृहस्थ.

“ब्रम्हाचे - ब्रम्हदेवाचे आचारी." मी.

“हत् बावळया, हे ब्रम्हदेवाचा स्वैंपाक करणारे झाले कारे? छट.... छट...." गृहस्थ

"मग....” मी.

“अरे हे ब्रम्हचारी म्हणते गुरूच्या आश्रमात जाऊत यांना बारा वर्षेपर्यंत विद्याभ्यास करावा लागेल. घरी

यायला मिळणार नाही. यांना लग्न नाही करता येणार." गृहस्थ.

"मग यांना लग्न केव्हा करायला मिळेल" मी

"अरे यांनी ही केलेली मुंज सोडल्यावर म्हणजे यांनी सोड मुंज केल्यावर." गृहस्थ.

"मग यांनी मुंजच कशाला करून घेतली?" मी.

"मग मी काय तेचं तर म्हणतो. तू बसला मुळूमुळू रडत. मुंज केली नाही म्हणून...." गृहस्थ.

"हे खरं आहे. बरं झालं माझी मुंज झाली नाही हे. मला लग्न तरी करता येईल."



# (७) मी सांष्टांग नमस्कार घालतो

धामणगावच्या ज्या घरात राजा आणि वसंताच्या मुंजी झाल्या ते घर सोडून आम्ही धामणगाव स्टेशनपासून यवतमाळकडे जाणारा जो मुख्य रस्ता आहे त्या रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या चाळीवजा घरात राहायला आलो. साधारणपणे ही १९२७ ती गोष्ट असावी आणि मी ८ वर्षाचा असावा.

धामणगावच्या प्रायमरी शाळेत तुकडी पहिलीत मी शिकत असेन. आमची प्रायमरी शाळा स्टेशनच्या पलीकडच्या बाजूला होती. म्हणजे शाळेत जाण्याकरता स्टेशनचा रेल्वे पूल ओलांडून एक - दिड फर्लांगावर असलेल्या शाळेत वळणे घेत - घेत जावं लागत असे.

त्या वेळचा एक प्रसंग अजूनही माझ्या डोळ्यासमोर आहे व तो धरणेवाल्याचा. आम्ही लहान मुले (मी व माझे २ - ३ सोबती) पूल ओलांडून रस्त्याला लागलो म्हणजे एक फाटके तुटके कपडे घातलेला, दाढी वाढवलेला, केस पिंजारलेला, उंच पण मध्यम बांध्याचा, हातामध्ये काळं भिक्षापात्र घेतलेला, तोंडानं काहीतरी पुटपुटणारा (जरा वेड्यातच जमा होणारा) भयानक चेहऱ्याचा ४० - ४५ वर्षाचा माणूस बाजार ओळीत इकडून तिकडे नियमाने फेऱ्या घालीत असे. हा लहान मुलांना पकडतो. अशी वंदता पसरली होती. लहान मुलगा दिसला रे दिसला की त्याच्या पाठीमागे लागून त्या लहान मुलांना हा पकडतो. असे आमच्या प्रायमरी शाळेतील सारी मुले सांगत असत. हा

लहान मुलांना धरत असे म्हणून याला धरणेवाला म्हणत असत. आमच्या एक - दिड फर्लांगाचा पूल ओलांडल्यानंतरचा शाळेत जाण्याचा तो रस्ता होता तो बाजार ओळीतूनच जात असे. तेव्हा आम्ही नेहमी ही दक्षता घेत असू की, हा धरणेवाला ज्या थोडा वेळापर्यंत रस्त्यावर फिरताना दिसत नसे ती वेळ साधून आम्ही रस्त्यावरून शाळेला जात असू. पण एकदा हा अदमास चुकला. हा धरणेवाला रस्त्यावर नाही असे समजून आम्ही रस्त्यावर आलो व चालू लागलो तो काय आमच्या समोरच तोंडानं काहीतरी पुटपुटत असलेला हा धरणेवाला; मग आमची काय म्हणता गाळण उडाली. आम्ही दोघे तिथे जीवाच्या आकांताने घाबरून इतक्या वेगाने पळत सुटलो आणि शेवटी पळता - पळता जमिनीवर सांष्टांग नमस्कार (मी व माझ्या एका मित्रांनी) घातला. मागे वळून पाहिले तर तो धरणेवाला हसत होता. गुडघ्याला खरचटलं होतं तरी तसेच उठलो व परत पुन्हा पळू लागतो व शाळेच्या अंगणातच येऊन थांबलो.

नंतर शेवटी आमच्या शिक्षकांना जेव्हा हे कळलं तेव्हा त्यांनी आम्हालाच वेड्यात काढलं आणि म्हणाले, "तो धरणेवाला वगैरे कोणी नसून कोणीतरी तुमच्या डोक्यात भरवून दिलंय. अरे, तो वेडा भिकारी आहे. पुन्हा असा मूर्खपणा करु नका." असा आम्हाला समज दिला.

दुसरी नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे मी ८ वर्षाचा असताना माझ्या पाठीवर मला दोन भाऊ झाले होते व मला तिसरा भाऊ होणार होता. या चाळीवजा

घरात आल्यानंतर आमच्या ताईला सातवा महिना होता. माझ्या पाठीवर हे दोन भाऊ झाले. त्यांच्याबद्दल त्यांच्या नावाशिवाय मला काहीच आठवत नाही. एकाचे नाव होतं प्रभाकर तर दुसऱ्याचं नाव होतं मुरलीधर. इतक्यात आमच्या भाऊंची वर्धेला बदली झाली होती. तेव्हा भाऊ एकटेच वर्धेला गेले होते. ताईच्या तिसऱ्या मुलाच्या बाळंतपणाकरता माझे आजोबा (श्री. मार्तंडराव) व आजीबाई (सौ. सरस्वतीबाई) माझ्या वडिलांचे वडील व आई आले होते. आजोबा - आजीबाई बरोबर आमचे सर्वांत धाकटे काका अंतूकाका हे पण आले होते. आमच्या या आजोबांनी व काही काकांनी आमच्या ताईला फार छळलं हे मागे आलंच आहे. आजोबा शीघ्रकोपी, नेहमी अपशब्द वापरणारे, भाषा शिव्यांनी भरलेली असे. होते स्वभावानं जरा पोरकटातच जमा, ताईच्या बाळंतपणाकरता आजोबा - आजीबाई व काका आल्यामुळे आमचे भाऊ वर्धेला बदलीच्या गावी निर्धास्त होते. ते फक्त वेळेला येणार होते. आजोबांच्या काही मर्जी विरुद्ध झालं किंवा काय काही कळत नाही ते एकदम आमच्या ताईवर संतापले. ते अगदी शुल्लक गोष्टीवरून संतापत असत व त्यांचे बहुधा कोणाशीच जमत नसे. आजोबाबरोबर आजीबाईही तावातावानं बोलू लागल्या.

माझ्या ताईची सहनशक्ती संपली. ती पण आजोबा - आजीबाईशी रोखठोक जबाब विचारल्यासारखं बोलू लागली. झाले आजोबांनी तिला आम्ही निघून जातो म्हणून धाक घातला.

आमची ताई मुळीच घाबरली नाही ती पण म्हणाली, “खुश्याल निघून जा, माझी काळजी परमेश्वरालाच आहे. माणसं काय करू शकणार आहेत."

आजीबाईही सुनेचं निर्भय व बिनतोड उत्तर ऐकून चिडल्या. ही दुपार दिड - दोनची वेळ असेल. काठीवर नुकतेच धुणं वाळत घातले होते. ते सर्व धुणे काठीवरून तरातरा ओढत ओले पिळे खांद्यावर घेऊन तिघेही (आमचे धाकटे काकासुद्धा) जायला निघाले. जाताना रस्त्यावरून वटवट करीत, शिव्या देत - देत जाऊ लागले. आम्ही पाहात बसलो. धाकट्या काकांनी तर "तुझ्या राजाचे लग्नचं होणार नाही."

असा शाप द्यायलाही कमी केलं नाही. ते रागानं निघून गेल्यानंतर आम्हाला कसंसचं वाटलं; पण आमची ताई मोठी धीराची. ती मात्र डगमगली नाही.



# (८) माझ्या पाठीला तापलेल्या पळीचा डाग

बाळंतपण करायला आलेले नातेवाईक ते न करता निघून गेले म्हणजे बाळंत होणाऱ्या स्त्रीच्या मनाची केवढी घालमेल होत असेल याची कल्पनाच करवत नाही. त्यातून बाळंतपण करायला आलेले सासू - सासरे भांडून निघून जावेत म्हणजे बाळंत होणाऱ्या सुनेची केवढी कुचंबणा पण हे सर्व आमच्या ताईने सहन करून प्रसंगाला धैर्याने तोंड द्यायचं ठरवलं होतं. याच काळात धामणगावचे एक प्रख्यात डॉक्टर बापट यांच्याशी व त्यांच्या कुटुंबियांशी आमचा अत्यंत घरोबा होता. डॉक्टरांची व त्यांच्या मंडळीची खाण्या - जेवणाला बोलावण्यापासून ते जे काय लागेल ते जिन्नस देण्यापर्यंतच्या अडचणींना उपयोगी पडण्याच्या दृष्टीने बरीच मदत होती.

बापट डॉक्टरांनाही तीन मुलं व एक मुलगी असल्यामुळे आम्ही तिघेही भाऊ नेहमी त्यांच्याकडेच खेळावयास जात असू. आमच्या घरापासून एक फर्लांगच्या अंतरावर डॉक्टरांचे बंगले वजा घर की, ज्यात त्यांचा दवाखानाही होता. औषध - पाण्याची मदत तर होतच होती. आता पहा योग असा की, ज्या दिवशी ताईचे सासू - सासरे ताईशी भांडून निघून केले तो दिवस माझ्या ताईच्या व माझ्याही जीवनात एक अविस्मरणीय दिवस ठरला. सासू - सासरे भांडून निघून गेल्यानंतर आमच्या ताईला जी काय भिती वाटत होती ती आमच्या भाऊंची.

ताई सासू - सासऱ्यांशी भांडली म्हणून ते निघून गेले असे भाऊंना कळले म्हणजे ते ताईला दोष देतील, रागावतील, धारेवर धरतील याच एका गोष्टीला ताई भीत होती. तिच्याजवळ एक मोठा अफूचा गोळा होता. तिनं ठरवलं होत की, जर भाऊ तिच्यावर संतापले, तीच म्हणणं व्यवस्थित ऐकून न घेता, तिच्या सासू - सासऱ्यांना म्हणजे आमच्या भाऊंच्या आई - वडिलांना भांडून तिनं घालवून दिलं असा ग्रह जर भाऊंना झाला तर खचित आपल्यावर नाखूष होऊन रागवतील. कारण भाऊंना बायकोबद्दल जरी प्रेम वाटतं असलं तरी आई - वडिलांबद्दलसुद्धा त्यांना प्रेम असलंच पाहिजे. शिवाय त्या जुन्या काळात बायकोवर वेळेस अन्याय करून मातृ - पितृ भक्ती करणारे लोक होतेच. शिवाय भाऊसुद्धा त्यांचे आई - वडील वऱ्हाडात आले होते म्हणून त्यांच्याकरिता त्यांनी वऱ्हाडात बदली करून घेतली होती हे मागे आलेच आहे. म्हणून ताईने ठरवले होते की, तिनं स्वतः जवळ तो अफूचा गोळा ठेवला होता. तो भाऊ रागावून तिची खरडपट्टी काढू लागल्यास व मारायचा धाक घातल्यास खाऊन टाकायचा. पण योग असा ज्या दिवशी दुपारी ताईचे सासू - सासरे भांडून गेले त्याच दिवशी रात्री दहा वाजता आमचे भाऊ आले आणि त्याच दिवशी रात्री साडे बाराच्या सुमारास रात्री एक - दीड वाजता आमची ताई बाळंत झाली.

भाऊ दहा वाजता आल्यानंतर त्यांच्या सर्व न सांगता लक्षात आलं. त्यांनी झालेल्या भांडणाच्या घटनेबद्दल चकार शब्द काढला नाही. उलट समंजसपणे समजुतीने आमच्या

ताईची स्थिती त्यांच्या लक्षात आली. शिवाय स्वतःच्या वडिलांचा आक्रसताळ्या, पोरकट, शीघ्रसंतापी स्वभाव त्यांच्या चांगला परिचयाचा होता. त्यांनी काय जाणायचं ते जाणलं. काही न बोलता बाळंतपणात समजूतदारपणे लागेल ती मदत केली. अर्थात सुईण होतीच. ताई सुखरूपणे बाळंत झाली व एक गोंडस अपत्य जन्माला आलं. अफूच्या गोळयाचा अर्थात प्रश्नचं आला नाही. अफूचा गोळा जावून अमृताचाच गोळा मिळाला.

यात एका घटनेची नोंद करणं माझ्यावर झाल्या संस्काराच्या दृष्टीनं महत्त्वाचे आहे. धर्म भोळया रूढीचं व अंधश्रद्धेचं त्या काळात फार प्रस्थ असल्यामुळे अर्थात आमचंही घर व आमच्या घरातले (आई - वडील) ताई - भाऊ या भोळसट रूढीपासून मुक्त नव्हते. ५० - ६० वर्षानंतरसुद्धा आतासुद्धा काही भोळसट समजुतीचा व धार्मिक रूढी यांचा प्रभाव कित्येक जुन्या कुटुंबातच काय पण 'सो कॉल्ड' सुशिक्षित कुटुंबांतही पाहातो. अर्थात प्रमाण कमी असेल, पण अजून आहे या भोळया समजुतीवर व रूढीवर धार्मिक भावनांचं अवगुंठन असल्यामुळे त्या जायला वेळ लागतो व त्या समूळ नाहीशा कधीच होत नाहीत, आपण इंग्लंड, अमेरिकेतील जीवनाचा बारकाईने अभ्यास केल्यास त्यांच्या समाजातही शकुन - अपशकून - शुभा - अशुभ - रूढी यांचा पगडा आहेच.

टिळक - आगरकरांच्या बाबतीत एक घडलेला प्रसंग सर्वमुखी झाला होता. तो मला या धार्मिक समजुतीच्या व भावनांच्या संदर्भात आठवतोय.

आगरकर हे अग्रगण्य समाजसुधारक बुद्धी प्रामाण्यवादी वृत्तीचे. हिंदूधर्मातल्या कित्येक धार्मिक समजुतीवर त्यांनी स्वतःच्या 'सुधारक' या पत्रातून कोरडे ओढले होते. इतकेच काय, ज्या देवाचे अस्तित्व मानण्यामुळे धर्म निर्माण झाला तो देवच मुळात नाही व खऱ्या बुद्धीवाद्याप्रमाणे विज्ञान दृष्टीला अनुसरून ते देवाचं अस्तित्व मानत नव्हते. देव हे थोतांड आहे असं त्यांना वाटत असे.

एकदा असा प्रसंग घडला की, या देव मानणाऱ्या न मानणाऱ्यावरून टिळक - आगरकरांची खूपच वादावादी झाली. दोघंही हिरहिरीने कोटिक्रम करीत - करीत मोठ - मोठ्याने अगदी भांडणात जमा होणारा असा वाद करू लागले. कोणीच आपला मुद्दा मागे घेईना. तेव्हा टिळकांनी काय युक्ती केली की, आगरकरांच्या न कळत कोणाला तरी बोलावून आगरकरांच्या रस्त्यात दारातच एक गणपतीची मूर्ती टाकली जाईल अशी व्यवस्था केली आणि परत वाद चालू ठेवला. अर्ध्या तासाने वाद संपल्यानंतर आगरकर जायला निघाले. अर्थात जाता - जाता दारामध्ये रस्त्यात टाकलेल्या गणपतीच्या मूर्तीवर त्यांचा पाय पडला. पाय पडल्याबरोबर त्यांनी आजूबाजूला पाहिले. कोणी नाही अशी समजून झाल्यावर त्यांनी ती उलटी लिटी पडलेली मूर्ती सरळ ठेवली व तिला नमस्कार केला.

तेव्हा एकदम टिळक एकदम उत्तरले, "वाद - वादे जायते तत्त्वबोध" सांगायचं तात्पर्य असं की, बुद्धिवादी माणूससुद्धा भावनेतून जन्म घेणाऱ्या रूढीला कधी शरण

जातो. यात मला अंधश्रद्धा, रूढी यांचं समर्थन करायचं नाही. पण मी एक वस्तुस्थिती सांगितली.

तेव्हा माझ्याही  बाबतीत असंच झालं. अशी एक धार्मिक रूढी अथवा अंधश्रद्धा आहे की, ज्या मुलाच्या पाठीवर होणारी पुढची मुलं वाचत नसतील तर त्या मुलाच्या पाठीत काहीतरी दोष असतील. त्या मुलाच्या पाठीतला तो दोष काढला तर पुढे होणारी मुलं वाचतील. हा पाठीचा दोष जातो कसा तर त्या पाठीला लोखंडाच्या पळीचा दांडा विस्तवात लाल तापवून त्या सदोष पाठीवर डाग दिला की, त्या पाठीचा दोष जातो. ही एक वेडी भावना अथवा रूढी आहे. आमच्या ताई - भाऊंना कोणीतरी हा उपाय सांगितलाच होता. माझ्या पाठीवरची मागे सांगितल्याप्रमाणे दोन मुलं गेलीच होती. आता हा तिसरा जो मुलगा झाला हा वाचावा म्हणून माझ्या पाठीला डाग देणं हे क्रमाने आलंच. ताईच्या मनातही द्वंद सुरू झालं असेलच. वामनच्या पाठीला डाग दिला तर वामन कळवळेल कारण मी तिचा मुलगा ती माझी आई. पण नाही दिला तर या जन्मलेल्या बाळाच्या जीवाला धोका. माझ्यासारखं त्या जन्मलेल्या मुलाबद्दलही तिला प्रेम राहणारच. डाग नाही दिला तर जन्मलेले बाळ कायमचंच जाईल. डाग दिला तर वामन कळवळून रडेल. पाठीला डाग दिल्यामुळे भाजल्याचा चट्टा अथवा डाग पडेल पण काही वेळानं बरं वाटलं की, वामनचं रडणंही थांबेल व पंधरा - वीस दिवसात चट्टाही बरा होईल आणि मग काय मुलगा झाल्याबरोबर तो ट्याहा - ट्याहा रडू लागला आणि आमचे

भाऊ लोखंडाच्या पळीचा दांडा लाल तापवून मी साखर झोपेत एका कुशीवर निजलो असताना शर्ट बाजूला करून व पाठ उघडी पाठ करून उघड्या पाठीवर त्यांनी डाग दिला. डाग दिल्याबरोबर मी कळवळून रडत - रडत उठून बसलो व तुला काही चावलं का? म्हणून आरडाओरड सुरू झाली. काही वेळाने माझी समजूत घालण्यात आली, पण माझ्या जीवनात पुढे जे अनेक चटके बसले त्या चटक्यांची नांदी या पाठीवर बसलेल्या चटक्यामुळे झाली.



# (९) काखेत कळसा नि गावाला वळसा व बबीचा जन्म

साधारणपणे मुले जर जगत नसतील तर ती जगावीत म्हणून पुढे होणाऱ्या मुलाचं ओबडं - धोबडं नाव ठेवण्याचीपद्धत आहे. ही पण अनेक रूढी, अंधश्रद्धेपैकी एक श्रद्धा अथवा कल्पना आहे. म्हणून माझ्या पाठीवर झालेल्या मुलाचं विशेष असं काही नाव न ठेवता त्याला फक्त 'बाळ' म्हणू लागले. त्याचे नावच 'बाळ' अर्थात 'बाळ' हे नाव काही वाईट नव्हत; पण ते तो लहान मूल म्हणून 'बाळ' नाव ठेवलं एवढंच.

या वेळेला आमच्या भाऊंची वर्ध्यास बदली झाली होती. मागे सांगितल्याप्रमाणे आमच्या ताईला डॉक्टर बापटांच्या मंडळीने बरीच मदत केली होती. थोडासा बाळ मोठा झाल्यावर व भाऊंना वर्ध्याला घर मिळाल्यावर मग आमचं सर्व बिऱ्हाडचं वर्ध्याला हलवले.

आम्हाला त्या वेळेला एका चाळीत जागा मिळाली होती. आमचे भाऊ वर्ध्याच्या जनरल पोस्ट ऑफिसमध्ये लिपिक - तारमास्तर म्हणून काम करीत होते. हे जनरल पोस्ट ऑफिस गावापासून जरा लांब अंतरावर पण भव्य असं होतं.

वर्ध्याला आलो तेव्हा मी मराठी पहिली इयत्ता पास झालो होतो. येथे या चाळीत असताना काही दिवस बरे गेले; पण 'सुखस्या नंतरम् दुःख' या न्यायाने दुःखाने प्रवेश केला.

झालेले बाळ छोटेसे, सुंदर, दिसायला गोंडस, गौरवर्णीय, दुडूदुडू इकडे - तिकडे खेळणारे लोभस व बाळसे असलेले असे होते. त्याचे कौतुक करण्यात व त्याच्या बाललिलात आम्ही गढून जात होतो. आमच्या ताईला बाळाला दृष्ट लागेल की काय म्हणून सारखी काळजी वाटत होती आणि अशी काळजी वाटली ती खरीचं ठरली. खरंच बाळाला दृष्ट लागली किंवा काय ते कळत नाही. तो असा आजारी झाला व त्याची खूप काळजी घेऊनही देवाला तो फार आवडल्यामुळे देव त्याला घेऊन गेला. आम्ही सारेच दुःखात बुडालो. अगदी सहज माझ्या मनात विचार आला की, माझ्या पाठीवरचा डाग बरा झाला म्हणून तर तो गेला नसेल? पुन्हा येरे माझ्या मागल्या, माझ्या पाठीवरचे तिसरेही मूल गेले. त्यातून पुढे पुन्हा माझ्या पाठीवर डाग बसणार ही भिती मनात. नंतर आम्ही ही जागा सोडून दुसऱ्या फकिरचंदच्या चाळीत राहायला गेलो. या वेळेस येथे सब रजिस्ट्रार पौंक्षे या फॅमिलीशी आमचा अगदी घरोब्यासारखा संबंध आला.

अजूनही आठवतयं, या फकीरचंदच्या चाळीतल्या घरात मला मामूली फल्यू खोकल्याचं दुखणं झालं होतं. काही दिवसांनी बरं वाटू लागलं; पण मी आता कॉटवर निजलो असताना व कॉट भिंतीला लागून असल्यामुळे माझ्या उजव्या हाताच्या कोपऱ्याला विंचू चावला होता.

विंचू बराच मोठा होता. या वेळेस झालेल्या असह्य वेदनामुळे लहानपणी माझी टाळूला विंचू चावल्यामुळे

कशी अवस्था झाली असेल व मी जिवंत राहिलोच कसा हा विचार मनात आल्यावाचून राहिला नाही.

वरील महत्त्वाच्या दोन घटनामुळे माझ्या मनात दोन तत्त्वं ठसली. एक जीवाचा जन्म वा मृत्यू हे सर्वस्वी दैवाधीन आहे. ज्याचा जितका भोग अथवा योग असेल तेवढाच त्याच्या पदरी पडणार.

दुसरे, नाव न दिल्याने मूल जगते ही कल्पना मानवी स्वभावातील खुळेपणाची द्योतक आहे. एवढेच या प्रथा भावनेच्या स्त्रोतून बाहेर पडतात म्हणून मानायच्या एवढंच त्यात खरं काही नाही. असो.

हा १९२६ - १९२७ चा काल असावा. मी असेन नऊ वर्षांचा. मला वाटतं मी मराठी पहिली पास झालो होतो. पास झालो होतो म्हणजे काय तर काहीतरी बेरीज वजाबाकीची गणित होती. एक पाठ्यपुस्तक होते, त्यातलं वाचायला सांगितले व मास्तर म्हणाले, “जा जाता तू त्या दुसऱ्या खोलीत बैस. ही दुसरी खोली म्हणजे दुसरीचा वर्ग.”

आधी काही मुलं होतीच. मी गेलो. माझ्याबरोबर आणखी काही मुलं आली, बहुतेक ज्यांना अशी गणित देऊन व वाचायला सांगितली ती सारीच आमच्या खोलीत आली.

एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जाणं म्हणजे पास होणे असा माझा समज होणे सहाजिकच होता.

नंतर आमच्या भाऊंची बदली जनरल पोस्ट ऑफिसमधून वर्धागंज पोस्ट ऑफिसमध्ये झाली. हे वर्धागंज पोस्ट ऑफिस वर्धा रेल्वे स्टेशनच्या अगदी जवळ म्हणजे या पोस्ट ऑफिसमधून सर्व जाणाऱ्या - येणाऱ्या ट्रेन्स

दिसायच्या व इंजिनची शिटी, भोंगा सदा कानी पडायचा. हे वर्धागंज पोस्ट ऑफिस रेल्वे स्टेशन करता व रेल्वे स्टेशन या करता खास होतं. शिवाय पोस्टाच्या डाव्या बाजूला खूप मोठं मोकळं मैदान जेथे कापसाच्या गाड्या जमत असतं. ते एक कॉटन मार्केट होतं. येथे आमच्या रहाण्याच्या दृष्टीने व्यवस्था उत्तमच होती.

पुढे पोस्ट ऑफिस कचेरी व कचेरीला लागून रहाण्याचे क्वॉर्टर्स होते. क्वॉर्टर्स प्रशस्त होते व कापसाच्या सीझनमुळे पोस्टात काम खूप. आमचे भाऊ पोस्टमास्तर होते व त्यांच्या हाताखाली एक लिपिक 'क्लार्क - कम - सिग्नेचर तारमास्तर.' येथे आम्हा मुलांना खूपच मजा वाटायची व खेळायला बागडायला खूप प्रशस्त जागा व अंगण. हाताखाली नोकर - चाकर पण इथून आमची मराठी शाळा मात्र खूप लांब पडायची. पण जाणे भाग असे.

मी व माझा मोठा भाऊ वसंत असे आम्ही सारखे खेळत बसायचे. वसंत खूपच हुशार होता. आमच्या प्रायमरी शाळेत एक हेडमास्तर पंतोजी होते. असतील ५२ - ५५ वयाचे त्यांच्या कंबरेला नेहमी एक किल्ल्यांचा मोठा झुबका लोंबत असायचा. मला वाटायचे हा एवढा मोठा किल्ल्यांचा झुबका ते कोटाच्या खिशात किंवा आतील बंडीत का ठेवीत नाहीत. तो लोंबता झुबका पाहिला म्हणजे त्यांचे असिस्टंट त्यांना घाबरतात व विद्यार्थीही घाबरतात अशी म्हणे त्यांची समजूत होती.

एकदा त्यांनी चुकून तो आत बंडीत ठेवला व मग काही वेळाने आम्ही सारे व इतर शिक्षक त्यांच्याकडे टक

लावून पाहू लागलो. त्यांना वाटले हे सर्व आपल्याकडे पाहातात काय? ते जरा स्वभावानेही रागीटच होते. इतर कोणाची त्यांच्याशी बोलण्याची छाती होईना. ते विद्यार्थ्यांना व समोरच्या मास्तरांना दटावून सांगू लागले, "पाहाता काय? काही तमाशा आहे काय?"

तो एक तरूण शिक्षक भीत - भीत त्यांना म्हणाले, "हेडमास्तर साहेब, किल्ल्या...."

"किल्ल्या...." असे म्हणून ते कंबरेला पाहतात तो किल्ल्यांचा जुडगा नाही. ते खूप घाबरले. हाता - पायाला घाम सुटला. त्या जुडग्यात पैसे ठेवलेल्या पेटीच्याही व महत्त्वाच्या कपाटाच्या किल्ल्या होत्या. ते घाबरतच ओरडले, "अरे, किल्ल्यांचा जुडगा कुठाय?"

"आहो मास्तर, वर्गात पहा बरं कुठं पडलाय का?"

सारे वर्ग पाहणं सुरू झालं. कोपरा न कोपरा पाहिला. कोठे सापडेनात. हेड मास्तरांची छाती धडधड करु लागली तेव्हा एक मास्तर कसे म्हणतायत, "हेड मास्तर, तुम्ही घरीच विसरला असाल."

"शक्य आहे.... शक्य आहे...."

"मी घरी जाऊन पाहून येतो...."

घरी जाऊन आले, पण घरी सापडेनात. मग काय पाच - सहा दिवसात इन्स्पेक्शन होतं. त्यांच्या डोळ्यातून पाणी येऊ लागले. कारण कंबरेचा जुडगा पडला कुठं तेव्हा हळूच दुसरे मास्तर म्हणाले, "हेडमास्तर साहेब, तुम्ही आपल्या आतल्या बंडीत पहा, चुकून ठेवल्या असतील."

"अहो काय चमत्कार किल्ल्यांचा जुडगा आतल्या बंडीतच होता.

'काखेत कळसा नी गावाला वळसा'

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे येथेच आमच्या बबीचा (माझ्या बहिणीचा) जन्म झाला. ताई - भाऊंना आता कन्याच पाहिजे होती व त्याप्रमाणे झाली म्हणून त्यांना फार आनंद झाला व पुढे माझ्या पाठीला तापल्या पळीचा डाग मिळणार नाही म्हणून माझा हर्ष गगनात मावेनासा झाला. शिवाय बबी बाळसेदार, नाकी डोळी उत्तम, वर्णाने गोरी, सुंदरातच जमा होणारी.

आमच्या ताईच्या बाळंतिणीच्या मदतीला पोंक्षे रजिस्ट्रारांची बायको (त्यांना आम्ही मामी म्हणत असू) व या मामींची बहीण येत असे. आमची ताई बाळंतीण असताना या पोंक्ष्यांची बायको उर्फ मामी आमच्या ताईला म्हणाल्या, "ताई तुम्हाला मुलगी झाली की, ती तुम्ही माझ्या मुलाला द्यायची हं...! मी तुमचं सर्व करते."

अर्थात मुलगी होण्याच्या आशेपोटी (कारण ताईला मुलगीच पाहिजे होती) कोणती आई मामीसारख्या बाईने प्रदर्शित केलेली इच्छा मान्य करणार नाही?

ताईने "हो" म्हणून मान्यता दिली.

'वचने किं दरिद्रता...!'

मामींना बबन नावाचा मुलगा होता. तो ४ - ५ वर्षाचा होता. त्यांनाही वाटलं हीच वेळ आहे आश्वासन मिळवून घ्यायची, अर्थात ताईनेही वरवर हो म्हटलं. पुढचं कोणाला माहिती?

# (१०) मी मराठी दुसरी नापास होतो

मी मराठी दुसरी नापास होतो हे वाचून वाचकाला असं वाटेल की, हा आत्मवृत्त लिहिणारा लेखक साध्या मराठी दुसरीच्या वर्गात नापास झाला म्हणजे आश्चर्यच आहे. मलाही पुढं - पुढं समजू लागल्यावर मी दुसरीच्या वर्गात नापास झालोच कसा याचं आश्चर्य वाटायचं आणि अजूनही वाटतं. पण मी नापास झालो खरा. मी दहा वर्षाचा असेन. अर्थात सध्या आहे अशी परिस्थिती शिक्षणाच्या कोणत्याही थरात नव्हती, सध्याच्या शाळेतील व कॉलेजमधील परीक्षेत नापास होण्याकरिता श्रम घ्यावे लागतात. आमच्या शैक्षणिक अवस्थेत संख्यात्मकतेपेक्षा गुणात्मकतेला जास्त प्राधान्य होतं.

खरा अभ्यास करीत तेच पास होत. दुसऱ्या दिवशी परीक्षा असताना मी आदल्या दिवशी संध्याकाळी ‘अभ्यासाला’ बसलो; पण माझा मोठा भाऊ वसंत मला म्हणाला, "अरे काय वामन ही काय अभ्यासाची वेळ आहे? चल की रे खेळायला बाहेर आणि तू नापास थोडाच होणार आहेस?”

मलाही त्याचं म्हणणं खरं वाटलं. शिवाय पहिली पास व्हायला मी विशेष असे काहीच श्रम घेतले नव्हते. तेव्हा मी पास होणारच. म्हणून मी त्याच्याबरोबर खेळावयास उठलो. खेळून थकलो. भूक लागल्यामुळे जेवण केलं व मग मला झोप लागली. सकाळी सहाला उठलो,

परीक्षा सकाळी साडेसात ते साडेदहा पर्यंत होती. आम्ही वर्धागंज पोस्ट ऑफिसच्या क्वॉर्टर्समध्ये रहात असल्यामुळे व हे पोस्ट ऑफिस रेल्वे स्टेशनच्या समोरच जवळ असल्यामुळे माझी प्रायमरी शाळा फार लांब पडत होती.

प्रथम गणिताची परीक्षा. जायला अर्धा तास लागायचा. मी सातला शाळेत जाऊन पोहोचलो. प्रथम गणिताची परीक्षा त्या वेळेला सध्याच्या सारखे कागदाच्या पेपरावर गणितं सोडवावी लागत नसतं. पाटीवरच गणितं सोडवायची. फळयावर उदाहरण कोणतं ते लिहून देत असत. मग आपण ते उदाहरण वाचायचं आणि पाटीवर सोडवायची. सोडवून, उत्तर काढून, उत्तर कोणतं ते स्वतंत्र लिहायचं. पाटी उलटी खाली ठेवायची व उभं राहायचं. प्रत्येक गणिताकरिता पाच मिनिटे वेळ असायचा. पाच मिनिटात ज्यांची गणित संपणार नाहीत त्यांना बाजूला काढायचं. तोंडी हिशोबाची ही परीक्षेचीही अशीच पद्धत. फक्त तोंडी हिशेबाला एक मिनिट असायचा. गणित फळयावर लिहून दिल्यानंतर मी फार लांब असल्यामुळे (फळयापासून) मला काही अक्षरं अथवा आकडे दिसत नव्हते किंवा काय ठाऊक, पण फळयावरचं बरोबर दिसत नाही; असे म्हणण्याची प्रज्ञा नव्हती. जे काय कसं दिसेल ते करायचं. मी उदाहरणाचं उत्तर काढल्यावर तसा लवकर उभा राहायचा. पाच मिनिटे झाल्याबरोबर परीक्षक खालची पाटी उचलायचे. माझी पाटी उचलली. मला निश्चित वाटले माझे उत्तर बरोबर आहे म्हणून; पण परीक्षकाने पाटीवरचं उत्तर पाहून एकदम एक मोठा क्रॉस

(x) चूक म्हणून दिला. मी घाबरलो, मी इतका घाबरलो की माझ्या हाता - पायाला घाम सुटला. शेजारच्या मुलाच्या पाटीवर २८ हे उत्तर व माझ्याही पाटीवर २८ च उत्तर. पण मी २८ हा आकडा असा न लिहिता ८ या आकड्याला ८ शेवटी अशी गाठ दिली होती म्हणजे मी २६ असा आकडा लिहिला होता. परीक्षकाला तो २७ वाटला. म्हणून चूक. मग मी खूपच घाबरलो. बोलायची वा हू का चू करायची हिंमत नव्हती. या घाबरटपणामुळे माझी पुढचीही २ गणिते चुकली असावीत. तोंडी हिशेबात झटपट हिशेब करावा लागत असल्यामुळे किती बरोबर व किती चुकले हे लक्षात आले नाही तरी माझा एक तोंडी हिशेब बरोबर असावा असे वाटत होते. नंतर पुस्तक वाचनाची परीक्षा. तेही मी घाबरत - घाबरत वाचलं. परीक्षा संपली.

शेवटी निकालाचा दिवस आला. त्यावेळेस निकाल सांगताना पास झालेल्या मुलांना त्यांची यादी एकेकाचे नाव वाचत - वाचत वरच्या वर्गात जाऊन बसायला सांगत असत. जसं - जसे शिक्षक नाव वाचू लागते तस - तसे एक - एक मुलगा वरच्या वर्गात (तिसरीत) दुसऱ्या क्लास रूममध्ये जाऊन बसू लागला. बरं खरी गंमत ही की नाव वाचणाऱ्या शिक्षकानं निकाल मी वाचीत असून पास झालेल्या मुलांची मी नावं वाचीत आहे, असंही आधी स्पष्ट करून सांगितलं नाही. त्यामुळे मीच काय पण आम्ही सारेच बुचकळ्यात पडलो. नाव वाचल्या बरोबर ज्याचे नाव उच्चारल्या जात असे तो वरच्या वर्गात जाऊन बसू लागता. माझ्या शेजारी एक जो मुलगा बसला त्याची सारीच गणिते

चुकली होती व तो पुस्तक वाचनाच्या परीक्षेलाही नव्हता. पण त्याचंही नाव वाचलं गेलं. तो वरच्या वर्गात माझ्याकडे हसत - हसत पाहत जाऊन बसला. मी म्हटले, "हा जर मुलगा पास होतो; तर आपण नक्कीच पास होणार."

पण कसंच काय नि कसंच काय. अशी नाव न उच्चारल्या गेलेली पाच - सहा मुलं माझ्याचबरोबर होती. नंतर नाव उच्चारण बंद झालं. लाँग बेल झाली. शाळा सुटली. मला वाटलं आमची नावं उद्या उच्चारतील. नंतर दुसऱ्या दिवशी मी शाळेत आल्याबरोबर आमच्या मित्रांबरोबर तिसऱ्या वर्गात येऊन बसलो. माझ्या बरोबरची चार - पाच मुलंही बसली. तितक्यात गुरुजी आले. त्यांनी वाचून आम्हा पाच - सहा मुलांना आमच्या आधीच्या वर्गात बसवलं मी त्यांना म्हटलं, "आमचे सारे मित्र तर वरच्या वर्गात आहेत तर आम्ही का खालच्या वर्गात?"

गुरुजी म्हणाले, "तुम्ही नापास झाला आहात. ते पास झाले."

मी गुरुजींना म्हणालो, "तो तर मुलगा सारीच गणित चुकला होता, तो वाचनाच्या परीक्षेला पण गैरहजर होता."

गुरुजी उत्तरले, "गप्प बैस.... जास्त बोलू नको." व थोबाडीत मारण्याकरिता हात वर केला.

मी चूप बसलो, माझ्यासारख्याच नापास झालेल्या माझ्या मित्राला मी हे सांगितले.

तर त्याला अगोदर माहिती होती. तो म्हणाला, "अरे वामन, तो डेप्युटीचा मुलगा आहे."

# (११) शिक्षकांच्या शिक्षा

मी घरी आल्यावर रडत - रडतच सांगू लागलो, मी नापास झालो. तो डेप्युटीचा मुलगा ज्याची सर्व गणित चुकली होती तो पास झाला. मग मी कसा नापास झालो हे मी सांगत असताना वसंत, राजा जेवत होते. ताई स्वयंपाक करीत होती.

मी वसंताला म्हणालो, "तू मला अभ्यास करू दिला असता तर मी नापास झालो नसतो."

तो म्हणाला, "असं काही नाही रे बुवा, प्रायमरीतले शिक्षक आपल्या मताप्रमाणे ज्याला पास करायचं त्याला पास करतात. ज्याला नापास करायचं त्याला नापास करतात आणि हे बघ वामन, जे दुसरीत नापास होतात ते पुढे कधीच नापास होत नाहीत."

पण यानंतर मी कानाला खडा लावला की, कधी पुढे नापास व्हायचं नाही. आता ही मला ठेच लागली ना! पुढच्यास शहाणा कशाला. मीच शहाणा होईन. त्यानंतर मात्र मी अभ्यासात नेहमी दक्ष राहू लागलो. पुढे प्रायमरी तिसरी व चौथीही विशेष प्रयास न पडता पास झालो. नापास झाल्यानंतर पूर्ण एक वर्ष पुन: त्याच वर्गात काढावं लागलं या विचाराचा इतका भयानक पगडा मनावर बसला की, नापास म्हणून कधी व्हायचं नाही हा कृतनिश्चय केला आणि खरोखरच चौथीतून पाचवीत (इंग्रजी पहिलीत) येताना माझ्या मिळालेल्या गुणांचे प्रमाण ४५ ते ५० टक्के असावे. आता माध्यमिक शाळेत प्रवेश (हायस्कूलमध्ये).

याच वेळेला एक दैवयोगाने अशी घटना घडली की, जिचा मला फायदा झाला. वर्ध्याला एक प्रसिद्ध सरकारी हायस्कूल होते. त्याचे नाव 'क्रडॉक हायस्कूल'. कोणी क्रडॉक नावाचा गव्हर्नर किंवा डेप्युटी कमिशनर होता त्याच्या नावाने ते त्यांच्या स्मरणार्थ म्हणून बांधले होते. या हायस्कूलमध्ये या वेळेस श्री. एस. एन्. कुलकर्णी (सदाशिव नारायण कुलकर्णी) या नावाचे हेड मास्तर म्हणून बदलून आले होते. ते आमच्या भाऊंच्या चांगलेच परिचयाचे. ते नी आमचे भाऊ समवयस्क. दोघेही लहानपणाचे प्रेमळ मित्र. लहानपणी एकमेकांशी खेळलेले. त्यांना वर्धेच्या हायस्कूलमध्ये (डॉक) बदलून आल्यावर जेव्हा कळले की, वर्धागंज पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर श्री. गोविंद मार्तंड देवगांवकर आहेत तेव्हा ते बदलून आल्यानंतर लगेचच आमच्या भाऊंना लहानपणाचे मित्र म्हणून भेटायला आहे. त्यांच्या विनोद, गप्पा, चेष्टा, हास्य विनोद, लहानपणाच्या आठवणी यांनी वातावरण दुमदुमून गेले. मुला - बाळांची माहिती विचारल्यावर त्यांना एवढे कळले की, आमच्या भाऊंच्या तीन मुलांपैकी मोठा मुलगा राजा (शाम सुंदर) हा सतरा वर्षाचा इंग्रजी सहावीत व मधला मुलगा वसंत हा पंधरा वर्षाचा इंग्रजी चौथीत व मी तेरा वर्षाचा नुकताच मराठी चौथीत पास होऊन हायस्कूलमध्ये (माध्यमिक शाळेत प्रवेश घ्यायचा होता) तेव्हा मला प्रत्यक्ष श्री. कुलकर्णी हेडमास्तरांनी क्रडॉक हायस्कूलमध्ये नाव घालायला सांगितले व त्याप्रमाणे ते घातले गेले. या माध्यमिक शिक्षणाच्या ओघात संस्मरणीय अशा दोन - तीन

आठवणींचा उल्लेख करणे प्रस्तुत ठरावं. हे कुलकर्णी हेडमास्तर जरी आमच्या वडीलांच्या दाट ओळखीचे होते; तरी ते शिस्त व प्रशासन व शासन या बाबतीत अत्यंत कडक, कठोर व दयामाया न करणारे होते. त्यांचा वेष म्हणाल तर अंगात साधारण फिकट पिवळसर रंगाचे जाकीट, त्यावर त्याच रंगाचा कोट, पांढरं शुभ्र, स्वच्छ तलम धोतर कासोटा घातलेले, पायात काळे पायमोजे, बूट, डोक्याला पांढरा स्वच्छ फेटा व डोळयांना सुवर्ण फ्रेमचा चष्मा व रूबाबदार मिशी असं होतं. जरा गव्हाळ (काळसरातच जमा होणारे), पण एकंदर त्यांच्या वेश परिधानामुळे त्यांचा रूबाब व भय व कडक शिस्त यामुळे हायस्कूलमधील सर्व मुलं व शिक्षकसुद्धा त्यांना दबकून वचकून होती. वरच्या वर्गातली मुलं ते पांढरा फेटा बांधत असल्यामुळे त्यांना 'भाव्या' म्हणत होते. वक्तशीर, रोज सायकलीवरून बरोबर पावणे अकराला यायचे. त्यामुळे शिक्षकांचे उशीरा येण्याचं धाडस तर होत नव्हतंच पण मुलंही येत नव्हती. क्वचित एखादा दुसरा मुलगा आला तर त्याला (छडी मार) शिक्षा झालीच म्हणून समजा. त्यांनी वर्गशिक्षकांना सूचनाच दिल्या होत्या की, कोणताही मुलगा उशीरा आला तर त्याला माझ्याकडे पाठवायचा.

एके दिवशी मला व माझा मोठा भाऊ वसंत याला एकदमच एकाच वेळेस प्रसाद मिळाला. दोन - तीन मिनिटे लेट झालो असेल. वर्ग शिक्षकांनी हेडमास्तरकडे पाठविल्याबरोबर हेडमास्तरांनी आपली छडी लांब केन काढली. मला वाटलं होतं ते आमच्या भाऊंचे मित्र म्हणून

आम्हाला सोडून देतील; पण कसचं काय, तळहात पुढे करायला सांगितला. करणेच भाग होते. आम्हाला दोघांनाही दोन छड्या बसल्या. मी इंग्रजी तिसरीच्या अर्ध्या टर्मपर्यंत या क्रडॉक हायस्कूलमध्येच होतो. आमच्या वेळेच शिक्षक या शब्दाची व्युत्पत्ती शिक्षण देणारे अशी न करता 'शिक्षा (शासन) देणारे' अशी करणे अधिक संयुक्तिक होईल. बरे प्रत्येक शिक्षकाच्या मारण्याच्या वा शिक्षा करण्याच्या पद्धती निरनिराळया.

एक श्यामराव देशमुख, इतिहासाचे शिक्षक होते. त्यावेळेस आम्हाला जी. एन. जोशींचा 'हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास' हे पुस्तक इतिहासाला होते. टेक्स्ट बुकाप्रमाणे बाकावर बसलेल्या मुलांकडून ते बरोबर क्रमांकाने एक - एक परिच्छेद वाचून घ्यायचे. नंतर जितके परिच्छेद तासामध्ये वाचून होतील ते पाठ करून यायला सांगायचे व मग सर्व प्रकरण अस वाचून संपलं की, मग क्रमा - क्रमाने एक - एक मुलाकडून मुलाच्या अगदी जवळ जाऊन त्याला पाठ म्हणायला सांगायचे.

एखाद्या मुलाला सुरुवात आठवली नाही किंवा मधलीच एक दोन वाक्ये आठवली नाहीत तर त्यांच्या हातात जो डस्टर बसे त्या डस्टरचे पाठीमागच्या लाकडी भागाने खांद्याच्या पाठीजवळच्या बाजूला धपाधप डस्टरचे पंधरा - वीस फटके न थांबता मारायचे. यामुळे मुलं कधी - कधी खाली पडत. पण हेडमास्तरकडे तक्रार करायची सोय नव्हती. अशाप्रकारे मुलाने शिताफीने त्यांच्या हातून सुटून जायचा प्रयत्न केला तर ते डस्टर दुरून त्याला फेकून

मारायचे. कधी - कधी त्यांचा नेम चुकून तो डस्टर भलत्याच मुलाला लागायचा.

एक गणिताचे श्री. केदार म्हणून मास्तर हाते. त्यांना गजकर्ण झाला होता व ते सारखे तंबाखूचे पान चघळायचे व खाजवित - खाजवित जवळ यायचे. त्यांचे तोंड कधीच थांबलं नाही. ते गणिताची वही पाहताना मुलाच्या डेस्कवर त्याला चिकटूनच बसत असत. एक चूक दिसली की कान पिळायचे. एका मुलाचे दहाही उदाहरण चुकली तेव्हा प्रत्येक चुकलेल्या उदाहरणाकरिता ते कान जोरात पिळू लागले. कान पिळायचा तो इतका जोरात की शेवटी तो मुलगा कळवळून “नको.... नको...." म्हणायचा व ते सारखं एकच कान जो जवळ असेल तो पिळायचे.

शेवटी दहाही उदाहरण चुकलेल्या या मुलाचे एक कान पाच वेळा पिळणं झाल्यावर कान लालीलाल झाला तेव्हा तो मुलगा म्हणाला, “तर आता हा दुसरा कान पिळा परमेश्वराने या करताच मुद्दामहून दोन कान दिले आहेत." हे ऐकून मात्र ते हसले.

तिसरे एक डोंगरे - उंच, गोरे, अंगानं मध्यम बांध्याचे शिक्षक होते. ते इंग्रजी शिकवायचे. चूक झाली की दंडाला खूप जोरात चिमटा घ्यायची त्यांची सवय होती. चिमटा घेतल्यानंतर जर मुलगा कळवळला नाही तर पुन्हा त्याच ठिकाणी चिमटा घ्यायचे व मुलगा कळवळला की, मग सोडून द्यायचे. याचा काही मुलं असा फायदा घेत की डोंगरे मास्तरांनी चिमटा काढायला सुरुवात केली की

कळवळायचे. मुलगा कळवळला की, शिक्षकाला समाधान मिळे.

चौथे एक शिक्षक श्री. मराठे या आडनावाचे. यांनाही चिमटा घेण्याची शिक्षा देण्याचीच सवय होती. पण हे चिमटा पोटाच्या उजव्या किंवा डाव्या बाजूला घेत. इतका शिक्षेचा धाक असल्यामुळे शिक्षेच्या भीतीने अभ्यास करावाच लागत असे. त्यामुळे मी इंग्रजी पहिली व दुसरी चांगल्या तऱ्हेने म्हणजे शेकडा पन्नास टक्के मार्कस् मिळवून पास झालो होतो व इंग्रजी तिसरीत गेलो होतो. पण मी इंग्रजी पहिलीत असताना माझा सर्वात मोठा भाऊ राजा अकरावीत होता व मधला भाऊ वसंत नववीत होता. मी इंग्रजी पहिली पास होऊन दुसरीत गेलो व वसंत नववी पास होऊन दहावीत गेला, पण राजा मात्र थोड्या मार्कांने अकरावीत मॅट्रिकमध्ये दोन विषयात (इंग्रजीत व इतिहास) नापास झाला होता. इतक्यात आमच्या भाऊंची बदली वर्ध्याच्या जनरल पोस्ट ऑफीसमध्ये (मोठ्या पोस्ट ऑफिसमध्ये, गावा बाहेरच्या) झाली. त्यामुळे आम्हाला वर्धागंज पोस्ट ऑफिसचे क्वॉर्टर्स सोडावे लागले व गावात श्री. आगाशे वकील यांच्या घरात सारेजण रहाण्यास आलो.

# (१२) मनावर परिणाम करणाऱ्या दोन घटना

गावात ज्या श्री. आगाशे वकीलांच्या घरात राहावयास आलो ते घर एखाद्या रेल्वेच्या डब्यासारखे लांबच लांब होते. या घरात एका ओळीनं तीन खोल्या. पुढची बैठक, मधलं घर व तिसरी स्वयंपाकाची खोली. ज्या घरात आम्ही रहात होतो ते एका मोठ्या वाड्यात होतं. त्यात चार - पाच बिऱ्हाड असतील. स्वत: घरमालकांचं घर दुमजली बंगल्यासारखं होतं. वरच्या मजल्यावर स्वत: घरमालक त्यांची फॅमिली, खालच्या वाड्यासारख्या घरात दोन बिऱ्हाड. जे प्रशस्त मोठं घर वाड्यात होतं, त्यात स्टेट बँकेत नोकरीला असणारे श्री. वेचलेकर राहत होते व त्यांच्या वाड्याला जोडूनच उजव्या बाजूच्या लहानशा तीन खोल्यांच्या घरात श्री. चिपळूणकर राहत होते. हे चिपळूणकर रेल्वेत बुकींग क्लार्क म्हणून होते व त्याशिवाय ते फोटोग्राफीचा धंदा करीत. नंतर श्री. वेचलेकरांचं घर सोडून त्याच्या जवळच एक छोटं तीन खोल्यांचं घर होते, त्यात कुणी श्री. जोशी राहत असतं. हे श्री. वेचलेकर व श्री. जोशी स्टेट बँकेत (त्या वेळेला इंम्पेरियल बँक म्हणत असावेत) नोकरीला होते. पैकी श्री. चिपळूणकर व त्यांची बायको एवढेच त्यांच्या घरात. त्यांना मूल नव्हते. श्री. जोशीचेही लग्न झाले होते; पण त्यांनाही मूल नव्हते. श्री. वेचलेकर मात्र मुला - बाळांचा माणूस. आम्ही जास्त माणसांची नेहमी वर्दळ असे अशाच वाड्यातल्या घरात

राहत होतो. राजा मॅट्रिक नापास झाल्यामुळे त्याने प्रायव्हेट पुन: परीक्षेला बसावं असा विचार चालू होता. पण यशाची जास्त खात्री निश्चित करण्याच्या दृष्टीनं पुन्हा शाळेत नाव घालावं हा विचार प्रभावी ठरला. या वाड्यातली मंडळी सारी खेळीमेळीनं वागणारी होती. मी लहान म्हणून माझी चेष्टा मस्करी होत होती. चि. बबी दोन वर्षाची असेल. दिसायला चांगली गौर वर्णाची, बाळसेदार अशी होती. शेंडेफळ म्हणून तिचे कौतुक होणे साहजिक होतं. मला बालपणाच्या शाळा सोबत्यांचा व शेजाऱ्यांच्या संगतीचा जो आनंद असतो तो इथेच भोगायला मिळाला. आमच्या घरमालकीणबाई स्वभावाने फारच चांगल्या होत्या. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे आमच्या शेजारी जे तरुण जोडपं श्री. जोशी व त्यांची बायको यांची मात्र सदान्कदा भांडण होत असत. भांडण होत असत असं मी म्हणतो याचं कारण म्हणजे त्यांच्या भांडणाचा आवाज सर्व वाड्यात घुमत असे. पुन्हा दुसऱ्या दिवशी गोडीगुलाबीने वागायचे. मला नेहमी प्रश्न पडत असे की, इतके दोघे एकमेकांशी का भांडतात.

श्री. जोशी तर बायकोला वेतानेच चोपत असे तर दुसऱ्या दिवशी यांची एकदम जवळीक वा मैत्री कशी होते. शिवाय या जोशीजवळ त्यांचा एक पुतण्या असे तेरा - चौदा वर्षांचा शिकायला राहत असे. या पुतण्याला रोजचाच छडीच्या माराचा प्रसाद मिळायचा.

या जोशीच्या हातातून एक वेताचा छडीच्या माराचा प्रसाद मिळायचाचं. बँकेतून पाच - सहा वाजता आले की,

हातात छडीच घेऊन येत असत. आल्याबरोबर त्यांच्या पुतण्याची काय चूक होत असे कुणास ठाऊक.

ते सपासप छडीचे वार पुतण्याच्या अंगावर ओढीत असतं. पुतण्या तसा सोशिक होता. तो बिचारा सहन करायचा व सहनशक्तीच्या बाहेर गेलं म्हणजे ओरडायचा. मला या जोशीचा मनापासून राग व तिटकारा यायचा. त्यांना मी 'छडी मास्तर' म्हणायचो. ज्याला मार बसायचा त्याचं नाव होते रंगनाथ. त्याला मी शिवा म्हणायचा "अरे तू पळून का जात नाहीस? म्हणजे या छडी मास्तरांच्या तडाख्यातून वाचशील."

तो उत्तर द्यायचा, "अरे मी पळून जाऊन राहू कोठे? मला मार खायची सवय झाली आहे. या घरात असताना अर्थात मी इंग्रजी दुसरीत होतो. आमच्या घराच्या जवळच एक श्री दत्त मंदिर होते. तेथेही मी खेळायला जायचा. नंतर राजा अभ्यास करून शेवटी दुसऱ्या वर्गात मॅट्रिक पास झाला. वसंत चांगल्या तऱ्हेने दहावी पास झाला व मी पण पास होऊन सातवीत (इंग्रजी तिसरीत) गेलो. पुढे आम्हाला ज्या घरात आम्ही राहत होतो त्या घराच्या बाजूला एक चांगले घर रिकामे झाल्याचे ऐकल्याबरोबर आम्ही या नव्या घरात राहायला गेलो. हे नवं घर फारच चांगले, मोकळ्या मुबलक जागेचे होतं.

पुढे व्हरांडा, दोन मोठ्या खोल्या, शिवाय माडी, माडीवर दोन खोल्या व पुढे गॅलरीमुळे येथे जागेचं सुख होतं. येथून अर्थात आम्हाला आमचे हायस्कूल लांब पडायचं. पण त्याला नाईलाज होता. आम्ही या ज्या नवीन घरात राहत

होतो या घराच्या बाजूला चौरस्ता (स्क्वेअर) होता. मी वर नमूद केलेलं श्री. दत्त मंदिर या चौरस्त्याजवळच होतं. येथे मी बहुधा लपवा - छपवीचे, पकडा - पकडीचे खेळ शाळूसोबत्यांबरोबर खेळत असू. या देवळाचे मालक श्री. अवधूत वैद्य नावाचे होते. या देवळातच त्यांना घर होतं. या घरात मध्ये - मध्ये मोठे खांब होते. आमच्या शाळूसोबत्यांबरोबर खेळायला एक मुलगी पण असायची. तिचं वय असावं पंधरा - सोळा वर्षांचं. कधी - कधी शाळू सोबती खेळायला नसले की तीच खेळायला यायची. पुढं - पुढं या अवधूतचं व त्याच्या घरातल्या मंडळींचा आमच्या घरातल्या मंडळीशी इतका घरोबा झाला की, आमचं रोजचं जाण येणं सुरू असे. मी मात्र दत्त मंदिरातला एखादा दिवस जरी चुकला तर ही मुलं शाळेतून नियमित खेळायला जायचे. अवधूतची बहीण तिचं नाव होतं सुशीला. ती मला बोलवायला यायची. खेळायला गेलो नाही म्हणून माझा गालगुच्चा काढायची. ही सुशीला होती लोभस व बोलकी, वर्णनात जरा गोऱ्यातच जमा होणारी, चाफेकळी सारखं नाक, अटकळ बांधा, थोडक्यात दिसायला सुंदरच होती. त्यावेळी माझं वय पंधरा असेल. ती म्हणायची मला खेळायला सवंगडी म्हणून तूच बरा आहेस. अर्थात तसं मला त्या वयात विशेष कळत नव्हत. पण एवढं खरं की, सारखं तिच्याशी (सुशीलेशी) खेळायला जावं असे वाटत होतं. असं का वाटत होतं हे सांगता येणं कठीण होतं. दत्त मंदिरामध्ये एक मोठा खांब होता. या खांबाच्या आधाराने लपवा - छपवीचा खेळ कधी - कधी आम्ही दोघंच खेळत असू. ही

सुशीला सारखी मला खायला आणून द्यायची. पुष्कळ वेळेला जेवायलाही ठेवून घ्यायची. मला तिच्याबद्दल आकर्षणाची भावना होती; पण ती एवढीच की, ती जर कधी आमच्याकडे आली नाही अथवा तीन - चार दिवस गावाला गेली तर मला चुकल्या - चुकल्यासारखं व्हायचं. ती नसताना मी एकदा दत्त मंदिरात गेलो संध्याकाळच्या वेळी. तेव्हा एक उंच व लठ्ठ गोरापान, अंगाला भस्म लावलेला, कपाळावर त्रिपुर लावलेला, जांभळया रंगाचं सोवळे नेसलेला श्री. दत्त महाराजाच्या मूर्तीची पूजा व प्रार्थना करीत होता. विशेष म्हणजे हे की, तो एका पायावर उभा राहून श्री दत्ताचे स्तोत्र म्हणत होता. त्याची पूजा, उपासना, प्रार्थना जवळ - जवळ अर्धा तास चाले. बरं त्यातून वैशिष्ट्य हे की, तो अशा तऱ्हेचं कडक व्रत उपासना एकसारखी पंधरा दिवस करीत होता. आम्हाला आश्चर्य वाटायचं, किती भाविक व पवित्र माणूस दिसतोय. त्याची नक्कल म्हणून आम्ही ही कधी - कधी एका पायावर उभे राहायचे; पण एकदम पडायचे. सारे मित्रमंडळी हसत. तो दत्ताचा भक्त अर्धा तास एका पायावर कसा उभा राहायचा हेच कळेना. मला सुशीला म्हणाली, “अरे, त्यांना सवय आहे.”

मी तिला विचारी "ईश्वराने दोन पाय दिले असताना एका पायावर कशाला उभं राहायचे?”

तिचं उत्तर असे, "अरे, त्यामुळे ईश्वराबद्दल जास्त भक्ती दाखवल्यासारखं होतं.”

घरी आल्यावर या विशेष भक्ताची ही विशेष भक्ती मी आई - वडिलांना सांगायचं पण नंतर काय झालं की, या

भक्ताच येणं (मंदिरात) अजिबात बंद झालं. तो जसा येईनासा झाला तसे मी भक्ताबद्दल - वडिलांना सांगितलं की, तो उंच, गोरा, देखणा, गंध, टिळा, माळा सकट असलेला आता दत्त मंदिरात का येत नाही? या माझ्या प्रश्नाला मी वडिलांचे उत्तर ऐकून चाटच पडलो.

वडिलांनी सांगितलं, "अरे त्याला पोलिस पकडून घेऊन गेले. त्याने पन्नास हजार खाल्ल्याबद्दल त्याला मी पकडून घेऊन जाताना पाहिलं."

आणि ते पुढे म्हणाले, "अरे वामन, एवढी त्याची श्री. दत्त महाराजाबद्दलची कडक भक्ती व व्रत उपासना खाल्लेले पन्नास हजार पचवण्याकरिता होती."

या भक्तीत एवढं ढोंग, फसवेगिरी, लबाडी व थोतांड असत किंबहुना पैसा खायला मिळावा म्हणूनही कडक व्रत करणारे ढोंगी भक्त असतात. हा विचार संस्कारी मनाला एकदम चाटून गेला. काही भक्तामध्ये असा ढोंगीपणाचा व स्वार्थीपणाचा एक पैलू असतो. किंबहुना त्या करताच ते ईश्वर भक्ती करीत असतात. पण ईश्वर खराच सच्चा त्याला हजार डोळे आहेत. श्री दत्त महाराजांनीच त्याला या ढोंगी भक्ताला सापळयांत आणण्याची प्रेरणा शिक्षा करणाऱ्या अधिकाऱ्यांना दिली नसेल कशावरून? पण हा प्रसंग माझ्या मनावर कायमचा लिहिला गेला, वज्रलेप झाला. नंतर सुशीला आपल्याकडे चार - पाच दिवस आलीच नाही, देवळात गेल्यावर कळले की ती गावाला गेली आहे व तिला दाखवायला नेले आहे. मग माझेही दत्त मंदिरात जाणं बंद

झालं आणि मग काय चार - पाच दिवसांनी माझ्या घरी माझ्यासमोर 'दत्त' म्हणून उभी.

मी विचारलं, "कुठे गहाळ झाली होतीस? आठवण विसरलीस वाटतं?"

ती उत्तरली, "अरे वामन, आठवण विसरले असते तर तुझ्याकडे आता पुन्हा आले असते का? तुला काय माहित मला पसंत केलं व माझं लग्न ठरलं."

मी एकदम तिच्या हातावर टाळी देऊन, "उत्तम, फार छान! मला लाडू खायला मिळतील."

ती म्हणाली, "अरे वामन तुला लाडू मी केव्हाही व कितीही दिले असते. पण माझं लग्न झाल्यावर मला तुझ्याशी व तुला माझ्याशी खेळायला मिळायचे नाही."

"का बरं?" मी.

"अरे लग्न झाल्यावर मी इथे देवळात राहणार नाही." सुशीला म्हणाली.

"लग्न झाल्यावर नवऱ्याला सांग आठवड्यातून एकदा मला भेटायला येत जा म्हणून."

"वामन, तू मूर्ख आहेस." सुशीला

"तो कसा काय बुवा." मी.

"अरे, लग्न झालं की नवऱ्याबरोबर सासरी जावं लागतं व सर्व जन्म सासरीच काढावा लागतो."

"अस्स होय."

आणि ती पुढं म्हणाली, "आता माझ्यावर माझ्या नवऱ्याची मालकी. बाकी कुण्णा कुण्णाची नाही."

हे ऐकून मात्र मन खट्टू झाले.

# (१ ३) वडिलांची मोर्शीला बदली

सांगायची एक गोष्ट राहून गेली. ती म्हणजे आम्ही आगाशे वकीलांच्या वाड्यात राहत असताना वसंत दहावीतून अकरावीत (मॅट्रिकमध्ये) गेला व राजा मॅट्रिक दुसऱ्या वर्गात पास झाला. मी सहावीतून सातवीत गेलो. मी १६ वर्षांचा असेन, आम्ही समोरच्या नवीन प्रशस्त माडीच्या घरात राहायला गेलो ते एप्रिल १९३३ साल असावे. जवळ - जवळ १९३३ डिसेंबर पर्यंत आम्ही याच घरात होतो. या घरात असताना माझ्या आई - वडिलांना अगदी दोघांनाही एकदम टायफॉईड झाला. ताईला जवळ - जवळ बेचाळीस दिवसांचा टायफॉईड झाला. त्यावेळेस टायफॉईडवर सध्यासारखे असे खास औषध निघाले नव्हते. केवल शुश्रूषा व पथ्यपाणी व डॉक्टरांची देखरेख हेच उपाय होते. पण हे उपाय तोकडे पडत होते. पण त्यावेळेस आमचे फॅमिली डॉक्टर डॉ. जड्डी हे अत्यंत कळकळीने, काळजीपूर्वक आमच्या ताई - भाऊंच्या प्रकृतीकडे लक्ष देत असत. अगदी रात्री उशीरासुद्धा ते पाहायला येत असत. ताप खूप चढला म्हणजे कोलन वॉटरच्या घड्या ठेवणं, बर्फ ठेवणं, मोसंबीचा रस देणं याप्रमाणे उपाय व शुश्रुषा करत असे. आम्ही तर सर्व चिंतातूर झालो होतो. वसंतानेसुद्धा ताई - भाऊंची सेवा बरीच केली. राजा चिंता करीत जवळ बसून असे. मी अत्यंत लहान असल्यामुळे व चि. बबी (हिचे नाव कलावती ठेवलं होतं) माझ्याहून लहान असल्यामुळे

जबाबदारीच्या दृष्टीने आम्हाला विशेष कळत नसावं असं मोठ्यांना वाटायचं. पण मी स्वत: घाबरून गेलो होतो. ईश्वरकृपेने ताई - भाऊंचा ताप उतरून हळूहळू बरे वाटू लागले. नंतर आम्ही सारेच निश्चिंत झालो. या आमच्या ताई - भाऊंच्या दुखण्यात आम्हाला शेजाऱ्यांची, ओळखीच्या लोकांची बरीच मदत झाली. येतं दुखणं हत्तीच्या पावलानं व जातं मुंगीच्या पावलानं.

भाऊ सुट्टीवर होते. ते बरे झाल्यानंतर कामावर जाऊ लागले. डिसेंबरपर्यंत दिवस बरे गेले. पण पुढे जानेवारीमध्येच १९३४ ला भाऊंची बदली मोर्शी या तालुक्याच्या ठिकाणी झाली. हा मोर्शी तालुका अमरावती जिल्ह्यात तेहतीस मैल अंतरावर आहे. बदली झाल्यामुळे शिक्षणाच्या दृष्टीनं मोठी पंचाईत झाली. मी सातवीत (इंग्रजी तिसरीत) व वसंत मॅट्रिकमध्ये. शेवटी असं ठरलं की, वसंताने वर्धेलाच स्वतंत्र खोली घेऊन राहावे, कारण मॅट्रिकचा वर्धेच्या हायस्कूलमध्ये जो अभ्यासक्रम झाला असेल तर मोर्शीच्या हायस्कूलमध्ये त्याच्यापेक्षा कमी झाला असेल. शिवाय वसंताची इंग्लीश मिडीयम होती. मोर्शीला इंग्लीश मिडीयम नव्हती. मला मोर्शीच्या हायस्कूलमध्ये गव्हर्मेन्ट सर्व्हन्टचा मुलगा म्हणून केव्हाही ॲडमिशन मिळणार होती. त्या प्रमाणे ठरलं. वडिलांनी एक स्वतंत्र सामानाचा ट्रक ठरविला. त्या ट्रकमध्ये सर्व घरगुती सामान भरून व आम्ही ट्रकमध्ये फ्रंट सीटवर बसून मोर्शीला रात्री आठ वाजता येऊन पोहोचलो. वडील (भाऊ) मोर्शीला पोस्टमास्तर म्हणूनच बदलून आले होते, त्यामुळे त्यांना

पोस्टाचे क्वॉर्टर्स मिळाले. क्वॉर्टर्स मोठे व प्रशस्त होते व अमरावती मोर्शी मेनरोडवर नाक्याच्या जवळ क्वॉर्टर्स होते. पण मोर्शीला आल्यानंतर मी आजारी झालो. मला (कॉन्स्टिपेशन) बद्धकोष्ठतेचा विकार बहुधा उद्भवत असे व याच विकाराने मला आजारपण येत असे. त्यापासून मला मलेरिया झाला. त्यामुळे येथे आल्यावर येथील हायस्कूलमध्ये नाव एकदम घालता आले नाही. मला बरे वाटू लागल्यावर जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात येथील सरकारी हायस्कूलमध्ये नाव घातले. मला अॅडमिशन मिळाली कारण मी गव्हर्मेन्ट सर्व्हन्टचा मुलगा म्हणून. सरकारी हायस्कूल्सना तशा सूचनाच असतात. एप्रिलमध्ये वार्षिक परीक्षा. मला भिती ही पडली, मी पास कसा होणार? जेमतेम दोन अडीच महिने मिळाले असतील. मनात भिती असण्याचे कारण मी मराठीत दुसरीत नापास झालो होतो म्हणून. आता मला पंधरावे संपून सोळावे वर्ष लागलं. म्हणून वयाच्या मानाने माझे शिक्षण उशीराच होत होतं. तरीपण मोर्शी हायस्कूलमधील शिक्षकांनी एकंदर माझी चाचणी घेतली व त्यांच्या चाचणीच्या चाळणीतून मी यशस्वीपणे बाहेर पडत असे. पण आपलं बरोबर आहे की नाही, का चुकलं. आपल्यावर रागवतील काय?

"वर्धेच्या शाळेत असंच शिकला वाटतं, तुला अभ्यास करण्याची सवय दिसत नाही इ." असं म्हणून कानउघडणी करतील काय ही नेहमी भिती. मोर्शी हे गाव तालुक्याचं असल्यामुळे लहान होतं व आमचे क्वॉर्टर्स बाहेर मोकळयावर

होते. आमच्या क्वॉर्टर्सच्या पाठीमागे मात्र काही हरिजन वर्गातल्या लोकांच्या झोपड्या व रजपूत जातीची एक - दोन बिऱ्हाडे होती. मुख्य गावापासून आमचे क्वॉर्टर्स दूरच होते. पण हायस्कूलला फार जवळ. हायस्कूलही मोर्शी - अमरावती मोठ्या (मेन रोड) रस्त्याच्या आमच्या क्वॉर्टर्सच्या २ फर्लांग पुढे होते. या रस्त्याच्या एका म्हणजे अमरावती बाजूकडे जाताना डाव्या हाताला हायस्कूलची इमारत व क्रीडांगण व उजव्या हाताला हायस्कूलचं होस्टेल. या होस्टेलमध्येच बाजूला होस्टेल सुपरिंटेंडेंटचे (त्यावेळी हेडमास्तरच होस्टेल सुपरिंटेंडेंट असतं) क्वॉर्टस होते. हा जो मेन रोड उंचीवर असा होता व खाली बाजूला घरं होती आणि या मेन रोडने आमच्या क्वॉर्टर्स पासूनच्या एक फर्लांग अंतरावर मोटार स्टॅण्ड होते. हे गाव आतल्या बाजूला असल्यामुळे येथे रेल्वे स्टेशन नव्हते. सर्व मोटर ट्रान्सपोर्ट, प्रायव्हेट बसेस अथवा ट्रक साईझ मोटर्स, हाक घेऊन येणारी मोटार सकाळी साडेनऊ दहाच्या सुमारास आमच्या क्वॉर्टर्स समोरच थांबत असे.

पोस्ट ऑफिसमध्ये वडील पोस्टमास्तर असल्यामुळे तेच मुख्य अधिकारी व त्यांच्या हाताखाली एक तारमास्तर कम क्लार्क (लेखनिक) चार नोकर होते. दोन पोस्टमन. एक पोस्ट ऑफिस सुरू असताना असणारा नोकर व एक म्हणजे चौथा आमच्या भाऊंचा वैयक्तिक दिमतीस असणारा नोकर सीताराम. हा सीताराम नोकर मात्र स्वभावांनी तर उत्तमच होता पण मोठा प्रामाणिक, कळकळीचा, आपुलकीने घरातल्या कुटुंबियांप्रमाणे काम करणारा, वाटेल तेव्हा

मदतीला तयार. उपमाच द्यायची झाली तर रामाचा जसा सेवक मारुती तसा आमच्या भाऊंचा व भाऊंच्या सर्व कुटुंबांतील माणसांचा सेवक सीताराम हा सकाळी, दिवसा, रात्री नेहमी कामाला हजर तेही आपखुषीने. काही दुखले खुपलं तर नेहमीच उपयोगी पहायचा. रोज रात्री वडिलांचे व इतरांचेही हात, पाय, डोके रगडून द्यायचा. त्याला कंटाळा म्हणून नाही. राहणीसुद्धा स्वच्छ धारदार नाक व जरा गौरच वर्णाचा असा नोकर आता तर अपवादानेसुद्धा लाभणार नाही. त्याचा जसा आमच्या घरातील मंडळींवर लोभ जडला होता तशी सर्व घरातील मंडळींचा लोभही त्याच्यावर जडला होता. पोस्ट ऑफिसला लागूनच क्वॉर्टर्स असल्यामुळे व पोस्टाच्या आतूनच राहत्या क्वॉर्टर्सला दार असल्यामुळे आमचे भाऊ घरात केव्हाही ये - जा करू शकत होते. आमच्या घरासमोरून जाणारा हा मोर्शी - अमरावती जो मेनरोड (हाय रोडच म्हणा ना) होता हा पुढे वरूडपर्यंत व पुढे मुलतापीपर्यंत जाता येत होते.

माझे हायस्कूलमध्ये जाणे सुरू झाल्यानंतर मी वर्गातल्या विद्यार्थ्यांत हळूहळू मिसळू लागलो व बऱ्यापैकी म्हणजे जरा हुशारात विद्यार्थ्यातच मोडणारे म्हणा ना अशा विद्यार्थ्यातच मी जास्त वावरू लागलो. शिवाय नवीन बदलून आलेल्या पोस्ट मास्तरांचा मुलगा म्हणून मला जरा किंमत ही देण्यात येत होती.

इंग्रजी तिसरीची वार्षिक परीक्षा आली आणि या परीक्षेत आपला कितपत नी कसा निभाव लागणार याबद्दल मला जरा चिंताच होती. परंतु वार्षिक परीक्षा १९३४

एप्रिल पहिल्या आठवड्यात संपली व रिझल्ट (निकाल) वाचून दाखवू लागले. मला वाटलं आता आमचा कायमचा निकाल लागणार, पण दैवानं व देवानं खैर केली. गुणानुक्रमे नंबर व निकाल लागत होता. पहिले चार नंबर झाल्यानंतर पाचव्या नंबरावर आमचे नाव पुकारण्यात आले. मला वर्गशिक्षकांनी जवळ बोलावून माझ्या पाठीवर शाबासकी दिली व म्हणाले, "इतक्या उशीरा शाळेत प्रवेश घेऊन त्यामानाने तू प्रगती उत्तम केलीस."

या वर्गशिक्षकांच्या उत्तेजनामुळे व गुणग्राहकतेमुळे मला बराच धीर आला व मी येथील जीवनात रूळलो.



# (१४) राजाभाऊचे लग्न

माझ्या शालेय विद्यार्थी दशेत मला चांगले स्पष्टपणे. आठवणार व त्यातल्या त्यात उत्तम वाटलेले म्हणजे मोर्शीचं जीवन. माझी तशी शालेय जीवनात प्रगती बरी होत होती. शिवाय वडील पोस्टमास्तर असल्यामुळे त्या काळात तहसिलीच्या ठिकाणी सबजज्ज, तहसीलदार, हेडमास्तर या जशा मानाच्या सत्तेच्या व अधिकाराच्या जागा समजल्या जात होत्या त्याचप्रमाणे पोस्टमास्तरही ही पण एक अधिकाराची व मानाची जागा समजली जात होती. त्यामुळे मोठमोठ्या अधिकाऱ्यांचं जाणं - येणं शिक्षक, हेडमास्तरांचं, डॉक्टरांचे, गावातील काही प्रमुख व्यक्तीचं जाणं - येणं ही नित्याचीच बाब होती. आमच्या भाऊंचा दराराही तसा बराच होता. पब्लिकच काय पण गावातील लोकही त्यांना वचकून होते. शिवाय क्वॉर्टर्स खूप प्रशस्त, पुढे क्वॉर्टर्सला लागून उभी आडवी ओसरीसारखी लांब खोली, त्यानंतर मोठा हॉल, नंतर मोठ स्वयंपाकघर, मागच्या बाजूला अंगण, अंगणात पुन्हा दोन स्वतंत्र खोल्या व अंगणाच्या दुसऱ्या टोकाला लॅटरिन. त्यामुळे आमच्या ताईला व आम्हालाही जागेचं सुख भोगायला मिळालं व ताईकडे बायकांचे जाणं - येणं व तिच्याही मैत्रिणी हळुहळू वाढू लागल्या.

मी इंग्रजी तिसरीतून चौथीत गेल्यावर जूनमध्ये वसंताचा मॅट्रिकचा निकाल आला. वसंत पहिल्या वर्गात पास झाला होता. वसंत हुशार व बुद्धिमानच होता. आम्हा

चौघात (३ भावात व २ बहिणीत) सर्वात हुशार, चतुर, थोडासा चलता बुरजा टाईप म्हणजे वसंतच. शिवाय दिसायलाही सुंदर, वर्ण गोऱ्यातच जमा होणारा, उंचीला शोभणारा शरीराचा आकार, बोलण्यात स्वत:चा खुबीनं कसा फायदा करून घ्यावा ही ढब (युक्तिबाज) असा होता. त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्वाची एकदम दुसऱ्यावर छाप पडत असे. त्या मानानं राजा अंगापिंडानं प्रशस्त पण राजात चपळाई कमीच (थोडासा आळशीच). स्वारी थोडीशी संथ, हळुहळू व वसंताचा चलतेबुरजेपणा त्याच्यात मुळीच नव्हता. संभावितपणाचे व थोडेसे आळशीपणाचं प्रमाण राजाभाऊत जास्त. चि. कलावती (तिला आम्ही बबी म्हणत असू) ही शेंडेफळ व शिवाय मुलगी तशीच दिसण्यात स्वरूपवान गोरी म्हणून तिचं कौतुक होत असे. त्या मानानं मी अगदीच साधारण (किरकोळातच जमा होणाऱ्या) व्यक्तिमत्वाचा. साधारण बुद्धिमत्तेचा, अगदी साधा - सीधा सरळ, मध्यम कृतिशीलतेचा व डोळयात ज्याचे व्यक्तिमत्व भरणार नाही असा.

साधारण माझं मत असं आहे की, कुटुंब ही एक संस्था असून या कुटुंबातील कुटुंबाचे घटक असणारे या संस्थेतील मेंबर्स - वडील, आई, भाऊ, बहीण आणखी अंतर चुलत नातेवाईक जे कोणी असतील त्या प्रत्येकाचं निरनिराळं महत्व व व्यक्तिमत्व त्या कुटुंबांत असतं व ज्याचं जसं व्यक्तिमत्व अथवा महत्व असेल तशी त्याची कमी जास्त प्रमाणात त्या कुटुंब संस्थेत संभावना होत असते. जसं एखाद्या संस्थेत त्या संस्थेचा चेअरमन (अध्यक्ष), उपाध्यक्ष,

मॅनेजर, असिस्टंट मॅनेजर, हेडक्लार्क, इतर क्लार्कस् व प्यून्स नोकर या सर्व घटकांची त्यांच्या - त्यांच्या मानाचा दर्जा व त्यामुळे येणाऱ्या महत्त्वानुसार त्यांची संभावना होते तशीच स्थिती प्रत्येक कुटुंबांत असते. फक्त फरक एवढाच संस्थेत करण्यात येणारा घटका घटकामधील फरक हा जाणून बुजून केलेला असतो (कारण यातील कोणत्याही घटकाचे परस्परांशी रक्ताचे नाते नसते.) तसाच फरक कुटुंब संस्थेतील प्रत्येक घटकामध्ये आणि व्यक्तीमध्ये केला जातो. पण जो फरक केला जातो तो अजाणता असतो. रक्ताच्या संबंधामुळे मला म्हणायचं काय की कुटुंबांतल्या सर्व मंडळींना सारखं महत्व दिले जात नाही. आई वडिलांचे सोडून द्या पण मुलांच्या बाबतीतही असा प्रकार घडतोच.

माझ्या माहितीतले एक नाशिकचे श्री. वासुदेवराव देशपांड्याचे कुटुंब होते, त्यांच्या कुटुंबात ते स्वत: सबजज्ज होते. त्यांचे वडील निवृत्त झाले होते. आई होतीच. जे सबजज्ज होते त्यांना दोन भाऊ व एक बहीण मोठा भाऊ हा कुठल्या शाळेत शिक्षक होता तर धाकटा भाऊ हा क्लार्क होता. मुलीचा नवरा हा निफाडला मामलेदार होता. सर्वांत मोठ्या भावाची बायको व सर्वांत लहान भावाची बायको व सबजज्जची बायको तसेच या तीन मुलांचे - आई वडील सारे एकच एकत्र अविभक्त कुटुंबं पद्धतीच होती. यात सर्वांत जास्त महत्व सबजज्ज व त्याच्या पत्नीला देण्यात येत असे. या जज्जला सारेच साहेबराव म्हणायचे. आई - वडीलसुद्धा. त्याचे घरात वजन व दरारा. अगदी खालचा धाकटा भाऊ तर खालच्या मानेनेच काम करायचा. मोठा

शिक्षक आपण बरे की, आपलं काम बरं. जावामध्ये सबजज्जच्या बायकोची हुकूमत इतर दोन्ही जावावर चालायची आणि सासूसुद्धा सुनामध्ये सबजज्जच्या बायकोच्या कलानं व तिचा शब्द प्रमाण मानायची. बाकीच्या दोन सुनांना जे पडेल ते काम करण्याव्यतिरिक्त किंमत नव्हती. अर्थात अविभक्त कुटुंब पद्धतीतील फायदे (संख्येने जास्त असूनसुद्धा) जो एक मोठा तोटा होता तो हा.

माझ्या बाबतीत परिस्थितीच अशी झाली की अगदी गैर सोईच्या परिस्थितीत जन्माला आलो, थोड्या गौण अशा परिस्थितीतच वाढला गेलो. मी व माझ्या नंतरची (जन्मल्यानंतर) पार्श्वभूमी भाग्यदायक नव्हती, मुले आजारी पडायची म्हणून शारीरिक स्वास्थाच्याही दृष्टीनं गैर सोयीची व बुद्धिमत्ताही असामान्य नव्हती. सामान्य होती. त्यामुळे मला महत्व येणारच कसं?

बरं! कुटुंबातल्या माझ्या या गैर - सोयीच्या स्थितीबद्दल कोणाला दोष देणेही इष्ट नव्हतं कारण माझी जी काय ही अशी परिस्थिती होती ती जन्मजातच. ही वस्तुस्थिती अधिक तपशीलांनी माझ्यापुढे येणाऱ्या जीवन क्रमामुळे अधिक स्पष्ट होणार आहे. तात्पर्य - प्रत्येक गोष्ट नशीबात पाहिजे. आमच्या भाऊंनी पोस्टमास्तर म्हणून नावही चांगलं मिळवलं होत व ताईसुद्धा पोस्टमास्तरीण बाई म्हणून तिच्याकडे जाणाऱ्या येणाऱ्या बायका बऱ्याच होत्या. राजाभाऊ मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी पुढं शिकायचं की नाही हा प्रश्न होता. वसंत पहिल्या वर्गात मॅट्रिक झाल्यामुळे त्याला पुढं शिकवण्याच ठरलंच. त्याचं गणित

चांगलं होतं; पण राजा व वसंत या दोघांचा कॉलेजाचा खर्च वडिलांना परवडण्यासारखा नव्हता. अजमेर बोर्डात खर्च कमी येत असल्यामुळे दोघांनी अजमेरला जावं असं बोलण्यात येत होतं. पण राजाभाऊंची तयारी नव्हती म्हणून राजाभाऊंनी हा जॉब अर्थात नोकरी धरली. हुशेगाबादला हिंदी विभागात त्यांना नोकरी मिळाली. पण ती थोड्या दिवसानंतरच त्यांना सोडून द्यावी लागली. राजाभाऊ परत मोर्शीला आले. त्याच वेळेला मोर्शीच्या कोर्टात आबाजी देशपांडे म्हणून होते.

राजाच्या स्थळाबद्दल या आबाजी देशपांडेकडून विचारणा झाली होती. राजा त्या वेळेला असेल २० - २१ वर्षाचा राजा तसा अंगापिंडाने प्रशस्त होता. त्यातून पोस्टमास्तरचा मुलगा. आबाजी देशपांड्यांनी ज्या मुली - करता विचारलं होतं ती रूपाने अगदीचं साधारण होती. वर्णाने काळसर, थोडी उंची कमीच आणि मुलाचं रूप व व्यक्तिमत्व या तुलनेने मुलगी अगदीच गौण होती. पण राजाला ती मुलगी सांगून आल्यानंतर ताईच्या मनाने अर्थात निराळेच विचार. तिला आमच्या धाकट्या चुलत्यांनी (अंतुकाका) धामणगावाहून आमच्या आईचे सासू - सासरे व हे काका मागे भांडून निघाले असताना - "तुझ्या राजाचे लग्न होणार नाही."

.... म्हणून जी शाप वाणी उद्गारली होती ती खोटी पाडायची होती. अर्थात कावळयाच्या शापानं गाय मरत नाही. तरी पण बायका साधारणतः असल्या बाबतीत भावनेच्या आहारी फार लवकर जातात. मुलगी

दाखवण्याचा समारंभ झाल्यानंतर राजाच्या मानानं मुलगीचं स्थान बरंच गौण असल्यामुळे पुन्हा दुसरी मुलगी पाहावी असा भाऊंचा व वसंताचा ताईला सल्ला होता व ही मुलगी नाकारावी. ही पहिलीच आलेली मुलगी. राजाही तसा काही फार मोठा नव्हता. त्याला बऱ्याच मुली सांगून येतील इतक्यात घाई करू नये. या सारख्या सूचना वसंत व भाऊ ताईला करत होते. पण आमची ताई काही ऐकेना. मुलगी सांगून आली की, हीच मुलगी ठरवून लग्न करायचं म्हणजे तिचे सासू - सासरे व धाकटे दीर खोटे पडतील. त्यांच्या नाकावर टिच्चून मी माझ्या राजाचं लग्न करीन या एका बाणीवर तिनेच राजाकरिता हीच मुलगी (आबाजी देशपांड्यांची) नक्की करायचं ठरवलं. राजाभाऊंना मुलगी अगदी पसंतच पडली होती असाही भाग नव्हता. पण हाताखाली सून आणणे ही एक जुन्या बायकांच्या अनेक महत्वाकांक्षेपैकी एक महत्वाकांक्षा असते. त्यामुळे ताईने हीच मुलगी राजाकरिता ठरवली. साखरपुडा झाला. येथे थोडा राजाभाऊंचा त्यागच म्हणावा लागेल. केवळ आईच्या आग्रहाखातर तो लग्नाला उभा राहिला. लग्न ठरलं. लग्न समारंभाला बरीच मंडळी आली होती. आमच्या घरातलं हे पहिलं कार्य. मुंबईहून आमची मावशी सौ. शांतामावशी व मावशे सॉलिसिटर के. बा. जोशी हे ही आले होते. लग्न मोठ्या थाटानं पार पडलं. आमच्या ताईला कृतकृत्यता वाटली. कोणत्या आईला आपल्या मुलाचं लग्न करून घरात सून आणल्याबद्दल कृतार्थता वाटणार नाही? बायकांच्या अपेक्षा व आकांक्षा ठरलेल्या असतात या बाबतीत मी तर

राजाभाऊंनी थोडीशी त्यागाचीच भावना दाखवल्याबद्दल त्याला मी श्रेय देईन. मनात मुलगी थोडीशी तरी पसंत पडल्याशिवाय साधारण मुलगा लग्न करत नाही. थोडेसे ताईकरताच (सारखी पाठीमागे लागली होती म्हणून व लग्नाकरिता तो विशेष आसूसला नसतानाही) तो चतुर्भुज झाला. त्याला त्याच्या सासऱ्याच्या खटपटीनेच फॉरेस्ट गव्हंमेंट डिपार्टमेंटमध्ये लिपिकाची जागा मिळाली. अर्थात नोकरी पगाराचे स्केल कमी असले तर शाश्वत सुशिक्षित आर्थिक जीवन चालू झाल्यामुळे एकंदर जीवन शिस्तीला लागले. मध्यमवर्गीय पांढरपेश्या कुटुंबात मुलाचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याला सरकारी नोकरी मिळून लग्न होणे म्हणजे वैवाहिक, कौटुंबिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मुलगा रांकेला लागला व त्याच्या आर्थिक व कौटुंबिक जीवनाला निश्चितता व सुरक्षितता प्राप्त झाली ही मध्यमवर्गीय पांढरपेश्या जीवनातला मुख्य सिद्धांत होय.



# (१५) मोर्शीचं जीवन

आमचं मोर्शीचं जीवन त्या मानानं फारच चांगलं होतं. जागेची मुबलकता, भाऊंची प्रतिष्ठा, हाताखाली नोकर माणसे, उत्तम शेजारपाजार, मुख्य मोर्शी अमरावती हायवेवर पोस्ट ऑफिस बिल्डींग, उभा आडवा फरसबंदी व्हरांडा, गावातील प्रतिष्ठित व्यक्तीचं येणं - जाणं.

आमच्या भाऊंना लाभलेले अत्यंत सज्जन तारमास्तर श्री. कृष्णराव अंभईकर (प्रसिद्ध गायक विनायकराव अंभईकरांचे सख्खे मोठे भाऊ), सबजज्ज, तहसीलदार, प्रतिष्ठित शिक्षक, वकील यांचे जाणं - येणं व परिपूर्ण स्वातंत्र्य यामुळे मोर्शीचं जीवन हेवा करण्यालायक होते. शिवाय त्या वेळेला असणारी स्वस्ताई यामुळे जीवनातल्या सुखवस्तूपणात भरच पडली होती. आमची ताई अत्यंत धार्मिक वृत्तीची व तिला याबाबतीत संपूर्ण सहकार्य देणारे आमचे भाऊ.

आमच्या ताईकडे नेहमी बायकांचं जाणं - येणं (तिच्या धार्मिक व्रतवैकल्यामुळे) म्हणून तिच्याही मैत्रिणींचा परिवार बराच वाढला होता. तिचं सावित्रीचं व्रत म्हणजे पूर्ण तीन दिवस चालायचं. घरातल्या आतल्या लांबोड्या व्हरांड्यात बसून सावित्रीच्या व्रतानिमित्त सावित्रीच्या जीवनावरील पद्य लिखाणांच एक लहान पण लांबट काळ सर्व उत्तम स्वरात तिचं वाचन सुस्वरात करीत असे.

एखादे वेळेस मला सुट्टी असली दुपारची तर मी मधल्या हॉलमध्ये बंगई (लोखंडी कडीचा पाळणा) वर बसून

ऐकताना पद्यात लिहिलेली सावित्रीची कथा ती सुस्वरात गात असे. ते ऐकून मी तर हेलावून जात असे. तिनं 'अश्वपती पुसता झाला । नारद सांगती तयाला।' हे गोड आवाजात म्हणण्यास सुरुवात केली की, मला वाटायचं माझी आई खरोखरच फार मोठी गायिका झाली असती, एखाद्या प्रवचनकार बाईसारखी ती उंच पाटावर बसलेली असे व तिच्या भोवती बायांचा गराडा असे.

वाचन तीन तास चालायचं. मग बायका तिची ओटी भरत. तिच्या पुढे आंबे, नारळ, खण ठेवून हळद - कुंकू फुलं तिला वाहत असत. या वेळेस तिच्या पावित्र्याचं व पातिव्रत्याचं मूर्त स्वरुपात दर्शन व्हायचं. चैत्र गौरीचं हळदी कुंकू कार्य, हरितालिका कार्य, सवाष्ण बायकांच्या गर्दीत बायकांचे व्रतवैकल्ये व सण मोठ्या वैभवाने पार पाडायचे. तसं म्हणजे तिला पूर्ण स्वातंत्र्य असल्यामुळे भाऊंच्या सहकार्यात तिनं अशी एकही गोष्ट ठेवली नाही.

निदान खाण्या - जेवण्याच्या बाबतीत वा नवीन फराळाचे पदार्थ करण्याच्या बाबतीत त्याची रूची व आस्वाद बहिणीसकट आम्हा मुलांना अनुभवायला मिळाला नाही. ती पहिल्या वहिल्या संसारी जीवनाच्या कालखंडात त्याग व सासुरवासातून गेल्यामुळे तिच्यात सत्व परीक्षेतून बाहेर पडलेल्या सीतेसारखं एक सात्विक तेज चेहऱ्यावर निर्माण झालं होतं.

अर्थात तिला इतका त्याग व सासुरवास सहन करावा लागला होता तो केवळ आमच्या भाऊंच्या अत्यंत नि:स्वार्थी प्रकारासारख्या सांब - भोळया दिलदार स्वभावामुळे.

भाऊसुद्धा पोस्टमास्तर असल्यामुळे मोर्शीतील प्रतिष्ठित अधिकारी. त्यांचेही मित्रमंडळ होतं. विशेषत: त्यांच्या नेहमीच्या गप्पाष्टकातले डॉ. राहाळकर, श्री. जोशीराव, श्री. जहागीरदार. हायस्कूलला पोस्टासमोरच्या रस्त्यावरूनच जावे लागत असल्यामुळे शिक्षक लोक पोस्टात येत. विशेषत: श्री. जोशीराव शिक्षक बऱ्याच वेळा येत व त्यांचा आमच्या भाऊंचा थट्टा विनोद बराच वेळ चाले.

आमचे फॅमिली डॉक्टर म्हणजे मी ज्यांचा वर उल्लेख केला आहे ते डॉ. राहाळकर. त्यांचा दवाखाना अगदी जुनाट. साऱ्या औषधाच्या बाटल्या व एकाच टेबलावर मांडल्या आहेत असा पुढच्या एका खोलीत होता. सर्व टेबलावर धूळ आणि नवीन माणसाने त्यांचा चेहरा व वेष पाहिल्यावर त्यांना हा माणूस डॉक्टर आहे असे सांगितले असते तर आश्चर्याचा धक्काच बसला असता. पण ते नाडी परीक्षा व रोग निदान यात इतर गावातील डॉक्टरांपेक्षा अधिक तज्ञ होते.

पोस्टातले श्री. अंभईकर या नावाचे जे तार मास्तर होते ते पण स्वभावाने सज्जन वक्तशीर राहणीत स्वच्छ व अपटुडेट व विनयशील होते. मी, वसंत, राजा भाऊ त्यांच्याशी आमचे भाऊ जेवण्याच्या मधल्या सुटीत गेले म्हणजे गप्पा मारीत असू. माझेही काही निवडक मित्र होते. हुशार म्हणून नावाजलेला टी. एन. देशपांडे हा तर होताच, त्याशिवाय मोर्शीचे सुप्रसिद्ध वकील श्री. मुंडले यांचा सर्वांत मोठा मुलगा राजाभाऊ मुंडले हाही माझ्या नेहमीच्याच सहवासात एकमेकांचे एकमेकांच्या स्वयंपाकघरापर्यंत जाणे येणे होते. शिवाय नुकतेच आमच्या हायस्कूलमध्ये श्री. मुंडले या नावाचे

मास्तर बदलून आले होते. ते बुटके, गोल चेहऱ्याचे व व्यक्तिमत्वाचे, गोऱ्यातच जमा होणारे गोल पोटाचे चालताना हातात छत्री घेऊन उडत - उडत चालणारे होते व त्यांच्याबद्दल फार आदर व कुतूहल होते कारण ते डबल एम्. एस्सी. सी. होते. मला स्वत:ला एम. ए. किंवा एम. एस्सी. झालेल्या व्यक्तीबद्दल फार आदर काय म्हणजे मला ते देवासारखेच वाटायचे आणि मनात एक सुप्त आकांक्षा झिरपत राहायची आपण ही एम. ए. (मास्टर ऑफ आर्टस्) होऊ का? बी. ए. बद्दल तेवढं कुतूहल नव्हतं; कारण बी. ए. खूप होते. एम. ए. मोजके होते व एम. ए. झालेला माणूस लेक्चररच (कॉलेजमध्ये) व्हायचा. मास्तरकीचा पेशा स्वीकारणारे क्वचित. हे मुंडले शिक्षक शिकवायचेही. या मुंडल्याचं व वकील मुंडल्याच दूरचं नातं होतं.

मुंडले शिक्षकांचा संसार व कुटुंबीय मंडळ म्हणजे जबरदस्त. मला वाटायचं यांच्या या कुटुंबीय मंडळातील मंडळ या शब्दाचा अपभ्रंश होऊन यांचे मुंडले हे नाव पडले किंवा काय? या मुंडले व शिक्षकांचे एकाखाली एक नंबराने अशी आठ मुलं व दोन मुली शिवाय त्यांच्याजवळ रहायला त्यांच्या भावाचा एक मुलगा व मुलगी. या मुंडल्यांच्या मुलांचेही आमच्याकडे सारखं जाणं - येणं असायचं. कारण त्याचं दार आमच्या घरापासून, एक तीस - चाळीस पावलांवर शिवाय राजाभाऊ दूर नोकरीच्या गावाला असल्यामुळे व वसंत नागपूरला असल्यामुळे मी एकटा व माझी धाकटी बहीण चि. बबी (कलावती) असे दोघेजण होतो. मला अभ्यास करायला पुष्कळ स्वतंत्र जागा होती.

वसंत उन्हाळ्याच्या सुट्टीत आल्यावर व राजाभाऊ रजा घेऊन आल्यानंतर आमच्या ताईला स्वर्गीय आनंद होत असे. मग आमच्याकडे मुंडले शिक्षकांचे मुलं - मुली तसेच श्री. जोशीराव ड्रॉइंग मास्तरांचे मुलंपण खेळायला, गाणी म्हणायला यायचे. त्यामुळे माझे मोर्शीचं जीवन फारच उत्तम तऱ्हेने जात होतं. भाऊ पोस्टमास्तर असल्याने आमचा गावात दबदबा होताच. कधी - कधी वुलन कपड्यांचे पाठीवर मोठ - मोठे गाठोडे घेऊन काबुली लोक यायचे. जसे ते प्रतिष्ठित लोकांकडे जात असत तसेच ते आमच्याकडेही येत असतात. त्यांच्याजवळ उत्तम लोकरी (वुलन) कापड असे. आमचे भाऊही या लोकांकडून वुलन कपडा घेत असत.

एकदा दोघेजण असेच वुलन कपड्यांचे गाठोडे घेऊन आले. त्यांच्या पाठीवरचे गाठोडे इतके मोठे होते सहज चाळीस - पन्नास किलोचे असेल; की ते पाठीवर घेऊन चालतातच कसे याचा मला अचंबा वाटायचा त्यांनी ते गाठोडे उघडले. त्यातील निरनिराळ्या तऱ्हेचे वुलन कापड पाहून आम्हाला फार आनंद झाला. भाऊंनी चौकड्या चौकड्याचे वुलन कापड पसंत करून त्यांच्या स्वत:सह आमच्या तिघांच्या कोटाला पुरेल एवढे कापड त्या काबुलीवाल्याला द्यायला सांगितले. पण वसंत महा चलाख. त्याने भाऊंना स्वत: करता चौकड्याचे कापड सोडून दुसरे निळ्या रंगाचे सर्चचे वुलन कापड दाखविले, कारण कॉलेजमध्ये अशा सर्चच्या कापडाचाच वुलन कोट घालावा लागतो असे सांगितले.

माझ्या मनातही वसंताने पसंत केलेले कापड घ्यावे असे आले व मी भाऊंना तसे सांगितले पण भाऊंनी "तू कॉलेजमध्ये जेव्हा जाईल तेव्हा घे." असे म्हणून माझी विनंती नाकारली.

शेवटी मला चौकड्याचेच कापड घ्यावे लागले. अशा तऱ्हेने मोर्शीचं जीवन व्यतीत करीत असतानाच माझ्या बाबतीत अशा ही घटना घडत होत्या की, ज्यामुळे माझं एकंदर कुटुंबातलं स्थान प्रभावी राहू शकलं नाही. त्यात पहिली गोष्ट म्हणजे मला बद्धकोष्ठतेचा विकार होता. यामुळे मी चार - पाच महिन्यातून आजारी पडायचाच. ताप येणे, सर्दी होणे, फल्यू होणे हे विकार वर्षातून दोनदा तरी होऊन जायचे. तसेच माझ्या अंगावर पित्त उठत असे. हे पित्त अंग भरून उठायचं व खाजवता - खाजवता मला नाकीनव येत असतं. त्यामुळे नेहमी डॉक्टर, आमच्या भाऊंना हे असं माझं आजारपण पाठ होऊन गेलं होतं. शिवाय मी मुलांत शेवटचा व धाकटा. नकटं व्हावं पण धाकटं होऊ नये हे अशा वेळी मला पटत असे. त्यामुळे माझं व्यक्तिमत्व एकंदर कुटुंबात अगदी गौण असं ठरवायचं.

राजाभाऊ सर्वांत मोठा मुलगा म्हणून त्यांना मान, वसंतराव दिसायला सुंदर, बुद्धिमान, तल्लख व हुशार अत्यंत चपळ व चंचल माझ्यापेक्षा बबी (कलावती) लहान पण तिचं मुलगी (शेंडेफळ) म्हणून कौतुक. अधांतरी फक्त राहाणार मीच. शिवाय माझ्या पाठी मागची तीन मुलं गेलेली त्यामुळे माझी प्रतिमा उठावदार माझ्या दृष्टीनं फायद्याची अशी कधीच राहिली नाही.

# (१६) काका शिक्षक म्हणून छडीचा मार

माझं मागे उल्लेख केल्याप्रमाणे गैरसोयीचं व्यक्तिमत्व, निस्तेज चंद्राप्रमाणे असल्यामुळे माझ्या मनात जरा भिती व भवितव्याबद्दल अनिश्चितता नेहमी राहायची. पण आमच्या कुटुंबातील या गैरसोयीच्या व्यक्तिमत्वाचा मला एका दृष्टीनं फायदा झाला. तो म्हणजे आपण नियमितपणे आळस न करता अभ्यास करावा व शाळेत हुशार मुलांच्या पंक्तीत आपला समावेश व्हावा ही महत्वाकांक्षा माझ्या मनात नेहमी घर करून राहत असे. त्यामुळे भाऊंना जेव्हा शिक्षकाकडून माझ्या अभ्यासातील प्रगतीबद्दल माहिती मिळायची तेव्हा त्यांना बरं वाटायचं या बाबतीत तरी आपण सामान्य विद्यार्थ्यापेक्षा किंचित का होईना सरस आहोत म्हणून मनाला समाधान वाटून जिद्द व ईर्षा वाढायची.

मी मागे उल्लेख केलेलाच आहे की एम. ए. झालेल्या माणसाबद्दल मला अत्यंत आदर व कुतूहल असायचं. पोस्टाचं इन्स्पेक्शन करायला मधून - मधून पोस्टाचे इन्स्पेक्टर श्री. फाटक यायचे. ते आमच्याकडेच उतरायचे. दोन - तीन दिवस राहायचे व मग इन्स्पेक्शन करून निघून जायचे. त्यांना ज्योतिष विशेषत: कुंडली उत्तम कळायची. ते आले की, आमचे भाऊ नी ताई त्यांना आमच्या कुंडल्या दाखवायचे. कुंडली पाहून ते पुष्कळसं बरोबर सांगायचं. माझ्याही ज्योतीषाबद्दल, भविष्याबद्दल मला उत्सुकता

असायची. म्हणून मी सारखा त्यांच्या जवळ बसायचा. त्यांनी माझी कुंडली पाहायला सुरुवात केल्याबरोबर हे काय सांगतात नी काय नाही याबद्दल माझ्या मनात सारखी धसक्याची व भीतीची भावना असायची. जेव्हा त्यांनी कुंडली पाहून सांगितले की हा मुलगा वकील होणार आहे तेव्हा मी त्यांना विचारले, “काय? मी बी. ए. एलएल. बी. होईन? ते कसे काय?”

ते उत्तरले, “तुझ्या कुंडलीत आहे.”

त्यामुळे आमचा चेहरा उजळला व मनात वाटले आपल्या आई - वडिलांना ताई - भाऊंनासुद्धा बरं वाटलं असेल. पण मला एम्. ए. झालेल्यांच्याबद्दल आदर व त्यांच्या बाबतीत देवासारखी भावना असल्यामुळे मी फाटक इन्स्पेक्टरना विचारलं, "का हो मी एम. ए. नाही का होणार?"

ते म्हणाले "तू होशील ना. तसा तू चिकाटीचा व जिद्दी आहेस."

मग मला मात्र धीर व स्वत: बद्दल अभिमान वाटू लागला. त्यांना मी मग सहज विचारलं, “का हो, मी चिकाटीचा व जिद्दीचा आहे हेही आहे का त्या कुंडलीत?”

तेव्हा फाटक इन्स्पेक्टर म्हणाले, “अरे इथेच तर तू आता तुझा कार्यक्रम करण्याची तू वकीली बुद्धी दाखविलीस.”

आपण अगदीच काही टाकाऊ नाही. आपल्यातही काही दम आहे, नाही असं नाही. मी त्या वेळेला नुकतीच कर्णाबद्दल गोष्ट वाचली होती.

"चांगल्या कुळात जन्म मिळणे हे दैवाधीन आहे; पण सामर्थ्य, महत्वाकांक्षा ठेवून ती पुरी करणे यात पुरूषार्थ आहे."

**देवायतं कुले जन्मा यदायनं तु पौरुषम्**

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमचे सख्खे काका श्रीधर काका हे ही शिक्षक होते व ते मोर्शीलाच बदलून आले होते. मागे उल्लेख केल्याप्रमाणे आम्हाला एकूण चार काका. वयानुक्रमाने १) गोपाळकाका २) श्री निवासकाका ३) श्रीधरकाका ४) अनंत (अंतू) काका. तेव्हा हे नंबर तीनचे श्रीधरकाका शिक्षक म्हणून नुकतेच बदलून आले होते. या श्रीधरकाकांना आम्ही शिदूकाका म्हणत असू. त्यांचं लग्न झालं होतं. ते गावातच स्वतंत्र बिऱ्हाड करून राहत होते. ही घटना आहे मी नवव्या वर्गात असतानाची.

ते आमच्या वर्गाला मराठी विषय शिकवित असत. ते शिकवायला आले की प्रश्न विशेष न विचारता रेकॉर्ड सुरू करीत असत. तसे ते तयारी खूप करत यायचे. त्यांचं सारखं रेकॉर्ड सुरू असल्यामुळे कधी - कधी ते कंटाळवाणे व्हायचे व मधूनच काही तरी नकला करायचे. सोवळया बाईच्या, मुक्या मुलाच्या, बढिया मुलाच्या अर्थात ते शिक्षकापेक्षा नकलाकारच जास्त वाटायचे. आमच्या वर्गात दोनच मुली होत्या. १) कु. वेणू व २) कु. सुशीला मुंडले. अर्थात ते वर्गात आल्यावर नकलाकार म्हणून आधीच मुले हसायची. नक्कल केल्यानंतर शिकवण्याचा गंभीर विषय सुरू झाला तरी मुले हसतच राहायची. मुलांची इच्छा ही की, त्यांनी आणखी नक्कल करावी. त्यांच्या गंभीर शिकवण्याच्या ओघात मुलं

हसत असल्यामुळे गंभीर विषय शिकवण्याचा मुलांच्या मनावर परिणाम होत नसे. एकदा माझ्या डेस्कवरचा मुलगा मोठ - मोठ्याने हसू लागला.

अर्थात - शिक्षक माझे काका असल्यामुळे मी माझं हसू दाबत असे व खाली पाहून हसत असे. माझ्या डेस्कवरचा मुलगाच काय पण बहुतांशी मुलं हसत होती. कोणाचं हसणं उघड - उघड दिसत होतं, कोणी तोंड फिरवून हसत होती. माझ्या डेस्कवरच्या मुलांना हसताना खूप मोठा 'च्याक' म्हणून आवाज केला तेव्हा मी खाली पाहून तोंड दाबून हसू लागलो. आमच्या काकांचा गैरसमज झाला की, मीच आवाज केला. त्यांना संताप आला व त्यांनी मला उभं राहायला सांगितलं. मी उभा राहिलो.

तेव्हा ते रागावून ओरडले, "आवाज कशाला केला?"

"आवाज मी केला नाही." माझे ठामठोक उत्तर.

काका, "मग आवाज झाला कसा?"

"कोणीतरी केला असेल, ते मी काय सांगू" मी

"मग कोणी केला त्याचं नाव सांग?" काका

"मला माहित नाही. माझे शिकवण्याकडे लक्ष होतं." मी म्हणालो.

माझं हे उत्तर ऐकून मुले पुन्हा हसू लागली.

"आवाज तुझ्याच बाकाकडून आला." काका

माझ्या बाकाच्या बाजूला पुष्कळ मुलं आहेत." मी.

"मग मला नाव सांग." काका

कोणत्या मुलाने आवाज काढला हे नक्की मला माहित नसताना मी नाव कसं सांगणार?"

"तू जर नाव सांगितलं नाहीस तर तूच आवाज केला असशील." काका.

"हा चुकीचा तर्क आहे." मी.

"उत्तराला उत्तर देतोस? मुजोरी करतोस तूच असला पाहिजेस." काका बरेच चिडले

कारण साऱ्या मुलासारखा त्यांचा एक विद्यार्थी व तोही त्यांचा पुतण्या त्यांना थांग लागू देत नव्हता. शिवाय मुलांसमोर त्यांची प्रतिष्ठा माझ्या उत्तराने घसरत होती ती निराळीच.

"मी तुलाच शिक्षा करणार. छडी आणायला सांगतो."

"चोराला सोडून सन्याशाला फाशी देता काय?" मी

यामुळे काकांचा तोलच गेला.

त्यांनी शाळेतल्या गड्याला बोलावले आणि हेडमास्तरांच्या ऑफिसमधून छडी आणायला सांगितले. या प्रसंगाच्या दिवशी मुख्याध्यापक रजेवर होते. काकांना वाटलं ही बरी संधी आहे. म्हणून त्यांनी प्यूनकडून केन आणून घेतली. आता त्यांची प्रतिष्ठा हळूहळू घसरतच होती. ते इरेला पेटले व मला म्हणाले, "हात पुढे कर."

मी उत्तरलो, "मी निरपराधी आहे. ज्याने अपराध केला त्याला शिक्षा करा."

"मला ज्ञान सांगू नकोस, तुझ्या बाजूनं आवाज आला व तूच आवाज केला. हात पुढे कर." काका

तुम्ही मला केनिंग (छडीमार) करू शकत नाही." मी

मी त्यांच्या त्यांना नसलेल्या अधिकाराची जाणीव करून दिली. त्यामुळे आणखीनच चिडले. एक विद्यार्थी व

आपला पुतण्या सर्व विद्यार्थ्यांसमोर आपल्याला शिकवतो काय? केवढा अपमान!

"हात पुढे कर. करतोस की नाही? लवकर कर!" काका.

"मी अपराध केलाच नाही तर छड्या का खाऊ?" मी.

त्यांचा तोल सुटला. त्यांनी माझ्या अंगावरच दोन छड्या मारल्या व म्हणाले, "आता जागेवर बैस."

मी पण संतापाने लाल झालो व सर्व मुलांसमोर एक शिक्षक व तेही काका माझा अपराध नसताना मला केनिंग केले. त्यामुळे सारी मुलंही नाराज झाली. मी वर्गातूनच त्यांना न जुमानता बाहेर पडलो व रडत - रडत घरी आलो नी ताई भाऊंना माझा अपराध नसताना आणि त्यांच्या अधिकारात नसताना शिदू (श्रीधर) काकांनी सर्व मुलांसमोर मला केनिंग केले याचं मी उट्ट काढल्याशिवाय राहणार नाही. भाऊंना वडिलांनासुद्धा हे काकांच कृत्य आवडलं नाही. तितक्यात काही मुले माझ्याकडे आली व काकांनी अधिकार नसताना केनिंग केले व तेही मी निरपराधी आहे असे सांगू लागले.

मुख्याध्यापक रात्री गावाहून आले होते. त्यांना भेटायचं व निषेध नोंदवायचा असं ठरलं. याची कुणकुण काकांना लागली. ते घाबरले त्यांनी आमच्या हायस्कूलमध्ये ड्रॉईंग शिक्षक श्री. जोशीराव जे आमच्या वडिलांचे मित्र (आमच्या भाऊंचं व जोशीरावचं एकमेकांकडे खूप जाणं - येणं होतं) यांना मुलांच्या तर्फे मुख्याध्यापकांकडे अधिकार नसताना मी केनिंग केल्याचा निषेध नोंदवला जाणार असून

नववीच्या वर्गातील सारी मुले मुख्याध्यापकांना भेटणार आहेत. तेव्हा मुख्याध्यापक मला अधिकार नसताना मी केनिंग केल्याबद्दल माझ्याविरुद्ध कारवाई करू शकणार नाहीत अशी व्यवस्था करण्याची विनंती श्री. जोशीराव मास्तराकडे निरोप पाठवून केली.

श्री. जोशीरावांनी माझ्या वडिलांना स्वतःच्या घरी बोलावले व तुमचे ते सख्खे भाऊ आहेत व काकाने पुतण्याला शिक्षा केली तर ते जगरहाटीला धरूनच आहे. वडिलांना सांगून प्रकरण दाबून टाकण्याचा प्रयत्न करणे असे सांगितले. वडिलांनी मला श्री. जोशीरावकडे बोलावले. तुझ्या श्रीधरच्या (शिदूकाकांच्या) हातून रागात चुकीने त्यांनी तुला केनिंग केली. त्याबद्दल मी त्याला बोलेन पण आपल्या फॅमिलीच्या दृष्टीनं ही गोष्ट गावभर होऊ नये अशी माझी समजूत काढून प्रकरण मिटविण्यात आले.

नंतर शिदूकाका आपणहून घरी आले. त्यांनी भाऊंना व ताईला नमस्कार केला; मला खाऊ म्हणून पेढ्याचा पुडा दिला व घरी जेवायला बोलावले. अशा रीतीने हे प्रकरण येथेच आटोपते घेण्यात आले.

# (१७) मनुष्य चिंतितो एक, तर ईश्वर चिंतितो भलतेच

तसं पाहिलं तर मी हायस्कूलच्या वर्गात एक पाच - सहा मुलांमध्ये बऱ्यापैकी विद्यार्थी गणला जात असे. बऱ्यापैकी काय तर एक हुशार विद्यार्थी म्हणूनच माझी संभावना होत असे. जे जी काय साधारण प्रत्येक वर्गात चार - पाच हुशार, बुद्धिमान विद्यार्थी म्हणून असतात तसे ते आमच्याही वर्गात (नववीच्या) होते व त्यात मी एक शाळेचे नाव कमावून देणारा विद्यार्थी समजला जात होतो. स्पष्टच व प्रामाणिकपणे सांगायचं म्हणजे मी विशेष बुद्धिमान (असामान्य बुद्धिमान) होतो असे मुळीच नाही पण मी मेहनती जिद्द व चिकाटी वृत्तीचा होतो. त्यामुळे शिक्षकही आमच्याशी (विशेषतः टी. एन. देशपांडे, कु. वेणू पांडे, मी) विशेष सहानुभूतीने वागायचे. माझ्या रोजच्या कंपनीतला म्हणजे टी. एन. देशपांडे. हा देशपांडे को - ऑपरेटिव्ह बँकेत अकाउंटंट होते त्यांचा मुलगा. अर्थात प्रत्येक वर्गात असतात त्याप्रमाणे टवाळखोर मुलंही आमच्या वर्गात होतीच व ते शिक्षक शिकवित असताना त्यांच्या खोड्या काढण्यात पटाईत होती. मी दहाव्या वर्गात गेल्यावर आम्हाला इंग्रजी शिकवण्याकरिता एक श्री. घारे मास्तर बदलून आले होते. ते म्हातारपणात जमा होते. असतील ५५ - ५६ वर्षाचे. पण त्यांची बायको मात्र तरुण व सुंदर होती. एक दिवस दोघं रस्त्यावरून जाताना हे वृद्ध - तरुणीचे जोडपं पाहिल्यावर

टवाळखोर मुलं म्हणायची "आत्याबाई नशीबवान आहे." आत्याबाई शब्द वापरायचे कारण हे घारे मास्तर किंकाळया आवाजात ओठाला उजव्या हाताच्या तर्जनीचे टोक लावून "यू सी, यू सी" म्हणून बोलायचे. काही - काही आठवले नाही की, "यू सी, यू सी" ते बोलू लागले की किंवा वर्गात शिरले की "अगंबाई, आत्याबाई आल्या, यू सी आत्याबाई आल्या."

यांच्यानंतर आमच्यावर श्री. डी. बी. प्रधान वर्गशिक्षक म्हणून दहावीला आले. हे प्रधान शिक्षक मात्र बोलण्यात, शिकवण्यात मुलांना समजून घेऊन बोलत, शिकवत असतं. यांची शिकवण्याची पद्धतही व्याख्यानासारखी असे. ते बी. एस., एल. एल. बी होते; पण मुलांत सरमिसळून राहायचे. त्यांच्या अशा काही विक्षिप्त सवयी नव्हत्या की ज्यामुळे त्यांच्यात दोष काढायला विद्यार्थ्यांना संधी मिळे. ते आम्हाला इंग्रजी शिकवित. मी दहावीच्या वर्गात होतो. ठराविक बऱ्यापैकी अथवा हुशार म्हणून समजली जाणारी सात - आठ मुलं पुढच्या बाकावर बसत. त्यांना या प्रधान शिक्षकांचे इंग्रजी बोललेलं समजत असे. समजेल असंच ते बोलत असतं. त्यातून त्यांच्याकडे अत्यंत लक्ष वेधून घेणारी Rupel of Henza ही कादंबरी शिकवायला होती त्यामुळे, शिवाय ते मुलांच्या Extracurricular activities मध्ये फार भाग घेत असत. नाटकं बसवणे, ट्रिप्स काढणं यात त्यांना विशेष रस होता. त्यामुळे ते विद्यार्थ्यात बरेच प्रिय झाले होते. आम्हाला ते

संस्कृत शिकवायचे. त्या काळात संस्कृत विषय आवश्यक होता. म्हणजे आर्ट्स वा सायन्स कोर्स घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला संस्कृत घ्यावेच लागत असे. प्रधान मास्तर आम्हाला संस्कृत पण शिकवायचे. त्यांचे संस्कृत शिकवणं विशेषत: मला फार आवडायचं. आपणही असंच पुढं संस्कृत शिकवावं ही सुप्त आकांक्षा त्यावेळी मनात निर्माण झाली. (पुढे ती कशी फलद्रुप झाली हे कळेलच). अशा रीतीने पुढे दहावीची परीक्षा मी उत्तम तऱ्हेने पास झालो व अकरावीत (म्हणजे मॅट्रिकमध्ये) गेलो. मॅट्रिकला आम्हाला 'कॉडर्न इंग्लिश प्रोज' हे कठीण पुस्तक होतं. संस्कृतही माझ्या आवडीचा विषय होताच. तसा मी थोडासा नियमित, वक्तशीर अभ्यास करणारा, पाठांतर करणारा विद्यार्थी होतो. आमच्या वेळेला 'अर्थमॅटिक' हा ही एक आवश्यक विषय होता.

'अर्थमॅटिक' मात्र त्या मानानं कच्चं होतं. मॅट्रिकच्या परीक्षा चार महिन्यावर राहिल्यावर काय झालं कुणास ठाऊक? आमच्या भाऊंची परतवाडा (एलिचपूर) येथे बदली झाली. आता मॅट्रिकची परीक्षा इतकी जवळ आली असताना मोर्शीच्या हायस्कूलमधून नाव काढून परतवाड्याला जाणं योग्य नव्हतं. एकतर दोन्ही ठिकाणी झालेल्या अभ्यासक्रमात फरक पडणार. म्हणून ताई व भाऊ दोघंही परतवाड्याला गेले व मला नवीन भाऊंच्या जागेवर आलेल्या पोस्टमास्तरांनी मागच्या अंगणातली स्वतंत्र खोली मला अभ्यासाला दिली. मी हायस्कूलच्या

होस्टेलमध्ये जेवावयास जात असे व खोलीवर अभ्यास करावयास येत असे. पण पुढे कर्म धर्म संयोगाने दोन महिन्यांनी परत भाऊंची बदली मोर्शीला झाली व माझ्याकरिता प्रत्यक्ष ईश्वरानेच हा बदल घडवून आणला म्हणून मी परमेश्वराचे आभार मानले. ज्याचा कोणी नसतो त्याचा परमेश्वर असतो हे मला इथं पटलं. दीड - पावणेदोन महिन्यावर परीक्षा असताना परत आई - वडील आले याबद्दल कोणाला आनंद वाटणार नाही? परीक्षा जसं - जशी जवळ येऊ लागली तसे परीक्षेमुळे अभ्यासाचं वारं मुलांच्या अंगात शिरू लागलं. महत्वाकांक्षा ही की, पहिल्या वर्गात यावं. निदान प्रयत्न तरी करावा. दुसऱ्या वर्गात येणार अशी आमच्या बहुतेक शिक्षकांची खात्री होतीच. परीक्षेला दोन - तीन दिवस राहिल्याबरोबर माझ्या मधून - मधून येणाऱ्या आजारपणाच्या नित्य नियमाप्रमाणे मी मलेरियाने आजारी झालो. खूप ताप आला. उद्या सकाळी साडेसातला इंग्रजीचा पेपर आणि आज रात्री एकशेदोन ताप. केव्हा कोणती आपत्ती येईल हे जरी माणसाला कळत नाही तरी ती आपत्ती ऐन आपल्या परीक्षेच्या तोंडी अथवा परीक्षेसारख्या भवितव्य ठरविण्याच्या वेळेस आली म्हणजे एखाद्या शत्रूने जसा आपला विश्वासघाताने गळा दाबून प्राण घेण्याचा प्रयत्न करावा तसल्या तऱ्हेची कल्पना मनात येऊन आपल्याच दुर्दैवाबद्दल आपल्याला कीव येऊ लागते. तसे ताई - भाऊ म्हणालेच की, "वामन तू वाईट वाटून घेऊ नकोस. पुढल्या वर्षी बैस परीक्षेला; पण आपले सारे

समवयस्क सोबती परीक्षेला बसणार नी आपण मात्र त्यांच्या बरोबर नाही याबद्दलचे दारूण दुःख मनाला जाळत होतं. मी रडू लागलो व मी परीक्षेला बसणार म्हणून हट्ट करू लागलो. ही आदल्या रात्रीची गोष्ट.

दुसऱ्या दिवशी सकाळी भाऊ म्हणाले, "पण तुला परीक्षेच्या हॉलपर्यंत जाववेल का? वाटल्यास टांगा करू. पण तुला तीन तास अंगात ताप असताना पेपर लिहिणं जमेल कसं?"

मी निश्चयपूर्वक सांगितलं “जमेल.”

रात्री शिक्षक मंडळी माझी प्रकृती पाहायला व माझे सांत्वन करायला घरी आली होती. ती सर्व मला म्हणाली, “वामनाची एवढी प्रबळ इच्छा असेल तर त्याला बसू द्या परीक्षेला.”

ठरलं परीक्षेला बसायचं. मॅट्रिकच्या परीक्षेकरता जे कंडक्टर आले होते त्यांनी माझी अवस्था पाहून व अंगात ताप पाहून माझ्याकरिता आरामखुर्ची बोलावली व “तुला लिहीण्यास लेखक देऊ का” म्हणून विचारले.

मी उत्तरलो, “मला आरामखुर्चीची गरज नाही व मी पेपर स्वत:च्या हाताने लिहितो.”

त्याप्रमाणे कंडक्टरने डॉक्टर वगैरे बोलावून ठेवला होता. इंग्रजीचा पहिला पेपर (ज्यात टेक्स्टवर प्रश्न असतात) होता. प्रश्नपत्रिका वाटण्यात आल्या. पेपरमधील पहिला प्रश्न लिहावयास सुरुवात केली. हात थरथरला. पाच मिनिटं चालेना. अर्धा तास जवळ - जवळ तसाच गेला. पण मग

मनाचा हिय्या करून लिहायला सुरुवात केलीच आणि मग वेग येऊ लागला. असे जवळ पहिल्या तीन - चार पेपरापर्यंत तापातच उत्तरपत्रिका लिहिल्या गेल्या. नंतरच्या सात - आठ पेपरात ताप नव्हता. मग हळूहळू ताप उतरला. अशक्तपणा खूप आला होता. या अवस्थेत पेपर लिहिला गेल्यामुळे ताई - भाऊंना माझ्या यशाची खात्री नव्हती. तापामुळे मलासुद्धा जशा उत्तरपत्रिका लिहावयास पाहिजे होत्या तशा लिहिता आल्या नाही. एक इच्छाशक्ती म्हणूनच उत्तरपत्रिका लिहिल्या. शेवटी याचा व्हायचा तोच परिणाम झाला. मला काठावर दुसरा वर्ग मिळेल असे वाटत होते. पुष्कळांचे नाव पास झालेल्या मुलात मिळू लागले. माझे नाव कुणीच सांगितलं नाही. जे शिक्षक आले ते म्हणाले, “आम्ही तुझं नाव दुसऱ्या वर्गात पाहिलं पण ते तिथं नव्हतं.”

अर्थात मी नापास झालो. ताई व भाऊ म्हणाले "तू नापास झाला तर रडतोस काय? अरे तू आजारपणात परीक्षा दिली ना? मग पास कसा होणार?"

माझ्या डोळ्यातून सारख्या धारा. शेवटी माझा मोठा भाऊ वसंत हा स्वत: हायस्कूलमध्ये जाऊन रिझल्ट पाहून आला व तो हेच सांगत आला की, "वामन पास झालाय तिसऱ्या वर्गात आला."

केवळ पाच मार्कांनी माझा दुसरा वर्ग गेला होता. मी समजलो Man Proposes, God Disposes मनुष्य चिंतितो एक, तर ईश्वर चिंतितो भलतेच.

# (१८) शेवटी अ‍ॅडमिशन मिळाली.

मी तिसऱ्या वर्गात पास झाल्यामुळे पुढे मोठ्ठा प्रश्न निर्माण झाला. तिसऱ्या वर्गात पास झालेल्या मुलाला साधारणपणे कॉलेजमध्ये पाठवत नसतं. तो कॉलेज शिक्षण घेण्याच्या लायकीचा समजला जात नसे. त्याने आपली कोणत्या तरी सरकारी ऑफिसात क्लार्कशिप करावी. या समजुतीला आमचे भाऊही अपवाद नव्हते. त्यांनाही वाटे की, याला काय करायचे कॉलेज शिक्षण. शिवाय त्या काळात कॉलेज शिक्षण म्हणजे खर्चाचा प्रश्न. त्या वेळेला कोणत्याच सवलती नव्हत्या. मला वाटलं श्री. फाटक इन्स्पेक्टरांनी माझं टिपण पाहिलं पण चुकीचंच पाहिलेलं दिसतंय. मला जर कॉलेज शिक्षण घेण्याचाच योग येत नाही तर मी कसचा वकील होणार. पण मी मग हट्टच धरत बसलो. मला ताईकडून व माझ्या मधल्या भावाकडून वसंताकडून साथही मिळाली. त्यांनी माझी अशी वकिली केली की जर वामन आजारी पडला नसता तर निश्चितच दुसऱ्या वर्गात आला असता. शिवाय काही शिक्षक मंडळीचेही मत पडलं की, मला कॉलेजचे शिक्षण द्यावं म्हणून; कॉलेजमध्ये शिकत होतोच.

वडिलांचे म्हणणं पडलं की, एकालाच मी पैसे पुरवू शकतो. दोघांना पैसे कसे पाठविणार? त्यांचेही म्हणणं एका अर्थी खरं होत. वसंत नागपूरच्या सायन्स कॉलेजमध्ये बी. एस्सी. ला होता. या वेळेस माझा सर्वांत मोठा राजाभाऊ नागपूरलाच Conservator of forest ऑफीसमध्ये क्लार्क होता. तो बायको मुलांसकट नागपूरला घर करूनच राहत

होता व त्याचं घर सीताबर्डीवर टेकडी लाईनला होतं. तो ज्यांच्या घरात राहत होता त्या घराचे मालक श्री. चारी वकील (अॅडव्होकेट) होते. वसंत राजाभाऊ जवळच होता. तेव्हा मी व वसंत आम्ही दोघांनी राजाभाऊ जवळ राहायचं व त्याला जेवणाचे काही पैसे द्यायचे म्हणजे त्याच्याही संसाराला मदत व आमचंही शिक्षण. भाऊ फक्त मी राहणार म्हणून वीस ऐवजी पंचवीस रुपये पाठवणार व एवढ्या रकमेत आम्ही दोघे राहू शकू असं वसंताने सांगितलं व त्याप्रमाणे मला कॉलेजमध्ये पाठवावयाचं ठरलं व मी वसंताबरोबर नागरपूरला आलो.

मी तिसऱ्या वर्गात आल्यामुळे कॉलेजमध्ये अॅडमिशनचा प्रश्न. सीताबर्डीवर जे सरकारी कॉलेज होतं. त्याचं नाव 'मॉरिस कॉलेज ऑफ आर्टस्' या मॉरिस कॉलेजची बिल्डींग तशी फार लहान होती; पण हे फार प्रसिद्ध कॉलेज होतं. वरच्या वर्गात आलेली हुशार मुलं याच कॉलेजात जायची. किंबहुना पहिल्या वर्गात अथवा उच्च दुसऱ्या वर्गात मॅट्रिक पास झालेल्या मुलांनाच या कॉलेजात प्रवेश मिळायचा. हे कॉलेजही बर्डीवरच होतं त्यामुळे मला फार जवळ होतं. जसं ऐन परीक्षेच्या वेळी आजार हे माझं दुसरा वर्ग न मिळण्याच्या दृष्टीनं दुर्दैव ठरलं तसंच दुसरा वर्ग न मिळणं या मॉरिस कॉलेजात प्रवेश न मिळण्याच्या दृष्टीनं दुर्दैव ठरलं.

जरी मी मेहनती, थोडा अभ्यासू वृत्तीचा व चिकाटीचा व जिद्दीनं प्रयत्न करणारा होतो तरीही अपेक्षित यश

मिळविण्याच्या दृष्टीनं माझं बहुधा दुर्दैव प्रत्येक वेळेस आड येत गेलंय.

जगात काही माणसं अशी असतात की, त्यांच्या हाताला एकदम यश कधीच मिळत नाही. सोनं हातात घेतल्याबरोबर त्याची त्यांच्या हातात माती होईल. माझी अशीच अवस्था होती. या उलट माझा मोठा भाऊ वसंत याचं नशीब होतं. त्याच्या हाताला चटकन यश मिळत असे. त्यानं हातात माती जरी घेतली तर त्याचं सोनं व्हायचं. त्याच्या कृतीत 'विनींग स्पीरिट' असे. अर्थात मी तिसऱ्या वर्गात आल्यामुळे 'हिस्लॉप कॉलेज' मध्येच अॅडमिशन घेणं भाग होतं. या हिस्लॉप कॉलेजमध्ये तिसऱ्या वर्गातल्या विद्यार्थ्यांना अॅडमिशन मिळत असे आणि याही कॉलेजमध्ये ज्यांना अॅडमिशन मिळत नाही त्यांना हिस्लॉप कॉलेजच्या पुढे म्हणून एक 'सिटी कॉलेज' होते त्यात तर मिळतच असे. पण ही दोन्ही कॉलेजेस गावात महालात (नागपूरची जुन्या शहराची) म्हणजे बर्डीपासून दोन अडीच मैल लांब होती. तेव्हा हिस्लॉप कॉलेजमध्ये अॅडमिशन घ्यायची ठरलं.

मला सायकल येत नव्हती. म्हणजे सीताबर्डीवरील घरापासून हे दोन मैलाचं अंतर लेफ्ट राईट करीत - करीत पायी चालणं नशिबी आलं. खरंतर नशीब म्हणायचं ते यालाच. अॅडमिशन घेण्याकरिता वसंतसुद्धा पायी - पायीच आला. अॅडमिशन घेण्याच्या आधी अर्ज व अर्जाबरोबर किती विषयात किती गुण मिळाले याची यादी बरोबर घेऊन प्रिन्सिपॉल समोर जावे लागले. प्रिन्सिपॉल इंटरव्हयू घेतात हे कळल्यामुळे छातीत धडधडू लागले. प्रिन्सिपॉल होता

इंग्लीश. गार्डिनर या नावाचा. त्याच्या समोर उभा राहिल्याबरोबर लालसर गोरा लांबट चेहरा, मांजरीसारखे डोळे, ज्याचे इंग्रजी उच्चार समजणे कठीण होतं. असा प्रिन्सिपॉल असल्यामुळे घाबरगुंडी उडाली.

“व्हॉटस् नेम, व्हेरफॉम यू आ - कमिंग, व्हेअर डु यू प्ली व्ह" अशा तऱ्हेच्या उच्चाराचे इंग्रजी प्रश्न विचारले. काही प्रश्न तर मुळात समजलेच नाहीत. पण अंदाजे उत्तरे दिली. शेवटी प्रिन्सिपॉल "दॅट ऑईट" असे काहीतरी बोलला. याचा स्पष्ट उच्चार म्हणजे खरा होता "दॅट इज ऑल राईट". म्हणजे आता संपले. म्हणजे मी जावयास पाहिजे होते. पण मला उच्चार न समजल्यामुळे मी समोर उभाच होतो. इतक्याच तो रागावून म्हणाला, "व्हाय आर यू हीअर, गॉऊट."

गॉऊट म्हणजे गो आऊट. तू जा असे म्हटल्याबरोबर मला असे वाटलं की, आपण इंटरव्हयूत नापास झालो व मी बाहेर तसे सांगू लागलो. तरी वरच्या वर्गातले काही मुलं म्हणाली की, "घाबरू नको रे, इंटरव्हयू नॉमिनल असतो.”

काही मुलं इंटरव्हयू शिवायसुद्धा घेतात कारण कॉलेजला मुलं पाहिजे असतात. शिवाय हिस्लॉप कॉलेज हे Missionary College कॉलेज होतं. ख्रिश्चन धर्माचा प्रसार करावयाचा हे या कॉलेजचं मूळ ध्येय होतं. शिवाय बायबल हा विषय प्रत्येकाला आवश्यक असतो. बी. ए. पर्यंत व या विषयाला गैरहजर राहणाऱ्या मुलाला नापास (Detain) करीत असत. जेव्हा मला कॉलेजची टर्म फी भरण्याकरता क्लार्कनी बोलावले तेव्हा एकदाचा जीव भांड्यांत पडला व शेवटी मला ॲडमिशन मिळाली.

# (१९) हिस्लॉपमध्ये शिक्षण

अॅडमिशन मिळाल्यानंतर फर्स्ट इअरच्या बी क्लासमध्ये मला घालण्यात आले. मला वाटतं ज्यावेळेला फर्स्ट इअरचे तीन क्लासेस होते. ए, बी, सी. ए - सायन्स कोर्स वाल्यांचा व बी आणि सी आर्टस् कोर्स वाल्यांचा. मी आर्टस्चाच विद्यार्थी होतो. प्रथम विषय निवडण्यात माझा गोंधळ उडाला. इंग्रजी तर आवश्यक विषय तो घेतलाच. पण नंतर लॉजिक, मराठी व अर्थशास्त्र हे विषय घेतले. मला लॉजिकच्या प्रोफेसरांचे काहीच कळेना. एका विशिष्ट कालावधीपर्यंत विषय बदलता येत होते. मी नंतर लॉजिक ऐवजी संस्कृत विषय घेतला. अर्थात त्यावेळेस सर्व विषय (मराठी सोडून) इंग्लीशमध्येच होते. त्या वेळेला मराठी माध्यम नव्हतंच. इंग्रजी माध्यम. संस्कृत घेतल्यामुळे मला पुष्कळ बरं वाटलं. आपण केलेली चूक सुधारल्याचं समाधान वाटलं. शिवाय आमचे संस्कृतचे प्रोफेसर श्री. बापट यांचे बोलणं सर्व कळायचं. अडचण कुठे येत होती तर इंग्रजी, अर्थशास्त्र या दोन विषयाबद्दल. मराठीची संस्कृतप्रमाणेच मला आवडच होती. मराठी गद्याकरिता प्रो. शं. द. पेंडसे. ते आम्हाला हरी नारायण आपट्यांची चंद्रगुप्त कादंबरी शिकवायचे. पद्याकरता प्रो. भ. श्री. पंडित. ते आम्हाला मोरोपंतांची केकावली शिकवित. पण प्रो. पंडितांना शिकवित असताना प्रत्येक वेळेस Do you follow me, yes हे प्रत्येक वाक्याच्या शेवटी म्हणण्याची आणि तेही नाकामध्ये म्हणण्याची सवय होती. अर्थात कॉलेजमधल्या विद्यार्थ्यांत

व हायस्कूलमधील विद्यार्थ्यात जो एक मोठा फरक मानण्यात येतो तो म्हणजे हा की हायस्कूलमधील विद्यार्थ्याला काही समजत नाही; अशा समजुतीने शिक्षक त्याला समजावून देण्याचा प्रयत्न करतो. तसं कॉलेजमधील विद्यार्थ्याला सर्व समजतंय असं समजूनच प्रोफेसर फक्त आपल्या भाषणाची तबकडी वाजवत असतो. समजलं नसलं तरी समजलं नाही म्हणून कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे प्रोफेसर समोर सांगण्याचे धैर्य नसते हे एक व सांगितलं तर कॉलेज विद्यार्थी होण्याच्या लायकीचा नाही अशी प्रोफेसरची व त्याच्या वर्गातल्या इतर मुलांची समजूत होणे त्याच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे ठरतं; हे दुसरं हे जे मी विधान केलेय ते फक्त आर्टस् कोर्स घेणाऱ्या विद्यार्थ्याबद्दलच. तेव्हा या प्रो. पंडितांनी केकावली शिकवताना कवितेच्या एकेक चरणाचा अर्थ सांगायचा घाई - घाईने व एक चरणाचा अर्थ सांगून संपला की Do you follow me, yes असे म्हणायचे. आम्हा विद्यार्थ्यांना अचंबा हा वाटायचा की हे प्रोफेसर महाशय शिकवितायत मराठी व प्रत्येक वेळेस असे इंग्रजी काय बोलतात. अर्थात विशेषत: आर्टस् कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे प्रोफेसरांच्या वैयक्तिक व्यंगाकडे लक्ष्य असतेच. शिवाय कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा एक गट असतो व गटा गटाने बसत असतात आणि गटातल्या एकाने उत्तरादाखल असा आवाज काढायचा की, तो कोणी काढला हे प्रोफेसरला समजू नये. प्रो. पंडित जेव्हा एकदा असेच एका चरणाचा अर्थ सांगितल्यावर म्हणाले Do you follow me त्या बरोबर त्यांनी पुढचा yes, म्हणण्याच्या आतच आवाज आला No

(अर्थात तो मीच होतो. मी जरा मागच्या बाकावरच बसायचा) No ऐकल्यावर प्रो. पंडित चरकले. मुलं - मुली हसू लागली. कॉलेजमधले प्रोफेसरही तसे जाणून असतात व अशा खोड्या काढणाऱ्या विद्यार्थ्यांशी कसा मुकाबला करायचा याची त्यांना सवयपण झालेली असते. अर्थात हे काही काहींच्या बाबतीतच हं. ते एकदम सर्व विद्यार्थ्यांकडे पाहून म्हणाले, Who said 'No' कोणी उभा राहायला रिकामा नाही. तेव्हा ते म्हणाले, Yes, have followed you. Did you follow me असे त्यांनी म्हणता क्षणीच सर्व वर्ग मोठ्याने हसू लागला.

"याला विनोद म्हणतात" Did you follow me, Yes कॉलेज मधल्या वातावरणात धाक व शिस्त याचं प्रमाण बेताचंच असतं. त्यामानाने डॉ. पेंडश्यांची मात्र मुलांवर जरब होती. अर्थशास्त्राचे प्रोफेसर डॉ. पटेल (M. A., Ph. D.) हे फडतूस इंग्रजी बोलायचे. नवीन इंग्रजी शिकलेल्या एखाद्या मुलासारखे ते इंग्रजी वाक्य बोलायचे. त्यांच्या बोलण्यात वक्तृत्व शून्य पण मराठी इंग्लीश सारखे धेडगुजरी इंग्लीश बोलायचे. ते आम्हाला Law of Diminishing utility सिद्धांत शिकवताना किंवा wants, necessaries, comforts यांच्या व्याख्या सांगताना नेहमी रसगुल्ल्यांचं उदाहरण द्यायचे.

“Suppose I am hangry. How many Rassagullas I will eat?”

“I will eat 100” मुलं म्हणायचे.

"No I will eat 15."

एकजण उठून म्हणाला, "sir, Can I take 100 Rasagullas as example?"

ते म्हणायचे "Why not, if you are so much hungry." या त्यांच्या रसगुल्ल्यांच्या उदाहरणामुळे एकदा मागच्या बेंचवरील एका मुलानं खरोखरच रसगुल्ले भरून एक मोठा उंच डबा वर्गात आणला. जेव्हा प्रो. पटेलांनी रसगुल्ल्याचं उदाहरण सुरू केले. तेव्हा ते ऐकत असता तो मुलगा एक - एक रसगुल्ला खाऊ लागला.

प्रोफेसरसाहेब त्या मुलाला उद्देशून म्हणाले, "What are you doing?"

"I am eating Rasgullas" मुलाचं उत्तर.

"How are you eating" प्रोफेसर.

"One by one" मुलाचं उत्तर

"Why are you eating." इती प्रोफेसर.

त्या मुलाचं इंग्रजी ही जेमतेमच. आता त्याला इंग्रजीत उत्तर देता येईना.

तो म्हणाला "मी प्रत्यक्ष प्रयोग करीत आहे."

प्रोफेसर पटेलांना मराठीही जेमतेमच येत होतं. ते म्हणाले, "Answer in English. I do not understand. Stand up. Come on. Come here."

मुलगा प्रोफेसरजवळ येऊ लागला. तेव्हा प्रो. पटेल म्हणाले, "Come with your डब्बा"

मुलगा थोडा घाबरला. मुलाने डब्बा प्रोफेसरांच्या टेबलावर ठेवला. प्रोफेसरांनी सर्व मुलांना प्रत्येकाला एक -

एक रसगुल्ला याप्रमाणे वाटून दिले. डब्यात एकही रसगुल्ला न राहिल्यामुळे "Boys there is not a Rasagullah for me. Now I will take example of गुलाबजाम in future."

वर्गात एकच हशा पिकला. याबाबतीत एका मुद्द्याचा निर्देश करावयाचा राहिला. संस्कृत मला फार आवडायचे. त्यातल्या त्यात विशेष म्हणजे पाठांतराची आवड फार व संस्कृत विषयात पाठांतराची अत्यंत गरज असते. एकदा फस्ट इअर ते बी. ए. पर्यंतच्या संस्कृत घेतलेल्या विद्यार्थ्यांची संस्कृत कविता म्हणून दाखविण्याची स्पर्धा ठेवण्यात आली. मी त्या वेळेला सेकंड इअरला होतो. आपणपण भाग घ्यावा का घेऊ नये याबद्दल मनाची दोलायमान परिस्थिती होत होती. शिवाय बी. ए. च्या विद्यार्थ्यासमोर त्यांचं ज्ञान व पाठांतर कितीतरी अधिक असल्यामुळे आपण टिकू का नाही ही मनात भिती. तरीपण 'Not failure but low aim is a crime' ही म्हण एकदम मनात आल्याबरोबर भाग घ्यावयाचे ठरविले आणि काय चमत्कार, माझा दुसरा नंबर आला व मला बक्षीसपण मिळाले.

दुसरी महत्त्वाची घटना. हिस्लॉप कॉलेजमध्ये असतानाच घडली. मला काव्याची जात्याच आवड आहे. नुसत्या वाचण्याची व रसग्रहण करण्याचीच नव्हे तर आपणही एखादी कविता करून पहावी असे नेहमी वाटायचे. आमच्या कॉलेजचे नियतकालिक निघत असे. त्यात मी एखादा लेख अथवा कविता द्यावी असा कॉलेज मासिकाच्या संपादकाने आपला मनोदय बोलून दाखवला.

झाले मनात आले आपण कविता द्यावी व मी त्यांना म्हटले, "कविता दिली तर चालेल का?"

तर ते म्हणाले, "कविताच द्या. कविता देणारे फार कमी आहेत."

त्याप्रमाणे दोन दिवस सतत बसून व कल्पना करून - करून 'शिखरिणी' या वृत्ताची कविता तयार केली. अर्थात ती मला आता पूर्ण आठवत नाही पण जेवढे काही या क्षणाला आठवते तेवढे खाली देत आहे.

कवितेचं शीर्षक होते.

**'चन्द्रो - प्रेक्षा'**

अहा। नीलाकाशीं रजतझित हा चन्द्र विलसे
तयाची ही ज्योत्स्ना जणुं रजनिचे अंबर असे
मना देती शांती शशिकिरण हे मोद मजला
हरीनी क्लेशांना शशिविमलता लाजवि जला.

याच्या पुढच्या ओळी आठवत नाहीत.

पण कल्पना अशी होती की -

या चन्द्रकिरणाभोवती चकोरपक्षी फिरू लागले व ते किरणांना त्यांचे अन्न म्हणून भक्षू लागले. इतक्यात या चकोर पक्षांचा हेवा वाटला म्हणून की काय वारा सुरू झाला व वाऱ्याबरोबर मेघ आले. मेघांनी चंद्राला झाकून टाकले व चंद्रकिरणांचे वैभव नाहीसे होऊन बिचारे चकोरपक्षी मरू लागले. मेघ आल्यामुळे मेघातून येणारे जलबिंदु त्यांचे अन्न आहे. असे चातक पक्षी जमू लागले व ते जलबिंदु पिऊ लागले. इकडे चकोरपक्षी अन्नाविना मरू लागले. तर चातकपक्षी मेघांतील जलबिंदुनी पोट भरून घेऊ लागले.

एकाच्या मरणावर दुसऱ्याचे जगणे. शेवटी म्हटले होते -

चाले खेळ असा जगात बहुधा सौख्यात सारे जरी
कोणी एक मरे म्हणून दुसरा जिवंत राहे तरी.
एकाचे विष ही सुद्धा गमतसे अन्याय हे नाकळे
देवासी अशी विषमता निर्मूनिया साधिले.

संस्कृतचे प्रोफेसर बापट साधे सरळ व कळकळीने शिकवणारे होते. संस्कृत इंग्लीश मेडियममध्ये (हायस्कूलमध्ये माझे मराठी माध्यम होते.) असल्यामुळे समजायला प्रथम थोडी अडचण वाटली. समजायला मला कठीण वाटायचं म्हणजे इंग्रजी व अर्थशास्त्र. त्यातल्या त्यात अर्थशास्त्र मुळीच सुरुवातीला समजत नसे. मुख्य म्हणजे अर्थशास्त्रातल्या कल्पना इंग्रजीत कशा स्पष्ट करायच्या हा प्रश्न पडत असे. ज्यांच्या जवळ मी बसत असे. ते माझे मित्र लक्ष्मण केशव दामले यांना मात्र चांगले समजायचं. याचा मला अचंबा वाटायचा. मी या दामलेच्या वहीवरूनच न समजता लिहून घेत असे. फर्स्ट इअरच्या वार्षिक परीक्षेमध्ये मला अगदी काठावर गुण मिळाले. उलट माझे मित्र दामले यांना शेकडा साठच्यावर गुण मिळाले याची मला जरा खंत वाटायची. शेवटी मी मनात विचार केला नुसते प्रोफेसरच्या लेक्चरवर अवलंबून रहाण्याचा हा परिणाम असावा. शेवटी मी Principles of Economics हे जठार आणि बेरीचे पुस्तक विकत घेतले. ते प्रथमपासून रोज एक - एक प्रकरण वाचावयास सुरुवात केली. चमत्कार असा की, मला पुस्तकातली अर्थशास्त्राचे सिद्धांत व उदाहरणे चांगली कळू

लागली आणि original मूळ पुस्तकातही छापील माहिती वाचली की त्यातल्या संकल्पना चांगल्या समजतात व मनावर त्यांची चांगली छाप पडून त्या बरेच दिवस स्मृतीत राहतात. प्रोफेसर समजावून सांगतात, त्याहीपेक्षा मूळ पुस्तक वाचल्याने सिद्धांत तर अधिक चांगले कळतातच पण त्याशिवाय आपली भाषा सुधारते व Explanation स्पष्टीकरण अथवा आविष्कारही चांगला करता येतो. मूळ पुस्तकातून अभ्यास करण्याचा इतका उत्तम परिणाम झाला की अर्थशास्त्र या विषयाबद्दल आवड निर्माण होऊन मला सेकंड इअरला intermediate च्या परीक्षेत गुणही चांगले पडले. अर्थशास्त्र जे कठीण वाटायचे ते सोपे वाटू लागले. पुढे तर मला वार्षिकमध्ये चांगले गुण पडले व इंटरच्या परीक्षेला मला हायर सेकंड क्लास मिळाला. यात माझा स्वतःचा अनुभव असा की मूळ टेक्स्टबुक original पुस्तक वाचून होणारे ज्ञान व प्रोफेसरच्या वर्गात घेतलेल्या नोट्सवरून अथवा गाईडमधून होणारे ज्ञान यात खूप फरक पडतो. मूळ पुस्तक वाचून जी ज्ञानाची खोली येते ती तात्पुरत्या नोटस् वाचून येत नाही व बुद्धीही म्हणावी तशी विकसीत होत नाही.



# (२०) मॉरिसमध्ये अॅडमिशन व शिक्षण

मला तर खरं सीताबर्डीवर असलेल्या मॉरिस कॉलेजबद्दल पहिल्यापासूनच फार आकर्षण. मॅट्रिक झाल्यावर मला याच कॉलेजमध्ये जावयाचे होते, पण यात Selected Admissions असल्यामुळे माझी मनीषा पूर्ण झाली नाही. पण पुढे इंटरला हायर सेकंड क्लास आल्यामुळे मॉरिस कॉलेजमध्ये अॅडमिशन मिळायला अडचण आली नाही. खरं कॉलेज लाईफ जगायचं असेल तर ते मॉरिस कॉलेजमध्येच जगावं या विधानातील सत्यता मला पटू लागली. मॉरिस कॉलेज एकतर सीताबर्डीवर जवळ असल्यामुळे व उत्तम - उत्तम Foreign Returned प्रोफेसरांचा संच अधिक प्रमाणात असल्यामुळे बहुतांशी हुशार मुला - मुलींचा लोंढा मॉरिसकडेच वळतो. त्यातून श्रीमंतांच्या, उच्चभ्रू कुटुंबांतल्या दिसायला सुंदर अशा मुलींचा भरणा मॉरिसमध्ये जास्त असतो. तसे पाहिलं तर कॉलेजची बिल्डींग (आमच्या वेळेस १९४१ मध्ये) अगदी लहान बंगलेवजा अनाकर्षक अशीच होती. ती बिल्डींग अपुरी पडायची म्हणून जरा अंतरावर एक Annexed बिल्डींग होती. पण सुंदर मुलींची सारखी वर्दळ, त्यात मुलांचीही त्यांच्याबरोबर स्पर्धा, निवांत झाडाखाली बसणाऱ्या जोड्या, वर्गांत stamping व मुलींच्या Nickname वरून मुलींना प्रोफेसरांच्या लक्षात येणार नाही अशा तऱ्हेने वर्गात आवाज काढून चिडवणे, प्रोफेसरांच्या नकला इ. अनेक

प्रकार पहायला मिळत असतं. त्यातून काय होत असे; अत्यंत सुंदर अशा मुली पहिल्या दोन वर्षातच खपून जायच्या. त्यापेक्षा कमी सुंदर बी. ए. पर्यंत कशातरी राहायच्या व मग त्यांचीही लग्न होऊन जात असत. शेवटी Post Graduation ला राहायचा तो गाळ. त्यातही एखादी दुसरी चांगली असायची. शिवाय Gathering मधील मजा तर काही विचारूच नका.

मित्र डी. जे. नांदेडकर हा हिस्लॉपमध्ये असताना मी टेकडी लाईनला आता न राहता टेकडी लाईनच्या टोकाला कॉलेजजवळ बॅ. पंडिताच्या वाड्यात एक माडीवर जी खोली होती ती मला सुदैवाने राहावयास मिळाली होती. या वेळेस मी व माझा मित्र आम्ही दोघांनीही मॉरिसमध्येच अॅडमिशन घेतली होती. मी, नांदेडकर दत्तात्रय देशपांडे, चिंचाळकर व रावेरकर अशा मित्रमंडळाचा एक ग्रुपच होता व प्रत्येकजण एकमेकाला सुटीच्या दिवशी भेटत असे व एकत्र येत असू. पुढे - पुढे मी व नांदेडकर आमची दोघांचीच जोडी जास्त वेळ एकत्र राहत असे; कारण आम्ही दोघेही बर्डीवरच राहत होतो. बाकीचे सारे महालात राहत असतं. आम्ही दोघे अधिकाधिक एकत्र येण्याचं कारण म्हणजे आम्ही दोघांनीही मॉरिसमध्येच अॅडमिशन घेतली होती, इतकेच नव्हे तर दोघांचे विषयही एकच होते.

या ठिकाणी मुद्दामहून उल्लेख करण्यासारखा मुद्दा की, ज्यामुळे माझ्या शैक्षणिक जीवनाला मी मनात ठरवली होती त्यापेक्षा नवीनच दिशा मिळाली. ती म्हणजे आम्ही दोघांनी लवकरात लवकर एम्. ए. होण्याच्या दृष्टीनं


घेतलेला B. A. (Hons.) चा कोर्स. माझी हायस्कूलमध्ये मी शिक्षण घेत असतानाच एम. ए. होण्याची एक महत्वाकांक्षा होती. साधारणपणे शैक्षणिक जीवनात प्रत्येकाला कोणता तरी विशिष्ट कोर्स (एखाद्या विशिष्ट उद्देशाने) घेऊन आपले उद्दिष्ट साध्य करण्याचे एक ध्येय असते. तसेच माझेही एम. ए. होण्याचं एक विशिष्ट ध्येय होतं. शिवाय एम्. ए. झालेल्या शिक्षकांबद्दल मला विशेष आदर वाटायचा. याला थोडासा पाठीमागचा इतिहास आहे. आमचे भाऊ (वडील) मला फक्त बी. ए. पर्यंतच शिकविणार होते व तेही माझा मोठा भाऊ वसंत हा नागपूरातच बी. एस्सी. (Previous) ला असल्यामुळे त्याला व मला मिळून एकत्र पैसे पाठवीत. आमच्या सर्वात मोठ्या भावाकडे राजाभाऊ यांचे घर नागपूरातच असल्यामुळे त्याच्याकडे राहून काटकसरीने आमच्या दोघांचं शिक्षण सुरू होतं.

पुढे वसंत बी. एस्सी. झाला व मग तो एम्. एस्सी. पार्ट फर्स्टच्या वर्गात शिकू लागला. पुढे तो पार्ट फर्स्ट (एम्. एस्सी.) झाला पण त्याला Setha Loan Scholarship न मिळाल्यामुळे तो मुंबईला V. J. T. I. च्या Course ला गेला. आता मी बी. ए. पार्ट फर्स्ट ला मॉरिसमध्येच होतो. मी जेव्हा वसंताला सांगितलं की, भाऊ मला फक्त बी. ए. पर्यंतच शिकविणार आहेत व मला तर एम. ए. होण्याची इच्छा आहे. तेव्हा त्यानेच मला B. A. (Hons. ) चा Course घेण्याचा सल्ला दिला. या course च्या द्वारे बी. ए. झाल्यानंतर मधे साखळी (Link) न तुटता एम. ए. होता येते. हा बी. ए. (ऑनर्सचा) कोर्स इंटरनंतर तीन वर्षांचा

आहे. इंटरनंतर एम्. ए. होण्याला खरं तर चार वर्ष लागतात; पण या कोर्समुळे तीन वर्षात B. A. (Hous. ) होता येते व चौथ्या वर्षी एम. ए. ची पदवी आपोआप मिळते. बी. ए. (ऑ.) व एम्. ए. म्हणजे एकच कारण दोन्ही परीक्षांचा कोर्स सारखाच. फक्त तीन वर्षात एम. ए. ची डिग्री पदरात पाडून घ्यावयाची असेल तर बी. ए. (ऑ.) चा कोर्स घेतात. चौथ्या वर्षी आपोआप परीक्षेला न बसता एम्. ए. डिग्री मिळायची. तो जो Honors करता विषय घ्यायचा तो Major Subject म्हणून असे व बी. ए. च्या मुलाबरोबर इंटरनंतर दोन वर्षांनी दोन विषयांना ज्यांना Minor Sub. बसायचं. मी Minor Subject म्हणून मराठी अथवा संस्कृत घेणार होतो पण वसंताच्या म्हणण्याप्रमाणे या विषयांना नोकरीच्या दृष्टीनं म्हणत असतं. विशेष किंमत नव्हती म्हणून त्याने Economics म्हणून हा विषय सुचविला. मलाही Economics विषय घेऊन Minor General English त्याचं पटलं व मी Major Subject म्हणून Marathi असे दोन विषय घेतले. बरोबर हेच विषय माझा मित्र नांदेडकर याने घेतले व 'समानशी लेव्यसनेषु सख्यम्' या न्यायाने आम्ही अधिक जवळ आलो. परंतु मी ऑनर्स करता Economics घेतल्या मुळं आपल्याला Economics चा ऑनर्सचा म्हणजे एम. ए. चा Course झेपेल का ही भीती सारखी मनात दडून बसलेली असायची. कारण एकतर साधारणपणे एम. ए. करता तोच विषय घेतात की, ज्या विषयाची त्या विद्यार्थ्याला विशेष आवड असते. Intuition म्हणणे मनाचा व बुद्धीचा कल ज्या विषयाकडे असतो असाच विषय

निवडतात. यातील एकही देणगी मजजवळ नव्हती. केवळ व्यावहारिक मूल्य जास्त पुढे scope (संधी) नोकरीच्या वा आर्थिक लाभाच्या दृष्टीने जास्त म्हणून मी हा विषय घेतला. दुसरे महत्त्वाचे कारण हा विषय घेण्याचं ते हे की, मला माझेचं विषय घेणारा सवंगडी माझा मित्र श्री. ही. जे. नांदेडकर मिळाला. माझा कल जरी मराठी विषयाकडे होता तरी मला एकत्र अभ्यास करण्याकरिता व चर्चा करण्याकरिता माझ्याबरोबर रहाणारा Partner सहकारी मित्र नांदेडकर असल्यामुळे मी अर्थशास्त्र हा विषय घेण्याचे धाडस केले. आम्ही दोघांनी जेव्हा एम्. ए. करता (B. A. Hons. करता) या विषयाचा (Syllabus) अभ्यासक्रम पाहिला तेव्हा तर माझी छाती दडपूनच गेली. तरीपण नांदेडकर असल्यामुळे नोटस् काढून एकमेकांच्या सल्ल्याने आणि चर्चेने विषयातील कठीण - कठीण भाग एकमेकाकडून समजावून घ्यायचा. तसेच अर्थशास्त्राच्या एम्. ए. कोर्सला इतका अफाट अभ्यासक्रम होता की, विशेषत: संदर्भ पुस्तकांची यादी इतकी प्रचंड होती की (६९ पुस्तके) की आता पर्यंतच्या परीक्षेत एवढा अभ्यासक्रम कधीच नव्हता. आमच्या दृष्टीनं हा अभ्यासक्रम अपूर्वच होता. पुस्तकं विकत घ्यायची ताकद नव्हती. कारण पुस्तकं विकत घ्यायची ठरवली तरी कोणती घेणार अशी तीन - चार पुस्तके नव्हती ज्यात सरळ अभ्यासक्रमातील सर्व (Topics) भाग आले होते. काही Topics एका पुस्तकात, काही दुसऱ्या तर काही तिसऱ्या पुस्तकात शिवाय अभ्यासक्रमातील कोणता Topics कोणत्या पुस्तकात दिला

आहे हे कसे ओळखणार? त्याकरिता बरीच पुस्तके (निदान ६९ पैकी ५० पुस्तके तरी) वाचावी. शेवटी आम्ही दोघांनी असे ठरविले की, युनिव्हर्सिटी लायब्ररीत जाऊन Recommended शिफारस केलेले एक - एक पुस्तक वाचून त्यातले दिलेले Topics शोधून काढून स्व:हस्ते नोटस् तयार करायच्या. त्याप्रमाणे आम्ही University Library मध्ये जाऊ लागलो व सुटीच्या दिवशी दुपारी अकरा ते पाच बसून नोटस् काढू लागलो.



# (२१) नागपूरमधील जीवन व मॉरिसमधील अनुभव नी अभ्यासक्रम

यात्रमाणे नोटस् स्वतः काढून त्या तयार करीत असताना आमचे पहिले वाचन आपोआप होऊन जायचे व एकंदर विषयाची सर्वसाधारण कल्पना यायची. आम्हाला प्रो. नानावटी, प्रो. दादाचंणी, प्रो. बँकर इ. प्रोफेसर त्यांच्या - त्यांच्या पेपरांच्या नोटस् देत असतंच आम्हाला. एकंदर एम्. ए. (अर्थशास्त्र) करता १० पेपर्स असत. १) प्रिन्सिपल्स ॲण्ड प्रॅक्टीस ऑफ एकॉनॉमिक्स, (२) हिस्टरी ऑफ एकॉनॉमिक थॉट, (३) मनी व बँकिंग, (४) बिझनेस एकॉनॉमिक्स व ऑर्गेनाइझेशन (५) पब्लिक फायनान्स, (६) इन्टरनॅशनल ट्रेड, ऑरिफ, फॉरेन एक्सचेंज, एक्सचेंज कन्ट्रोल, (७) रेल्वे एकॉनॉमिक्स, (८) लेबर युनियन ट्रेड प्रॉब्लेम्स्, (९) कोणत्याही अर्थशास्त्रीय विषयावर निबंध, (१३) Viva - voce तोंडी परीक्षा. या पेपरात फक्त पेपर नंबर एक, पेपर नंबर तीन यावरच नोटस् देत असत. बाकीच्या पेपरावर नुसते प्रोफेसरचे लेक्चर (व्याख्यान), 'तरीपण जो स्वये कष्टतच गेला, तोची भला' या एका ब्रीदवाणीनं प्रेरित होऊन आम्ही आमचे प्रयत्न सुरू केले होते. अक्षरश: बी. ए. (ऑन.) अर्थशास्त्राचा अभ्यास करताना ढोर मेहनत करावी लागत असे. पण याचा फायदा आम्हाला पुढे परीक्षा जवळ येऊ लागली तेव्हा फार झाला. साध्या बी. ए. करता माझे मराठी व जनरल इंग्लीश हे विषय होते हे मागे आलेच आहे.

पैकी मराठीला प्रो. बनहट्टी हे होते. यांची नाकात बोलण्याची व मध्ये गुं गुं करीत बोलण्याची पद्धत कंटाळवाणी व थोडी चेष्टेचा विषयच झाली होती. मराठीला आम्हाला सूक्ष्म वाचनाकरता 'दौलत' कादंबरी होती. ती शिकवताना प्रोफेसर म्हणजे खरोखरच तरतरीत, उत्तेजक व तरुणांच्या भावनांशी एकरूप होणारा असा असावयास पाहिजे, पण प्रो. बनहट्टी म्हणजे याच्या अगदी विरुद्ध टोक. एकच उदाहरण द्यायचे म्हणजे दौलत मधील नायक अविनाश याचं वर्णन त्याचं तारूण्य, औदार्य, धीरोदात्तता, कर्तव्य तत्परता, व्यक्तिमत्व या गुणांनी युक्त असं केलं असून यामुळेच नायिका त्याच्याकडे आकर्षित होते असं असताना प्रा. बनहट्टींच्या बोलण्यात नायकाच्या या गुणांचा परिपोष होईल अशी दब, आवेश व नायकाबद्दल आकर्षण, आदर, गौरव वाटावा अशी भाषेचा तडफदारपणा व जोश असावयास पाहिजे होता तो नव्हता. या उलट प्रा. बनहट्टीच्या बोलण्यात नायकाचं वर्णन करताना करकपात्रेपणा, गलथानपणा व निरसता प्रत्ययास येत होती. मराठीचे प्राध्यापक असून नायक नायिकेचे वर्णन करताना जी वक्तृत्व कला व अभिनिवेश असावयास पाहिजे होता तो त्यांच्याजवळ नव्हता. एकदा तर अविनाशचं वर्णन करताना जेव्हा ते - "अविनाशची छाती - अं - अं - अ. विशाल होती. कपाळ अं - अं - अं विशाल होतं. असे थोड्याशा भोंगल्या अनाकर्षक आवाजात बोलू लागताच मुलांनी त्यांची थट्टा करायला सुरूवात केली - कॉलेजचीच मुलं ती तीही मॉरिसची व थर्ड इअरची (ज्यु. बी. ए. ची)

ती काय ऐकतात. मुलांतील मागच्या बाकावरील एक दोघं लक्षात येणार नाही असा आवाज काढून ओरडले, "आणखी अविनाशच काय - काय विशाल होतं ते सांगाल का?" ते प्रोफेसर महाशयांनी ऐकलं. तेव्हा ते म्हणाले, “अं अं अं - हे पहा तुम्हाला चेष्टा करायची असेल तर मी काहीच बोलत नाही.”

तात्पर्य - प्रा. बनहट्टी होते हुशार, ज्ञानी, बहुश्रृत पण त्यांना वक्तृत्व नसल्यामुळे व बोलण्याची पद्धत कंटाळवाणी असल्यामुळे त्यांच्या शिकवण्यात अरसिकपणाची व मानवेळातून वळवून बोलण्यामुळे गलथानपणाची भर पडत असे यानंतर माझे बी. ए. ला जनरल इंग्लीश असे. या विषयाला जलद वाचनाखेरीज दुसरं कोणतंच पुस्तक नसे. या पेपरमध्ये जनरल म्हणजे इंग्रजी निबंध व अपठित पाठ या दोनच भागांचा अभ्यास करावा लागत असे. या जनरल इंग्लीश करता आम्हाला सौ. कुसुमावती देशपांडे होत्या. यामात्र तडफदार व बिजलीसारख्या. त्यांचा मुलावर दरारा पण होता. अर्थात कॉलेजमधील मुलांना चेष्टा करायची व प्रोफेसरांच्या खोड्या काढायची सवय असतेच. कित्येक वेळेला प्रोफेसरमध्ये मुलं थट्टा करताना गमतीनं स्वत: च्या कल्पनेतूनच त्यांचे दोष काढतात की जे त्या प्रोफेसरमध्ये नसतातच पण मुलांनीच आपल्या फाजील कल्पनाशक्तीनं त्यांना चिकटविलेले असतात. आता एवढे खरे की सौ. कुसुमावती देशपांडे एखादा धडा घ्यायच्या व त्याचा अभ्यास करून यायला सांगायच्या व दुसऱ्या दिवशी वर्गात आल्यावर Have you studied my unseen Passage? असं

त्या विचारायच्या. त्या असं विचारत नसत Have you seen my unseen Passage? पण चावट, फाजील व खोड्या करण्याच्या मुलांचा प्रत्येक कॉलेजमध्ये एक गट असतो. त्याला Morris College कसं अपवाद ठरणार? एका मुलानं म्हणे बाईला असं उत्तर दिलं होतं (वरील प्रश्न विचारल्यावर) की, Madam. how can I see your unsee passage अर्थात माझा यावर कधीच विश्वास बसला नाही व हे कपोलकल्पित असून एका टारगट मुलानं उठवलेली अफवा असली पाहिजे.

थोडक्यात मला हे सांगायचे आहे की, कॉलेज विश्वात अनेक तऱ्हेचे, स्वभावाचे, सवयीचे मुलांचे नमुने पहावयास मिळतात व आपल्याला विविधता व वैचित्रता कॉलेजमध्ये प्रतीत होणाऱ्या दोन वैशिष्ट्यातून उलट - सुलट बराच अनुभव येतो. मी व माझा मित्र ही. जे. नांदेडकर जरी एकत्र हिंडत फिरत होतो, कॉलेजमध्ये पिरिअडला जात होतो तरी पण आम्ही दोघांनी निरनिराळ्या भाड्याच्या खोल्या घेतल्या होत्या. माझी खोली लहानच (१० फूट x १० फूट) ची होती व ती जुन्या धंतोलीमध्ये. नव्या धंतोलीकडे रेल्वे लाईनला जो समांतर रस्ता जातो त्या रस्त्याच्या बाजूला होती व ती मालकाच्या बंगल्याला लागूनच होती. खोली मजबूत बांधलेली होती पण तिला फरशीची लादी नव्हती. बाकी साऱ्या सोयी होत्या. या उलट नांदेडकरची खोली नव्या धंतोलीच्या पुढे कॉंग्रेसनगरमध्ये असून ती माडीवर होती. त्याची खोली बरीच मोठी, दोन - तीन विद्यार्थी राहण्या इतकी लांबट व प्रशस्त होती. माझ्या खोलीच्या

दुप्पट असेल. बी. ए. च्या परीक्षेबद्दल आम्हाला विशेष काळजी वाटत नव्हती, कारण बी. ए. ला दोन विषय मराठी, इंग्रजी जे घेतले होते ते मायनर होते. १९४२ साली मायनर विषयांची परीक्षा झाल्यानंतर मुख्य म्हणजे १९४३ च्या मार्च - एप्रिलमध्ये येणारी मेजर विषयाची अर्थशास्त्राची विशेष काळजी होती. एकतर परीक्षेकरता अवाढव्य कोर्स त्यावर करावी लागणारी प्रचंड मेहनत व अभ्यास व पुढे यश मिळेल की नाही याबद्दल विवंचना. एम. ए. च्या वा (बी. ए. ऑन.) च्या विद्यार्थ्यावर वर्गात उपस्थिती रहाण्याची अशी आवश्यकता नसे. साधारण शेवटच्या तीन महिन्यात. मी नांदेडकर वर्षभरात म्हणजे चौथ्या वर्षाच्या बी. ए. च्या मायनर विषयांचा अभ्यास करीत असतानाच प्रथमपासूनच नोटस् काढायला (यूनिर्व्हसिटी लायब्ररीतली) पुस्तके वाचून (टॉपिक वाईज) सुरुवात केली होती व तिसऱ्या वर्षाच्या म्हणजे बी. ए. (ऑन.) फायनलच्या डिसेंबर जानेवारीपर्यंत नोटस् काढून संपविल्या होत्या. त्यामुळे जानेवारीच्या पंधरानंतर आम्ही नोटस् वरून अभ्यास करण्यास सुरुवात केली होती, जेवण झाल्यावर थोडी झोप झाली की दुपारी दोनच्या पुढे मी अभ्यासास बसत असे ते साडेपाचपर्यंत. मग नांदेडकर माझ्या खोलीवर यायचा व आम्ही फिरायला जात असू. नंतर संध्याकाळी साडेसातपासून आठपर्यंत जेवून आल्यानंतर आठ ते अकरापर्यंत अभ्यास करून नंतर सकाळी पाच वाजता चहा घेऊन अभ्यासास बसत असे. पाच ते साडेसातपर्यंत (सकाळी) अभ्यास झाला की चहा, आंघोळी

नंतर नऊ ते साडेअकरा ते बारापर्यंत अभ्यास व मग जेवणास जाणे; असा आमचा जीवनक्रम असे. मी मॉरिसमध्ये शिकत असताना माझा सर्वात मोठा भाऊ नागपूरलाच नोकरीला असल्यामुळे (Conservator of forest ऑफिसमध्ये) तो जिथे राहत होता, म्हणजे टेकडी लाईनला तेथे मी जेवावयास जात असे. मॉरिसमधील दोन - तीन वैशिष्ट्यांचा उल्लेख करण्यासारखा आहे. (१) मॉरिसमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थी हा विशेष हुशार समजत असत. (२) श्रीमंतांची बहुतेक मुले मॉरिसमध्ये शिक्षण घेत असत. (३) ज्याला कॉलेज लाईफ चा ग्रेस (वैभव, मजा) म्हणत असत ती मॉरिसमध्येच उपलब्ध होते. (४) मॉरिसमधील गॅदरिंग म्हणजे ज्याचा सर्व नागपूरात गाजावाजा व्हायचा असा एक विलासी जीवनाचा सोहळाच असे. (५) मॉरिस कॉलेज व सायन्स कॉलेज या दोन कॉलेजला जोडणारी अथवा दोघांच्यामध्ये असणारी एक लांब बोळ (लेन) होती, ही लेन म्हणजे मॉरिसमधून सायन्स कॉलेजला जाण्याचा शॉर्टकट (अगदी जवळचा रस्ता) होता. या लेनला ‘लव्ह लेन’ (प्रेमिकांचा छुपा मार्ग) असे म्हणत असत व या लेनमध्येच बरीच प्रकरणे घडली होती असे ऐकिवात होते. खरे की खोटे परमेश्वराला माहित. मी बी. ए. (ऑन.) अर्थशास्त्राचा अभ्यास करीत असल्यामुळे माझ्या नोटस् अथवा जी काय मजजवळ जास्तीची माहिती असेल तिचा उपयोग व्हावा या दृष्टीने माझ्या नोटस् वाचण्यास द्याव्यात म्हणून अर्थशास्त्र घेऊन बी. ए. चा अभ्यास करणारी मुलगी कु. मनूताई नातू या माझ्याकडे यायच्या किंवा मी त्यांच्याकडे

जायचा. अर्थात पूर्वीची थोडी ओळख होती. या कु. मनूताई नातूचा भाऊ माझ्या मोठ्या भावाचा वसंताचा जिवलग मित्र होता व तो फार बुद्धिमान (स्कॉलर) होता. तो बनारसला शिकत असे. काही कारणाने अपघात होऊन त्याचे निधन झाले होते. भावाच्या मृत्यूमुळे ही कु. मनूताई नातू यांनी धसका घेतला होता व त्या फार मनानं हळव्या झाल्या होत्या त्यामुळे मला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटावी यात काही नवल नव्हते. या मनूताईसुद्धा फार हुशार, अभ्यासू व बुद्धिमान होत्या. भावाच्या मृत्यूनंतर त्यांनी लग्न करायचं नाही असा पण केला होता. अर्थात पुढं त्यांचा हा पणचा निश्चय जशी परिस्थिती बदलली तसा कोठल्या कोठे विरत गेला. मनुष्याला असे खूप वाटतं की, आपण 'यंवं करू नी त्यवं करू.' ज्या वेळेस असं वाटतं त्या वेळेच्या परिस्थितीमुळे व मागील घडलेल्या घटनांमुळे तो मोठ - मोठे निश्चय करू शकतो व ध्येय ठरवतो. पण जसं - जसा याचा जीवनक्रम पुढे - पुढे चालू राहत असतो, तसं - तसे तो नवीन - नवीन अनुभव परिस्थिती यांच्या मुशीत पकडला जातो व या मुशीत त्याला असा आकार येतो की त्याला कल्पनाही नसते की आपण अशा न अपेक्षिलेल्या जीवन परिस्थितीत येऊन पोहोचू. पुढे या अनाथ (मनुताईंना) अशी परिस्थिती आली की लग्न करावे लागले. स्त्री ही किती ही बुद्धिमान असली व शिकली तरी जन्मजात पारतंत्र्यापुढे तिला नमावेच लागते. अर्थात यालाही काही अपवाद असतीलच पण ते बोटावर मोजण्याइतकेच आणि हे जे बोटावर मोजण्या इतके अपवाद असतील.

उदाहरणार्थ - राजकारणात आणि समाजकारणात स्वतंत्रपणे पुढे आलेल्या ज्या काही थोड्या स्त्रिया असतील अशा स्त्रियांच्या जीवनाचाही साकल्याने विचार केल्यास जोपर्यंत वेळ येत नाही तोपर्यंत त्यांना वाटते आम्हाला पुरुषा बरोबरचे समान हक्क मिळून आला.

स्वतंत्रपणे काम करत पुरुषाप्रमाणे स्वतंत्र आहोत पण वेळ आली की त्यांच्या संरक्षणार्थ पुरुषांना धावून जावेच लागते. याचे कारण म्हणजे जात्याच परमेश्वराने तिला दिलेले पारतंत्र्य, तिला दिलेल्या 'अबला' या नावातच तिचं पारतंत्र्य, पराधीनता वा तिच्या संरक्षणाकरता पुरुषाची गरज. या मनूताई नातू जरी खोली घेऊन धंतोलीतच राहत होत्या तरी तिचे सख्ये मामा तिच्याच जवळ राहत असत कारण संरक्षणाच्या दृष्टीनं कुणीतरी पुरुष माणूस पाहिजे असतो ना?



# (२२) पुण्यास प्रयाण व अपघात

मायनर जनरल इंग्लीश व मराठी हे दोन विषय घेऊन मी १९४२ च्या एप्रिलमध्ये फायनल बी. ए. च्या परीक्षेला बसलो. अर्थात वरील दोन मायनर विषय बी. ए. ला असल्यामुळे बी. ए. च्या परीक्षेबद्दल विशेष भीती वाटत नव्हती. प्रश्न होता तो मेजर अर्थशास्त्र विषय घेऊन बी. ए. (ऑन. ) म्हणजेच एम. ए. च्या परीक्षेबद्दलचा. या परीक्षेत आपण पास होऊ का? इतक्या ९ पेपरांचा अभ्यास जमेल का? शिवाय Viva - voce या तोंडी परीक्षेबद्दलची भीती होती ती निराळीच. अर्थात एकदा उखळात भात घातल्यानंतर काय होईल काय नाही याचा विचार करणे व्यर्थ आहे. समजा मी बी. ए. (ऑ.) च्या अर्थशास्त्र विषयात नापास झालो असतो तर मग मला बी. ए. (ऑ.) च काय पण बी. ए. चीही पदवी मिळाली नसती. पण एकदा हा धोका पत्करल्यानंतर सारखी भीती मनात ठेवणेही गैर होते. कारण भीतीमुळे धीर खचत गेला तर मनाच्या खंबीरपणामुळे जे माणसाला यश मिळते ते मिळत नाही. आता जे होईल ते होईल. 'करेंगे या मरेंगे'. हाच कसोटीचा क्षण होता. १९४३ च्या एप्रिलमध्ये बी. ए. (ऑ) ची परीक्षा सुरू होती. आधी स्वत: पुस्तकं वाचून नोटस् काढलेल्या असल्यामुळे तसेच प्रोफेसरर्सनी काही नोटस् दिलेल्या असल्यामुळे पहिले दोन पेपर साधारण बरे गेले. पण तिसरा पेपर मनी व बॅकिंग हा बराच वाईट गेला. इतका वाईट गेला की, मला २० - २५ गुण मिळतील की नाही याची शाश्वती

वाटत नव्हती. बी. ए. (ऑ.) वा एम्. ए. परीक्षेच्या बाबतीत आमच्या वेळी असा नियम होता की, कोणत्याही एका पेपरात शे. २५ पेक्षा कमी गुण मिळाले तर तो पेपर स्क्रॅच होत असे. म्हणजे त्या पेपराचे गुण जमेस धरत नसत म्हणजे त्या पेपरास शून्यच गुण समजायचे. पेपर तिसरा खराब गेल्यामुळे मी बराच खट्टू झालो. पण घाबरत अथवा धीर सोडून चालण्यासारखे नव्हते. अजून बरेच लढायचे होते. पाच पेपर्स द्यायचे होते. रणाला पाठ दाखवणे व पळून जाणे म्हणजे जी काय थोडी आशा होती ती पण राहिली नसती व कायमचाच निकाल लागला असता. तसाच धीर करून पुढच्या सर्व पेपरांना बसलो. चौथा पेपर ‘बिझनेस इकॉनॉमी अ‍ॅण्ड इंडस्ट्रीयल ऑर्गनाझेशन’ तसेच पाचवा पेपर ‘ट्रेड युनियन अ‍ॅण्ड लेबर प्रॉब्लेम्स’ हे दोनच पेपर्स अगदी मनासारखे गेले. बाकीचे तसेच काठावर गुण मिळावे इतपतच. परीक्षा संपली. तिसऱ्या पेपराची खुटखुट वा खेद सारखी मनाला लागून राहिली होती कारण हा पेपर स्क्रॅच झाला की मी नापासच होणार. शेवटी मी नापासच होणार असे धरून चाललो व आई वडिलांना व सर्व मित्रमंडळींना सांगितले की मी नापासच होणार. खरं पाहिलं तर तशी परिस्थिती होतीच. फक्त दोन पेपर मनासारखे गेलेले. तिसऱ्या पेपरात स्क्रॅच झाला म्हणून शून्यच गुण मिळणार. बाकीचे अगदी काठावर अगदी जेमतेम पास गुण मिळण्याची शक्यता. अर्थात या वेळेस मी हिंगणघाट येथे होतो. कारण वर्ध्याहून भाऊंची हिंगणघाटला बदली झाली

होती व परीक्षा संपल्यानंतर मी हिंगणघाटलाच आलो. पण मनात सारखी बेचैनी व अस्वस्थता होती ती यामुळे की मनाने घेतले होते मी नापासच होणार. भाऊ म्हणत होते की, नापास झाला की पुन्हा प्रायव्हेटली बसा. पण मनात सारखी घालमेल. आपण नापास झालो तर कसे होईल. सारा पैसा वाया जाणार. तेव्हा एक कल्पना सुचली. पुण्याला माझा मित्र दामले होता. इन्टरनंतर तो त्याच्या गावी बेळगावला येऊन एल्. एल्. बी. झाला होता व तो पुण्याला आला होता. तसेच मुंबईला - दादरला माझी मावशी (सौ. शांता मावशी) होती. तिचे मिस्टर श्री. केशव बाळकृष्ण जोशी हे एम्. ए., एल. एल. बी. होऊन मुंबईला 'सॉलिसीटर' म्हणून प्रॅक्टिस करीत होते व त्यांनी स्वतंत्र ऑफिस सॉलिसीटर्स फर्म काढून त्यांचा चांगलाच जम बसला होता व प्रॅक्टीसही उत्तम चालत होती. त्यांनी दादरला प्लॉट घेऊन स्वत:ची तीन मजली इमारत बांधली होती. दादर चौपाटीपासून अगदी जवळच.

शिवाय माझा मोठा भाऊ वसंत हाही मुंबईलाच आला होता व मावशीकडेच राहत असे. अर्थात त्यानं पार्ल्याला एक दोन रूमचा त्याचा मित्र श्री. कापरे यांच्या पार्टनरशिपमध्ये खोली वजा ब्लॉक घेतला होता. तोही त्यावेळेस 'कॉटन कमिटी'त नोकरीला होता. हे साल होते १९४३ की ज्या वेळेस दुसरे महायुद्ध सुरू असल्यामुळे नोकऱ्या चटकन मिळत असत. मला जो विचार आला तो हा की पुण्याला जावे व तेथे अंडरग्रॅज्युएट म्हणून मिलिटरीत अकौन्टस् ऑफिसमध्ये नोकरी मिळवावी म्हणजे पगार

मिळेल. एकदा मनुष्याला पैसा मिळू लागला की त्याला आर्थिक स्वातंत्र्य मिळतं. एकदा हे आर्थिक स्वातंत्र्य आपणाला मिळाले म्हणजे आपण नापास झालो तरी त्याचे विशेष दुःख वाटणार नव्हतं. हा विचार मनात ठाण मांडून बसला व ताई भाऊंना सांगितला व त्यांची पुण्यात नोकरीच्या शोधार्थ जाण्याकरिता परवानगी मागितली. अर्थात त्यांना ही माझी कल्पना तितकी आवडली नाही, पण शेवटी त्यांनी परवानगी दिली. पुण्यास दामले एक खोली भाड्याने घेऊन राहत होता. त्याच्याकडेच उतरलो व त्यावेळेस पुण्यास वानवडी या ठिकाणी मिलिटरी अकौन्टस् ऑफिस होते. दुपारच्या वेळेला या ऑफिसमध्ये जाऊन व अधिकाऱ्यांना भेटून अर्ज देऊन, नोकरीकरता प्रयत्न करू लागलो. हिंगणघाटला जी कापड मिल होती तिचा मॅनेजर मि. बेलचम हा इंग्लीश माणूस नुकताच निवृत्त होऊन पुण्यास राहायला आला होता. हिंगणघाटला भाऊ पोस्टमास्तर असल्यामुळे भाऊंची व मि. बेलचमची चांगलीच ओळख होती. भाऊ पुण्यात मि. बेलचमला भेटून त्याच्याकडून शिफारस पत्र घ्यावयास गेले. मि. बेलचमला ओळख सांगितल्याबरोबर त्याने मला आपल्या आतल्या खोलीतच बोलावून घेतले; व मला पाहिजे त्याप्रमाणे शिफारस पत्र दिले. नंतर आधी उल्लेख केलेल्या वानवडी येथे असलेल्या मिलिटरी अकौन्टस् ऑफिसमध्ये नोकरी करता खूप प्रयत्न केला. दोन तीन अधिकाऱ्यांना भेटलो. त्या अधिकाऱ्यांचे उत्तर हेच होतं की त्यांना पदवीधर पाहिजे होता. त्यांनी मॅट्रिक्युलेटस् व इंटर झालेल्यांना तर

नोकरीवर घेणं बंद केलं होतं. एकतर त्यांना ग्रॅज्युएटसच खूप मिळत होते व कित्येक ग्रॅज्युएटसचे अर्ज येऊन पडले होते. त्यामुळे मला पुण्याला मिलिटरीत अकौन्टस् ऑफिसमध्ये नोकरी मिळण्याची आशा दुरावली. त्यातून मी पुण्यास असताना मला एक किरकोळ अपघात झाला. मी दामलेबरोबर प्रभात स्टुडिओकडे जाणाऱ्या रस्त्याने फिरायला जात होतो. परत येताना रस्त्यावर एक दगडी पूल होता. त्या दगडी पुलावर मी व दामले गप्पा मारीत बसलो. पुलाचा रस्ता उंच होता व पुलाच्या दोन्ही बाजूला खोल दरी सारखा गड्डा होता. मि. दामलेशी गप्पा मारीत असताना मी सहज पाठीमागे थोडासा वाकलो, तोच माझा तोल जाऊन मी खाली गड्ड्यात मानेवर आपटलो. पण सुदैवाने दगडावर न आपटता हिरवळ असलेल्या गवतावर आपटलो. त्यामुळे फार गंभीर अशी दुखापत झाली नाही. फक्त मान मात्र लचकली. थोडीशी वाकडीच झाली. तेव्हा हे काही लक्षण बरे नव्हे, येथून काढता पाय घेतलेला बरा हीच सूचना या अपघाताद्वारे परमेश्वराने आपल्याला दिली आहे असे अंतर्मनात आल्यावाचून राहिले नाही. तरीपण मानेत लचक असल्यामुळे मान थोडीशी वाकडी होऊन दुखत असल्यामुळे माझ्या मित्राने मानेस जरा आराम पडोस्तर दोन - तीन दिवस रहावयाचा सल्ला दिला आणि तेही खरेच होते. अशा दुखऱ्या मानेने प्रवास करणे योग्य नव्हतं. डॉक्टरकडे जाऊन, मानेला त्यांनी दिलेलं औषध लावून व विश्रांती घेत तीन - चार दिवस पुण्यातच काढले व मग पुण्याहून मुंबईस जाण्यास निघालो.

# (२३) नोकरी करता मुंबईस प्रयाण

पुण्यास जरा शोकांतिकाच झाली असे म्हणावयास हरकत नाही. पुण्यास न जाता सरळ आपण मुंबईसच गेलो असतो तर बरं झाले असतं असं वाटू लागलं. पण पुण्यास असा अपघात होणार हे पुढचं भविष्य कोणास माहिती? माणसाला अशा पुढे येणाऱ्या संकटांची आधी कल्पना आली असती तर दुःख त्याच्या वाटेला आलीच नसती. अशी अंतर्ज्ञानी माणसं राहिली असती तर ती माणसं म्हणून राहिलीच नसती. हे अंतर्ज्ञान असामान्य दैवी शक्तीच्या संतात अथवा ईश्वरी अवतार असणाऱ्या थोर विभुतीतच राहू शकते. गंभीर अपघातातून थोडक्यात बचावलो.

केवळ किरकोळ अपघात झाला ही देवाचीच कृपा समजायची. दगडावर मान व डोकं आपटून रक्त बंबाळ होण्याइतपत गंभीर अपघात झाला असता तर हॉस्पिटलमध्ये एक महिना राहावे लागले असते. म्हणूनच म्हणतो थोडक्यात बचावलो. ईश्वरी कृपा असो.

मुंबईस जाण्याकरिता श्री. दामलेबरोबर स्टेशनावर आलो व दामलेने मला मोठ्या प्रेमाने निरोप दिला. दादर स्टेशन आल्याबरोबर मी दादरला उतरलो. मला घ्यायला कोणी येण्याचा प्रश्नच नव्हता कारण मी माझ्या मावशीला अथवा भावाला (वसंताला) मी येत आहे वगैरे काही कळवलं नव्हते. तशी मला मुंबईची व दादरची माहिती पण होती. कारण या आधी मी पुष्कळ वेळेला मुंबईस येऊन गेलो होतो.

दादर स्टेशनावर उतरल्यावर हमाल करत त्याच्या डोक्यावर सामान देऊन पायी - पायीच मी मावशीच्या 'कपिलतीर्थ' इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर गेलो. बाहेरची बेल दाबली. ते दार उघडले ते मावशीनेच. "वामन काही न कळवता तू इकडे कसा काय?" असे म्हणून चेहऱ्यावर आश्चर्य व आनंद प्रगट झालेला दिसला.

मी ज्या दिवशी मुंबईला (दादरला) येऊन पोहोचलो त्याच दिवशी रात्री वसंत मावशीकडे आला व मी काही पूर्व कल्पना न देता अकस्मात आलो म्हणून त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य तर दिसलेच पण मी अशा तऱ्हेने मुंबईला आलो यात माझा मूर्खपणाचाच भाग जास्त आहे असे त्याला वाटल्यावाचून राहिले नाही. परीक्षेचा निकाल लागण्याच्या आधी मी आलोच कसा हा त्याचा पहिला प्रश्न. त्याच्या मते निकाल लागल्यानंतर मी विदर्भातच नोकरीचा प्रयत्न करावयास हवा होता. मी सांगितलेली कारण परंपरा त्याला पटली नाही असे दिसले.

पण मावशीने मात्र माझी बाजू घेतली व "तुला जसे वसंता, मुंबईस नोकरी करणे आवडते तसे त्यालाही जर आवडत असेल तर त्याच्यावर तुझी दादागिरी म्हणून का?" असा खडा सवाल टाकला.

शांता मावशीच्या यजमानांची ही 'कपिलतीर्थ' तीन मजली इमारत चौपाटी जवळ होती व मावशी अगदी वरच्या फ्लॅटमध्ये राहत होती. प्रत्येक मजल्यात दोन - दोन फ्लॅटस् होते व वर तिसऱ्या मजल्याच्या गच्चीवर एक लहान रूम होती. एक मिनिटाच्या अंतरावर दादर चौपाटी

असल्यामुळे समुद्र दृष्टीसमोर दिसत होता व समुद्रावरून सारखं वारे वाहत येत होते. रोज चौपाटीवर फिरायला जाण्याची सोय होती. वसंता मुंबईस नोकरी करीतच होता. पण त्याची नोकरीचे ठिकाण पार्ल्यात होते व पार्ल्यातच त्याने त्याच्या एका मित्राच्या पार्टनरशिपमध्ये एक खोली घेतली होती. तो मावशीकडे जाऊन येऊन असे.

पार्ल्यास त्याला कॉटन कमिटीमध्ये रिसर्च असिस्टंट म्हणून नोकरी होती व पगार रु.७०/- होत अर्थात तो या नोकरीत नाखूष होता. तो एम. एस्सी. (गणित) हायर सेकंड क्लासमध्ये पास झाल्यामुळे त्याला तीन आकड्याच्या रकमेच्या पगाराचा स्टार्ट हवा होता व ही त्याची आकांक्षा नैसर्गिकपण होती. त्यामुळे तो ही नोकरी करीत असताना चांगल्या पगाराच्या नोकरीच्या शोधात असे आणि त्याच्या सुदैवाने त्याला 'सेंट्रल बँक ऑफ इंडिया ली.' या मुंबईच्या मुख्य बँकेच्या शाखेत ऑफिसर अंडर ट्रेनिंग म्हणून एकदम रु. १२५/- च्या सुरुवातीच्या पगारावर अपॉइंटमेंट मिळाली व सहा महिन्याने रु. २५/- इन्क्रीमेंट या अटीवर नोकरी मिळाली. म्हणजे महिन्याला रु. १५०/- व पुढे पगारात वर्षाला रु. २५/- इंन्क्रीमेंट व शिवाय बढतीचे प्रॉस्पेक्टस्. त्याने एकदम कॉटन कमिटीमधली नोकरी सोडली राजीनामा दिला व या नव्या नोकरीवर तो रूजू झाला.

माझे स्वत: चे मुंबईला येणे एका दृष्टीनं सार्थकीच लागले. मी मुंबईला आलो ते १९४३ चे साल होते व दुसरे युद्ध जोरात सुरू होते. त्यामुळे मुंबईस वॉर एमर्जन्सीमुळे

नोकऱ्या पटापट मिळत असत व शिवाय युद्धामुळे रेशनिंग डिपार्टमेंट स्वतंत्रपणे उघडले होते व तेथे साधा मॅट्रिक असलेल्या तरुणाला एकदम अर्ज दिला की, लगेच तो अर्ज घेऊन त्याची तेवढ्या पुरती मुलाखत घेऊन लगेच १० मिनिटात अपॉइंटमेंट ऑर्डर मिळत असे. माझेही असेच झाले. मी रेशनिंग ऑफिसमध्ये गेल्यावर अर्ज लिहिला व तेथील रिक्रूटिंग ऑफिसर श्री. ठाकूर यांना अर्ज दिला. मी इंटरमिजेट असून नुकताच बी. ए. (ऑ.) परीक्षेला बसलो आहे व एक महिन्याच्या आत निकाल लागून मी पदवीधर होईन या माझ्या अर्जाच्या माहितीवर एकदम मला जुजबी तीन - चार प्रश्न विचारत ताबडतोब मला अपॉइंटमेंट ऑर्डर देऊन ताबडतोब मला ज्या टेबलावर काम करायचे तेथे जायला सांगितले. सुरुवातीचा पगार रु. ६०/ - मला फार आनंद झाला व आपली इच्छा फलद्रुप झाली म्हणून मी मुंबईला येण्यात फार शहाणपणा दाखविला असे तर वाटलेच पण मनात एक कृतकृत्यतेची भावना निर्माण झाली.

घरी मावशीकडे येऊन मी सर्वांना सांगितले. माणसाला आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्याचा जो एक आनंद असतो तो खरोखरच अवर्णनीय असतो व मनाला मोकळे व हायसे वाटते. आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यामुळे होणाऱ्या आनंदाचे वर्णन करण्याला शब्द अपुरे ठरतात. असो.

वसंताला सेंट्रल बँकमध्ये ऑफिसर अंडर ट्रेनिंगची नोकरी मिळाल्यामुळे त्याने पार्ल्याची खोली सोडली व दैवयोग असा की माझ्या मावशीच्या इमारतीच्या अगदी

बाजूला असणाऱ्या इमारतीत त्याला तीन रूम्सचा स्वतंत्र फ्लॅट मिळाला त्यामुळे दुधात साखर पडल्यासारखे झाले. मावशीच्या अगदी जवळ राहिल्यामुळे मावशीकडे जाणे - येणे वाढू लागले व मावशीच्या प्रेमळ सहवासात गप्पा गोष्टीत अत्यंत प्रसन्नपणे व आनंदाने कालक्रमणा होऊ लागली.

इतक्यात आनंदाची बातमी कळली. ती मे महिन्यामध्ये (१९४३). माझा बी. ए. (ऑ.) चा रिझल्ट लागला व मी पास झाल्याबद्दलचं पत्र माझ्या सर्वांत मोठ्या भावाकडून राजाभाऊकडून आले. त्यामुळे ही ऑनर्स घेऊन पदवीधर झाल्याचा आनंद तर झालाच पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे बी. ए. (ऑ.) पास होणे म्हणजे एम्. ए. ची परीक्षा पास होणं व नंतर तीन वर्षात यामुळे आनंद, समाधान व सार्थकता या तिन्ही भावनांची मनात गर्दी झाली. कारण मी जर नापास झालो असतो तर मला बी. ए. ची ही पदवी तर मिळाली नसतीच पण बी. ए. होण्याकरिता खाजगी विद्यार्थी म्हणून बी. ए. ला बसावे लागले असते.

आमच्या वेळेस नागपूर युनिव्हर्सिटीत बी. ए. (ऑ.) चा कोर्स म्हणजे इंटरनंतर तीन वर्षात एम. ए. होण्याचा कोर्स. कारण बी. ए. (ऑ.) चा अभ्यासक्रम व एम. ए. चा अभ्यास तुम्ही ज्या विषयात ऑनर्स घ्याल त्या विषयात एकसारखाच असतो. फरक एवढाच की इंटरनंतर ३ वर्षात बी. ए. (ऑ.) पास झाल्यावर ४थ्या वर्षी एम्. ए. ला न बसता ॲटोमॅटीक - आपोआप एम. ए. ची पदवी मिळते. तशी ती मला मिळाली. ज्या दिवशी बी. ए. (ऑ. ) पास

झाल्याचे कळले त्याच दिवशी रेशनिंग ऑफिसमधील रिक्रूटिंग ऑफिसरला मी बी. ए. (ऑ.) झाल्याबदलचे सांगितले. त्याने त्यावर ताबडतोब माझे क्वॉलिफिकेशन गुणवत्ता वाढल्यामुळे मला रु. १५/- जास्त इन्क्रीमेन्ट दिले. म्हणजे माझा रु.७५/ - पगार झाला व आर्थिक दृष्ट्या स्वातंत्र्य मिळविण्याची माझी आकांक्षा फलद्रुप झाली.



# (२४) माझ्या मुंबईतील अनेकविध नोकऱ्या: भाग १

मी रेशनिंग ऑफिसमध्ये फार दिवस नोकरी केली नाही. एकतर ही नोकरी तात्पुरती (टेंपररी) होती व मला केव्हाही काढून टाकतील अशी होती. शिवाय या नोकरीत तसे काही पुढचे प्रास्पेक्टस् - बढतीचे योग विशेष नव्हते. यापेक्षा जास्त टिकाऊ अशी नोकरी मिळावी अशी माझी इच्छा होती व अशाच नोकरीच्या मी शोधात होतो. त्यावेळेस कंट्रोलर ऑफ नेव्हल अकाऊंटस् मध्ये पदवीधरांना नोकऱ्या मिळत असत. हे ऑफिस फोर्टमध्ये होते अर्थात मी प्रयत्न करण्याच्या दृष्टीने या नवीन नोकरी करिता अर्ज केला व मला ताबडतोब अपॉईंटमेंट ऑर्डरही मिळाली. एकूण सर्व मिळून रु. ९०/ - पगार सुरुवातीला (स्टार्ट) मिळाला. मी रेशनिंग ऑफिसमधील क्लार्कची नोकरी सोडून या कंट्रोलर ऑफ नेव्हल अकाऊंटस् मधील असि. ऑडिट क्लार्कच्या नोकरीवर रूजू झालो. अर्थात वॉर इमरजन्सीमुळेच कंट्रोलर ऑफ नेव्हल अकाऊंटस्मध्ये जास्त प्रमाणात रिक्रूट्मेंट सुरू होत. कारण वॉरमुळे नेव्हल टेक वाढत होता तसे नेव्हल आकऊंटस् डिपार्टमेंटही वाटत होते. ही नोकरी वॉर टाईम पुरतीच होती पण दोन - तीन वर्षे तरी टिकणारी होती यात सांगायचा मुद्दा असा की, मला आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यामुळे मी स्वत: करता कपडे, सूट, पँटस्, शर्ट, बूट स्वत:च्या पैशाने तयार करून घेतले.

जोपर्यंत मी शिकत होतो तोपर्यंत माझे कपडे अगदी साधे दोन शर्टस्, एक धोतर जोडी, दोन कोट असा वेष असे. आमच्या भाऊंचे म्हणणे हे की सुट, बूट, पँट हे स्वत:च्या कमावलेल्या पैशात करा. कारण ते महिन्याला नागपूरला असताना जे रुपये ४५/ - पाठवायचे त्यात मी व वसंत या दोघांचे शिक्षणात मला पँट वा पायजमा घालण्याची इच्छा झाली तरीही पुरी होणे अपुऱ्या पैशामुळे शक्य नसे. मी पण मनाशी ठरविलेच होते की आपल्या कमावलेल्या पगारातच सुट, बूट, पँट या गोष्टी करायच्या. जेव्हा अगदी पहिल्या दिवशी मी पँट व नवीन शिवलेला कोट - सूट घातला त्यावेळेस सर्वांनी (माझी मावशी, मावसे व वसंत) कौतुक केले. कोणत्याही स्वत: कमावलेल्या वा मिळवलेल्या प्रथमच्या नवीन गोष्टीत जो आनंद, नावीन्य व कौतुक असते ते अवर्णनीय असते. कोणत्याही मिळविलेल्या पहिल्या गोष्टीत वाटणारी कृतकृज्ञता माणसाचं आयुष्य वाढविण्यास कारणीभूत व्हावी अस मला वाटलं. असो.

ही नेव्हल अकाऊंटस्मधील नोकरी मी बरेच दिवस केली, पण मला जास्त पगाराची व थोडीशी अधिकाराची जागा असलेली नोकरी मिळावी म्हणून आकांक्षा वाटू लागली कारण आपण डबल ग्रॅज्युएट आहोत व आपल्या शिक्षणाला योग्य अशी अधिकाराची जागा मिळवण्याची महत्वाकांक्षा तशी समर्थनीय होती. शिवाय या नोकरीतलं कामही कंटाळवाणे होते. या नेव्हल अकौन्टसमध्ये मद्रासी फार होते. माझ्या महत्वाकांक्षेला वाव देणारी अशी अधिकाराची जागा रेशनिंग इन्स्पेक्टरची होती व या जागे

करता उच्च पदवीधर घेत असत. मी पण या जागेकरता अर्ज केला. आश्चर्य हे की, अर्ज करता क्षणीच दोन - तीन दिवसात मला अपॉइंटमेंट ऑर्डरच आली. पगार तसा फार नसून, सुरुवातीचा रु.१००/ - असेल पण थोडी अधिकाराची व फिरतीची नोकरी होती. मी नेव्हल अकौन्टस् मधील नोकरीचा राजीनामा दिला व या रेशनिंग इन्स्पेक्टर च्या नव्या नोकरीवर रूजू झालो. जे - जे रेशनिंग फॉर्मस् भरून येत असत त्या रेशनिंग फार्मस् मधील अर्जात दिलेल्या माहितीबद्दल इनव्हेस्टीगेशन, इन्क्वायरीज करणे व माहितीबद्दल खाली करून रिपोर्ट लिहिणे व तो चिफ रेशनिंग इन्स्पेक्टर सादर करणे एवढंच काम या नोकरीत होते. फॉर्मवर दिलेल्या माहिती रेशनिंग इन्स्पेक्टर निश्चित (सर्टिफाय) केली की, अर्ज करणाऱ्याला रेशनिंग कार्ड मिळत असे. पण नंतर माझ्या असे नजरेस आले की, काही रेशनिंग इन्स्पेक्टर्स घरी बसूनच अर्जदाराच्या घरातील माणसांची चौकशी न करताच फॉर्मवर इनफर्ममेशन ऑसर्टेन्ट ॲण्ड सर्टिफिईल (Ascertied and Certified) म्हणून रिमार्कस् लिहित असत.

दुसरी गोष्ट माहिती काढण्याकरिता अर्जदाराच्या घरी तीन - तीन किंवा चार - चार वेळा जावे लागत असे, कारण तो अथवा घरची मंडळी भेटली नाही म्हणजे पुन्हा - पुन्हा जाणे अगत्याचे वाटत असे. मुंबईतील इमारती सहा - सहा तर काही सात - सात मजली असायच्या. प्रत्येक वेळेस जिने चढ - उतर करावे लागत असे. सुट्टी मिळणे कठीण असे. सकाळी ऑफिसमध्ये चिफ रेशनिंग इन्स्पेक्टरकडे जावे

लागत असे व परत दुपारी चारनंतर जावे लागत असे. त्यामुळे मला या नोकरीचाही कंटाळा येत चालला व ही नोकरी सोडण्याचे विचार डोक्यात येऊ लागले. एकदा मला डोमिसीयल सर्टिफिकेट मिळण्याकरिता निफाड (नाशिक जिल्ह्यातील) या ठिकाणी जावे लागले. तेथे दोन - तीन दिवस गेले. त्यामुळे चिफ इन्स्पेक्टरच्या ऑफिसमध्ये दोन - तीन दिवस रिपोर्ट देण्याकरिता जाऊ शकलो नाही. त्यामुळे चिफ इन्स्पेक्टरने माझ्याविरुद्ध त्याच्या श्रेष्ठ ऑफिसरकडे कम्प्लेंट केली. हे मला कळल्यावर माझी बाजू मांडण्याकरिता वरच्या ऑफिसरला भेटलो. इतक्यात घरी येऊन पाहातो तो मी एका इंग्लीश फर्ममध्ये आधीच एक महिन्यापूर्वी सहज अकौन्टस अंडर ट्रेनिंग या जागेकरिता अर्ज करून ठेवला होता त्या जागेवर नेमल्याची अपॉइन्टमेन्ट ऑर्डर घरी येऊन पडली होती. त्यामुळे मी या रेशनिंग इन्स्पेक्टर जागेचा राजीनामाच दिला व वरील इंग्लीश फर्ममधील नोकरीवर रूजू झालो. पगार अर्थात कमी म्हणजे रु.७०/ - होता. जागा होती असिस्टंट टू चिफ अकौन्टंटची. पण या नोकरीला मी एका दिवसातच कंटाळलो. एकतर जो या फर्म मधील चिफ ऑफिसर होता तो इंग्लीश असल्यामुळे त्याचे इंग्रजी उच्चार कळेनात व दुसरे म्हणजे ज्या चिफ अकौन्टंटच्या हाताखाली मला काम करावयास सांगितले होते ते अरेरावी वृत्तीचा व तुसड्या होता. त्याच्याशी माझं जमेना. एवढ्यात आणखी चांगल्या नोकरीची एक संधी घरी चालून आली. माझ्या मोठ्या (म्हणजे सर्वात मोठ्या भावाचा नारायण नेने म्हणून मित्र

होता. तो बी. एस्सी. होता. त्याला आधी वर्धेला एका खाजगी शाळेत शिक्षकाची नोकरी होती, अर्थात पगार थोडा. तो त्या नोकरीला कंटाळला. त्याला त्याच्या खटपटीने मुंबईत नेव्हीमध्ये आधी चिफ पेट्टी ऑफिसर (टिचर टू रॅटिंग सेलर्स) ची नोकरी १५० रु. सुरुवातीच्या पगाराची मिळाली व नंतर तो वारंट ऑफिसर एक वर्षातच झाला. पगार ३००/- या नोकरीवर असताना तो दादरला मला भेटायला आला व असे म्हणाला की, "नेव्हीमध्ये आता पदवीधर घेतायत. तूही माझ्या बरोबर चल. अर्ज दे. तू बी. ए. (ऑ.) असल्यामुळे तुला ताबडतोब घेतील."

मग काय मी सकाळी ड्रेस करून ताबडतोब त्याच्या बरोबर निघालो की, इंटरव्हयू चालूच होते. मी अर्ज दिला. माझे शिक्षण पाहून माझा इंटरव्हयू व मेडिकल एक्झामिनेशन झाली. मी पास झालो. लगेच मला १५० / रु. वर चिफ पेट्टी ऑफिसर म्हणून नियुक्त केल्याची अपॉइंटमेंट ऑर्डर दिली. या नोकरीत डॉकवरचे व बोटीवरचे जीवन निरनिराळया देशात बोटीनं जावयास मिळणार. पण मिलिटरी लाईफ म्हणजे अत्यंत नियमित व कष्टाचे जीवन. माझं काम म्हणजे सेलर्स नाविकांना इंग्रजी व इतिहास शिकवण. शिक्षकाची नोकरी, जेवण, खाण व कपडे सर्व फुकट. सकाळी उठून (चार वाजता) दाढी रोज घोटायची व साडे सहा वाजता रूट मार्च करत हजर.

मला अपॉइंटमेंट ऑर्डर मिळाली व संध्याकाळी ती घेऊन मी घरी आलो. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. मी आई - वडिलांना ऑर्डर दाखविली अर्थात नॉन -

व्हिजीटेरियनसुद्धा व्हावे लागणार होतं. पण त्यावेळचे तरुण वय. असेन सव्वीस वर्षाचा. तरुण वयात जितकं नवीन अथवा नाविन्य तितकं ते सर्व विलोभनीय वाटतं. पण ताई - भाऊंनी परवानगी दिली नाही. कारण त्यांना माहित होतं की तशी माझी तब्येत तोळा - मासा. शिवाय मला बद्धकोष्टतेचा विकार. कुठ परदेशात आजारी पडलो म्हणजे लक्ष कोण देणार? मिलिटरीच्या शिस्तीत हे बसत नव्हतं त्यातून मी प्रवास करीत असणाऱ्या बोटीने निरनिराळ्या देशात जाऊन परत भारतात केव्हा येणार हे निश्चित नसायचे व त्यातूनही दुर्दैवानं बोट बुडाली की, कारभार संपलाच. ताई - भाऊंचं म्हणणं काही अगदीच चुकीचं नव्हतं. शेवटी ती नोकरी नाकारली.

नंतर मी रिझर्व्ह बॅक ऑफ इंडियामध्ये नोकरी करता अर्ज केला होता. वरील इंग्लीश फर्ममधील नोकरी जेमतेम दोन दिवस केल्यानंतर मला या रिझर्व्ह बॅक ऑफ इंडियाच्या क्लार्कच्या जागे करिता इंटरव्हयूची आमंत्रण पत्रिका आली व ताबडतोब इंटरव्हयूला बोलावले होते. माझी एम्. ए. (इकॉनॉमिक्स) (मी बी. ए. (ऑन.) इन इकॉनॉमिक्स झाल्यामुळे मला ही पदवी आपोआप मिळालीच होती) एम. ए. ची पदवी असल्यामुळे माझा जुजबी इंटरव्हयू होऊन मला क्लार्क म्हणून एकदम नेमणूक मिळून गेली. मात्र पगार मात्र फार थोडा रु. ६०/ - सुरुवातीस होता. ही नेमणूक मला डिपार्टमेन्ट ऑफ बॅकिंग ऑपरेशनस्च्या खात्यात मिळाली पण ही नोकरी कायम स्वरुपाची असल्यामुळे व पुढे प्रगतीची (प्रॉस्पेक्टस्) शक्यता

असल्यामुळे कमी पगार असला तरीही स्वीकारण्याबद्दल मला माझ्या मोठ्या भावाकडून वसंताकडून कळले. मला गव्हर्नरला रोज पाठवावे लागणारे गोल्ड स्टेटमेन्टचे काम देण्यात आले होते. प्रत्येक कमर्शियल बँकेकडून येणारे गोल्ड रिझर्व्ह स्टेटमेन्ट एकत्र करून त्याचा एकत्रित रिपोर्ट करण्याचे काम हाते. हे काम फार अचूक करावे लागे. शिवाय माझ्या कामावर देखरेख करणारा सुपरिंटेंडेंट हे काम माझ्या मानेवर खडा ठेवून करून घेत असे. एखादे वेळेस थोडीशी चूक झाली की एकदम वाटेल ते बोलायचा. माणूस आहे, चूक होतेच. त्या सुपरिंटेंडेंटकडूनही चुका होत असतचं. एखादे वेळेस टायपिस्ट कडूनही माझे हस्तलिखित स्टेटमेंटस् टाईप करण्यात चूक होत असे. त्याबद्दल तुम्ही कशी ही चूक करू दिली असे टायपिस्टला बोलण्यापेक्षा मलाच उद्धटपणे वाईट शब्द वापरून बोलू लागे. मी दोन - तीन वेळेस सहन केले व मग मात्र त्याचीच खरडपट्टी काढण्यास सुरवात केली.

"स्टेटमेंटस्मध्ये ज्या चुका होतात त्या कोणी काही मुद्दामहून करीत नाही व समजा अजाणता काही चुका झाल्या तर त्या शोधून काढून बरोबर करण्याचे काम सुपरिंटेंडेंटचेच आहे व त्याकरिताच तुम्ही या खुर्चीवर आहात. हाताखालच्या क्लार्कसना वाटेल तसे उद्धटपणे बोलण्याकरिता व आपल्या अधिकाराचं प्रदर्शन करण्याकरिता नाही".

असे सडेतोड त्या सुपरिंटेंडेंटला देऊन बसलो. त्याला माझे हे इनसबोर्डीनेशन वाटल्यामुळे त्याने मुख्य

अधिकाऱ्याकडे तक्रार केली. मुख्य अधिकाऱ्याने मला बोलावले. त्याला मी सर्व परिस्थिती समजावून सांगितली. तरी तो म्हणाला, "तुम्हाला सुपरिंटेंडेंटला असे उत्तर देता येत नाही. फार तर तुम्हाला मी बदलून दुसरे काम देतो. पण तुम्हाला त्या सुपरिटेंडंटच्याच हाताखाली राहावे लागेल. त्याची सारखी तक्रार येत गेली तर तुम्हाला कामावरून काढून टाकावे लागेल."

त्याचे हे उत्तर ऐकल्याबरोबर मी त्यालाच (चिफ ऑफिसर) एकदम उत्स्फूर्तपणे म्हणालो, "मला तुम्ही काढून टाकण्या ऐवजी मीच हा राजीनामा देतो."

असे म्हणून पाच मिनिटात राजीनामा त्याच्या टेबलावर फेकून जाऊ लागलो. तो माझ्याकडे पाहातच बसला. त्याने पुन्हा मला बोलावण्याचा प्रयत्न केला: पण मी काही दाद दिली नाही.

घरी येऊन सर्व प्रकरण इत्यंभूत सांगितले. अर्थात या बाबतीत माझ्याकडून कोणत्याही स्वाभिमानी तरुणाकडून व्हावा असा थोडा अविचार झाला. पण पगार फार कमी रु.६०/ - असल्यामुळे मी या नोकरीत समाधानी नव्हतो. ही रिझर्व्ह बँकमधील नोकरी करीत असतानाच मी स्टॉक एक्सचेंज (शेअर बाजार) मधील ए. बी. पंडित अॅण्ड कंपनी यांच्या फर्ममध्ये नोकरीसाठी या फर्मचे पार्टनर यांना भेटून व माझ्या भावाला भेटायला लावून प्रयत्न करीत होतो. एकतर या स्टॉक एक्सचेंजमध्ये शिरकाव मिळाला. नोकरीद्वारे का होईना तर खूप पैसा मिळण्यायोग्य होते. येथे कोट्यावधी रुपयांची उलाढाल होत असे व सब - एजंट

म्हणून संधी मिळाली तर नोकरी व्यतिरिक्त आपल्या क्लाईन्टस्च्या शेअर्सची खरेदी - विक्री करून मधले कमिशनही मिळत असे. याच नोकरीत माझा मित्र श्री. परांजपे होता व तो कसे पैसे मिळवित होता हे मी पाहात होतो. त्यामुळे ए. बी. पंडित अॅण्ड कंपनी यातील नोकरीची मला भुरळ पडली. रिझर्व्ह बॅंक मधील नोकरीचा राजीनामा दिल्याबरोबर या फर्मच्या पार्टनर श्री. दीक्षित यांना त्यांच्या फर्ममध्ये एजंट म्हणून शेअर्स बिझनेस करणाऱ्या श्री. चितळयांच्या मार्फत बोलणी केली व माझा मित्र श्री. परांजपे व भाऊ वसंत यांच्याशी बोलणी झाल्यावर मला एकदम मॅनेजर इन - चार्ज ऑफ शेअर्स डिपार्टमेन्ट म्हणून रु. १३०/ - सुरुवातीच्या पगारावर नोकरी मिळाली. येथे मात्र मी जवळ - जवळ एक वर्ष नोकरी केली. पण ज्या शेअर्स डिपार्टमेन्टचा मी इनचार्ज होतो तेथे इतके तुफान काम होते की मला लंचला जायला फुरसत मिळत नसे. मग वेगळा स्वतंत्र धंदा करण्याचे दूरच राहिले. माझ्या जागेवर जे आधी श्री. तांबूळवाडकर म्हणून होते त्यांची मी आल्यामुळे सुटका झाली ते स्वतंत्रपणे धंदा करायला मोकळे झाले. मला एकदम सुरुवातीचा १३० रु. (म्हणजे पहिल्या नोकरीपेक्षा रु.७०/ - जास्त) पगार असल्यामुळे कामाचा ताण मी सहन करू शकलो. पण कधी - कधी सकाळी ११ वाजता फर्ममध्ये गेल्यानंतर रात्री ८ - ९ वाजेपर्यंत काम करावे लागे. बाकीचे सारे काम करणारे ६ वाजण्याच्या आतच जात असत. मी व श्री. तांबुळवाडकर फक्त राहत होतो. तरीपण मी स्वत:चा सब - एजंट

होण्याच्या दृष्टीने दोन क्लाईन्टस्, एक अकोल्याला व एक अमरावतीचा असे मिळविले होते. पण मला फोनवर क्लाईन्टना (अर्थात फर्मच्या) शेअर्सच्या भावाची चढ - उतार सांगायला कधीच संधी मिळाली नव्हती. शिवाय फर्म प्रायव्हेट असल्यामुळे वेळेचं असं बंधन नव्हतं. स्टॉक एक्सचेंज मधला सारा सट्टा बिझनेस असतो. कोणत्या शेअरचा भाव कोणत्या कारणामुळे वर जाईल व कोणत्या कारणामुळे एकदम खाली येईल हे सांगता येत नसे. सारे कधी एखाद्या शेअर होल्डरला एका दिवसात १०००/- रु. मिळत असत.

डायरेक्टर ऑफ स्टॅटिस्टिक ॲण्ड रिसर्च म्हणून बदलून आले होते व ते माझे मी हिस्लॉप कॉलेजमध्ये नागपूरला इंटरमध्ये असताना इकॉनॉमिक्सचे प्रोफेसर होते. ते मला चांगले ओळखत होते. त्यांना मी जाऊन भेटलो व मला त्यांच्या खात्यात नोकरी मिळण्याबद्दल त्यांच्याशी बोलणी केली. अर्थात नोकरी देणे त्यांच्या हातात होतेच. त्यांनी एकदम मला नोकरीवर घ्यायचे कबूल केले. पण सहा महिन्यात इंटरव्ह्यू होईल व तो नॉमिनल असेल असे त्यांनी मला सांगितले होते.

बोलण्यात त्यांना मी हेही सांगितले की, “मी सहा महिन्यांनी ओव्हरएज होत होतो. तेव्हा सहा महिने ओव्हरएज कन्डोन करता येईल.”

कारण तेही त्यांच्या हातात होते. पगार मात्र फक्त रु.७०/ - होता व जागा क्लार्कची होती पण मला पुढे माझ्या गुणवत्तेमुळे प्रमोशन मिळेल असे सांगितले होते.

तेव्हा ताबडतोब मी ए. बी. पंडित ॲण्ड कंपनी या फर्ममधील नोकरीचा राजीनामा दिला व रिसर्च असिस्टंट क्लार्क म्हणून श्री. प्रसाद पांडे यांच्या रिसर्च ॲण्ड स्टॅटीस्टीक्स खात्यात रूजू झालो. ४ - ५ महिने झाल्यानंतर श्री. प्रसाद पांडे यांना रिझर्व्ह बँकेने अमेरिकेला अधिक संशोधना करता पाठविण्याचे ठरविले व त्याप्रमाणे ते अमेरिकेला गेले. ते अमेरिकेला गेल्यानंतर २० - २४ दिवसांनी वर उल्लेख केलेला इंटरव्ह्यू घ्यायचे ठरले. इंटरव्ह्यू नॉर्मल असेल असे मला श्री. प्रसाद पांडे यांनी मला सांगितल्यामुळे मला विशेष काळजी वा चिंता वाटत नव्हती. इंटरव्ह्यूला मला बोलावल्यानंतर माझ्या इंटरव्ह्यूकरता चार मोठ्या दोन डायरेक्टर्स व दोन असिस्टंट डायरेक्टर्स - अधिकाऱ्यांचे कमिशन बसले होते व कॅन्डीडेटस् होते असे कळले. मी इंटरव्ह्यू करता मी एकटाच नसून २ - ३ मद्रासी इंटरव्ह्यू मध्ये मुळीच न घाबरता उत्तरे चांगली दिली पण वय विचारल्यावर मी ओव्हरएज होत आहे असे कमिशनमधील एक - दोन कमिशन मेंबर्स म्हणाले.

मी त्यांना स्पष्टच सांगितले की, "श्री. प्रसाद पांडे यांना मी ही कल्पना दिली होती व ते म्हणाले होते की सहा महिन्याचे ओव्हरएज कन्डोन करता येईल व त्याप्रमाणे ते करणार होते व त्यांनी तसे कदाचित केलेही असेल."

पण त्या कमिशनमधील एका डायरेक्टरचा त्याच्या नात्यातील एक अर्जदार होता व त्याला माझ्या ओव्हरएजचे निमित्त करून मला रिजेक्ट करून त्याच्या माणसाला घ्यावयाचे होते. तेव्हा तो म्हणाला की श्री. प्रसादनी तसं

आम्हाला काही सांगितले नाही वा तसं काही रेकॉर्डवरही लिहून ठेवलं नाही. त्यामुळे आम्ही तुम्हाला ओव्हरएज मुळे नोकरीत कंन्टीन्यू करू शकत नाही. मी त्यांना अमेरिकेत श्री. प्रसाद यांना लिहिण्याबद्दल व खुलासा करून घेण्याबद्दल म्हटले. पण त्यांचा एक बनावच होता. फक्त एक असिस्टंट डायरेक्टर मला अनुकूल होता. त्यांना मी पुष्कळ समजावण्याचा प्रयत्न केला पण वशिल्याचा माणूस घ्यायचा असल्यामुळे श्री. प्रसाद पांडे यांच्या अनुपस्थितीचा फायदा घेऊन त्यांनी मला डिसकंन्टीन्यू केले व माझ्या जागेवर त्यांच्या वशिल्याच्या माणसाची नेमणूक केली. मी डेप्युटी गव्हर्नरलाही माझ्यावर झालेल्या अन्यायाबद्दलची तक्रार केली. त्यानेही पण रिपोर्ट नसल्यामुळे व श्री. प्रसादनी तुमचे वय कन्डोन करून न घेतल्यामुळे आता त्याचा काही उपयोग नाही. श्री. प्रसादनी अमेरिकेला जाण्यापूर्वीच माझे सहा महिने ओव्हरएज कन्डोन करून घ्यावयास पाहिजे होते. ही चूक श्री. प्रसाद पांड्यांची (डायरेक्टर ऑफ रिसर्च ॲण्ड स्टॅटीस्टीक्सची) पण सुळावर मात्र मी गेलो.

अर्थात ही नोकरी मला गमवावी लागली, पण घरी आल्याबरोबर त्या दिवसाची रात्र जरी माझी चिंतेत व काळजीत गेली तरी दुसऱ्या दिवशी सकाळी जी. आय. पी. रेल्वे ऑडिट खात्यामधील एक असिंटंट ऑडिटर क्लार्क आमच्या घरी आला व त्याने रेल्वे क्लार्क ऑडिट ऑफिसरने बोलावले आहे म्हणून सांगितले. कारण जेथे नोकरी असेल तेथे अर्ज करण्याचा माझा परिपाठ होता. मी केव्हा तरी एक

दीड महिन्यापूर्वी डायरेक्टर ऑफ रेल्वे ऑडिटरकडे अर्ज केला होता व त्याचा हा परिणाम होता. त्या ऑफिसरलाही अर्थशास्त्रात पदवीधर झालेल्या माणसाची गरज होती. त्याप्रमाणे ऑडिट क्लार्कच्या निरोपा बरहुकूम मी रेल्वे ऑडिट ऑफिसमध्ये गेलो. डायरेक्टर ऑफ रेल्वे ऑडिटरने मला आतच बोलावले. माझा जुजबी इंटरव्ह्यू घेतला व ताबडतोब मला अपॉइन्टमेन्ट ऑर्डर दिली. मला ऑडिटर अंडर ट्रेनिंगची जागा दिली. या नोकरीत सकाळी अकरा ते दुपारी पाच पर्यंत काम करावे लागे. मात्र या वेळात दोन तासाचा ट्रेनिंग क्लास असे व त्यात रेल्वे ऑडिट ट्रेनिंगवर व्याख्यान देणारा ऑडिटर येत असे. पगार मात्र सुरुवातीला फार थोडा म्हणजे रु.७०/ - होता. परीक्षा पास झाल्यावर बढती मिळणार.

अर्थात तेथले कामही कंटाळवाणे होते. पेन्शनर्सच्या केसेसचे फॉर्मस् भरण्याचे काम होते. शिवाय ऑडिट ट्रेनिंगचा कोर्सही किचकट होता. शिकवणारा लेक्चरर इतक्या कंटाळवाण्या पद्धतीने शिकवित होता की, त्याचे शिकवणे डोक्यावरून जात असे व मध्ये डुलकी लागत असे. झोप येत असे. ही नोकरी पुढे बरीच टिकू शकली असती; पण परीक्षा फार कठीण होती व पहिल्या प्रयत्नात पास होणारे क्वचित. ही नोकरी करीत असताना मी मुंबई सेक्रेटरिएटमध्ये गेलो होतो. तेथे मला बातमी लागली की, या सेक्रेटरिएट मध्ये एम. ए. झालेल्या लोकांना चटकन ज्युनिअर असिस्टंट पगार रु.१५०/ - च्या जागा मिळतात

व कामाचे स्वरूपही नोटींग व ड्राफ्टींगचे असते व असे काम माझ्या आवडीचे होते.

मी तेथल्या चिफ ऑफिसरकडे लगेचच अर्ज केला. अर्थात तोपर्यंत माझ्या ऑडिटर अंडर ट्रेनिंगच्या नोकरीला चार महिने झाले होते. मी चिफ ऑफिसरकडे अर्ज केल्याबरोबर माझा इंटरव्ह्यू न घेताच मला माझ्या गुणवत्तेवर (क्वॉलिफिकेशनस्) ज्युनिअर असिस्टंट म्हणून नियुक्तीची ऑर्डरच आली. पगार सुरुवातीचा रु.१५०/- व काम आवडीचे. मग काय पाहता मी ऑडिटर अंडर ट्रेनिंगच्या जागेचा एकदम राजीनामा देऊन टाकला.



# (२५) माझ्या मुंबईतील अनेकविध नोकऱ्या: भाग २

मुंबई सेक्रेटरिएटमधील सिव्हिल सप्लाईज या खात्यातील माझी नोकरी माझ्या अपेक्षेप्रमाणे वाटल्यामुळे मी ज्युनिअर असिस्टंट म्हणून कामाला सुरुवात केली. येथील कामाचे स्वरूप म्हणजे मोठ - मोठे दुकानदार साखरेचा, गव्हाचा, ज्वारीचा, पीठाचा इ. चा साठा मागवायचे व हा साठा मिळण्याकरिता लायसेन्स म्हणून रेशन कार्ड त्यांना मंजूर करायचे पण हे करण्याआधी त्याचा अर्ज त्यात त्यांच्याजवळ साठा किती शिल्लक आहे; हा दिलेला साठा केव्हा दिला होता व तो किती दिवस टिकावयास हवा होता इ. माहितीची कागदपत्रे कंट्रोलर ऑफ रेशनिंग मधून सप्लाय ऑफिसमध्ये आल्यानंतर या सर्व कागदपत्रांची तपासणी करायची. ते १९४५ साल दुसऱ्या युद्धाच्या अंतिम काळाचे दिवस असल्यामुळे धान्याविषयी व इतर गरजेच्या बहुतेक वस्तूवर (साखर, सिमेंट) रेशनिंग होते वरील सर्व कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर त्यावर नोटींग करायचे म्हणजे माहिती थोडक्यात देऊन खरी वस्तुस्थिती स्पष्ट करायची व वस्तुस्थिती खरी असेल त्याप्रमाणे परमिट द्यावे की नाही हे लिहायचे. हे नोटींग आपल्या सप्लाय ऑफिसरला मान्य झाल्यास तो (अॅपूड) मंजूर म्हणून शेरा मारतो व पत्र लिहीण्यास (ड्राफ्ट करण्यास) सांगतो. त्याप्रमाणे ड्राफ्टींग

झाले की, ते मंजूर करून ऑफिसरच्या सही शिक्यासकट ते त्या दुकानदाराला पाठवून द्यायचे. पण या कामात एकंदर कागदपत्रावरून माहिती मिळविणे म्हणजे कठीण व बुद्धी खर्च करण्याचेच काम होते. कारण माहिती करता दिलेल्या कागदपत्रातील माहिती विस्कळीत असे. ती सुसंगतपणे एकत्र ठिकाणी आणावी लागत असे. नुसतेच एकट्याने भागत नसे. तर ती सुसूत्रपणे अगदी अचूक मोजक्या शब्दात व थोडक्यात चांगल्या भाषेत लिहून द्यावी लागत असे, नोटींग करावे लागत असे की जी वाचल्यामुळे ऑफिसरच्या एकदम परिस्थिती काय आहे हे लक्षात यावे व अगदी थोडक्या वेळात. कारण त्या ऑफिसरच्या हाताखाली ज्युनिअर व सिनिअर असिसटेंटस् मिळून ३० - ४० जण काम करी असत व त्याला हे प्रत्येकाचे नोटींग तपासावे लागत असे. जरी या ज्युनिअर व सिनिअर असिसटंट वर एक सुपरिंटेडेट असे तरी हा सुपरिंटेंडेंट नवीन कामावर आलेल्या ज्युनिअरच्या नोटींगमध्ये चुका काढण्यात तरबेज असे. ज्युनिअरची वाक्ये खोडून स्वत:चीच वाक्ये लिहित असे व ते सर्व पुन्हा लिहून काढावे लागत असे. काही ज्युनिअर असिस्टंटस्चे तो सर्व पसंत करीत असे व काहींच्या बऱ्याचशा चुका काढून दोनदा तीनदा लिहावयास लावीत असे. या दुसऱ्या प्रकारात आमचा नंबर यायचा.

मी त्याला म्हणायचो, "आमची एकही चूक आपण काढीत नाही असा एक ड्राप्ट आपल्या हातून लिहिला जात नाही हे एक अनेक आश्चर्यापैकी एक आश्चर्यच आहे."

यामुळे हा टोमणा त्याला झोंबला व माझे नाव चिफ ऑफिसर जवळ बदनाम व्हावे म्हणून इकडचे तिकडे करून खोडाखोड करून मुद्दामहून जास्त चुका काढायचा. जास्त त्रास व्हावा या उद्देशाने. अर्थात या सेक्रेटरीएटमधल्या सिव्हील सप्लाय डिपार्टमेन्टमध्ये मी काम करीत असल्यामुळे व हे सिव्हील सप्लायज् डिपार्टमैन्ट फक्त म्हणजे वॉरच्या काळापुरते एक सरप्लस (जास्तीचे) टेम्पररी अस्थायी स्वरूपाचे असल्यामुळे फक्त तीन वर्षे टिकणारे होते. तीन वर्षांनंतर जे सिनिअर मोस्ट असतील त्यांची दुसऱ्या खात्यात, जे ज्युनिअर होते त्या सर्वांना नंतर नोकरी सोडावी लागणार होती. कारण तसे त्यांच्याकडून करारपत्रच (बॉण्ड) लिहून घेतले होते.

या ज्युनिअर मोस्टमध्येच मी होतो. तेव्हा आपली ही नोकरी फार काळ टिकणारी नाही व केव्हाही आपल्याला कमी करतील ही भिती मनात सतत असे. ही नोकरी करीत असताना पुढच्या भविष्याच्या दृष्टीनं मी जिथे कायम राहू शकेन व जेथे मला पुढचे प्रोस्पेक्टस् असतील, भरभराट होण्याची शक्यता असेल अशा खात्यात नोकरी करावी असा आमच्या भाऊंचा (वडिलांचा) विचार मी एकदा त्यांना हिंगणघाटला भेटायला गेलो असताना त्यांनी मला बोलून दाखविला व ते वसंताला म्हणालेसुद्धा की वामनाला तुझ्या (सेंट्रल बँक ऑफ इंडीया लि.) मध्ये लावून घे.

मलाही असे वाटले की, मी सेंट्रल बँकेत कायम स्वरुपाची नोकरी मिळाली तर आपल्याला बँकेच्या कामाची सर्व माहिती होऊन एक करिअर निर्माण करता

येईल व पुढे मागे अकौन्टंट, एजंट म्हणून बँकेच्या दुसऱ्या शाखेत बढती मिळू शकेल. म्हणून हा विचार पक्का करून मी वसंताबरोबरच सेंट्रल बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टरला भेटलो. त्या वेळेला मि. कॅप्टेन हे पार्शी गृहस्थ मॅनेजिंग डायरेक्टर होते. सेन्ट्रल बँक ही सारी बहुसंख्या पारशांचीच बँक. अर्थात त्यात महाराष्ट्रीयन, गुजराथी इ. जातीचे ऑफिसरर्स व क्लार्कस् होते, पण पार्शी माणसाला जागा असो वा नसो एकदम लावून घेत असत.

तेव्हा सांगायचा मुद्दा असा की, मी वसंताबरोबर मॅनेजिंग डायरेक्टरला माझ्या अर्जासहित भेटायला गेलो. मी एम. ए. अर्थशास्त्रात असल्यामुळे मला सुरुवातीलाच चांगल्या पगारावर घेतील अशी मलाच काय पण वसंतालाही खात्री होती. पण मॅनेजिंग डायरेक्टरने अर्ज पाहिल्यावर नोकरीवर घेतो म्हणून सांगितले व तेही ऑफिसर अंडर ट्रेनिंगच्या जागेवर असलेल्या माझ्या भावाबरोबर आलो म्हणून. पण पगार मात्र रु.६०/ - दरमहा मिळेल असे सांगितले. त्याला आम्ही माझ्या क्वॉलिफिकेशनबद्दल सांगूनही व तीन - चार वेळा विनंती करूनही ६०/- रु. पगारापेक्षा जास्त स्टार्ट मिळणार नाही कारण बँकेला आता गरज नाही. असे स्पष्ट सांगितले.

शेवटी आम्ही बँकेच्या अकौन्टंट श्री. फोटोग्राफर याला भेटलो. त्यानेही माझा अर्ज पाहिल्यावर जास्त पगाराचा स्टार्ट द्यावयास पाहिजे हे मान्य केले व इतकेच काय तोही पण आमच्याबरोबर श्री. कॅप्टनला भेटायला आला. पण कॅप्टन काही ऐकेना. तेव्हा कॅप्टनही विचार

विनिमय करून पुढे पाहू सध्या दिलेला सुरुवातीचा पगार मान्य करावा असे ठरले व माझी सेंट्रल बँक मधील नोकरीची सुरुवात झाली. नंतर पुढे सहा महिन्यांनी बँकेत रेग्युलर स्केल सिस्टीम येणार होती. त्यावेळेस आपल्याला ऑफिस ग्रेड मिळेल या कल्पनेने व आशेने बँकेत निरनिराळ्या खात्यात काम करून लागलो.

बँकेत नोकरी सुरू केल्यावर एका क्लार्कशी जरा माझी बाचाबाची झाली. त्याने मॅनेजिंग डायरेक्टरला रिपोर्ट केला. ही बातमी दुसऱ्या अकौन्टंटला श्री. कूपरला कळली. हा कूपर वृत्तीनं उद्धट, मग्रुर, मनात डाव ठेवणारा व जरा महाराष्ट्रीय द्वेष्टा होता. या घटनेचा पुढे काही विपरीत परिणाम होईल अशी मला आधी कल्पना आली नाही.

सहा महिन्यांनी जेव्हा पे स्केल सिस्टीम झाली त्यावेळेस मला वाटले माझे काम व क्वॉलिफीकेशन लक्षात घेऊन मला ज्युनिअर ऑफिसरची जागा मिळेल. पण कसचं काय नी कसचं काय. "मॅन प्रपोझेस ॲण्ड गॉड डिस्पोझेस".

जेव्हा निरनिराळ्या ऑफिसर्सचे व क्लार्क्स्चे स्केल जाहीर झाले तेव्हा मला क्लार्कचे स्केल ७० - १० - १२० हे देण्यात आले व माझ्यापेक्षा बरेच कमी शिकलेले - नॉन मॅट्रिक असलेले अशांना ज्युनिअर ऑफिसरचे १०० - २५ - १५० हे स्केल देण्यात आले.

माझ्या मनात आले की, ईश्वरी इच्छा अशी दिसते की मी सेंट्रल बँक सोडावी. मी तात्काळ राजीनामा दिला. मग काही दिवस नोकरी विरहित होतो. पण दहा - पंधरा

दिवसातच एका बिहारी माणसाच्या वशिल्याने मला जयवाडी शुगर मिल्स्, रंगून व सिमेंट फॅक्टरी, आऱ्हा (पाटणा) याच्या मॅनेजिंग डायरेक्टरच्या पर्सनल असिस्टंटची रु. १५०/- पगारावर नोकरी मिळाली. अर्थात ही नोकरी अल्पायुषी ठरली ते कसे ते पुढं पाहू.



# (२६) माझा विवाह ठरला

लग्न अथवा विवाह हा प्रत्येक पुरुषाच्या अथवा स्त्रीच्या जीवनाला एक नवीन वळण देणारा प्रवाह असतो. अर्थात कोणाच्या बाबतीत प्रवाह पहिल्यांदा संथ व शांत असतो, नंतर दगड - गोटे खडक यातून जातो, नंतर लहान - लहान टेकड्या यांना वळसा देऊन दऱ्या खोरे यातून जावं लागते. सखल प्रदेशात आल्यावर त्याला एका अथांग जलाशयाचं स्वरूप पात्र होते. पात्र रुंदावत, नंतर हळूहळू ओहोटी लागून, शेवटच्या स्थितीत एखाद्या दुसऱ्या नदीला व समुद्राला मिळून शेवटी त्या नदीत अथवा समुद्रात मिळाल्यामुळे त्याचं स्वतंत्र अस्तित्व नष्ट होतं. वर हा दिलेला जो क्रम अगदी याच क्रमाने प्रत्येकाचा विवाहोत्तर जीवन प्रवाह वाहतो असे नाही. तर यात क्रम पुढे मागे होत जातो. कदाचित यातली एखादी अवस्था एखाद्याच्या जीवन प्रवाहात येत असेल तर एखाद्याच्या जीवन प्रवाहात वर वर्णन केल्यापेक्षा एखादी जास्तीची येत असेल. पण एक गोष्ट निश्चित की जीवनाला नवीन वळण देणारं विवाह हे एक बदलणाऱ्या जीवनाचं व्यवच्छेदक लक्षण होय. शेवटची जी अवस्था आहे की, स्वतंत्र अस्तित्व नष्ट होण्याच ती मात्र प्रत्येक लग्न झालेल्या माणसाच्या जीवनात येतेच.

माझ्या बाबतीत सांगायचं म्हणजे ज्या वेळेस माझ्या विवाहाबद्दलच्या वाटाघाटी सुरू होत्या त्यावेळेस मा. ए. बी. पंडित अॅण्ड कं. मध्ये ऑफिस इन चार्ज ऑफ शेअर्स या नोकरीवर होतो. पगार रु. १५०/ - कोट्यावधी रुपयांची

उलाढाल होणाऱ्या शेअर ॲण्ड स्टॉक एक्सचेंजमध्ये. वेळ असेल १९४६ चा पूर्वार्ध. शिक्षण बी. ए. (ऑ), एम्. ए.

मी लठ्ठ तर मुळीच नव्हतो. पण तसा मध्यम अंगयष्टीचा नव्हतो. माझी अंगयष्टी अर्थात फार बारीकही काही सारखीही नव्हती पण थोड्या प्रमाणात कृशतेकडे झुकणारीच. माझी उंची पाच फूट सात इंच असल्यामुळे थोडा बारीक दिसत असेल एवढेच. वर्ण गव्हाळ, चष्मा की ज्यामुळे दुसऱ्यावर छाप पडायची व एकंदर व्यक्तिमत्वाचा दुसऱ्यावर प्रभाव पाडण्यास मदत करणारा असा. फॅमिली, नातेवाईक उत्तम संस्कारात वाढलेला, प्रतिष्ठित घराणे, दोन भाऊ, एक लहान बहीण, आई, वडील.

वडील दोन्ही भावांना नोकऱ्या. मधला एक सेंट्रल बँकेत ऑफिसर तर सर्वात वडील भावाला सरकारी फॉरेस्ट खात्यात असि. अकौन्टंटची नोकरी. मुंबईसच मावसे श्री. के. बी. जोशी सॉलिसिटर. त्यांची तीन मजली इमारत तर सख्ये मामा इलेक्ट्रिकल इंजिनियर. अर्थात तशी इस्टेट, घर - दार असं काही नव्हती. फक्त शिक्षण व उत्तम घराणे आणि नोकरी हेच भांडवल. त्या काळात म्हणजे १९४५ - ४६ च्या काळात मुंबईसारख्या ठिकाणी वास्तव्य असल्यामुळे व पुष्कळ मुली नोकऱ्या करणाऱ्या असल्यामुळे तसा अनेक मुलींशी माझा सारखा संबंध येत असे. मला लग्न कर्तव्य आहे असे कळल्यावर मुलींच्या बापांची सारखी रांग लागायची व शेजारी राहणाऱ्या माझ्या सौ. शांता मावशीच्या तर्फे मुली सांगून यायच्या. तर कधी - कधी मुलीचे बाप आमच्या घरी खेटे घालायचे. तशा मला सांगून आल्या असतील ४०

- ५० मुली. पण त्या सर्वांची माहिती देणे केवळ अशक्य आहे. यातील जेवढ्या निवडक, महत्त्वाच्या तीन - चार मुली आहेत त्याबद्दलच लग्नाच्या वाटाघाटी संबंधाने माहिती देणे संयुक्तिक ठरेल. तशा मी घरच्या कोणाला काहीही न कळवता बऱ्याच मुली परस्पर पाहिल्या. मी स्वत: घरच्या कोणाच्याच मंडळींना न कळत एका मित्राच्या ओळखीच्या गृहस्थाच्या या मित्राच्या सूचनेवरून व त्याला बरोबर घेऊन एक मुलगी पाहिली. ती पनवेलची. या मित्राचं नाव श्री. काणे. तोही ए. बी. पंडित ॲण्ड कं. मध्ये लिपिक होता व मुलीच्या बापाच्या सारख्या माझ्या स्थळाकरिता ए. बी. पंडित ॲण्ड कं. मध्ये या श्री. काणे यांच्याकडे खेट्या घालत असतं. एक दिवस श्री. काणेंच्या आग्रहाखातर त्याच्या बरोबर पनवेलला जाऊन मुलगी पाहाण्याचा कार्यक्रम निश्चित केला व मग प्रथम लोकलने व नंतर बसने मुलीच्या बापाच्या घरी गेलो. अर्थात मुलगी पसंत पहावी म्हणून मुलीचा बाप सारा स्वतःचा जीव ओतून व्यवस्थेच्या तयारीला लागतो व त्यातून त्याच्याकडे जेवण व मुक्काम. मग काय पाहता. आमची बडदास्त ठेवण्याच्या दृष्टीने जी - जी काय व्यवस्था व प्रयत्न करायचे ते सर्व बिचाऱ्याने केले. मुलगी होती बाळबोध वळणाचीच पण मुलगी घरकामात किती हुशार, कुशल, टापटीपशीर होती व स्वयंपाक करण्यात व निरनिराळे खाद्य पदार्थ करण्यात किती तयार झाली होती हे दाखविण्याची ही संधी मुलीचे आई - वडील कसे सोडतील? मुलीची आई व वडील मुलीच्या कर्तबगारीबद्दल व घरकामातल्या हुशारीबद्दल

वर्णन करीतच होते. मी व श्री. काणे श्रवण भक्ती करीत होतो व तक्क्याला टेकून मधून - मधून वाचीत होतो. मुलगी मॅट्रिक झाली होती. मुलीच्या आई - वडिलांनी केलेल्या वर्णनाव्यतिरिक्त व मुलीच्या शिक्षणाव्यतिरिक्त मुलगी दिसायला कशी होती की जो मुख्य महत्वाचा घटक होता. त्याची कल्पना उत्सुकता असूनही लवकर येण्याची संधी येत नव्हती. चहा - पोहे धाकट्या बहिणीनेच आणून दिले. जेवायला उशीर होता व तेव्हाच मुलगी प्रत्यक्ष पाहायला मिळणार होती. उशीर होत असल्यामुळे उत्सुकता वाढत होती. शेवटी दुपारी एक वाजता मुलगी आतल्या घरात पानं मांडताना ओझरती दिसली. नऊवारी साडी नेसली होती पण तोंड ओझरतं दिसलं. मुलीच्या बापाची सारी भिस्त काणेवर कारण काणे यांनी प्रेशर आणलं वा तरफदारी केली म्हणजे मित्राच्या शब्दास्तव मी मुलगी पसंत करणार. पानं मांडली व आतल्या घरात मुलीचा बाप आम्हा दोघांना घेऊन गेला. त्याबरोबर "आमच्या या मुलीनेच सर्व स्वयंपाक केला बरं."

असं म्हणून ज्या मुलीला मला पहावयाचे होते तिच्याकडे अंगुली निर्देश केला. मी मुलीला पाहिलं, मुलीने नमस्कार केला. मी पण नमस्कारातूनच प्रत्युत्तर दिले. मुलगी तशी उंच होती पण जरा काळी सावळी वाटली. बाळबोध घराण्यातली असल्यामुळे अगदी साधी पण अंगकाठी अथवा चेहऱ्यात आकर्षकता नव्हती. मुलीसारखे चेहऱ्यावर हावभाव, अभिनय अथवा नखरेलपणा अथवा फिचर्स मनात भरण्यासारखे नव्हते. या गोष्टींचाही एखादे

वेळेस विचार केला नसता जर अंगयष्टित बांधेसूदपणा वा प्रमाणबद्धता असती व फार शालीन मात्र नसती. मुलींत शालीनता असावी पण अति शालीनता नको. कारण अति तेथे माती. मुलीतील माफक शालीनता हा गुण आहे, पण अति शालीनता असणे यात मागासलेपणाची छटा असते. जेवणमात्र सुग्रास मिष्टांनाचे व अनेक पदार्थ. जेवलो व्यवस्थित. खुश झालो असं दाखवावचं लागलं. कारण शिष्टसंमत व जे औचित्य पूर्ण आहे ते सारे सोपस्कार पाळावेच लागतात. जेवणे वगैरे होऊन, थोडी वामकुक्षी करून दुपारी साडेचार - पाचला निघालो व आठ दिवसात निर्णय कळवितो म्हणून मुलीच्या बापाला सांगितले. घरी रात्री नऊ वाजता आलो. घरच्या मंडळींनी विशेषत: मोठ्या भावाने वसंताने "कुठं गेला होतास?" म्हणून विचारणा केली.

"मी मित्राकडे जेवावयास गेलो होतो." हे सांगून वेळ मारून नेली.

यानंतर जरी बऱ्याच मुलींचे बाप स्थळाच्या दृष्टीनं येत असत तरी लक्षात ठेवण्यासारख्या अशा दोन - तीन मुलीच आल्या. एक जण आपल्या मेहुणी करता आला होता. त्याने मुलीला पाहाण्याकरिता म्हणून घरी बोलावले. मीही वसंत बरोबर घरी गेलो. त्यानं मुलगी अशी समोर आणून दाखविली नाहीच. त्या मुलीला संगीताची आवड असून ती गाणं फारच उत्तम म्हणते म्हणून तो मुलीची तरफदारी करू लागला व मला अर्धवट दिसेल अशा तऱ्हेने आतल्या खोलीतच मुलीने पेटीवर गाणं म्हणण्यास सुरुवात केली.

गाणं चांगलंच म्हणत होती. आवाज तर उत्तमच होता. पण मुलगी जरा काळी होती व अंगयष्टी मामुली होती. लग्न मुलीशी करायचं होतं. गाण्याशी थोडंच करायचं होतं. मुलगी नापसंत केली. नंतरच मात्र जी मुलगी आली ती आमच्या शांता मावशीच्या ओळखीची. मुलीचं आडनाव होत पुरंदरे. ती इन्टर झाली होती. उंच होती. मुख्यत: म्हणजे गोरी होती. अंगकाठीही बरी होती. पण चष्मा होता. इतरांना सर्वांना मुलगी आवडली. मुलगा मुलीला पसंत करील अशी मुलीच्या मंडळीमध्ये आशा निर्माण केली. इतकंच काय मुलीच्या सर्व मंडळींना मीही आवडलो होतो. ते माझ्या पाठलागावरच होते. एकदा मी कोहिनूर सिनेमा थिएटरमध्ये सिनेमा पाहायला गेलो होतो.

माझ्या पाठीमागच्या दोन खुर्च्या सोडून तिसऱ्या खुर्चीच्या लाईनला मुलगी व तिचे आई - वडील सिनेमा पाहायला आले होते. इन्टरव्हलमध्ये मला भेटले. सिनेमा संपल्यावर भेटले. त्यांची कल्पना मी मुलीला पसंत केले. पण जेव्हा निर्णायक मत सांगायची वेळ आली तेव्हा मी नापसंतीबद्दल अप्रत्यक्षपणे निरोप कळवला. यानंतर मात्र जी मुलगी मला दाखविण्याकरिता म्हणून आली तिच्या बाबतीत साखरपुडा होणार इथपर्यंत वेळ आली व बहुतेक या मुलीशी लग्न ठरणार येथपर्यंत अवस्था येऊन पोहोचली होती. ती होती श्री. पारखी यांच्या भावाची बहीण. मुलगी निमगोऱ्या वर्णाची, अंगानं भरलेली. स्मार्ट, मोकळेपणाने बोलणारी, कामसू व विशेषत: म्हणजे मुंबई कॉर्पोरेशनमध्ये नोकरी करणारी. पगार होता त्यावेळेस २५० रु. मॅट्रिक

झालेली. प्रथम दर्शनी मला ती पटली. तिच्याशी चांगले बोलता यावे व ती कशी बोलते हे कळावे म्हणून मला तिच्या भावानं घरी बोलावलं होतं. मला ती पटली. पण विचार करता - करता एक गोष्ट लक्षात आली. जरी ती अंगानं भरलेली होती तरी तिच्यामध्ये बांधेसूदपणा व प्रमाणबद्धता नव्हती. तिचे नितंब जरा मोठे वाटले. मनात आलं ही पुढे लठ्ठ झाली तर काय करणार. कारण तसा माझा बांधा मध्यम (जरा कृशतेकडेच झुकणारा होता). ही गोष्ट माझ्या केव्हा लक्षात आली तर जेव्हा मी तिची प्रत्यक्ष गाठ तिच्या ऑफिसमध्ये जाऊन घेतली. मी जरा थोडा कुरकुरा आहे. असं वडिलांच्यालक्षात आल्यावर वडील तू प्रत्यक्ष ऑफिसमध्येच जाऊन तिला भेट म्हणजे तुला पूर्ण कल्पना येईल. मलाही विचार आला की, हा आपल्या संपूर्ण आयुष्याचा प्रश्न आहे. मी ऑफिसमध्ये गेल्यावर (साधारण ऑफिस सुटण्याच्या वेळेस साडेपाच वाजता) ती बाहेर येताना एकदम दिसली. मग आम्ही दोघे एका रेस्टॉरंटमध्ये फॅमिली रूममध्ये गेलो. गप्पा झाल्या. खाणं - पिणं झालं व मग बाहेर पडलो. तिला या माझ्या कृत्यावरून असं वाटलं की, मी तिला पसंत केलं आणि सर्वांचा समज हाच झाला. माझ्या मावशीकडे मुलीचा भाऊ, मुलगी, माझा मोठा भाऊ वसंत, माझे वडील माझी वाट पाहात बसले. पण मी काही गेलो नाही. शेवटी सर्व मंडळी निघून गेली. वसंत माझ्यावर खूप संतापला. मी मुलीला नापसंत केल्याबद्दल व नापसंत करण्याचे कारण सांगितल्याबद्दल खूप संतापला.

मी सारख्या मुली नाकारतो अशी माझी जाहिरात माझ्या हितशत्रूंनी करावयास सुरुवात केली. इतक्यात अकस्मात एक प्रसंग घडला. एक श्री. देशिंगकर म्हणून खादीची टोपी, पांढरा शर्ट व पांढरे धोतर नेसलेले चष्मा घातलेले गृहस्थ होते. त्यांचे कापडाचं दादरमध्येच प्लाझा सिनेमासमोर एक दुकान होत. मी त्यांच्या दुकानात मधून - मधून जात असे. त्यामुळे त्यांना माझी माहिती होती. त्यांच्याच ओळखीचे श्री. एकबोटे म्हणून एक शिक्षक होते. ते एम. ए., एल्एल्. बी. बी. टी. होते. कदाचित या श्री. एकबोटे व श्री. देशिंगकर यांना माझ्या स्थळाची माहिती ए. बी. पंडित ॲण्ड कं. या शेअर ॲण्ड स्टॉक ब्रोकर्सच्या कंपनीकडून माहिती झाली असावी. मला अत्यंत सुंदर नाही तरी दिसायला आकर्षक चेहऱ्याची बांधेसूद, साधारण प्रमाणबद्ध शरीराची मुलगी पाहिजे या माझ्या अपेक्षाही त्यांना कळल्या असाव्यात. अर्थात ज्या वेळेस श्री. देशिंगकर हे माझ्या स्थळाचा शोध घेत होते तेव्हा मी ए. बी. पंडित ॲण्ड कं. मध्येच नोकरीला जात होतो. मी इकॉनॉमिक्स मध्ये एम. ए. होतो व जेथे लाखो रुपयांची उलाढाल होते अशा शेअर ॲण्ड स्टॉक ब्रोकरच्या कंपनीत नोकरीला होतो. या दोन वैशिष्ट्यामुळे 'या मुलाला पुढे खूप प्रॉस्पेक्टस् मिळण्याची शक्यता आहे.' या समजुतीमुळेच श्री. एकबोटे यांच्या सल्ल्यानुसार श्री. देशिंगकर माझ्या स्थळाकरिता अचानक आमच्या ब्लॉकमध्ये आले व म्हणाले, "तुम्हाला तुमच्या भावाच्या अपेक्षेत बसणारी सुंदर मुलगी दाखवतो, तुम्ही मुलगी पाहून घ्या."

अर्थात मी व माझ्या भावानं (वसंताने) हे मान्य केले. नंतर श्री. देशिंगकर मला एकट्याला खाली नेऊन म्हणाले, “आम्ही पहिल्या मजल्यावर ‘कृष्णकुंज’ या इमारतीत राहत होतो." तुम्हाला मुलगी सुंदर पाहिजे आहे ना? अगदी तुमच्या पसंतीला उतरणारीच सुंदर मुलगी आहे."

त्यांनी मी वसंताला मुलगी पाहाण्याचा कार्यक्रम मुकरर करण्यासंबंधी सूचना केली. त्याप्रमाणे त्यांनी वसंताला मुलगी पहाण्यासंबंधीचा दिवस, वेळ व जागा निश्चित करण्यासंबंधी बोलणी करून श्री. एकबोटे यांच्या घरीच सायंकाळी साडेपाच - सहाच्या दरम्यान मुलगी पहाण्याचा कार्यक्रम मुकरर केला. आम्ही संमती दिली. अर्थात वसंत माझा मोठा भाऊ असल्यामुळे त्याच्या विचारानेच व मार्गदर्शनाखाली ही मुलगी पाहाण्याचा कार्यक्रम ठरला होता. त्याप्रमाणे आम्ही सायंकाळी साडेपाच नंतर ठरलेल्या दिवशी श्री. एकबोटे यांच्या घरी मुलगी पहाण्यास गेलो. इतर चहा - पाण्याच्या गप्पा झाल्यानंतर मग मुलीला आम्हाला दाखवावयास आणण्याच्या सूचना श्री. एकबोटे यांच्याकडून दिल्या गेल्या. अर्थात मी मुलगी पाहाण्यास कमालीचा आतुर व उत्सुक होणे हे नैसर्गिक होते. मुलगी आली व तिने माझ्या मोठ्या भावाला (वसंताला) नमस्कार करून समोरच्या खुर्चीवर बसली. ती नऊवारी पातळ नेसली होती. वेषभूषा तशी आकर्षक होती. अंगानं सुदृढ (रोबस्ट) होती. डोळे उत्तमच होते व नाक सरळ चांगले होते. केश संभार त्या मानानं बरा होता. मुद्दामहून फॅशन म्हणून म्हणावा आकर्षण करण्या

दृष्टीने म्हणून कपाळावर ३ - ४ केस लांब सोडले होते. एकंदर बांधा आकर्षक वाटला. संध्याकाळची वेळ असल्यामुळे व तोंडाला पावडर लावल्यामुळे वर्ण गोरा जरी नाही तरी निमगोरा अथवा उजळ असाच वाटला. अर्थात तिला दिवसा पाहिलं असतं तर इतका उजळ वाटला नसता. उंचीची कल्पना आली नाही. कारण उंचीच्या प्रमाणात एकंदर शरीराचा आकृतीबंध असल्यामुळे व फिचर्स (नाक, डोळे, भालप्रदेश) आकर्षक वाटला. त्यातूनही वसंताने विचारलेल्या प्रश्नांना न घाबरता उत्तरं दिल्यामुळे थोडा स्मार्टनेस जाणवला. शिक्षणाबद्दल नववीपर्यंत शिक्षण झालं आहे व पुढं शिकणार आहे असं म्हणाली. मान किंचित वाकडी करण्याच्या सवयीमुळे आकृतीत कमनीयता वाटली. त्यानंतर वडील श्री. **मुक्तेश्वर बापूजी तेरवाडकर** हे इनामदार मुक्तेश्वरांच्या संत घराण्यातले तेरवाड हे जहागीरीचे गाव यामुळे मुलगी अभिजात सुसंपन्न श्रीमंत घराण्यातली. वडिलांची संपत्ती बरीच होती आहे हे ही कळलं. श्री. एकबोट्यांना शिकलेल्या मुलाची आवड असल्यामुळे मी त्यांच्या मनात भरलो असेन व त्यांनी मुलीला मुलगा पाहायला आल्यानंतर कसं बोलावं, काय बोलावं; याची ट्रायल दिली असावी. शिवाय आमच्या घराण्याचीही त्यांना माहिती मिळाली होती. मुंबईतील माझ्यासारख्या मावशीचे यजमान नामांकित सॉलिसीटर, माझे मामा इंजिनिअर, भाऊ सेंट्रल बँकेत ऑफिसर व एम्. एस्सी. मोठ्या भावाला आकोल्यात नोकरी, आई - वडील हे सर्वच सुसंस्कृत घराण्यातले. प्रत्यक्ष मुलीला शिक्षणाची

कितपत आवड होती हा प्रश्न सोडला तरी मुलीवर मला पसंत करण्यात श्री. एकबोट्यांचाच प्रभाव होता हे निश्चित. मुलगी पाहून आम्ही घरी आल्यानंतर वसंत म्हणाला, "वामन, आतापर्यंत तुला आलेल्या मुलीत हीच मुलगी बरी आहे."

मी ही त्याच्या या म्हणण्याला दुजोरा दिला व माझ्याही मनात मुलगी भरली होती. कदाचित योगायोग असावा म्हणून या मुलीबद्दल माझे मन अनुकूल झाले. ती याच वेळी वडिलांचे आकोल्याहून घड्याळजी यांची मुलगी पाहण्याकरिता पत्र आले होते. वसंत म्हणाला की, “वामन, तू आकोल्यास जाऊन पाहून ये.”

पण एकतर आता मला मुली पाहाण्याचा कंटाळा आला होता. मी मुली पाहून - पाहून थकलो होतो. तेव्हा त्याला मी उत्तर दिले की, “आता याच मुलीशी ठरवा. मला मुलगी पसंत आहे व पुढच्या वाटाघाटी करावयास सुरुवात करा. मी माझी पसंती कळवल्यानंतर मग श्री. एकबोटे यांनी मुलीच्या वडिलांना ताबडतोब पुढील बोलणी करण्याकरिता व याद्या करण्याकरिता बोलावून घेतले. अर्थात सर्व बोलणी वसंतानीच केली. देण्या - घेण्याचे; रिती - रिवाजाप्रमाणे ठरले. नंतर ताई आली व भाऊ आले. त्यांना ही मुलगी दाखविण्यात आली. मुलानं मुलीला व मुलीनं मुलाला पसंत केल्यानंतर मग माझ्या आईनं (ताईने) टिपणाचा विषय काढला. तेव्हा मी एकदम म्हणालो, “मुलगा व मुलगी यांनी एकमेकांना पसंत करण्याआधीच

टिपण जुळते की, नाही हे पहावयास पाहिजे होते. आता देण्या - घेण्याचे ठरल्यानंतर, याद्या झाल्यानंतर, साखरपुडा झाल्यानंतर टिपण जुळत नाही म्हणून ठरलेले लग्न मोडण्यात दोन्ही कुटुंबाच्या प्रतिष्ठेला तडा जातो. आता टिपण पाहणे हे अयोग्य व अस्थानी आहे."

त्यातूनही सहज पाहायचे म्हणून पाहिल्यावर माझ्या टिपणात सौम्य उंचीचा - मंगळ तर मुलीच्या टिपणात शनी होता. मुलीचं नाव होतं सुभद्रा हे नाव ही चांगलं होतं. सुभद्रा म्हणजे चांगल्या लक्षणांची. मग ताई - भाऊंना पटलं व मग ११ मे १९४७ हा मुहूर्त धरण्यात येऊन लग्न ठरलं.



# (२७) माझा विवाह सोहळा

अर्थात मी पसंत केलेली मुलगी अत्यंत अप्रतिम व सुंदर होती असं मुळीच नव्हे. पण जेवढ्या म्हणून मी मुली पाहिल्या त्या सर्व मुलीत नाका डोळयांनी फिचर्सनी बरी होती. बरी म्हणजे काय चांगलीच होती. उंची कमी होती पण त्या मानानं जाड वा लठ्ठ अशी वाटली नाही. डोळे आकर्षक होते व तशी बांधेसूद वाटली. आकृतीबंध आकर्षक होता. वर्ण सावळयांतच जमा. संध्याकाळी मुलगी पाहिल्यामुळे वर्ण तितका एकदम लक्षात आला नाही. फिचर्स आकर्षक व चेहऱ्यावर हास्य होते.

तशी मला आकोल्याची मॅट्रिक झालेली घड्याळजी यांची मुलगी आली होती व माझ्या मोठ्या भावानं आकोल्याची मुलगी पाहून मग निर्णय दे अशी सूचना केली होती. पण खरं म्हणाल तर मी स्वत: ही मुली पाहून कंटाळलो होतो. शिवाय वसंतही म्हणाला, "वामन, तुला आतापर्यंत आलेल्या मुलीत तौलनिक दृष्ट्या हीच मुलगी बरी दिसते."

तशी मला वर्णानं गोरी मुलगी हवी होती व पुरंदऱ्यांची मला सांगून आलेली मुलगी अगदी कोकणस्थासारखी गोरी होती पण एक तर तिला चष्मा होता. चष्मेवाली मुलगी मला मुळीच नको होती व शिवाय फिचर्स उठावदार नव्हते. दुसरी पारखींची गोरी नाही; पण निमगोरी वा उजळ शिकलेली नोकरी करणारी मुलगी पण प्रथम दर्शनी मला आवडली होती. एकंदर ती बोलते कशी,

हसते कशी, केश संभार कसा व किती आहे, चालण्याची ढब कशी आहे इ. जाणण्याकरिता माझ्या वडिलांच्या सूचनेप्रमाणे तिला हॉटेलमध्ये फॅमिली रूममध्ये घेऊन गेलो होतो. ही शिकलेली व नोकरी (बॉम्बे कॉरपोरेशनमध्ये) करणारी होती; पण उंचीच्या मानानं जरा लठ्ठ वाटली व नितंब जरा मुलीच्या मानानं स्थूल वाटले. हे लग्न ठरण्याच्या बेतात होतं, पण वरील दोषामुळे मी साफ नकार दिला. साधारण बांधेसूद, प्रमाणबद्ध मुली पुढे लग्न झाल्यावर व मूल झाल्यावर अंगानं सुटतात. तेव्हा ही फारच सुटेल म्हणून नाकारली. असो.

विवाहाचा ११ मे १९४७ मुहूर्त ठरला पण साखरपुडा झाला नाही. मुलीचे वडील **मुक्तेश्वर बापूजी तेरवाडकर** हे एक बडे इनामदार होते. त्यांना शाहू महाराजांनी तेरवाड गावच मुळी बक्षीस म्हणून दिले होते. माझ्या सासऱ्यांना नव्हे तर माझ्या सासऱ्याच्या वडिलांना (त्यांना बुवासाहेब म्हणत). त्यांना हा मुक्तेश्वर एकच मुलगा असल्यामुळे वंशपरंपरांनी ते गाव व जमीन (५०० - ६०० एकर असावी) माझ्या सासऱ्याला मिळाली होती. मुलगी थोडी उंचीनी जरी कमी पण फिचर्सनी आकर्षक, सतत हसतमुख व शिवाय इनामदारांची त्यामुळे तशी समाधानी होती. आता थोडंस काही वेळेस ॲडजेस्टमेंट - अपेक्षा शिथिल करून मुली पसंत करून घ्याव्या लागतात. १०० टक्के गोष्टी कोणत्याही मनुष्याच्या मनासारख्या होत नाहीत. गौण गोष्टी सोडायच्या. महत्त्वाच्या गोष्टीवर भर द्यायचा. मानवी जीवनच मुळी सर्व देवघेवीवर कमी जास्त

बदल स्वीकारण्यावर आहे. शिवाय जी गोष्ट ठरते ती परमेश्वरच ठरवतो असं समजायलाच आपण योगायोग म्हणतो. लग्न नृसिंहवाडीला होणार होतं. त्याप्रमाणे आम्ही आमचं वऱ्हाड लग्नाला निघालं.

आम्ही पुण्याला आल्यानंतर पुण्याहून मिटरगेजने मिरजेला जायचं. त्या वेळेला ब्रॉडगेज नव्हता. मिटरगेजच्या गाड्या लहान, दरवाजे लहान, सिटस् लहान, शिवाय त्या काळात पुण्याहून मिरजेला मिटरगेजच्या मोजक्याच गाड्या होत्या. मिरज मेल, एक्सप्रेस व पॅसेंजर. तसा त्या काळात मेल व पॅसेंजरमध्ये फार फरक नव्हता. मला वाटतं आम्ही दुपारी अकराच्या मिरज एक्सप्रेसने निघालो. गाडीत खच्चून गर्दी. एकमेकांच्या अंगावर, मधल्या कॉरीडॉरमध्ये, गाडीच्या दारात, प्रवासी बसलेले. गाडीत इतकी गर्दी होती व उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे इतका उष्मा होत होता की, जीव गुदमरायची वेळ आली. त्यातून मला पित्ताचा विकार होता. खूप पित्त झाल्यामुळे सपाटून डोकं दुखू लागलं. शिवाय गाडी खूप तापली होती. त्यावेळेस मिटरगेज गाड्यांनी प्रवास करणं म्हणजे एक 'भयंकर दिव्य' च होतं. तेवढ्यात साताऱ्याला माझे वडील हात धुण्याकरिता उतरले. हाताला साबून लावल्यामुळे व हात साबूनने धुतल्यामुळे हातातली सोन्याची अंगठी केव्हा गळून पडली हे त्यांना कळलं नाही. हे नंतर लक्षात आलं. पण गाडीने सातारा सोडलं होतं. काही उपाय नव्हता. या प्रवासात इतका त्रास झाला की, आजपर्यंत आयुष्यात त्या प्रवासाच्या त्रासाशी तुलना करता मिटरगेज गाड्यांनी

मिरजेला जाणं म्हणजे एक शिक्षाच वाटत होती. कदाचित या मिटरगेज गाड्यांचा मिरजेकडे प्रवास करता तर इतका भयंकर त्रास होतो याची जर कुणी मला आधी पूर्ण कल्पना दिली असती तर मग या आत्यंतिक त्रासामुळे म्हणा मी या बाजूची मुलगी पत्करलीच नसती. आपल्या कन्येकरिता वर संशोधनाचा त्रास कोणत्याही पित्याला पडला नसेल आणि आपण अशा बाजूची सासुरवाडी शोधून काढली की मधून - मधून कारणपरत्वे सासुरवाडीला येणं म्हणजे एक अपूर्वाईच होती. असो. आम्ही रात्री दहाला मिरजेला येऊन पोहोचलो. मिरजेला आम्हाला घ्यायला आमच्या भावी श्वशुराचे जे उपाध्याय श्री. वामन भटजी त्यांची मुलं - अनंत भटजी आणखी कोणीतरी माणसं आली होती. रात्र मिरजेला काढल्यानंतर त्यावेळेस मिरज ते जयसिंगपूर - कोल्हापूरला जाणाऱ्या कोल्हापूर मिटरगेज रेल्वे गाड्या सकाळच्या सातच्या मिटरगेज गाडीने जयसिंगपूरला आलो. कोल्हापूर लाईनवरचं मिरजेहून जयसिंगपूर पहिलं स्टेशन. जयसिंगपूरला उतरल्यावर त्या काळात प्रायव्हेट बसेस होत्या. बसेसमध्ये गर्दी पण आम्हाला घ्यायला आलेल्या अनंत भटजींनी आधीच जागा धरून ठेवल्या होत्या. साधारण सकाळी साडेआठ ते नऊला वाडीत (नृसिंहवाडीला) आलो. आमचे भावी श्वशुर एस. टी. वर आले होते. आमच्या वऱ्हाडाकरिता इचलकरंजीकरांची ओरी अथवा बंगला दिला होता. या बंगल्याला वर मोठी माडी होती. पुढे गॅलरी व मागे गच्ची. जागा फारच सुंदर, सारखं थंड वारं येत होतं व जागा प्रशस्त होती. प्रवासाच्या

थकव्यामुळे व ऊन लागल्यामुळे माझा घोळणा फुटला. नाकातून रक्त वाहू लागले. मग नाकात कांद्याचा रस व त्यात तूप असं टाकलं. मग रक्त येणं बंद झाल. ही मे महिन्यातील १० तारखेची गोष्ट. मग लग्न लागण्यापूर्वीच सर्व विवाहाचे मूळ विधी व संस्कार सीमांतपूजन (रात्री) झालं. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता लग्न मुहूर्त. मुंडावळ्या बांधून मोटारीमधून मुलीच्या मंडळींनी जिथे जानोसा दिला होता तेथे वाजत गाजत आणण्यात आले. आंतरपाट धरण्यात येऊन व मंगलाष्टकं म्हणण्यात येऊन लग्न लागलं; शुभमंगल सावधान झाले. वाटले जीवनातल्या गृहस्थाश्रमाच्या दुसऱ्या पर्वाला वा अवस्थेला सुरुवात झाली. पण लग्नानंतरचे होम - हवन विधी, लग्न जरी छोट्या प्रमाणावर झालं; पण थाटमाट मोठा नव्हता तरी एकंदर समारंभ चांगल्या तऱ्हेने पार पडला. जिलबीच्या जेवणाच्या पंगती झाल्या. मुलीला उखाणा घेण्यास लावला. त्यावेळेस मुलीनं कोणता उखाणा घेतला हे तरी सध्या तरी आठवत नाही. मग मला नाव घेण्याचा आग्रह करू लागले. मी बावचळलो मी (किंचित) कवी आहे अशी कुणकुण लागली होती. मग मी पण कवीच्या आवेशात वा उर्मीत, "माझ्या लग्नाला आहे साक्ष ही शेजारची कृष्णा. शकुंतलेचं नाव घेतो तिची मला लागली होती तृष्णा."

सर्वजण एकदम विस्मय चकित झाले. फारच सुंदर, फारच सुंदर म्हणू लागले. माझ्या मोठ्या भावानं वसंतानं मी शकुंतला नाव ठेवल्याने, वामन स्वत:ला दुष्यंत समजतो असं थट्टेने म्हटलं. नंतर लग्न लागलं (दिनांक ११ मे) त्या

दिवशी रात्री गाण्याचा प्रोग्रॅम झाला. गाण्याचा प्रोग्रॅम मात्र फारच सुंदर वठला. माझे लग्नाला आलेले चार नंबरचे काका (श्रीधरकाका) हे गाणारेच होते. त्याचप्रमाणे मुलीच्या मधल्या मामाची बायको (इंदूमतीमामी) याहीपण गाणाऱ्या होत्या. दोघांचीही जुगलबंदी सुरू झाली.

जवळ - जवळ रात्री अडीच वाजेपर्यंत गाण्याचा कार्यक्रम सुंदर वठला. पण मध्येच काय झालं कुणास ठाऊक इंदूमतीमामी गाणं म्हणत असतानाच त्यांना एकदम फीट आली. त्या खाली पडल्या. तेव्हा कार्यक्रम आटोपणे भागच होतं. पुढे त्यांची फीट गेली. सकाळी उठल्यावर जायची गडबड. सकाळच्या बसने जयसिंगपूरला नववधूसह आलो.

आमच्या नवपत्नी माहेरचं नाव होतं सुभद्रा पण मी नाव ठेवलं होत शकुंतला. मला जरा कालिदास पहिल्यापासूनच आवडत होता, कारण तो शृंगाराचा राजा. इतर कोणी म्हणाले सुभद्रा नाव चांगलं होतं. नाव बदललं नसतं तरी चाललं असतं. पण ‘शकुंतला’ हे नवे नाव ठेवण्यात आपल्या स्वातंत्र्य वैशिष्ट्यांचा वा वेगळेपणाची छाप मारण्यासारखं होतं. शिवाय उखाण्यात नवीन नाव ठेवण्यात आपल्या काव्यमय वृत्तीचीही थोडीशी झलक दाखविण्यात आली. असो. नंतर आम्ही निघालो तो मी, पत्नी व आपल्याबरोबर श्री. वसंत मामा (माझ्या पत्नीचे सर्वात धाकटेमामा) त्यांची बायको व दोन मुलं. शिवाय माझी सख्खी बहीण, मावस बहीण हे सर्व पण होते. पुण्यास श्री. वसंतमामा व त्यांच्या पत्नी उतरल्या. त्यानंतर आम्ही मुंबईस पोहोचलो.

# (२८) मनुष्य चिंतितो एक तर ईश्वर चिंतितो भलतेच.

कोणी म्हणेल ११ मे १९४७ ला लग्न लागल्यानंतर एवढी निघायची घाई मी का केली व मधुचंद्राकरता जाण्याच्या प्रथेनुसार मी आठ - पंधरा दिवसांची सुट्टी घेऊन मधुचंद्रास एखाद्या थंड हवेच्या ठिकाणी का गेलो नाही. पण आहो लग्नाच्या आधी ए. बी. पंडित आपण कं. यांची शेअर बाजारातील माझी नोकर संपली होती. (कंपनीच्या नोकर कपातीमुळे) व दिनांक १३ मे १९४७ ला मी शिकत असताना पूर्वी माझे अर्थशास्त्राचे प्रोफेसर असताना माझी ओळख असलेल्या व तेच आता रिझर्व्ह बँकेच्या 'डिपार्टमेन्ट ऑफ स्टॅक्टस्टीक्स ॲण्ड रिसर्च' या खात्या डायरेक्टर असल्यामुळे त्यांच्या ओळखीमुळे याच खात्यात नेमणूक होऊन दिनांक १३ मे १९४७ ला कामावर रूजू होण्याची अपॉइंटमेंट ऑर्डर आल्यामुळे सुट्टी ती कशी मिळणार व मधुचंद्राकरता जाणार कसा?

तात्पर्य हे की, नुकतेच ११ मे १९४७ ला चतुर्भुज झालेल्या मला इच्छा असो वा नसो कामावर रूजू होणे भाग होते. शिवाय लग्न झाल्यामुळे पत्नीची जबाबदारी अंगावर पडली होती. समजलो आमच्या नशीबात हा (मधुचंद्राचा) भाग नाही. दिनांक १२ मे १९४७ ला पत्नीसकट मुंबईला आमच्या ब्लॉकमध्ये परतल्यानंतर बरोबर आलेल्या माझ्या मावस बहिणी व भाऊ आमच्या सौ. शांता मावशीच्या

शेजारच्या बंगल्यात राहावयास गेल्या. आमच्या ब्लॉकमध्ये मी व माझी नुकतेच लग्न झालेली पत्नी सौ. शकुंतला दोघंच उरलो.

तेव्हा असं ठरवलं की, हा ब्लॉकच आपणास महाबळेश्वरसारखा असून येथेच मधुचंद्र उरकायचा (एक दिवसाचा) कारण दुसरे दिवशी सकाळी माझे आई - वडील, मधला भाऊ, मोठा भाऊ व सर्वात मोठ्या वहिनी येणार होते. तेव्हा दिनांक १२ मे १९४७ ला दुपारी साडेपाच - सहापर्यंत व रात्रभर मौजमजा केली.

सौ. शकुंतला हसऱ्या वृत्तीची, कधी - कधी सतत दहा मिनिट हसणारी असल्यामुळे त्या हसण्यातलं माधुर्य तरी अनुपमेय वाटलं. पण एक होतं, ती खानदानी श्रीमंत इनामदार घराण्यातली असल्यामुळे कामाची विशेष सवय दिसत नाही व "आमच्या हाता - पायावर पाणी घालायला नोकर माणसं असत."

हे तिचे विधान अविस्मरणीय तर होतेच. तिचे वडील - माझे सासरे हे श्री. मुक्तेश्वर बापूजी तेरवाडकर इनामदार हे एक छोटे संस्थानिका सारखेच होते. कारण तेरवाड गाव त्यांच्या वडिलांना इनाम देण्यात आल्यामुळे कुरुंदवाड संस्थान असताना कुरुंदवाडचे संस्थानिक स्व. श्री. पटवर्धन व आमच्या श्वशुरांचा बराचसा घरोबा होता.

त्यामानाने आमची परिस्थिती बेताचीच. सांगायचं तात्पर्य हे की अगदी पहिल्या दिवशीच माझ्या नवपत्नीला भात करण्याकरिता मला मदत करावी लागली. कारण शिजविताना पाणी जास्त झाल्यामुळे भात खीरीसारखा

झाला होता की, जो आम्ही मिटक्या मारीत खाल्ला. नंतर दिनांक १३ ला सारी मंडळी (आमची आई - जिला आम्ही 'ताई' व वडील ज्यांना आम्ही 'भाऊ' म्हणत असू) आली. त्यामुळे सौ. शकुंतलेनं स्वयंपाक करण्याचा प्रश्नच मिटला. नंतर मी आपल्या नव्या जागेवर रिसर्च असिस्टंट म्हणून रूजू झालो.

काम करीत असतानाही पण केव्हा पाच वाजतील व केव्हा घरी जायला मिळेल याची चुटपूट लागायची. तारुण्यात कामजीवनातील सुखाची तर प्रत्यक्ष स्वर्गीय सुखापेक्षाही सरस वाटू लागते. लग्न झालं, नोकरी रिझर्व्ह बँके सारख्या बँकेत मिळाली त्यामुळे मी जरा निश्चित व समाधानी आहे अशी भावना मनात पिंगा घालीत होती. पण जीवनच असं आहे की त्याला चढ - उतार आहेत.

'कस्यैकान्तं सुखमुपगतं दुखमेकान्तता वा,
नीचैः गच्छति उपरिच दशा चक्रनेमिक्रमेण'

(कोणाला कायमचं सुख वा कायमचं दुःख या जीवनात मिळाले आहे. मनुष्याची दुःखामुळे अवनति व सुखामुळे उन्नति हे सारं चक्राप्रमाणे चालूच असतं)

या कालीदासाच्या सिद्धांताची पदोपदी प्रचीति यायला लागली. मला ज्याच्या ओळखीमुळे वा वशिल्यामुळे रिझर्व्ह बँकेतील रिसर्च असिस्टंटची जागा मिळाली होती. ते माझे प्रोफेसर पण आता बँकेत डायरेक्टर ऑफ रिसर्च अॅण्ड स्टॅटिस्टीकच्या हुद्द्यावर असलेले डॉ. प्रसाद पांडे यांच्या हाताखाली नोकरी करीत होतो. प्रत्यक्ष नोकरी लागताना मी त्यांना स्पष्ट सांगितले होते की, "मी सहा

महिने ओव्हरएज ओह. ते कन्डोन अर्थात क्षम्य करावं लागेल प्रत्यक्ष ऑर्डर काढून."

तेव्हा तेच म्हणाले, "त्याची तुम्ही काळजी करू नका, ते मी स्वत: करीन"

त्यानंतर मध्ये एकदा प्रसंगोपात मी त्यांना आठवण दिली होती तर ते म्हणाले, "माझ्या लक्षात आहे."

नंतर दोन महिन्यांनीच पुढच्या संशोधनाकरिता बँकेने त्यांना अमेरिकेला पाठविले. ते अमेरिकेला गेल्यानंतर बँकेतील तीन डेप्युटी डायरेक्टर्स ऑफ रिसर्च काम पहात होते. अर्थात त्या वेळेला वशिलेबाजी, गटबाजी होतीच. मला डॉ. प्रसाद पांडे यांनी सब्जेक्ट इंडरव्हयू आफ्टर सिक्स मन्थ्स् या अटीवर लावले होते व ते म्हणाले होते की, "इंटव्हयू फॉर्मल राहील व तेच इंटरव्हयू कमिटीचे मुख्य अध्यक्ष राहतील."

त्यावेळेस त्यांना कल्पना नव्हती की, त्यांना अमेरिकेला जावे लागेल. ते गेल्यामुळे राहिलेल्या तीन डेप्युटी डायरेक्टरर्स पैकी एका डेप्युटी डायरेक्टरला व त्याच्या सेक्रेटरीला त्यांचा एक मद्रासी पदवीधर तरुण माझ्या जागेवर घ्यायचा होता व आता डॉ. प्रसाद पांडे अमेरिकेला असल्यामुळे त्यांच्या गैरहजेरीत इंटरव्हयू घेऊन आपला माणूस नेमावा अशी त्यांनी कारस्थानी योजना काढली. बरं.

डॉ. प्रसाद पांडे यांनी जाण्याच्या आधी माझं सहा महिने ओव्हरएज माफ (कन्डोन) केलं असेल असं मला वाटलं. पण ज्या डेप्युटी डायरेक्टरला त्याचा माणूस

घ्यावयाचा होता त्याला कल्पना होती की, आपण या परिस्थितीचा फायदा घ्यायचा. कारण डॉ. प्रसाद पांडे माझं सहा महिने ओव्हरएज माफ करायचं विसरले होते. त्यांच्याकडून चुकून राहीलं होतं.

इंटरव्हयू करता पाच मेंबर्सच्या कमिटीसमोर मला बोलावण्यात आलेलं होतं. मी त्यांच्या सर्व प्रश्नांची बिनचूक उत्तरं दिली; पण वय विचारल्यानंतर मी माझं वय सांगितलं. त्यातील प्रेसिडेंट असलेल्या डेप्युटी डायरेक्टर जवळ उभा असलेल्या सेक्रेटरीनं सांगितलं, "ही इज ओव्हरएज बाय सिक्स मंथस्".

त्यांनी मला हे सांगितलं. त्यावर त्यांना मी सरळ उत्तर दिलं की, “त्या माझं सहा महिने ओव्हरएज कन्डोन करण्याच्या अटीवरच मला घेतलयं व स्वत: तेच करणार होते. कदाचित त्यांनी केलंही असेल."

तेव्हा त्या सेक्रेटरीनं उत्तर दिल, “त्यांनी वय कन्डोन केलं नाही व कन्डोन केल्याचं रेकॉर्ड पण नाही".

तेव्हा मी सरळ उत्तरलो, "यात काही काळं बेरं मला दिसत आहे. आपण त्यांना केबल करून विचारा."

तेव्हा त्यातील एका डेप्युटी डायरेक्टरने की, जो मला अनुकूल होता, त्यानं सांगितले, "तुम्ही पुन्हा उद्या या. आम्ही केबल करून सांगतो."

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी मला अनुकूल असलेल्या डेप्युटी डायरेक्टरला माझी परिस्थिती स्पष्ट केली. “रिझर्व्ह बँकेमध्ये मला नोकरी मिळण्याचं आश्वासन दिलं गेल्यामुळे व मला नोकरी डॉ. प्रसाद पांडे यांनी दिल्यामुळे मी शेअर

अ‍ॅण्ड स्टॉक एक्सचेंज मधील ए. बी. पंडित यांच्या फर्म मधील नोकरी सोडली व ही नोकरी सहा महिने ओव्हरएज असल्यामुळे जर मला काढलं तर माझी शाश्वतही नोकरी गेली व अशाश्वतही नोकरी गेली.”

“मला इथे नोकरी मिळाली नसती तर मी शेअर मार्केट मधील नोकरीचा राजीनामा दिला नसता. माझ्या ठिकाणी तुम्ही आहात अशी घटकाभर कल्पना करा म्हणजे माझ्या परिस्थितीची आपणास पूर्ण कल्पना येईल."

तेव्हा या डेप्युटी डायरेक्टरला माझं म्हणणं पटलं पण प्रेसिडेंट असलेल्या डेप्युटी डायरेक्टरला व त्यांच्या सेक्रेटरीला त्यांचा वशिल्याचा माणूस घेण्याच्या वेडाने इतकं पछाडलं होतं की डॉ. प्रसाद पांडे यांनी आश्वासन दिल्याचं केबल येऊन पोहोचली असताना त्यांनी ती गहाळ केली व मला सांगितलं त्यांचं उत्तर कन्डोन करण्याबद्दल आश्वासन दिले नव्हतं असं उत्तर आलं आहे व त्या बाबतीत काहीही रेकॉर्ड नसल्यामुळे तुम्हाला घेता येत नाही.

शेवटी त्यांनी माझी नेमणूक रद्द करून आपल्या वशिल्याच्या मद्रासी माणसाला माझ्या जागेवर नेमले व मला दगा दिला. मी नंतर डेप्युटी गव्हर्नरला भेटलो पण त्यांनी शाब्दिक सहानुभूती दाखवून, "तुमचे वय कन्डोन केल्याचं काहीही रेकॉर्ड नसल्यामुळे मी तरी तुमची बाजू कशी मांडणार?"

असं उत्तर देऊन मला वाटेला लावलं व मला नोकरी सोडावी लागली. यातून मी एकच शिकलो. "मनुष्य चिंतितो एक तर ईश्वर चिंतितो भलतेच."

# (२९) मोठ्या पेच प्रसंगातून वाचलो.

तसं पाहिलं तर नोकऱ्या मिळण्याच्या दृष्टीनं मी जरा थोडा भाग्यवानच समजायचा. एक नोकरी गेली तरी दुसरी तयारच असायची. इतकंच काय तर चालू असलेली नोकरी काही कारणपरत्वे सोडण्याचा विचार मनात येतो न येतो तोच दुसऱ्या नोकरीची ऑर्डर (हुकूम) तयार असायची. त्यामुळे बिन नोकरीचा अथवा पैसे न कमावणारा असा बहुधा योग येत नसे. आलाच तर फार अल्पकाळचा. या दृष्टीनं मी भाग्यवान म्हणतो. तसा एकंदर जीवनाचा विचार केल्यानंतर अथवा मूल्यमापन केल्यानंतर शेकडा १० टक्के यश मिळाले असावे किंवा त्याहीपेक्षा कमीच. सांगायची गोष्ट अशी की रिझर्व्ह बँकेतली नोकरी सोडावी लागल्यानंतर एक शुगर व सिमेंट फॅक्टरीच्या डायरेक्टरच्या हाताखाली त्याचा पर्सनल असिस्टंट (वैयक्तिक मदतनीस) म्हणून नोकरी करण्याची संधी चालून आली ती अर्थात माझ्या मोठ्या भावाच्या (वसंताच्या) ओळखीच्या मित्राकडून. माझी शैक्षणिक गुणवत्ता ही याला कारणीभूत होती. श्री. प्रसाद या नावाच्या माझ्या भावाच्या मित्राला मला रिझर्व्ह बँकेमधील नोकरी सोडावी लागली हे कळल्यानंतर त्याने माझ्या भावाकडून माझे एज्युकेशनल क्वॉलिफिकेशन आधीच माहित झाले होते व त्याला (श्री. प्रसादला) त्याच्या दुसऱ्या एका मित्राकडून त्याचेही नाव प्रसाद होते व की जो प्रसाद नामे गृहस्थ डायरेक्टर ऑफ जयवाडी शुगर मिल्स, रंगून व सिमेंट फॅक्टरी, अराह

(बिहार) याचा नातेवाईकच होता. त्या डायरेक्टरचे नाव सी. पी. सिन्हा असे होते. त्यांना एम. ए. पदवीधर पर्सनल असिस्टंट म्हणून हवा होता. हे माझ्या भावाला श्री. प्रसादकडून (आणि या प्रसादला डायरेक्टरचा नातेवाईक प्रसाद यांच्याकडून) कळल्यामुळे त्यानं माझ्या भावाला तशी विचारणा केली होती. इतकेच काय पण त्याकरिता तो माझ्या भावाकडे भेटण्याकरिता आला होता. या वेळेस माझी रिझर्व्ह बँकेतली नोकरी नुकतीच सुटली होती. तेव्हा मी अर्थातच नोकरीच्या शोधात असताना ही संधी चालू आली होती. त्याप्रमाणे श्री. प्रसाद ने जयवाडी शुगर मिल्स, रंगून व सिमेंट फॅक्टरी, आऱ्हा यांच्या डायरेक्टरचा पर्सनल असिस्टंट म्हणून मी काम करण्यास तयार आहे का म्हणून मला विचारल्याबरोबर मी एकदम “हो" म्हटलं व पगार विचारला तर त्यानं मंथली १५०/- रू. पगार सांगितला. मला काय हे पाहिजेच होतं. कारण रिझर्व्ह बँक मधल्या नोकरीत मला दरमहा रु.७०/- मिळायचे. येथे मला दुसरी पेक्षा जास्त पगाराची ऑफर केली. फक्त फरक एवढाच होता की मी व्यक्तिगत मदतनीस म्हणून असल्यामुळे जरी तशी कामाची वेळ सकाळी बारा वाजेपासून ते सायंकाळी सात वाजेपर्यंतची ठरलेली होती, तरी वेळ प्रसंगी मला केव्हाही जाणे भाग होतं व कितीही वेळ थांबणे भाग होत व वेळ पडल्यास ऑफिस कामाव्यतिरिक्त बाहेर फिरतीचे काम करावं लागणार होते. या सर्वाला माझी तयारी होती. याशिवाय मला नवीन अनुभव मिळेल हाही पण त्यातला एक दुसरा फायदा होता. मी तयार झाल्याबरोबर श्री. सी.

पी. सिन्हा डायरेक्टर ऑफ जयवाडी शुगर मिल्स व सिमेंट फॅक्टरी, अराह, यांनी मला मुलाखतीस बोलावले. मुलाखत इंग्रजीतून झाली व मला त्यात पसंत पडल्यामुळे लगेचच अपॉइंटमेंट ऑर्डर दिली. पगार रु. १५०/ - व दुसऱ्या दिवसापासून मी कामावर रूजू झालो. माझे नित्याचं काम ऑफिस फाईल्सचा अभ्यास करून काय हवं, काय नको हे पहाणं, पत्रलेखन ड्राफ्ट करणं, उत्तर देणं, टपाल पाहणं व आलेल्या टपालातील तातडीचं काय व बिन तातडीचं काय हे पाहणं, याची वर्गवारी करणं, तातडीच्या पत्राची प्रत्यक्ष डायरेक्टरकडून निर्णय घेणं, उत्तर घेणं, तसेच वेळोवेळी कधी - कधी डायरेक्टर असताना व डायरेक्टर बाहेरगावी गेले असताना नेहमीच त्यांचे फोन घेणं इत्यादी काम असे. तसा मी तयार होत होतो. अर्थात डायरेक्टरचं ऑफिस बाहेरच्या कामाला मला त्यांची कार (ॲम्बॅसिडर) माझ्या हाताशीच होती. कारण त्याच्या जवळ एकूण तीन कार होत्या; पण कामही कधी - कधी खूप पडत असे त्याच्या गैरहजेरीत त्याचे फोन घेऊन बाहेरचे काम करणे व ऑफिसचे काम करणं यामुळे कधी - कधी घरी यायला रात्रीचे साडेआठ वाजायचे.

एकदा तर खूप मजाच झाली. हा जास्त कामाचा मुद्दा आला म्हणून लक्षात आले. मुंबईस दंगा सुरू झाला. अर्थात हिंदू - मुसलमानाचा. नक्की दिवस मला आता आठवत नाही. पण दंगा जोरात सुरू होता. म्हणून कर्फ्यू (संचार बंदी) लागली होती. रात्री साडेसात आठच्या पुढे मुंबईच्या रस्त्यावर शुकशुकाट मिलिटरी ठिकठिकाणी उभी

होती. माझं डायरेक्टरचं ऑफिस पेडर रोडवरील गुलशन बंगल्यात होतं. त्यावेळेस डायरेक्टर सी. पी. सिन्हा काही मुंबईत नव्हते. ते बाहेर गावी गेले होते त्यामुळे मी कामामध्ये व फोन घेण्यात गर्क होतो. कर्फ्यू लागला आहे हे विसरूनच गेलो होतो व काम जास्त असल्यामुळे मी ऑफिसमध्ये रात्री आठ वाजेपर्यंत काम करीत बसलो होतो.


अर्थात माझा मोठा भाऊ व घरची मंडळी बायको व माझ्या वहिनी मी अजून कसा आलो नाही म्हणून माझी चिंतातुर होऊन सारखी माझ्या येण्याची प्रतीक्षा करीत होते. माझा भाऊ (वसंत) तर फार काळजीत होता. नुकतेच लग्न झालेली माझी नवपरिणीत वधू चिंतेने वाट पाहात होती. तेव्हा वाट पाहून - पाहून माझा भाऊ थकला व तो मला पहावयास निघाला व मला फोन करावा (एखाद्या इराण्याच्या हॉटेलमधून) म्हणून बाहेर पडला.

इकडे ऑफिसमध्ये मला एकदम लक्षात आले, "अरे आज तर कर्फ्यू आहे. आपण आधीच संध्याकाळी साडेपाचला निघायला पाहिजे होते. लक्षात कसे आले नाही बुवा? काय हे विस्मरण, आता घरचे काय म्हणतील? व भाऊ किती रागवेल. शिवाय कर्फ्यू असल्यामुळे बसेस पेडर रोडवर तर बंद झाल्या असतील."

मी फार घाबरलो व लगेच तसाच निघालो. माझ्या सुदैवाने म्हणा, एक शेवटची बस (रात्री आठची) मिळाली. ती गच्च भरली होती. पण त्यात जागा मिळाली व मी रात्री साडे आठच्या सुमारास हरी निवास (लेडी जमशेटजी रोड, दादर) या बसच्या स्टॉप उतरलो. तो समोरच वसंत माझ्या

समोर संतप्त चेहऱ्याने उभा. त्यानं माझी खूप हजेरी घेतली. अर्थात सर्व लहान भावाबद्दलच्या मायेतून व काळजीतूनच होतं. मी ते सर्व शांतपणे ऐकून घेतले (मान खाली घालून) कारण चूक माझी होती त्यामुळे रागवणे बरोबरच व न्याय्य होते. घरी मोठ्या वहिनीही बोलल्या. अर्थात माझी पत्नी नुकतेच लग्न झाल्यामुळे घरात नवीन होती पण तिच्या चेहऱ्यावर 'हे असे काय विचित्रासारखे?' म्हणून थोडासा हा आविष्कार दाखवणारा भाव मात्र होता.

कामात माणूस गर्क झाला, कामात स्वत:ला विसरत गेला म्हणजे त्याला कधी - कधी महत्त्वाच्या गोष्टींचेही कसे विस्मरण होते या सिद्धांताला बोलके करणारी ही माझ्या जीवनातील एक अविस्मरणीय घटना. जीवनातल्या एका मोठ्या संकटग्रस्त पेच प्रसंगातून वाचलो हे मात्र खरे.



# (३०) सौ. ताईचं निर्वाण

काही दिवस रजा काढून आकोल्यात जावे असे मनात आले. १९४७ सालच्या पहिल्या महिन्यातली (जानेवारी मधली) गोष्ट. आकोल्यास माझे आई - वडील होते. आम्ही आईला 'ताई' व वडिलांना 'भाऊ' म्हणत असून हे एकदा मागे आलेच आहे. त्यांना भेटून यावे. शिवाय माझी पत्नीही आकोल्यासच होती. येताना तिलाही घेऊन यावे. म्हणून मी आमच्या डायरेक्टरला सात - आठ दिवसांची रजा मागितली होती; ती मंजूर करण्यात आली. मी आकोल्यास आल्यावर माझे आई - वडील व सर्वात मोठा भाऊ घरीच होते. पत्नी पण होती. पण माझ्या सर्वांत मोठ्या भावाची (राजाची) बायको माझ्या सर्वात मोठ्या वहिनी नव्हत्या. ताईचे (आईचे) त्यांचे काही कौटुंबिक कारणावरून भांडण झाले होते व मोठ्या वहिनी माहेरी निघून गेल्या होत्या. माझी धाकटी बहीण (कु. कलावती), आम्ही तिला 'बबी' म्हणत असू ही पण होती. ती मॅट्रिकच्या वर्गात होती. तीन - चार दिवस राहिल्यानंतर आकोल्यास पत्नीबरोबर निघायचे ठरले. अर्थात आमच्या निघण्याच्या दिवशी सौ. ताईने आमच्याकरिता पक्वान्न म्हणून घरी विरजून ठेवलेल्या दह्याचे श्रीखंड करण्याच्या तयारीस लागली. पण काय झाले कोणास ठाऊक.

मनुष्य चिंतितो एक व ईश्वर चिंतितो भलतेच. ताई श्रीखंड करता करताच एकदम तिला भोवळ आल्यासारखे होऊन तिचं डोकं माझ्या मांडीवरच पडलं. तिला फिट आली

असेल म्हणून ती पडली असावी. पण तिचे दात व ओठ ती आवळू लागली. मनात अशुभाची पाल चुकचुकली. पण तसं काही होणार नाही, तिला पित्ताचा विकार असून तो खूप बळावला म्हणेन तिला फिट (भोवळ) आली असावी. कदाचित तिची शुद्ध हरपली असावी असाव पण बराच वेळ झाला तरी ती शुद्धीवर येण्याचं चिन्ह दिसेना. तिनं डोकं पक्कं आवळून घेतलं होतं. काय करावं सुचेना. माझं मन सुन्न झालं. अर्थात नुकत्याच भांडणामुळे मोठ्या वहिनी (राजभाऊंच्या मोठ्या भावाच्या पत्नी) भांडून माहेरी निघून गेल्या होत्या, त्याचा विपरीत परिणाम ताईवर झाला असावा म्हणून ही गंभीर अवस्था आली असं वाटू लागलं. पण मग तिच्या तोंडातून फेस बाहेर येऊ झाला. तिचं माझ्या मांडीवरच डोकं होतं. पण मग तिचं अंग थंड पडू लागलं. एव्हाना संध्याकाळचे सहा वाजले होते. वरील सर्व प्रकार दुपारी एक पासून सुरू झाला. जेव्हा पाच - सहा तास जाऊनसुद्धा ती शुद्धीवर येईना तेव्हा डॉ. जोगळेकर (आकोल्याचे नामांकित तज्ज्ञ डॉक्टर) यांना एमर्जन्सी म्हणून बोलावणं पाठवलं. आम्ही सारेच घाबरून गेलो होतो व आमची पाचावर धारण बसली होती. म्हणतात ना, ‘दैव जाणले कुणी’ तशीच नशीबात काय आहे हे समजत नाही. डॉक्टर आल्यावर ते सांगतील व त्यात घाबरण्यासारखं काही नाही. हा साधारण सर्वसाधारण डॉक्टरांचा वाक्यप्रयोग सांगतील, हा आशेचा पडसाद मनात उठत होता. इतक्यात डॉ. जोगळेकर आले. म्हटलं प्रकाश बहुतेक येईल. आशा मोठी वाईट असते जितकी ती फुलवल्यावर

मन उल्हासित होतं तितकंच ती भंगल्यावर मन खचतं. एकंदर वातावरण काळयाकुट्ट मेघांनी झाकळलं जातं व जीवनातला जिवंतपणा नाहीसा होऊन चैतन्य नाहीसं होतं व एकंदर शरीर गळून गेल्यासारखं वाटतं.

डॉ. जोगळेकरांनी जे सांगितलं ते इतक भयंकर व दारूण होतं की, वर वर्णिलेल्या प्रमाणं एकंदर आमची परिस्थिती होऊन गेली. कोणतं पुढं ताट वाढून ठेवलं आहे कोणास ठाऊक?

डॉ. जोगळेकरांनी तपासून सांगितलं, "सर्व संपलं."

मी म्हणालो, "संपलं म्हणजे काय?"

त्यांच उत्तर "शि इज नॉट अलाईव्ह."

“ते कसं" मी.

डॉक्टराचं उत्तर "आपल्या माता डोक्यातील रक्तप्रवाहामुळं (Cerebral Hemorrhage) त्यांना मृत्यू आला आहे. त्यांना बऱ्याच दिवसापासून ‘ब्लडप्रेशर’ चा विकार असला पाहिजे. त्यांचे ब्लडप्रेशर पाहाण्यात येत होतं का? त्यांचे ब्लडप्रेशर पूर्वीपासून पाहाण्यात आलं असतं तर त्यांना ब्लडप्रेशर आहे हे लक्षात आल्यावर त्यावर कंट्रोल मिळवण्याकरिता गोळया दिल्या गेल्या असत्या. ज्या - ज्या वेळेला त्यांचे भयंकर डोकं दुखत होतं व त्यांना डोक्याला फिरल्यासारखी चक्कर येत होती त्यावेळेस त्यांना ब्लडप्रेशर वाढत असलं पाहिजे. पण ते न पाहिलं गेल्यामुळे याबाबतीत त्यांची तपासणी करण्यात न आल्यामुळे ते शेवटी - शेवटी इतकं वाढलं गेलं की, शेवटी त्याचा परिणाम डोक्यात रक्तस्त्राव निर्माण होण्यात झाला."

म्हणजे आता आपली आई आपल्याला कायमचीच मुकली. माझ्यासमोर एकदम स्व. कवी यशवंत यांची 'आई' कविताच स्मृति फलकावर उतरली.

'आई (ताई) तुझ्याच ठायी सामर्थ्य नंदिनीचे गांभीर्य सागराचे, सतेज चंद्रिकेचे.' पण आम्ही आईविना भिकारी झालो होतो. गृहातील सत्वशील वंशात चंद्रिकेचं तेज नाहीसं झालं होतं. गांभीर्य उरलं होतं पण ते सागराचं नव्हतं, मृत्यूच्या कल्पनेने निर्माण केलेलं गांभीर्य होतं. आमची प्रिय ताईच्या कुडीतील तेजस्वी आत्मा विश्वात भरून राहिलेल्या आत्मतेजात विलीन झाला होता. अश्रूंचा पूर लोटला होता. दु:ख, दुःखाची व शोकाची कृष्णछाया सर्वत्र घरात पसरली होती. आमच्या भाऊंच्या (माझ्या वडिलांकडे) पाहिल्यावर त्यांच्या नेत्रातून अश्रूंचे थेंब खाली टप - टप पडत होते. पण त्यांनी स्वत:चं दुःख मात्र संयमाने काबूत ठेवलं होतं. त्यांना माहित होतं की त्यांनी धीर सोडला तर सर्व घरातील मंडळी (मी, माझी पत्नी, आमचा मोठा भाऊ राजा व बहीण कु. कलावती) हे सर्वजण शोकाने खचून गेले असते. या वेळेस कोणी - कोणीतरी शोकमय व दुःखमय परिस्थितीवर नियंत्रण मिळवणं आवश्यक होतं.

माझ्या मनात सतत हा विचार पिंगा घालत होता की, आम्ही भाऊ एवढे शिकलेले पण आमच्या हे कसे लक्षात आलं नाही की, आमच्या ताईचं ब्लडप्रेशर वेळोवेळी आम्ही का पाहिलं नाही? चाचणी का करून घेतली नाही? माझा मोठा भाऊ वसंत व त्याची पत्नी त्यांना तारेने कळल्याबरोबर त्याच दिवसाच्या रात्रीच्या कलकत्ता मेलने

ते आकोल्यास सकाळी चार वाजता येऊन पोहोचले. त्यांच्याबरोबर मुंबईतील प्रसिद्ध सॉलिसिटर श्री. के. बी. जोशी यांची बायको म्हणजे माझी मावशी सौ. शांतामावशी व माझा माझ्या मामी आल्या होत्या. ते आल्यावर आम्हा सर्वांना रडू कोसळलं. अर्थात माझ्या आईचं आयुष्यच संपलं होतं म्हणून ती गेली हे नेहमीचं तत्त्वज्ञान सांगणारे पण होते. ताईचं आयुष्यच अल्प म्हणजे कमी वयातच गेली.

अर्थात ती. भाऊंच्याकडे पाहिल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेली दु:खाची छाया व त्यांचा केविलवाणा चेहेरा पाहून आमच्या हृदयाचे बांध फुटतात काय असं आम्हाला वाटू लागले. जीवनाला साथ देणारी जीवनाची पतीच्या जीवनात अविभक्तपणे मिसळून गेलेली आमच्या भाऊंच्या जीवनाची सोबतीण त्यांना सोडून गेली. सीतेवीना राम पूर्ण विरहात बुडून गेला. चंद्राला रोहिणी सोडून कशी केली? सूर्य प्रभेविना; सूर्य निस्तेज दिसू लागला, आभाळ फाटल्यासारखे, धरणी दुभंगल्यासारखी आमच्या भाऊंना वाटत असेल. या साऱ्या कल्पनांनी माझ्या हृदयात कल्लोळ माजवला. या सर्व दु:खात समाधानाची एकच जागा होती व ती म्हणजे आमच्या ताईला सौभाग्यपूर्ण निधन आलं. असे म्हणतात, "मनुष्याच्या निधनात त्याचं यश साठलेलं असतं."

या दृष्टीनं आमच्या ताईने जीवनात खरं यश संपादून शेवटी ती निघून गेली. असो.

सकाळी दुःख व शोक प्रदर्शन झाल्यानंतर आम्ही भिजल्या डोळयांनी तिला भडाग्नी देऊन परत आलो. आमची ताई अनंतात विलीन झाली. एकंदर सर्व निरवानिरव झाल्यानंतर नुसतं शोकात कालापव्यय करून चालणारं नव्हतं. जो मृत्यू, तो अंतिम चांगल्या करताच येतो. 'मरणात खरोखर जग जगते' अनंत मरणे आधी मरावी मग अमरपण येते. कवी ताब्यांच्या ओळीप्रमाणे आमची ताई अमर झाली. दिव्यत्वात विलीन झाली.

ब्रम्हविद्येतलाच सिद्धांत सांगायचा म्हटले, चांगली कर्मे करणाऱ्या थोरांचे मरण हे त्यांना पुढच्या जन्मात अर्थात पुनर्जन्मात अधिक उत्तम दर्जाचं जीवन देते. ज्यामुळे महात्मता वाढते तीच गती आमच्या ताईची झाली असणार. शिवाय तिचा मृत्यू हा निसर्गा नियमाप्रमाणेच झाला. जन्म हा जितका नैसर्गिक तितकं मरण हेही नैसर्गिक म्हणून कायमचं दुःख करीत बसून आपली दैवाधीन कर्म न करणं म्हणजे आपल्या पाप कर्मात भर घालणे होय.

आमची ताई जर मेंदूतील रक्त प्रवाहामुळे मरण न येता जगली असती तर तिच्यात विकृती आली असती असं डॉक्टरांचे म्हणणे होते. या दृष्टीनं पाहता तिला चांगलं मरण आले हे काय कमी चांगलं झालं?

# (३१) मी शिक्षक झालो. (जीवनातील स्थित्यंतर)

१९४८ जूनपासून (बुलढाणा) आमच्या ताईचं निर्वाण झाल्यानंतर जमलेल्या मंडळींची पांगापांग होऊ लागली. बाहेर गावाहून आलेली मंडळी आपआपल्या गावाला जाऊ लागली.

सौ. शांतामावशी, सौ. मामी, वसंत व त्याची पत्नी हे आधी निघून गेले व मग मी पत्नीसह जावयास निघालो. अर्थात या वेळेस मी मुंबईलाच पेडर रोडवरील गुलशनच्या बंगल्यात जयवाडी शुगर मिल्स, रंगून यांच्या मॅनेजिंग डायरेक्टरच्या डॉ. सी. पी. सिन्हांच्या हाताखाली नोकरीला मी त्यांचा पर्सनल असिस्टंट म्हणून काम करीत होतो. तेव्हा मुंबईला आल्यावर पुन्हा आपल्या नोकरीवर रुजू झालो होतो.

पुढे पंधरा दिवसानंतरची गोष्ट. मागं मी उल्लेख केलेलाच आहे की डॉ. सी. पी सिन्हा व कंपनीतील मंडळींचा रंगूनला जाण्याचा व मार्गात पुणे या ठिकाणी कमीत कमी एक महिना कंपनीचा मुक्काम करण्याचा बेत आखण्यात येऊ लागला होता व त्यांच्या कंपनीबरोबर मलाही मी रंगूनला येणार का? म्हणून विचारणा करण्यात आली होती. आता ज्या वेळेस मी माझ्या मातेच्या निर्वाणानंतर रजा संपल्यावर कामावर रूजू झालो होतो, त्यावेळेस त्याचा वरील प्लॅन (बेत) निश्चित झाला होता.

ति. ताई हयात असताना मी तिला व माझ्या वडिलांनाही विचारले होते, "आमच्या साहेबांचे (सी. पी.

सिन्हा यांचे) ऑफिस रंगूनला हलणार आहे. ते मला चला म्हणतात तर मी जावं का?"

तेव्हा आमच्या परमपूज्य स्व. ति. ताईनं सांगितलं होतं की, "मुळीच नोकरी करता इतक लांब म्हणजे ब्रम्हदेशात जाऊ नकोस."

वडिलांचेही हेच मत होतं. अर्थात कंपनीत व माझ्या साहेबांनी परत विचारणा केल्यावर मी त्यांना उत्तर दिलं. "मी फारतर पुण्यास एक महिन्याकरिता येतो पण रंगूनला मी मात्र येणार नाही. आईवडिलांची संमती नाही."

तेव्हा सी. पी. सिन्हांचं उत्तर आलं, "रंगूनला येणार नसल्यास पुण्यास मुळीच येऊ नका, कारण पुण्यालाच आमचा रंगूनहून आणलेला आमचा एक पर्सनल असिस्टंट वैयक्तिक सहाय्यकर्ता पुण्यास आहे; त्याला आम्ही विचारणा केली आहे व त्याप्रमाणे तो यावयास तयार आहे."

अर्थात हे त्यांचे उत्तर ऐकून माझा त्यांच्याबरोबर जाण्याचा विषयच संपला. मी म्हटलं, "बरं झालं, औषधावाचून खोकला गेला."

आणि त्याप्रमाणे तीन - चार दिवसातच म्हणजे मार्च १९४७ च्या दोन या तारखेला डायरेक्टरांनी मला एक महिन्याचा रु.१५०/ - पगार व नोटीस न देता नोकरी सोडावी लागते म्हणून पुढील महिन्याचा रु.१५०/ - अँडव्हान्स पगार असे एकंदर रु.३००/ - दिले; व सी. पी. सिन्हांच्या नोकरीला मी कायमचा 'रामराम' ठोकला.

घरी (दादरला) परत आल्यावर पुन्हा नोकरीचा प्रश्न पुढे 'दत्त' म्हणून उभा राहिला. आता माझी जबाबदारी

वाढली होती. माझं लग्न नुकतंच झालं होतं. आता परत नोकरीच्या शोधार्थ राहणं भाग होतं. तसे म्हणाल तर मी मुंबईला व मुंबईच्या जीवनाला कंटाळलो होतो. मला कॉस्टीपेशन विकार होता व मुंबईच्या हवेमध्ये तो जास्त प्रमाणात वाढत होता. इतक्यात ज्याला जीवनात 'योगायोग' म्हणतात तो फार अवचितपणे आला.

माझ्या वडिलांचे ति. भाऊंचे मला पत्र आले. त्यात त्यांनी लिहिले होते की, "येथे (म्हणजे आकोल्याला) माझी सुपरिन्टेंट ऑफ एज्युकेशन श्री. मोडक यांच्याशी माझे घनिष्ठ संबंध असून मी दोन - तीन दिवसांनी त्यांच्याकडे जात असतो. त्यांना मी माझ्या एकंदर कुटुंबाची, घरातल्या माणसांची माहिती बोलता - बोलता दिली आहे.

"मला तीन मुले व एक मुलगी असून मोठी दोन मुले नोकरीला आहेत. सर्वात धाकटा मुलगा (चि. वामन) हाही तेथे नोकरी करीत आहे. पण त्याच्या बऱ्याच नोकऱ्या होऊन तो एकाही ठिकाणी अजून कन्फर्म परमनन्ट कायम झाला नाही. तो बी. ए. ऑ. असून एम. ए. पण झाला आहे."

हे त्यांनी श्री. मोडक यांना सांगितल्याबरोबर त्यांनी एकदम विचारले की, "पण त्यांचे बी. ए. ला संस्कृत विषय होता का?"

त्यावर ति. भाऊंचे उत्तर, "त्याच थर्ड ईअर बी. ए. ला संस्कृत तर होतच पण त्याचा संस्कृत हा विषय फार आवडता होता व संस्कृत पाठांतरपण खूप आहे."

तेव्हा श्री. मोडक म्हणले, "आपल्या इकडे संस्कृत विषय शिकवण्याला शिक्षक मिळत नाहीत. परवा (तीन -

चार दिवसांपूर्वी) इंटरव्हयू झाला पण संस्कृत विषय शिकवायला एकही कॅन्डीडेट तयार नाही. तुमच्या मुलाला तसे विचारा की तो अकरावीला इंग्लीश व मराठी मिडीयममध्ये संस्कृत हा विषय शिकवू शकतील का? त्यांना ताबडतोब पत्र घालून विचारा. जरी इंटरव्हयू झाला असला तरी मी माझ्या अधिकारात त्यांना संस्कृत शिकवण्यास ते तयार असल्यास एकदम अपॉइंटमेंट ऑर्डर देईन."

ति. भाऊंना हे ऐकल्यावर कमालीचा आनंद झाला. त्यांनी मला एक्सप्रेस डिलिव्हरीचं पत्र लिहून ही सर्व माहिती इत्थंभूत कळवून; "तू संस्कृत शिकवण्यास (दहावी - अकरावीला) तयार असल्यास सुपरिंडेंट ऑफ एज्युकेशन, श्री. मोडक तुला एकदम नोकरीवर घ्यावयास तयार आहेत. शिवाय जी नोकरी आहे ती सरकारी नोकरी गव्हर्मेन्ट जॉब आहे.

मी एकदम उत्तर पाठवून; "माझी पूर्ण तयारी आहे व इतकेच नसून माझ्या त्याबद्दल आत्मविश्वास आहे."

असे उलट टपाली उत्तर दिले. श्री. मोडकांना ही या अर्थाची तार केली. त्यांनी एकदम मला बोलावून घेण्यास वडिलांना सांगितले व मी दोन - तीन दिवसातच आकोल्यास आलो. आकोल्यास आल्याबरोबर श्री. मोडकांना भेटलो तर श्री. मोडकांनी मला एकदम अपॉइंटमेंट ऑर्डरच दिली व बुलढाण्यास गव्हर्मेन्ट हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून रूजू होण्यास सांगितले. त्या ऑर्डरमध्ये मला त्यांनी (७० - ५ - १५०) ही ग्रेड जरी दिली होती तर संस्कृत शिक्षक दुर्लभ असल्यामुळे संस्कृतच्या

शिक्षकांची असल्यामुळे मला स्टार्ट रू. ७० च्या ऐवजी रु.९०/ - दिला होता. हुकूम मिळाल्याबरोबर मी एकदम जुलैच्या एक तारखेस गव्हर्मेन्ट हायस्कूल, बुलढाणा या हायस्कूलमधील मुख्याध्यापकांना भेटलो व त्यांनी मला कामावर रूजू करून घेतले.

मी बुलढाण्याला आल्यावर माझे एक समव्यवसायी श्री. जोशी माझी वाट पाहतच होते. त्यांनीच माझे स्वागत केले व ते ज्या खोलीत राहत होते त्याच खोलीत मला राहण्याची व निवासाची व्यवस्था केली. ते पण एक वर्ग संस्कृतचा शिकवत होते व दुसरा वर्ग मी शिकवत होतो.

अर्थात ते काही दिवसच शिकविणार होते, कारण ते शिक्षकाची नोकरी सोडण्याच्या विचारात होते व त्यांनी नायब तहसीलदार (एन. टी.) च्या जागेकरता अर्ज केला होता. त्यांचा इंटरव्हयू झाला होता व ते थोड्याच दिवसात नोकरी सोडणार होते.

अर्थात मी त्यांच्या खोलीत राहत होतो, त्याच खोलीत एक डेप्युटी इन्स्पेक्टर श्री. अडावतकर राहत होते. असे आम्ही तिघे त्या खोलीत राहत असू.

श्री. जोशी हा माणूस मोठा चपळ, हुशार, चलता - बुरजा, लोकांना व विद्यार्थ्यांना आपल्याकडे खेचून घेण्याच्या वृत्तीचा व विनोदी स्वभावाचा होता. त्यामुळे आमचा वेळ फार चांगला जाई. मी बुलढाण्यास मात्र एकटाच आलो होतो व मंडळींना (माझ्या पत्नीला) आकोल्यासच ठेवले होते. बुलढाण्यास सर्व जम बसल्यावर पत्नीला घेऊन घर करण्याच्या विचारात. अशारितीने

माझ्या जीवनाला बुलढाण्यास शिक्षकाची नोकरी करीत असल्यामुळे एक नवीनच वळण लागले होते.

**मनात विचार मानवी जीवनाचा रस्ता हासुद्धा साधा आणि सीधा सरळ रेषेत नाही. त्यात बरीचशी प्रसंगानुरूप व परिस्थितीनुरूप वळणं - आडवळणं असतात. ती माणूस टाळू शकत नाही. कारण त्यामुळेच माणसाच्या जीवनाला आकार येतो.**

**माणूस म्हणू लागला की मी आता अशा आडवळणी जीवन प्रवासाला कंटाळलो तर तो तेथेच संपला. ही वळणं - आडवळणं अप्रत्यक्षपणे परमेश्वरच आणत असतो व अशा रितीनं जीवनाला आकार देण्याच त्याचे कार्य चालू असतं.**

गणपतीची मूर्ती बनविण्याऱ्या शिल्पकाराला व कलाकाराला गणपतीची मूर्ती बनवताना आपली मूर्ती योग्य, सुंदर व अप्रतिम कशी होईल याचा विचार करत त्याला बऱ्याच वेळेला द्राविडी प्राणायाम करावा लागतो. हाताचा, सोंडेचा, पोटाचा आकार करताना त्याला निरनिराळया क्लृप्त्या योजाव्या लागतात व त्या कार्यवाहीत आणल्यावर सुंदर, देखणी मूर्ती तयार होते. हाच नियम जीवनाची मूर्ती बनविण्यात आहे. यात आपण कोणीच नसतो. फक्त योगायोग व परिस्थिती यांच्या मागणी प्रमाणे जीवन घडत जाते.

फक्त माणसाने साथ द्यावयाची असते. आपलं जीवन घडविणाऱ्या त्या सर्व शक्तिमान शक्तीला परमेश्वराला आपण सहाय्यभूत होणं व त्यांची इच्छा पूर्ण करणं यालाच 'जीवन' म्हणतात.

# (३२) माझा बुलढाण्याचा जीवनक्रम

मी बुलढाण्यास सरकारी हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून लागणे ही गोष्ट वा घटना अनेक दृष्टींनी उत्तम ठरली. बुलढाण्यास राहू लागल्यानंतर या ठिकाणचं सृष्टीसौदर्य, गावाची रेखीव पद्धतशीर रचना व रमणीयता माझ्या नजरेतून सुटू शकली नाही. बुलढाणा हे जिल्ह्याचे ठिकाण असून मुख्य म्हणजे ते अजिंठा पर्वताच्या पठारावर वसलेले गाव आहे. हे ठिकाण बऱ्याच उंचीवर असल्यामुळे ते थंड हवेचं ठिकाण (हिल स्टेशन) म्हणून, विदर्भात फार महत्त्वाचं गणले जाते. या ठिकाणी इंग्रजी राज्य असताना 'बुल' या नावाचा गव्हर्नर केवळ थंड हवेचं ठिकाण असल्यामुळे येथेच राहत होता. 'बुल' या गव्हर्नराच 'ठाण' (वास्तव्य स्थान) असल्यामुळे 'बुलठाण' असे म्हणत होते.

पुढे या शब्दाचा अपभ्रंश म्हणून 'बुलढाणा' हे नाव पडले. हे जिल्ह्याचं ठिकाण असून खामगाव तालुका याच जिल्ह्यात अंतर्भूत आहे. खरे तर खामगाव हे विस्ताराने व लोकसंख्येने बुलढाण्यापेक्षा मोठं आहे. पण बुलढाणा हे थंड हवेचं ठिकाण असल्यामुळे ते जिल्ह्याच ठिकाण करण्यात आले आहे.

या गावात नोकरी निमित्त वास्तव्य करण्याचा योग म्हणजे माझ्या सुरुवात झालेल्या शिक्षकी जीवनामधील एक अत्यंत आनंददायी, जीवनात नाविन्य निर्माण करणारी व सृष्टी सौंदर्याचं दर्शन घडवणारी एक अविस्मरणीय घटना

म्हणावी लागेल. मागे उल्लेख केल्याप्रमाणे मला त्यावेळचे स्व. एम. एल. ए. यादव माधव काळे यांच्या बंगल्यावरील माडीवरचा ब्लॉक मिळाल्यानंतर मी पत्नीला सहजीवनाकरता बुलढाण्यास घेऊन आलो.

मला मिळालेली जागा थोडीशी बाजूला अगदी मोकळया जागेत असल्यामुळे सुंदर हवा, निर्मळ पाणी व आरोग्याच्या दृष्टी हितकारक अशीच जागा होती. माडीवर लांबोळया आकाराच्या अशा दोन बऱ्यापैकी फार लहान नाही फार मोठ्या नाहीत अशा दोन खोल्या. पुढची खोली जरा मागच्या खोलीपेक्षा किंचित मोठी होती. मागच्या खोलीचं न्हाणीघर व शौचास खालील बंगल्याजवळ स्वतंत्र शौचकूप होतं.

प्रसन्न करणारी अशी दोन खोल्याच्या पुढे बरीच मोठी विशेष म्हणजे सिमेंटची गच्ची होती. त्यामुळे जास्त सोय निर्माण झाली होती. या गच्चीमध्ये रात्रीच्या वेळी पत्ते खेळणे वा इतर खाण्या - जेवण्याचे वा डब्याचे कार्यक्रम करीत असू. कोजागिरी पोर्णिमा या गच्चीवरच साजरी करण्यात आली होती. मित्र - मंडळी व माझ्या दोन विद्यार्थिनी (घर मालकीणीच्या दोन मुली) या कार्यक्रमाला होत्या. गच्ची समोर दिसणाऱ्या पूर्ण चंद्रप्रकाशानं उजळून निघाली होती. एकांतवासात वा निवांत वातावरणाला अनुकूल अशी परिस्थिती या आमच्या राहत्या जागेत निर्माण केली होती. माझं नुकतेच लग्न झाल्यामुळे माझ्या एकांताची व मधुचंद्राची सोय करण्यात प्रत्यक्ष परमेश्वराचच साह्य होतं. असे मला बुलढाण्यात नोकरी

करण्याची संधी मिळाल्यामुळे वाटू लागलं. गावाची रचना टुमदार पद्धतशीर डोळयात भरणारी व दृष्टीसुख देणारी, नीट समांतर स्वच्छ रस्ते, सुंदर मन प्रसन्न करणारी हवा, घरांची व बंगल्यांची पद्धतशीर बांधणी, माफक गर्दी आणि सुंदर असे एक किलोमीटर अंतरावर गव्हर्मेन्ट गार्डन. दुसऱ्या बाजूला १/२ किलोमीटरवर देवीचं प्रसिद्ध देऊळ, त्याच्या पुढे पर्वताचं खोरं व संथ वाहणारी नदी, निरनिराळया रंगीत फुलांची मधून - मधून पखरण व रस्त्यावरून फिरणाऱ्या व सायकलीवरून जाणाऱ्या मुली व सुंदर ललना, हायस्कूलची एक एखाद्या रमणीय इस्पितळाच्या इमारतीसारखी दगडी इमारत, मध्यभागी सुंदरसा मनोरा, मनोऱ्यावरून होणारे गावाचं रम्य दर्शन, स्वच्छ काटकोना कृती रस्ते या सर्वामुळे हा गाव म्हणजे स्वर्ग नगरीचा एक लहानसा भागच आहे असं म्हणण्याने अतिशयोक्ती वाटू नये.

मी माझ्या नवपरिणत वधू सौ. शकुंतला दोघे जसा वेळ मिळेल तसं फिरायला जात असू. त्यामुळे मनाचा दिलखुलासपणा वाटत असे. आम्ही होतो (१९४८ - १९४९ - १९५० - १९५१) त्या काळात फक्त या गावात फक्त एकच उणीव भासत होती म्हणजे गावात इलेक्ट्रीक दिवे नव्हते. विजेचं कनेक्शन आलं नव्हते.

येथील अध्यापकीय जीवनाबद्दल सांगायचं म्हणजे येथील उच्च माध्यमिक सरकारी हायस्कूल एक कॉलेजच वाटायचं. मी संस्कृतचा मुख्य शिक्षक असल्यामुळे माझ्याकडे अकरावीचं संस्कृत दहावीच मराठी व नववीच

इंग्रजी हे विषय शिकवायला होते. मला मूल नसल्यामुळे राजाराणीचाच संसार होता. पाणी जरी जड होते तरी पचत होते. भूक लागत होती, प्रकृती सुधारत होती. विशेषत: १९४७ - ४८ व १९४८ - ४९ व १९४९ - ५० हे वर्ष फार सुखी व मनसोक्त आनंद लुटण्यात गेले. नुकतेच भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. त्याचा उत्साहवर्धक आनंद जसा सगळीकडे पसरला होता तसा तो येथेही पसरत चालला होता. काही दिवसांनी आम्हाला प्रयत्न केल्यानंतर राहत होतो त्या जागेपेक्षा उत्तम मोठी व अगदी मोक्याच्या ठिकाणी भाड्याने जागा मिळाली होती.

आम्ही पूर्वीची जागा सोडून या मोक्याच्या ठिकाणी असणाऱ्या जागेत येऊन राहिलो होतो याचं कारण ही जागा शहराच्या मध्यभागी हायस्कूलच्या जवळ मिळाली. ही जागा गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या मध्यभागी असून ज्या रस्त्याच्या मध्यभागी ही जागा होती त्यांच्या मागे व पुढे दोन समांतर रस्ते होते व पाठीमागच्या रस्त्यावर एक मोठे राम मंदिर होते.

आमच्या जागेच्या समोरच्या रस्त्यावर सारखी रहदारी असे. त्यामुळे एकंदर आसमंतात एक जिवंतपणाचे व चैतन्याचे वातावरण होते. मुख्य विशेष म्हणजे आमची ही जागा प्रशस्त व आम्हा दोघांच्या गरजेपेक्षा पुष्कळच जास्त होती. पुढे एक मोठी खोली, मध्ये लांब मोठा हॉल, हॉलच्या मागे दोन खोल्या, आकारानं पुढच्या खोलीपेक्षा किंचित लहान व स्वयंपाक घराला लागून असलेल्या खोलीपासून खाली गेलेला जिना व त्या जिन्याच्या शेवटी

स्नानगृह व बाजूला स्वच्छतागृह. या जागेत विशेष महत्त्वाची सोय म्हणजे घराच्या पुढच्या खोलीला लागून खूपच मोठी गच्ची. या गच्चीत उभे राहिले असता खालचं व आसमंतातले सर्व दिसत असे. थोडक्यात आम्ही बुलढाणा शहराच्या केन्द्र बिंदूच्या ठिकाणी आलो होतो. राजाराणीचाच संसार असल्यामुळे दिवस कसे किती मजेत भुर्रकन उडून गेले असावे हे विस्ताराने सांगण्याची गरज नाही, हे सुज्ञांनी ओळखावं.

विवाह सौख्याचा योग्य उपभोग घेण्यालायक मिळालेले ठिकाण व त्या ठिकाणी मिळालेली जागा हा एक सुंदर माझ्या जीवनातील योग असावा. शिकवण्याची उपजत आवड असल्यामुळे व त्यातून संस्कृत शिकवण्याची जास्त आवड असल्यामुळे हे शिकवण्याचे काम इतर कामासारखे डोक्यावर ओझे ठेवल्यासारखे न वाटता, मुलांना शिकवण्याच्या त्यांना विद्या देण्याच्या, गोष्टी सांगण्याच्या आनंदांत काहीतरी नवीन चैतन्य व जिवंतपणा वाटत होता. पन्नास विद्यार्थ्यांना शिकवताना त्यांनी त्यातील दहा मुलांना जरी चांगलं समजले तरी थोडे, मला कृतकृत्य वाटत होते.

मी असे विधान करतो याचे कारण जशी ज्या विद्यार्थ्यांची बुद्धी असेल व समजण्याची पात्रता असेल त्या प्रमाणात मी शिकविलेल्या अथवा दिलेल्या ज्ञानाचा त्याला फायदा होता हा विचारच वा वस्तुस्थितीच मुळी त्या शिक्षकाच्या जीवनात पावित्र्य निर्माण करते. म्हणून म्हणतात की, "टिचिंग इज ए नोबल प्रोफेशन".

शाळेमध्ये मला शिकवण्याचे दिवसातून तीन अथवा चार पिरीएड असतं. शेवटचा आठवा गेम्स पिरिएड घ्यावा लागायचा. पाच वाजता शाळा सुटल्यावर व घरी जाऊन थोडेसे खाणं (पोहे, चिवडा इ.) खाऊन चहा घेतल्यावर आम्ही फिरायला जात असू व फिरून आल्यानंतर रात्री साडेआठ - नऊ वाजता जेवण. भूक चांगली लागत असे ती येथील उत्तम हवेमुळे. खाल्ले ते एकदम पचून जायचे.

संस्कृत शिकवावे लागत असल्यामुळे सकाळी आम्ही लवकर उठत असू. सकाळी पाच ते साडेपाच पर्यंत उठून सात वाजेपर्यंत तयारी जे काय शिकवायचे त्याची व नंतर चहा व बिस्किट. भाजीचा मात्र दोनदा बाजार भरत असे तेव्हाच प्रत्येक वेळेला दोन - तीन दिवस पुरेल इतकी भाजी आणत असे. सकाळी साडे दहा वाजता जेवण झाले की सकाळी अकरा वाजता शाळेत कामावर हजर होत असे.

अशा तऱ्हेने पहिले दोन वर्षे १९४७ - १९४८ व १९४८ - १९४९ व १९४९ - १९५० हे तीन वर्षे मजेत गेले. बुलढाण्यात असताना जेव्हा बुलढाण्याहून आकोल्याला वा इतर दुसऱ्या ठिकाणी जायची पाळी यायची तेव्हा सुवर्ण ट्रान्सपोर्ट सर्व्हिसच्या बसमधून जाताना डोंगर उतरावा लागत असे व येताना चढावा लागत असे. असा प्रवास करताना माझ्या जिभेच्या टोकावर नेहमी रेव्हरंड ना. वा. टिळक यांची ‘पर्वतारोहणा’ मधील ‘प्रिये प्रेरणे थांब गडे हा पहा लागला गिरी इकडे पर्वत इकडे गिरी’ ही ओळ यायची.

कारण असाच घाटातून जाणारा हा मोटारीचा मार्ग होता. मोटार जेव्हा डोंगरातील रस्ता चढून पठारावर यायची त्यावेळेस आपण जीवनाची चढण सुखरूप व यशस्वी रीतीने चढलो आहे या समाधानाची छटा मनात उतरायची. कारण हे खरेच आहे की, माझ्या नवीन सुरुवात झालेल्या वैवाहिक चंदेरी जीवनात बुलढाण्याचे हवामान व वातावरण याची पूरक व सहाय्यक जोड मिळाल्यामुळे जीवनात अभावितपणे एक नवीन नाविन्य, चैतन्य व प्रसन्नता आली होती.



# (३३) आनंदाला लागलेले गालबोट

आमच्या सौ. ताईच्या निर्वाणानंतर मी बुलढाण्यात आल्यावर शाळेच्या कामात व कार्यक्रमात स्वतःला फार गुंतून घेत असे. मात्र 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' मनाला असं कायम वाटायचं आणि खरोखरच आईच्या प्रेमाला मुकल्यामुळे माझी एखाद्या भिकाऱ्यासारखी स्थिती झाली आहे असे वाटत असे. अर्थात मनाची ही अस्वस्थता नाहीशी करण्याकरिता जास्तीत जास्त कामात गुंतवून घेणं यासारखा दुसरा पर्याय नाही. अर्थात माझे शिकवण्याचे काम तर धडाक्यात चालूच होतं पण त्या शिवाय मी अनेक विधायक कामामध्ये स्वत:ला जास्त वाहून घेतले. आपल्याला उत्तम वक्ता कसं होता येईल हा विचार जेव्हा मनात आला होता. मला तर वक्तृत्वाचे प्राथमिक धडे या शिक्षकी आयुष्यात मिळतील. आपण त्यातूनही शाळेत होणाऱ्या प्रत्येक उत्सवात उदा. गणपती उत्सव, टिळक पुण्यतिथी, गॅदरिंगच्या वेळेला होणारे निरनिराळे प्रोग्रॅम्स् कार्यक्रम यामध्ये भाग घेतला तर मनातली भिती निघून जाऊन एक तऱ्हेचा निधडेपणा व धाडसी वृत्तीचा अंमल होऊ लागतो असा मला अनुभव येऊ लागला. त्याप्रमाणे १९४८ च्या हायस्कूलच्या गॅदरिंगमध्ये मी स्वत: काही कार्यक्रमात पुढाकार घ्यायचे ठरविले. शिवाय हायस्कूलचं हस्तलिखित मुलांचे व शिक्षकांचे लेख समाविष्ट करून तयार करण्याचे कामही माझ्याकडे होते. मी जे हस्तलिखित काढीत असे त्याचं (ओपनिंग) सुरुवात

सिनेमाप्रमाणे करीत असे. अर्थात अशा तऱ्हेचं मासिक काढण्याकरिता उत्तम मराठी असणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांचे लेख, विनोदी लेख, प्रसंग चित्रे, मुलांना उपयोगी पडणाऱ्या माहितीचे निरनिराळ्या विषयावरील लेख, उत्तम चित्रकार, मुखपृष्ठकार, उत्तम अक्षर असणारे अशा निरनिराळ्या कला अवगत असणाऱ्या विद्यार्थी - विद्यार्थिनींची गरज असे. त्याकरिता मी रचनात्मक कार्यक्रम ठेवला. मासिकात आवडीने व उत्सुकतेने काम करणारे विद्यार्थी - विद्यार्थिनी चित्रकार यांची मीटिंग भरवून निवड करून घेतली व मग निवडून आलेल्या १५ - २० मुलातून संपादक, उपसंपादक, सहसंपादक निवड, प्रमुख चित्रकार व उपप्रमुख चित्रकार निवडले व त्यांना मार्गदर्शनाचे काम स्वत:कडे घेऊन दर १५ दिवसांनी सभा घेऊन कोणाचे कितपत काम झाले याची माहिती करून घेतली. चित्र काढणारे प्रमुख चित्रकार माझ्या घरी येऊन चित्र काढीत असे. नोटीस काढून मासिकात लेख देणाऱ्या मुलांची नावे जाणून घेतली. तसेच गॅदरिंग ठरल्यावर गॅदरिंगमध्ये मुख्य कार्यक्रम 'नाटक' करावयाचे ठरले. तेव्हा नाटक कोण बसवणार याची विचारणा झाल्यावर मी स्वत: आपणहून ही नाटक बसविण्याची तयारी दाखविली. अर्थात तसा मला अनुभव काही नव्हता, पण 'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे' या श्री समर्थ रामदासांच्या वचनाप्रमाणे नाटक बसवण्यास सुरूवात केली. कोणते नाटक बसण्याकरिता निवडले म्हणाल तर 'आग्र्याहून सुटका' हे ते नाटक. हे बनविण्याचा मूळ उद्देश असा होता

की, एकतर हे नाटक अकरावीत मुलांना मराठी विषयाकरिता टेक्स्ट सूक्ष्म वाचनाकरिता होते. अनायासे नाटक बसवताना मुलांना नाटकातल्या प्रत्येक पात्राचा स्वभाव, विनोद, नाटकातील संघर्षस्थान, पात्रांच्या संभाषणातील भाषा, नाटकातील जिज्ञासा, उत्कंठा, विस्मय या गोष्टी नाटक प्रत्यक्ष पाहताना कळतील. कोणत्याही गोष्टीचा (मग ती केलेली असो वा शास्त्रातील असो) प्रयोग केल्यावर ती गोष्ट मुलांच्या मनावर चांगली बिंबते. मला रोज नाटकांच्या तालमी घ्याव्या लागत असत व माझं कामही खूप वाढलं होतं. नाटक चांगलं रंगणार हे रंगीत तालमीस्तव लक्षात आलं. शाळेमधील आनंदमय जीवनात मी नाटकाचा दिग्दर्शक होणार म्हणून ही एक आनंदात भर घालणारी कृती होत होती.

असाच एकदा मुलांची तालीम घेत असताना मला एक तार आली. हा नाटक बसविण्याचा आनंद फार वेळ टिकणारा नव्हता. एखाद्या फळा - फुलांनी बहरलेल्या वृक्षावर वीज पडल्यानंतर जसे ते जळून जावं तशीच ती तार वाचल्यावर माझ्या अंगावर वीज पडली की, काय असे मला वाटू लागलं. माझ्या आनंदाला गालबोट लागणार की, काय असं वाटू लागले आणि तार वाचल्यावर तर हुबेहुब हीच अवस्था झाली. तार फोडून वाचू लागलो, 'भाऊ (फादर) सिरीयस, स्टार्ट इमिजीऐटली.' ही तारेतली अक्षरे पाहिल्यावर नाटक दुसऱ्या सहकाऱ्याच्या अंगावर टाकून, नाटक बसवून पूर्ण करण्याची जबाबदारी सहकाऱ्याच्या अंगावर टाकून मी एकदम आकोल्यास जाण्यास निघालो.

मोटारीने भर वेगानं जात असताना मध्येच रस्त्यातून मांजर आडवी गेल्यामुळे एका वाईट शंकेची मनात पाल चुकचुकली, पण त्याकडे दुर्लक्ष देऊन येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्याचं ठरवलं.

आकोल्यात सकाळी अकरा वाजता येऊन पोहोचलो. तर काय, एकदम धक्का. ति. भाऊचं रात्रीच प्राणोत्क्रमण झालं होतं व मी पोहोचोस्तर त्यांचे निश्चेष्ट शरीर घरात ठेवणं बरोबर नाही म्हणून त्यांना स्मशानात नेले होते. मनात विचार आला, ति. भाऊ अंत्यवस्थ असल्याचं मला पहिल्यांदा कळवलं का नाही. तारेतही ते स्वर्गवासी झाले असा उल्लेख न करता ते 'व्हेरी सिरीयस' हे शब्द वापरले. का तर म्हणे ति. भाऊंच्या मृत्यूबद्दल कळवलं तर मला धक्का बसेल. पण धक्का बसेल म्हणून भिऊन खरी वस्तुस्थिती न कळवल्यामुळे व प्रत्यक्ष ती आकोल्याला येऊन कळल्यावर जास्त दुप्पट धक्का बसला. कदाचित आधीच भाऊ गेले म्हणून कळवलं असतं तर धक्का बसला असता व दु:खातिवेगानं व शोकाने अश्रू ढाळीत आकोल्याला आल्यावर ति. भाऊंचा निष्प्राण देह तरी पाहिला असता. त्या निष्प्राण देहाचं तरी दर्शन झालं असतं. यामुळे धक्याची तीव्रता व शोकाचा भार थोडा तरी हलका होऊन पुढे अधिक धक्का सहन करण्याला मनाची तयारी करता आली असती. कधी - कधी आपल्या नातेवाईक मंडळीचा दुसऱ्याला दुःख कमी व्हावं अथवा त्याच्यावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून आधी गंभीर बातमीची अग्रता व तीव्रता कमी होण्याच्या दृष्टी ती जितकी मवाळ कळविता येईल तितकी

मवाळ करून कळवावयाची मानसशास्त्रदृष्ट्या असं करणं हितावह आहे असं या नातेवाईकांना वाटते. पण कोंबडा झाकला म्हणून उगवायचं थोडंच राहाणार आहे? शेवटी खरं गंभीर व दुःखदायक अशी घटना चक्षूर्वे सत्य पाहिल्यावर मन विदीर्ण करण्याला शोक व दुःख ही एकाच रक्ताच्या नातेवाईकाच्या मृत्यूबद्दल बातमी कळल्यावर व प्रत्यक्ष पाहिल्यावर होणारच असतो. त्यातून प्रत्यक्ष ज्यानं आपली सतत काळजी घेऊन पालन - पोषण करून शिक्षण देऊन आपल्याला प्रतिष्ठितपणाचं अस्तित्व दिलं अशा जन्मदात्या पित्याच्या मृत्यूबद्दल तर शोकावेग व असह्य दुःख आवरणं कठीण होतंच व पुढे हे सहन करून ओसरण्याला अवसर नसल्यामुळे आधी कळतं सिरीयस म्हणून व पुढे प्रत्यक्ष कळलं 'गेले' म्हणून या तफावतीने शॉक व हाय ब्लडप्रेशर होऊन माणूस खलासच व्हायचा. वडिलांचा मृत्यू झाल्यावर अचानक आधी कल्पना नसताना मृत्यु शय्येवर पाहिल्यावर पाहणाऱ्या मुलाचा ही धक्का बसून मृत्यू व्हायचा. म्हणजे एकाचं वेळेला बापाचा मृत्यू झाल्यावर मुलाचा पण व्हायचा. माझ्या बाबतीत ही अवस्था होणं अशक्य नव्हतं. म्हणायचं तात्पर्य एवढंच की मला जर 'भाऊ एक्सायर्ड' अशी तार केली असती तर मी तडकाफडकी आकोल्यास येऊन ति. भाऊंच्या पार्थिव देहाचं दर्शन तरी घेऊ शकलो असतो. पण मी सर्वात लहान ना! शहाणपणा, आकलनाच्या व जबाबदारीच्या दृष्टीनं कमी. ही माझी किंमत असल्यामुळे वा पात्रता असल्यामुळे माझ्या बाबतीतच काय पण माझ्या

सारखी कुटुंबामध्ये (पोझिशन) अवस्था असलेल्या कोणाच्याही बाबतीत हे घडू शकते. असो.

ति. भाऊंना भडाग्नी दिल्यावर मला ज्या काही गोष्टी कळल्या त्यामुळे तर मला रागही आला व दया पण आली व ही केविलवाणी परिस्थिती होण्या घरचेच जबाबदार माणसे असतात; हे कळल्यावर अशा माणसांना जबाबदार तरी कसे म्हणायचे की, ज्यांना त्यांची जबाबदारी कळत नाही. एक स्व. ति. ताईच्या (माझ्या आईच्या) बाबतीत एक मोठी चूक झाली की ती कधीही ब्लड प्रेशर पाहिलं नाही. ते जर निदान १ - १ महिन्याच्या अंतरांनी पाहिलं असतं तर तिचा ब्लडप्रेशरचा (हाय ब्लड प्रेशरचा) विकार येऊन औषध योजना परीक्षा करून तिच्या ब्लड प्रेशरवर ताबा (कंट्रोल) मिळविता आला असता व हाय ब्लड प्रेशरमुळे तिला जो 'सेरिब्रल हेमरेज' चा अटॅक आला तो आला नसता व ती आणखी पुढे काही दिवस जगली असती. एक मुलगा बँकेत ऑफिसर व एक मुलगा मोठा फॉरेस्ट ऑफिस रेव्हयेन्यू अकाउंटंट पण दुदैव की, त्यांच्या हे लक्षात आलं नाही. याची दोन कारण, मुलं मोठी व कमावती झाली की, त्यांचं आपल्या संसारात अधिक लक्ष; त्यातून भांडण या सर्वापाशी आईच्या बाबतीत जी काळजी घ्यावी लागते ती घेण्यात दुर्लक्ष. तशीच ती भाऊंच्या बाबतीत परिस्थिती झाली. तीच पुनरावृत्ती. ति. भाऊंना तरी तीन - चार दिवस ताप येत होता (हडबडून असा) त्यांच्या छातीत दुखत असे. मोठ्या भावाने प्रख्यात डॉ. चौधरींना आणलं पण विशेष

काळजी करण्यासारखे नाही. असे त्यांचे मत. परत - परत घाम येणं व छातीत दुखणं होऊ लागलं.

मुंबईच्या मधल्या भावाला कळवलं होतं म्हणतात, पण तो येण्याच्या आधीच परत ति. भाऊंना ताप येऊन, घामानं डबडबून येऊन ते घाबरून गेले व औषध योजना होण्याच्या आतच त्यांचे प्राणोत्क्रमण झालं. सर्व संपलं. आटोपलं. आता त्यांचं आयुष्य संपलं असावं म्हणून ते गेले या म्हणण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

आमचे आई - वडील गेल्यामुळे आम्ही खऱ्या अर्थाने अनाथ झालो. मृत्यूनंतरच्या साऱ्या क्रिया आटोपल्यानंतर मग मी खिन्न वदनाने व शोकाकुल अवस्थेत बुलढाण्यास परतलो. कारण कामावर रूजू व्हायचं होतं. नोकरी करणाऱ्या माणसाला त्याचा कोणी माणूस मरो वा त्याचा काही कारणामुळे अंत होवो सर्व्हिस करणाऱ्याला आपलं कर्तव्य कर्म सोडता येत नाही.

कारण माणसाचा 'कर्मणये वाधिकारस्ते' फक्त. त्याच प्राप्त कर्म करण्याचा अधिकार आहे. 'मां फलेषु कदाचन' फलाची अपेक्षा न करता मी बसवलेले नाटक बुलढाण्याचे 'रुक्मिणी' थिटरमध्ये फार थाटमाटातच व यशस्वीरितीनं पार पडले व माझ्या दिग्दर्शनाबद्दल माझं अभिनंदन करण्यात आले. पण ह्या अभिनंदनाचा स्वीकार प्रसन्न व प्रफुल्ल चित्ताने मी करू शकत नव्हतो, कारण माझ्या वडिलांच्या आकस्मिक मृत्यूमुळे मला मिळालेला आनंद पचला तर नाहीच पण त्याला फार मोठं गालबोट लागलं.

# (३४) शाळेच्या जीवनातील काही कार्यक्रम

आमचे आई - वडील गेल्यानंतर आम्ही खऱ्या अर्थानं पोरके झालो. मी परत बुलढाण्यास कामावर आल्यानंतर माझे कशातच मन रमत नव्हते. कधी - कधी असं वाटत असे की, मला शिक्षकाची नोकरी मिळाली हे दोन दृष्टींनी बरं झाले. एकतर स्व. ति. भाऊंची अशी इच्छा होती की, मी त्यांच्या जवळ यावं, कारण माझी मुंबईची नोकरी त्यांना तशी मनापासून पटत नव्हती. मी शिक्षक व्हावं ही पण त्यांची इच्छा होती. ती मी पूर्ण करीत असल्यामुळे त्यांच्या आत्म्याला शांती लाभली असावी. दुसरी दृष्टी म्हणजे ताई भाऊंच्या मृत्यूमुळे मला जे अतीव दुःख झाले होतं ते काही वेळ तरी विसरण्याच्या दृष्टीनं शिक्षकाची नोकरी, ही अधिक सहाय्यक व उपयोगी पडते. एकदा मुलांना शिकवावयाला लागलं तर शिकवताना आपल्याजवळ आहे ते सर्व मुलांना द्यायचं. निरनिराळे दाखले व अनुभव सांगून त्यांची मनं तयार करण्यात मन (माझे) तल्लीन होत असे. तुम्ही मुलांना जितकं ज्ञान द्याल तितकं ते चांगलंच. त्यामुळे शिक्षकाचेही व्यक्तिमत्व फुलतं व मुलांच्या ठिकाणी त्यांच्या व्यक्तिमत्वाची जाणीव अथवा निर्मिती त्या ठिकाणी आणण्यास व ती येत असलेली पाहून शिक्षकाला धन्यता वाटते व मुलांना शिकवण्यात स्वत:ची वैयक्तिक दु:खे तो विसरून जातो. खरंतर सर सी. व्ही. राधाकृष्णांनी म्हटल्या प्रमाणे, "अखंड ज्ञानोपासना करणं व ज्ञान दान करणे हेच खऱ्या शिक्षकाचं अध्यापकाचं नैतिक कर्तव्य आहे."

तेव्हा माझा शिक्षकी पेशा दुःख हळुहळू विसरण्याच्या दृष्टीनं मला बराच उपकारक ठरला. अर्थात मी हळुहळु दुःख विसरत होतो व आपल्या आई - वडिलांचा आदर्श समोर ठेवून आपले काम करीत राहणे व ते करता - करता चारित्र्य उदात्त करणे याकडे माझं लक्ष होतं. या काळात मी लक्षात राहण्यासारख्या अशा ज्या तीन - चार घटना माझ्या हातून घडल्या त्याचा येथे उल्लेख करणे अप्रस्तुत होणार नाही.

माझ्या शिकवण्याच्या पद्धतीत मला जर कोणती गोष्ट उपयोगी पडली असेल तर माझं भरभक्कम पाठांतर. तिन्ही भाषेतलं (१) संस्कृत, (२) मराठी आणि (३) इंग्रजी. तुम्ही मुलांना शिकवित असताना जर काही - काही कविता वाक्य वा विधानं (थोरामोठ्यांची, गाणी राष्ट्र प्रेमाची वा भक्तीची) मुलांच्या समोर तोंड पाठ करून म्हणून दाखविली तर त्याचा मुलांच्या मनावर चांगला परिणाम होतो; दुसरं म्हणजे मुलांना तुमच्याबद्दल आदर वाटू लागतो, त्यामुळे ते तुम्हाला आपणहून मदत करावयास तयार होतात.

दुसरी गोष्ट म्हणजे, निरनिराळया ॲक्टीव्हिटीजमध्ये जातीनं तुम्ही भाग घेतला तर मुलांना उत्तेजन मिळतं. पहिली गोष्ट माझ्या हस्तलिखित मासिकामुळे मुलांना त्यांच्यामध्ये सुप्त असलेल्या गुणांचा उपयोग होऊ लागला. तसेच मुलांच्यामध्ये शिक्षकाबद्दल आदर निर्माण करण्याच्या दृष्टीने मुलांना गॅदरिंगसारख्या मोठ्या कार्यक्रमात जे अनेक लहान - लहान कार्यक्रम अंतर्भूत होतात त्यात मुलांना भाग घ्यावयास लावणे व तुम्ही स्वत:

पण भाग घेणे, ज्या वेळेस मी आमच्या शाळेच्या हस्तलिखिताचं नागपूरच्या मॉरिस कॉलेजच्या मराठीच्या प्रोफसराकडून (श्री. बनहट्टी) यांच्याकडून उद्घाटन करवले तेव्हा मुलांना समाधान वाटले कारण हे प्रो. बनहट्टी मी मॉरिस कॉलेज जवळ असताना आम्हाला मराठी शिकवित होते. जेव्हा शाळेच्या गॅदरिंगच्या तीन दिवस चालणाऱ्या उत्सवात जो करमणुकीचा कार्यक्रम असतो त्यात भावगीतांचाही हे एक मनोरंजक कार्यक्रम असतो. त्यावेळेस काही मुलं वा मुली अशा असतात की त्यांना भावगीत चांगली येतात पण अशा कार्यक्रमात मुलांची पण अशी इच्छा असते की, शिक्षकांनीसुद्धा भावगीताच्या कार्यक्रमात भाग घ्यावा. अर्थात या भावगीतांच्या कार्यक्रमात शिक्षक स्वत: भावगीत म्हणायला जरा संकोच करतात. पण मला एकदम भावगीत म्हणायचा मुलांनी आग्रह केला.

कारण शिकवताना (मराठी वर्गात) मी मुलांना गाणी गीते म्हणून दाखवित असे. हे मुलांना माहीत असल्यामुळे काही शिक्षक व मुले मला भावगीत म्हणण्याचा आग्रह करून लागली. अर्थात मी आधी माझा एक पेटी वाजवणारा मित्र होता, त्याला माझ्या गीतांची चाल पेटीवर वाजवून देण्यास सांगितले व तो तयारपण झाला. तेव्हा मी निश्चयाने व खंबीरपणे व्यासपीठावर गेलो व मित्राला आधी चाली सांगितल्याच होत्या त्या चालीवर भावगीत म्हटली. थोडक्यात त्यांची सुरूवात खालील प्रमाणे -

"नदी किनारी, नदी किनारी, नदी किनारी गं....
अवती - भवती नव्हते कोणी

खेळत होत्या राजसवाणी,
निळ्या जळावर सोन तळींच्या / नवधार लहरी गं....
नदी किनारी नदी किनारी, नदी किनारी गं....

(हे भावगीत गायिका सौ. बांदोडकर यांनी म्हटलेलं माझ्या लक्षात होतं.) हे सहा कडव्यांचे गाणे आहे.

दुसरं भावगीत म्हणजे

"उरला दिवस अल्प / घर राहिले दूर
घोडे थकुनी चूर / पथराति चढणीत / घर राहिले दूर.
या निर्जनी रानि / दे कोण साथ /
प्राण स्वनयनांत / पोटात कॉहून....

इत्यादी. हे पण गाणं चार कडव्यांचं आहे. सर्वच्या सर्व भावगीत येथे लिहिणे अप्रस्तुत वा अनुचित ठरेल. फक्त चुणूक दाखवावयाची.

ज्या - ज्या वेळेस टिळक पुण्यतिथी, यू. एन. ओ. डे, शिवाजी जयंती असेल त्या - त्या वेळी मी सहसा तर थोर, महान व्यक्तीवर वा महत्त्वाच्या दिवसावर ऐतिहासिक किंवा सामाजिकदृष्ट्या मी बोलत असे. कारण वक्ता व्हायचे असल्यास गर्दीबद्दलची भिती गेली पाहिजे. दुसरं म्हणजे प्रत्यक्ष बोलताना आपण आपल्यासमोर बसलेल्या श्रोत्यापेक्षा खूप शहाणे व ज्ञानी आहोत अशा अविर्भावाचा आविष्कार मनात पक्का करून ठेवला पाहिजे. तिसरी गोष्ट आपल्या भाषणा करता जर मर्यादित वेळ दिली असेल तर अशा वेळेला छोट्या कागदावर काय बोलायचं त्याचे मुद्दे (एक दोन अक्षरात) काढून ठेवले पाहिजेत. अशा तऱ्हेने

शाळेच्या विविध कार्यक्रमात भाग घेऊन १९४७ ते १९४८, १९४८ ते १९४९ व १९४९ ते १९५० हे तीन वर्ष कसे निघून गेले हे कळलंसुद्धा नाही.

मला अकरावीला संस्कृत शिकवावं लागत असल्यामुळे व संस्कृत करता वाचलेल्या पाठ्यपुस्तकात कवी कुलगुरू कालिदासाच्या 'मेघदूत' या काव्यातील १५ - २० कवितांचा पाठ्यपुस्तकात समावेश केल्यामुळे या कालिदासाच्या मंदाक्रांत वृत्तातील १५ - २० कवितांचा अर्थ सांगताना (व शिकवत असताना) मला अत्युच्च प्रतिभा म्हणजे काय हे कळून तर आलेच पण त्यातील उच्च आकाशाला गवसणी घालणाऱ्या कल्पना, काव्यातील गोडी, मन्दाक्रान्ता वृत्तांत चपखल बसणारा विप्रलंभ शृंगार (कारण मेघदूत हे विरह काव्य आहे.) याचा परिचय झाला व त्या काव्यातील कल्पक उत्तुंग कल्पनांचा व असामान्य प्रतिभेचा परिचय झाला व याचा परिणाम मला इतर कोणत्याही अभिजात साहित्यापेक्षा कालिदासाचं मेघदूत काव्य एक अमर काव्य वाटून कालिदासाच्या साहित्याबद्दल कमालीचं आकर्षण व ओढ वाटू लागली व पुढे निवृत्त झाल्यानंतर कालिदासाच्या नाट्य, वाङ्.मय साहित्याचा अधिक चिकित्सक वृत्तीनं अभ्यास करायचा हा मी मनाशी निश्चय केला.

# (३५) माझं बी. टी. ट्रेनिंग (प्रशिक्षण)

अशा रीतीने १९४७ - १९४८, १९४८ - १९४९, १९४९ - १९५० हे तीन वर्षे शिक्षकाची नोकरी करीत असताना मी शाळेच्या जीवनात रंगून गेलो होतो. वर्षात मी हायस्कूलमध्ये अनट्रेंड शिक्षक म्हणून होतो. हायस्कूलमध्ये शिक्षक वा अध्यापक म्हणून कायम व्हायचे असल्यास बी. टी. ट्रेनिंगची पदवी घ्यावी लागते. बी. टी. यु असल्यामुळे कायम करीत नाहीत. सरकारी हायस्कूलमध्ये दरवर्षी नवीन बी. टी. न झालेल्या पदवीधरांना त्यांच्यात निवड करून बी. टी. ट्रेनिंगला पाठवितात अर्थात सरकारी खर्चाने बी. टी. म्हणजे बॅचलर ऑफ ट्रेनिंग. अर्थात माझी शिक्षण खात्याला अत्यंत गरज असल्यामुळे त्यांनी फार - फार लवकर बी. टी. ट्रेनिंग करता माझी निवड केली.

माझी प्रशिक्षणाकरिता (बी. टी. च्या) निवड झाल्याचा हुकूम आल्याबरोबर मला प्रशिक्षणाकरिता असलेल्या स्पेन्स ट्रेनिंग कॉलेज, जबलपूर (एम. पी.) जुलैच्या पहिल्या आठवड्यात प्रशिक्षणाकरिता वरील उल्लेखिलेल्या ठिकाणी रूजू व्हावं लागलं. हे शिक्षण दहा महिन्याचं असून फक्त पदवीधर शिक्षकांनाच या प्रशिक्षणाकरिता ॲडमिट करतात कारण ही पदवी (बी. टी. बॅचलर ऑफ ट्रेनिंग) आहे. साधारणतः अशा प्रोफेशनल एक्झामिनेशनस् मध्ये नापास होण्याचे प्रमाण नगण्यच असते. अगदीच कोणी काही अभ्यास केला नाही तर तो नापास होतो. माझ्या वेळेसचा निकाल ९०% होता. असो.

पण या बी. टी. ट्रेनिंग (प्रशिक्षणात) मला एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते. ती म्हणजे ज्याचे पेपर्स उत्तम गेले होते व प्रॅक्टीस लेसन्स ही सुंदर घेण्यात आले होते त्यांना पास क्लास मिळाला होता व ज्यांना - ज्यांना प्रोफेसर समोर, प्रिन्सीपॉल समोर पुढे - पुढे करण्याची; हांजी - हांजी करण्याची तयारी होती, जे प्रिन्सिपॉलच्या बंगल्याचे उंबरठे सतत झिजवीत होते, त्यांची नोकराप्रमाणे, प्रोफेसरांचीही नोकरासारखी कामे करीत होती, होस्टेलमध्ये फिस्ट झाल्यास पक्वान्नाचे पदार्थ घरी नेऊन पोहोचवत होते; अशांना फर्स्ट क्लास व उत्तम प्रथम दर्जाचे गुण मिळाले होते. वशिलेबाजीपणाचा व चलत बुरुजेपणाचा नेहमीच विजय असतो व या कलेत तज्ञ असणारे विजयी मुद्रेने फिरत असतात. प्रौढी मारत असतात. मानवी जीवनातील माणुसकीत, मानवतेला लागलेले, खाली पहावयास लावणारे हे एक लांच्छन होय. मानवतेला शरम आणणाऱ्या या अवगुणाचे रूपांतर उत्तरोत्तर दिमाखाने वावरणाऱ्या गुणामध्ये होऊ लागले आहे. येथे एवढे स्पष्टपणे मी नमूद करण्याचे कारण हे की या लांच्छनास्पद अवगुणाचं दर्शन माझ्या सर्व पुढील आयुष्यात पदोपदी होऊ लागले.

माझं बी. टी. व प्रशिक्षण यशस्वीपणे पार पडल्यानंतर माझी पुन: बुलढाण्यास (१९५० जून) आता कायम अध्यापक म्हणून नेमणूक झाली; कारण मागे उल्लेख केल्याप्रमाणे संस्कृत शिक्षक म्हणून तेथे नितांत गरज होतीच. येथे मी माझ्या बी. टी. च्या शिक्षणात जिला विशेष

महत्व नव्हते अशी बारीक - सारीक माहितीच चर्चा करण्याचे मुद्दामहून टाळत आहे. येथे आलेले सर्व वाईटसाईट अनुभव पुढील माझ्या जीवनात मला आलेच व त्यांची चर्चा पुढं क्रमाक्रमाने येईल, पण या अनुभवांची पहिली जाणीव माझ्या बी. टी. प्रशिक्षणात प्रथमच आली. म्हणून मर्यादित थोड्या प्रमाणात त्यांचा उल्लेख केला आहे.

एकच महत्वाचा उल्लेखनीय मुद्दा म्हणून 'करमणूकीच्या कार्यक्रमात व गॅदरिंगमध्ये' जो 'जनरल डिबेट' मध्ये एक वक्ता म्हणून भाग घेतला होता. ज्यात वक्तृत्व स्पर्धेचा विषय सौंदर्य हे 'व्यक्तिनिष्ठ की वस्तुनिष्ठ' हा होता आणि मला भाषण करण्याकरिता जी दहा मिनिटे दिली होती त्यात मी कवी कुलगुरू कालिदासाच्या अभिजात शाकुंतलातील सौंदर्य स्थळांच्या आधारे 'सौंदर्य हे वस्तुनिष्ठ आहे' हा माझा मुद्दा सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. एवढेच 'यदे व रोचते यस्मै भवेत् ततस्य सुंदरम्.'

# (३६) परत बुलढाण्यातील चार वर्षे

(१९५० जुलै ते १९५३ - ५५)

अकरावीच्या (११वी) इंग्लीश मिडीयम वर्गाचा संस्कृत शिक्षक निघून गेल्यामुळे (त्याने दुसरी नोकरी धरल्यामुळे) मला अकरावीच्या मराठी मिडीयम वर्गाशिवाय आणखी अकरावीच्या इंग्लीश मिडीयम वर्गाला संस्कृत शिकवावे लागत असे. त्यामुळे माझे शिकवण्याचे तास बरेच वाढले. तेव्हा ॲडजेस्टमेन्ट म्हणून माझे दुसऱ्या वर्गाचे तास कमी करावे लागले. या वेळेस मात्र मला रहाण्यास जी जागा मिळाली ती तितकीशी चांगली नव्हती. साधारण होती. कारण त्यावेळेस घर मिळणेच मुष्कील होते. मला मिळालेली जागा वसतिस्थान - 'क्लार्क कॉलनी' म्हणजे पूर्वी मी ज्या दिशेला भरवस्तीत राहत होतो त्याच्या उलट दिशेला, जागा होती तीन खोल्यांची - पुढची खोली बरीच डिसेंट (सुंदर) चांगल्या कपाटासहीत पण लहान होती. तेथे पेशवाई बैठकच करावी लागली. दुसरी खोली पहिलीच्या दुप्पट पण पहिल्या इतकी डिसेंट नव्हती व एकच खिडकी असल्यामुळे थोडा अंधार वाटत होता. तिसरी खोली मोठी लांब होती पण ती जुन्या पद्धतीची माती व विटांनी बांधलेली स्वयंपाकघर म्हणून तर स्नानगृह खाली होतं. तेथे पायऱ्या उतरत जावं लागत होतं. अर्थात येथे काही नमूद करण्यासारखे प्रसंगाचे थोडक्यात वर्णन करून बुलढाण्यातील जीवनाचं वर्णन संपवितो.

मागे सांगितल्याप्रमाणे मी अकरावीच्या दोन्ही वर्गाला (१ इंग्रजी मिडीयमच्या २ मराठी मिडीयमच्या) शिकवत असे व त्यात मी कवी कुलगुरू कालिदासाच्या मेघदूतातील काही १५ - २० श्लोक संस्कृत पाठ्यपुस्तकात अंतर्भूत झाले होते ते शिकवण्यात मला स्वर्गीय आनंद वाटत असे. याच श्लोकावरून मला कालिदासाच्या दिव्य प्रतिभेची, गगनस्पर्शी कल्पनांची प्रचुट अर्थातरमय भाषेची, यक्ष व त्याची यांच्या दारूण विरहामुळे झालेल्या दारूण विरह दुःखाची, निसर्ग, मनुष्य व प्रीती यातील अन्योत्य संबंधांची रम्य कल्पना विलासाची सर्वांच्या मनाला भुरळ घालणाऱ्या सौंदर्याची प्रणय व निर्माण झालेल्या विप्रलंब शृंगाराची ओळख झाली. दुसरी नमूद करण्यासारखी गोष्ट पण बरेचसे आश्चर्य चकित करून सोडणारी घटना म्हणजे बुलढाण्यातील एक नामांकित डॉ. वसईकर यांचाही मेघदुताचा त्यांनी केलेला अभ्यास व परीक्षण. आम्ही दोघे नियमित सकाळी फिरायला जात असताना व मी संस्कृतचा शिक्षक आहे हे त्यांना माहिती झाल्यामुळे ते चालत असताना सुंदर संस्कृत सुभाषिते व विशेषत: कालिदासाच्या मेघदूतातील ओळी मुखोद्गत म्हणत असत. शिवाय त्यांच्या दोन्ही मुलींनी संस्कृत घेतल्यामुळे त्या माझ्याच वर्गात होत्या. त्यांच्या या संस्कृत वेडामुळे मला त्यांच्याकडे जाण्याचा ओढा व त्यांच्या संगतीत जितकं सर्वस्वी राहता येईल तितकं मी राहत असे. शिवाय ते आमचे (फॅमिली डॉक्टर) कौटुंबिक डॉक्टरही होते. जेव्हा त्यांनी -

'तन्वी शयामाशिखहि दशता पक्क बिंबाधरोष्ठी;

मध्ये क्ष्यामा चकित हरिणी, चकित हरिणी प्रेक्षणा निन्म

नाथिक्षोणी भादादलसगमना स्लोक नम्रास्तन भ्याम्
यातमस्यात सुवाति विषये स्टष्टिराधेव भर्तुः'

हे म्हटल्यावर मात्र मी गार पडलो. कारण हा श्लोक मी नुकताच शिकवला होता व त्यावेळेस मुला - मुलींत झालेली खळबळ माझ्या दृष्टीसमोर येत होती. यक्षाच्या पत्नीचं हे वर्णन वाचून माझी स्त्री किती सुंदर आहे की, तिचं सौंदर्य हे पहिल्या प्रतीचं अतुलनीय असून ब्रम्हदेवानं स्त्री घडवताना सर्व सौंदर्य परिपूर्ण अशी माझी पत्नी प्रथम केली व नंतर तिच्या खालोखाल सर्व स्त्रिया केल्या. कालिदासाच्या या मेघदूतातील - हृदयंगम कल्पनामुळे व उच्च प्रतिभेमुळे मी पुढे त्याच्या मेघदूताचे सुबोध मराठीत भाषांतर केले. त्यात या एका संस्कृत कवितेचं वर्णन मी दोन कवितेत केलं आहे. स्त्री सौंदर्य म्हणजे काय याची पूर्ण कल्पना या कवितेच्या स्वरूपात कालिदासाने समोर आणली त्याचं मेघदूत हे काव्य सुंदर उपमा (उपमा कालिदासस्य) व अर्थातरन्यास (शाश्वत सिद्धांत) यांनी भरलेले असल्यामुळे सर्व संस्कृत साहित्यात श्रेष्ठ प्रतीचं - पहिल्या दर्जाचे साहित्य म्हणून मेघदूताचं मूल्यमापन करण्यात येत हे अगदी स्वाभाविक आहे.

'कस्यैकान्तं सुखमुपगतम् दुःख एकान्तो वा
नीचैः गच्छति उपरिचदशा चक्रनेमिक्रमेणकी'

की ज्याचं मी मराठीत -

**नाही कोणा सतत सुख वा दुःख ना नित्य जाणे ।**

**उभत्वाला अवनति असे चक्रनेमाप्रमाणे ।**

असं केलं आहे. या नंतरची अत्यंत दुःखद घटना की, जी मला बुलढाण्याहून बदली मागायला कारणीभूत झाली म्हणजे मला झालेला आजार. मी आजारी पडायच्या आधी मला रक्ताची लघवी झाली व मग ताप सुरू झाला. औषधोपचार (ट्रिटमेन्ट) होती. मला प्रथम थंडी वाजून खूप ताप आला. निवृत्त सिव्हिल सर्जन होते डॉ. गोडबोले. त्यांनी मलेरिया म्हणून परीक्षा केली. पण ताप नॉर्मल येत नव्हता. वाढत होता. कमी होत होता. पण नॉर्मलवर येत नव्हता. खूप डोके दुखायचे व ताप असायचा. ते क्लिनईनचे डोस देत होते. मलेरियाचा ताप जास्तीत जास्त तीन - चार दिवसात नॉर्मलवर यायला पाहिजे. पण बारा दिवस झाले तरी ताप वाढतच होता. उतरत नव्हता. (वसंता) त्यावेळेस आठ दिवसांनी दोन - तीन दिवस सुट्टी काढून यायचा. डॉक्टरही रोज नेमाने मला अंटेंड करायला व तपासायला यायचे. पण ताप नॉर्मलवर येण्याचे चिन्ह दिसेना. तेव्हा शंका येऊ लागली की, ताप कशाचा आहे. म्हणून माझ्या वडील भावानेच डॉ. गोडबोल्यांना सांगितले की, जे नवीन सिव्हिल सर्जन बदलून आले आहेत त्यांना प्रकृती दाखवावी. त्याप्रमाणे ते आले.

(नवीन सिव्हील सर्जन डॉ. राव) त्यांनी तपासल्यावर एकदम सांगितले की, हा पॅराटाईफाईड आहे म्हणून आणि हे त्यांचे डायग्नॉईस खरे ठरले. एक वर्षापूर्वी नुकताच टाईफाईड बरे करणाऱ्या औषधांचा क्लोरोमायसेटीन

कॅप्सूल्स् चा शोध लागला. माझा भाऊ म्हणाला, "नशीब बरे म्हणायचे, देव पावला."

क्लोरोमायसेटी कॅप्सूल्स् सुरू केल्याबरोबर ताप उतरू लागला व थोड्याच दिवसात नॉर्मलवर आला. यात मला एवढेच म्हणायचे आहे की, एवढ्या अनुभवी रिटायर्ड सिव्हील सर्जन डॉ. गोडबोले यांना एवढी साधी गोष्ट कशी कळली नाही. डॉ. गोडबोले बोलण्यात गोड होते व हसऱ्या चेहऱ्याने बोलत पण आपण चुकीचे करीत असलो तरी ते बरोबर आहे अशा हट्टी वृत्तीचे होते. वास्तविक त्यांना हे केव्हाच कळावयास पाहिजे होते की, जर बारा - तेरा दिवस होऊनही ताप नॉर्मलवर येत नाही तर हा मलेरिया नसावा. हे आधीच लक्षात आले असते (म्हणजे ताप येऊ लागल्यानंतर तीन - चार दिवसांनी) तर मला लवकर बरे वाटले असते व मला जे अतोनात (सफरिंग) यातना भोगाव्या लागल्या त्या टाळता आल्या असत्या.

तात्पर्य हे की, डॉक्टर तारी आणि डॉक्टर मारी असे म्हणावेसे वाटते. मला डॉ. मारीच मिळावे यात माझ्या प्रतिकूल नशिबाचाही भाग असावा. कधी - कधी वेळ वाईट असली, ग्रह प्रतिकूल असले तर हुशार माणसालाही - डॉक्टरांनाही - दुर्बुद्धी होते. अपराध कोणाचा शिक्षा कोणाला. डॉक्टरांच्या चुकीच्या निदानामुळे बिचाऱ्या रोग्याला मात्र शिक्षा. पुढे - पुढे माझी येथे पोटाची तक्रार सुरू झाली व येथील पाणी (पहाडातले असल्यामुळे) जड वाटू लागले. ते पचेना, पचनाच्या तक्रारी सुरू झाल्या व शेवटी मला खामगावला बदली मागून घ्यावी लागली.

अर्थात शहराचे ठिकाणी जावे ही मनीषा होतीच कारण खामगाव हे जिल्ह्याचे ठिकाण नसले तरी विस्ताराने व लोक संख्येने बुलढाण्याच्या दुप्पट तरी खास होते. त्याचा पेहराव जिल्हा होण्यासारखा होता, पण मागे सांगितल्याप्रमाणे बुलढाणा हे या जिल्हाधिकाऱ्याला त्याच्या निवासा करता फार टुमदार असल्यामुळे फार पसंत पडले होते. शिवाय इतर युरोपियन साहेबासारखी त्याला शिकारीची पण आवड होती, पण खामगावला जे मोठ्या शहराचे आकर्षण होते ते त्याला नव्हते आणि दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे अर्थात हे इतके महत्त्वाचे नव्हते. आमच्या एका ओळखीच्या फॉरेस्ट रेंजरने आम्हाला खामगावला बदली करून घेण्याचा आग्रह केला.

तात्पर्य - **माणसाच्या नशीबातल्या ज्या ठिकाणी त्याची मीठ - भाकरी असते त्या ठिकाणी त्याला त्याचे नशीब ओढून नेते.** शिवाय यात योगायोगाचाही प्रश्न असतो ना!

# (३७) अस्मानी संकटाशी मुकाबला

बुलढाण्यास प्रकृती नीट राहत नसल्यामुळे व खामगाव हे मोठे शहर असून तेथे रेल्वे स्टेशन वगैरे असल्यामुळे मी माझी बदली खामगावला उच्च माध्यमिक विद्यालयात करून घेतली. येथे आल्यावर घर मिळविण्याचा फार मोठा प्रश्न पडला नाही अथवा ते मिळवण्यास विशेष असा त्रास झाला नाही. कारण बुलढाण्यास असतानाच साधारण दोन - दोन महिन्यांनी माझ्याकडे एक खामगावचे घड्याळाचे दुकानदार श्री. शंकरराव आगरकर म्हणून येत असे. त्यांच्याशी दाट परिचय झाला होता. खामगावच्या देशमुख प्लॉटमध्ये त्यांच्या भाडेकऱ्यांना रहाण्याकरिता एकमेकाला लागून दोन ब्लॉक्स् (तीन खोल्यांचे) होते व ब्लॉकला लागूनच गोड्या पाण्याची विहीर होती. त्यांच्याशी ओळख असल्यामुळे दुसरा तीन खोल्यांचा रिकामा ब्लॉक मिळाला व या ब्लॉकला लागून असलेल्या दुसऱ्या ब्लॉकमध्ये एक भाडेकरू होता. येथील हायस्कूलमध्ये कामावर रूजू झाल्यानंतर हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. चितळे (बी. ए., एलएल. बी., बी. टी.) हे होते. हे मुख्याध्यापक मी मोर्शीसं हायस्कूलमध्ये विद्यार्थी म्हणून असताना मला शिक्षक होते. ते इतिहास व मराठी शिकवत होते. आपला विद्यार्थीच आपल्या हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून आल्यावर त्यांना बरे वाटले. बरे वाटले ते अशाकरिता की, त्यांचे माझ्यावर शिक्षक म्हणून जे पूर्वी वजन होते त्या वजनाचा आता मी त्याच्या हाताखाली आल्यावर आपणास माझ्यावर दाब निर्माण करण्याकरिता माझ्या वर्गात

घुसून माझ्या विद्यार्थ्यांना ते कसे शिकवतील व त्यामुळे त्यांचे इंप्रेशन मुलांवर पडून मी त्यांना वचकून राहीन. या दृष्टीने ते माझा फायदा म्हणजे जणु काय मी त्यांचा अजूनही विद्यार्थीच असा फायदा घेता येईल. हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी करताना एक गोष्ट मला नेहमी खटकत असे. ती ही की बहुतेक जे मुख्याध्यापक असतात (८०%) त्यांना आपल्या हाताखालील शिक्षकांवर दाब ठेवून, स्वत: च्या अधिकाराचे प्रदर्शन करून शिक्षकाने आपल्याला खुश ठेवण्याचा व खुश करण्याचा व जेणेकरून शिक्षकाकडून काही लाभ उपटण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. शिक्षक शिकवण्याकरिता असेल त्याच्या शिकवण्यातून त्याला मिळणाऱ्या उत्पन्नाचा त्याने अर्धा वाटा द्यावा. म्हणजे वर पैसे मिळवण्याचे साधन. हाच त्रास मला बुलढाण्याला जाणवला होता. बुलढाण्याचे सिनिअर टीचर्स १५ - १५, २० - २० शिकवण्या करायचे व घरं बांधायचे. त्यात तर एका शिक्षकाला ३० - ३५ शिकवण्या होत्या. प्रत्येकांना रु.३०/ - प्रमाणे त्याच्या खिशात नेहमी नोटा आढळायच्या. पण ते मुख्याध्यापकाचे काम नोकरासारखे करीत असे. नेहमी वरवर करीत असे व मुख्याध्यापकाला महिन्याचे ४०% उत्पन्न (रु. २५० ३००) देत असे. हे मुख्याध्यापक नेहमी कर्जात असायचे व ते व्यसनी व जुगार पण खेळत असत. पण त्यांना या शिक्षकाकडून त्याच्या शिकवणीच्या उत्पन्नाला ४०% भाग मिळत असल्यामुळे ते त्याच्यावर खुश असत व शाळेची सर्व महत्त्वाची कामे त्याला देत असत. पण हा शिक्षक नुकताच लागला होता व हा बी. एस्सी. (सायन्स, गणित, केमिस्ट्री, फिजिक्स) शिकवण्यास.

अर्थात या सर्वांचे हे स्वरूप पाहून मलाही वाटू लागले की, आपणाला येणाऱ्या शिकवण्या आपण स्वीकाराव्या.

मी बुलढाण्यात नववीला इंग्रजी, दहावीला मराठी व अकरावीला संस्कृत हे विषय शिकवित असे. मला नववीच्या इंग्रजीच्या शिकवण्या येऊ लागल्या तेव्हा मला पण बऱ्याच शिकवण्या प्रत्येक मुला पाठीमागे रु.२५/ - याप्रमाणे येऊ लागल्या. त्या मी स्वीकारल्या व दोन बैठकीत सर्व शिकवण्या आटपीत असे. बुलढाण्यास बहुतेक शेकडा ७०% शिक्षक शिकवण्या करतात ही बातमी डिव्हीजनल एज्युकेशन सुपरिंटेडंट, अकोला यांना कळवण्यात आली. ते डिपार्टमेंटल इनक्वायरी (खाते निहाय चौकशी) करता आले व त्यांनी शिकवण्या करणाऱ्या शिक्षकांना क्रमाक्रमाने बोलावून चौकशी करावयास व शिक्षकांची हजेरी घ्यावयास सुरूवात केली. मुख्याध्यापकाला जो हा तरुण शिक्षक पैसे देत होता त्याची चौकशी करण्यात येणाऱ्या शिक्षकात नाव नव्हते. बाकीच्यांची होती. माझेही होते. माझे नाव पुकारण्यात आले. त्याप्रमाणे मी चौकशी समोर गेलो. सुपरिटेंडेटने "तुम्ही किती शिकवण्या करीत होता? किती पैसे घेत होता? तुम्ही मुख्याध्यापकांची परवानगी घेतली होती का?"

इत्यादी प्रश्नमाला सुरू झाली. प्रसंग तर मोठा बाका आला. कारण मी नुकताच नोकरीला (२ वर्षे झाली होती) लागलो होतो. सर्व खरं सांगितलं तर नोकरी जायची. शिवाय हातावरचं पोट - नोकरीवर पोट. पोटावर पाय पडायचा. कसं वागावं ही एक सत्व परीक्षाच होती. पण घाबरलो नाही. ईश्वरानेच धीर दिला.

मी उत्तरात सांगितले, "सर्व सिनीअर शिक्षक बऱ्याचशा शिकवण्या करतात ते पाहून आपणही शिकवण्या घेण्यात काही वावगं नाही अस मला वाटले."

मी बिलकूलच शिकवण्या करीत नाही हे ही सांगणं योग्य नव्हतं, कारण सुपरिंटेंडेंट जवळ कोणत्या शिक्षकाला किती शिकवण्या आहेत त्याचा नंबर व कोण - कोणत्या विद्यार्थ्यांच्या आहेत त्यांची नावे होती. अर्थात संपूर्णच माहिती होती असे नाही. मला जेव्हा वर्दी लागली की, माझीपण चौकशी होणार आहे तेव्हा मी फक्त दोन मुलांची नावे सांगायचं ठरवून बाकीच्यांना विचारलं तरी 'नाही' म्हणा असं सांगितले होते.

मला जेव्हा सुपरिंटेंडेंट म्हणाले, "काही मुळीच शिकवण्या करीत नव्हता काय?"

असं म्हटल्यावर मी उत्तरलो. "मी शिकवण्या जरूर घेतल्या पण त्या दोघांच्या इतर सिनिअर शिक्षकांच्या २० - २० शिकवण्या पाहिल्यानंतर तेव्हा दोन शिकवण्या घेण्यात काही पाप नाही असे वाटले."

मला 'नावे' विचारली ती मी दोन विद्यार्थ्यांची सांगितली' पण त्याचबरोबर हेही सांगितले की, "त्या विद्यार्थ्यांचे पैसे अजून यावयाचे आहेत. शिवाय मुख्याध्यापकाच्या परवानगी शिवाय शिकवण्या घेऊ नयेत असा आदेश परिपत्राकाद्वारे पण देण्यात आला नव्हता. आता आपण म्हणत असाल तर मी पैसे घेणार नाही."

अर्थात माझ्यावर या चौकशीचा तसा काही फार परिणाम झाला नाही. इतर शिकवणी करणाऱ्यांच्या मात्र

बदल्या झाल्या. शिवाय संस्कृत शिक्षक सर्व शिक्षण खात्यात पुरेसे नसल्यामुळे माझ्यावर फक्त पुढे परवानगी शिवाय शिकवणी घेऊ नये एवढाच रिमार्क मारून चौकशी संपली यातून एक धडा मी शिकलो तो म्हणजे जगात अथवा नोकरीत सर्वच खरं सांगणारा फाशी जातो. पण त्यात जरा बनवून थोडं खरं थोडं खोटं असं सांगणाऱ्याचा जीव बचावतो. सर्व खरं सांगणाऱ्याला बावळट अथवा अव्यवहारी म्हणता येईल अर्थात येथे खामगावमधील घटनांची माहिती देताना थोडं विषयांतर करून ज्या बुलढाण्याच्या जीवनक्रमाच्या माहिती द्यावयास पाहिजे होत्या त्या येथे द्याव्या लागल्या. त्या या दृष्टीने की बुलढाण्याच्या मुख्याध्यापकाला जसे पैसे चारून खुश करण्याचा प्रयत्न करणारा होता तशीच काही शिक्षक मंडळी खामगाव हायस्कूलच्या मुख्याध्यापकाला त्याच्या गरजा पुरवून, त्याला खुश ठेवून त्याच्या अपेक्षा पूर्ण करून आला स्वार्थ साधणारी माणसे होती.

आपल्या कनिष्ठाकडून पैसा खाण्याची व अशा तऱ्हेचा भ्रष्टाचार ज्या आपल्या कनिष्ठाकडून करवून घेता येतो त्या कनिष्ठ माणसाचे प्रस्थच फार माजते. खामगाव हायस्कूलच्या मुख्याध्यापकांनी खामगावला स्पोर्टस् सेलीब्रेशन, खेळाचे सामने होण्याकरिता आजूबाजूच्या शाळेतील खेळाडूंच्या टीम्स् येत असत व त्यांची व्यवस्था ठेवावी लागत असे. या स्पोर्टस् सेलीब्रेशनचा मुख्य म्हणून ज्याला होस्टेलचे सुपरिटेंडट केले होते तोच या स्पोर्टस् सिलेब्रेशनचा इनचार्ज होता व त्याच्या हातात पैशाची थैलीच असे. वास्तविक ओघाने आले व या संदर्भात मी मुख्याध्यापक चितळे यांच्या

बाबतीत निवेदन करीत असल्यामुळे बुलढाण्याच्या या घटनेचा मी उल्लेख केला इतकेच. पण मुख्याध्यापकाबद्दल माझ्या मनात जी आदराची भावना होती व ऑफिसर अथवा अधिकारी जितक्या मोठ्या जागेवरचा तितके त्याचे भ्रष्टाचाराचे प्रमाण जास्त ही गोष्ट अनुभवास आली.

येथे खामगावला मुख्याध्यापक चितळे यांचा एक ग्रुपच (गट) होता व त्यात निवडक सहा - सात जण होते व ते सुट्टीच्या दिवशी पत्ते खेळत असत. मी एकदा खामगावच्या श्री. चितळेंच्या भेटीला गेलो होतो तेव्हा ते आपल्या भागीदारांसोबत पत्तेच खेळत होते व पत्ते खेळतानाच माझ्याशी बोलत होते. येथेही अर्थात मला संस्कृत विषय दिलाच होता पण मला दहावीचं संस्कृत दिलं होतं. अकरावीचं संस्कृत एक सिनीअर शिक्षक श्री. अभ्यंकर शिकवित होते व नववीच श्री. वेतोडेकर.

पुढे श्री. अभ्यंकर यांची बदली झाल्यावर माझ्याकडे ११वीचं संस्कृत होतं. येथील मुख्याध्यापकांना विशेषत: मी पूर्वी त्यांचा विद्यार्थी असल्यामुळे, माझ्या वर्गात येऊन इंटरफेअर करून माझे शिकवण त्यांच्या येण्यामुळे बंद करावे लागत असे व तेच शिकवायला सुरूवात करीत असत. त्यामुळे माझा बराचसा वेळ फुकट जायचा व सिलॅबस प्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण होत नसे. ते स्वत:चे वजन देऊन वागत नसत. शिवाय आपल्या मर्जीतल्या शिक्षकांनाच संधी देण्याची त्यांची वृत्ती. अर्थात माझ्याकडून त्यांच्या ज्या अपेक्षा होत्या त्या मी पूर्ण करू शकत नव्हतो. त्यांच्या विरुद्ध इतर काही शिक्षक हाते.

वास्तविक हायस्कूलच्या वसतिगृहाच्या सुपरिंटेंडेंटचा चान्स सिनिअर शिक्षकाला न देता अत्यंत ज्युनिअर शिक्षकाला जो पदवी होल्डर नसून डिप्लोमा होल्डर त्याला होस्टेलच्या सुपरिंटेंडेंट म्हणून नेमले. कारण तो त्यांच्या मर्जीतला होता व त्यामुळे भ्रष्टाचार करण्यास बराच वाव मिळत असे. सुट्टीच्या दिवशी हे मुख्याध्यापक महाराज त्यांच्या घरीच सापडायचे. एखाद्या सत्ताधाऱ्यांनी आपल्या कनिष्ठ नोकराकडे नेहमी - नेहमी जाणे यात खरे तर त्या सत्ताधाऱ्यांची प्रतिष्ठा कमी होते पण स्वार्थाकरिता व वैयक्तिक फायदा करून घेण्यात सत्ताधारी माणूस स्वत:ची प्रतिष्ठा विसरतो. परंतु या सर्व सावळ्या गोंधळात व भ्रष्टाचाराच्या प्रकारात एक गोष्ट मात्र निश्चित. हा सर्व प्रकार पाहणारे मुकाट्याने पाहात असतात व तोंडावर कोणताही संशयात्मक बदल न दाखवता तो उघडकीस व अभिनिवेश न दाखवता गुपचूपपणे या प्रकाराविरुद्ध कारवाई करण्यात कसूर करीत नाही.

खामगाव हायस्कूलच्या मुख्याध्यापकांचा हा प्रकार आपल्या हाताखालील निवडक शिक्षकांशी पत्ते खेळण्याकरिता एकत्र येणे व एका ज्युनिअर माणसाला होस्टेल सुपरिंडेंटेड करणे याबद्दल उच्चाधिकाऱ्याकडे आकोल्यास रिपोर्ट होऊन मुख्याध्यापकांची चौकशी होऊन त्यांच्या विरुद्ध त्यांच्या कॅरॅक्टर रोलमध्ये रिमार्कस् मारले गेले व त्यांची नाच्चकी झाली. आता महत्वाचा मुद्दा म्हणजे खामगावला व अध्यापक असताना आलेले अस्मानी संकट.

# (३८) संकट - मला अकस्मात आलेला ठार बहिरेपणा

मी नुकताच माझ्या पत्नीबरोबर उन्हाळयाच्या सुट्टीत माझ्या थोरल्या (मधल्या) भावाकडे वसंताकडे कलकत्यास गेलो होतो. मी याच्या आधी एकदा कलकत्ता पाहिले होते. पण पत्नीला दाखवावे म्हणून वसंत म्हणाला की, "सौ. शकुंतला वहिनींना तू का आणीत नाहीस?"

म्हणून पत्नीला कलकत्ता दाखविण्याकरिता गेलो होतो. ही घटना १९५५ - १९५६ मधील असावी. खामगावला परत आल्यावर एकाएकी एकदम माझ्या दोन्ही कानातून भरभर कप डिसचार्ज होऊ लागला व डिसचार्ज आला म्हणजे ऐकू येणे ठार बंद व्हायचे. आता काय करावं? नोकरी अध्यापकाची व या नोकरीत बहिरेपणा बिलकूल उपयोगाचा नाही. मुलांचे प्रश्न ऐकू येणार कसे व मुलांना विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणार कसे? परत पाठ घेत असतानाच प्रश्न विचारावयाचे असतात ते विचारणार कसे? मुख्याध्यापक तर दर दिवशी मी कसा शिकवतो म्हणून पाहावयास यायचे. शिवाय इन्स्पेक्शनच्या वेळेस कसं करणार? म्हणजे नोकरी जायचीच पाळी आली की! पण एक गोष्ट माणसाने लक्षात ठेवावी की, किती ही भयंकर दारूण आपत्ती आली तरी ईश्वरावर गाढ श्रद्धा ठेवून न भीता आपत्तिशी मुकाबला करण्याची तयारी करावी. मनाला धीर द्यावा व धैर्य ठेवावे व न डगमगता येणाऱ्या

संकटांना एक आपल्यामध्ये असणाऱ्या सत्वाची परीक्षा पाहाण्याकरिता सत्वपरीक्षाच पहाण्याकरिताच ही संकटे येत असतात. त्यांना तोंड द्यावे. संकटांचे स्वागत करावे. ईश्वर अशा माणसांना आपोआप बुद्धी देतो. मी विचार केला. 'आता आपण मेडिकल लिव्ह काढावी. कारण माझी बरीच मेडिकल लिव्ह शिल्लक होती. मी दोन महिन्यांची मेडिकल लिव्ह घेऊन मुंबईला गेलो. अनायासे माझी सख्खी बहीण कला बोपर्डीकर ही दादर; शिवाजी पार्क जवळ श्री. दीक्षित यांच्या ब्लॉकमध्ये राहत होती. मी प्रथम आशियात प्रसिद्ध असलेल्या इ. एन. टी. स्पेशालिस्ट (ईअर - नोज - थ्रोट यांचे स्पेशल तज्ञ) डॉ. हिरानंदानी यांना दाखवले. त्यांनी माझे नाक, कान व घसा तपासून सल्ला दिला की, माझे घशाचे ऑपरेशन करून घशाची ग्लांड काढावी लागेल. कारण त्यात दोष असून घशात इन्फेक्शन निर्माण होऊन खोकला येतो. मला खोकल्याचा विकार होता. ग्लॅन्ड (घशातील) काढली तर तुम्हाला निश्चित ऐकू येईल असे त्या डॉक्टरांनी खात्रीपूर्वक सांगितले. ऑपरेशन करावेच लागेल. तेव्हा मी चटकन तयार झालो. डॉक्टरांनी ऑपरेशन केल्यावर मुंबईस तीन - चार दिवस राहून परत खामगावास आलो. पहिल्यांदा बर्फाचा शेक व नंतर हॉट वॉटर बॅग शेक देऊन जखम बरी झाली. डॉक्टर म्हणाले होते; "आठ दिवसात ऐकू येईल."

मात्र आठ दिवसांचे पंधरा दिवस झाले, ऐकू येईना. तेव्हा परत मुंबईस गेलो. डॉक्टरांनी मला तपासल्यावर सांगितले की, "जखम पूर्ण कोरडी झाली नाही. ती पूर्ण

कोरडी करण्याकरिता रेडियम ट्रिटमेंटच्या चार सिटींग्ज कराव्या लागतील. जखम कोरडी झाल्यावर नक्कीच ऐकू येईल.”

त्यांना मात्र मी स्पष्ट सांगितले की, “मी एक शिक्षक आहे व पगार फार नाही.”

तेव्हा त्यांची ऑपरेशनची फी त्यांची रु.४००/ - होती ती माझ्याकडून रु. २००/ - घेतली. तसेच रेडियम ट्रिटमेन्ट ची फी रु.५००/ - होती ती त्यांनी रु. २५०/ - घेतली. चार सिटींग्ज पूर्ण झाल्या. रेडियम ट्रिटमेन्ट घेतल्यानंतर कानात दगड ठेवल्यासारखे वाटत होते. चार सिंटींग पूर्ण झाल्यावर आठ दिवसात ऐकणे सुरू होईल. यातही पंधरा दिवस निघून गेले तरी ऐकू येण्याचं चिन्ह दिसेना. परत कानातून डिसचार्ज सुरू झाला. मी त्यांना टेलिग्राम केला. "हिअरिंग नॉट रेस्टॉर्ड, डिसचार्ज स्टार्टेड." त्यांनी उलट तारेने "टेक पेनिसिलीन प्रोकायन इंजेक्शनस् - फोर." त्याप्रमाणे इंजेक्शन्स घेतली. परत मुंबईस गेलो. त्यांना भेटलो. एक महिन्यात नक्कीच ऐकू येईल. तसे त्यांचे पत्रही पण आता रजा फार थोडे दिवसच शिल्लक होती. पुनः मुंबईस त्यांना भेटलो व सांगितले की, “आपण खात्री दिलेल्या मुदतीपेक्षा दुप्पट कालावधी होऊनही ऐकू येत नाही. माझी शिक्षकाची नोकरी आहे, तेव्हा ऐकू आल्याशिवाय कामावर रूजू कसा होणार?”

त्यावेळी हिअरिंग एड वापरत असत. ती वापरण्यास काय हरकत आहे? त्यांचे उत्तर, “तुम्हाला मी ती सूचना करणारच होतो; पण जास्तीत जास्त दोन महिन्याचे ऐकू

येईलच. पण तुम्ही हिअरिंग एड वापरा, कारण तिचीही सवय करावी लागेल. तेव्हा पुन्हा मुंबईस जाऊन मला नीट ऐकू येईल, आवाज कमी जास्त होण्याची सोय असलेली अशी ४०० रु. ची हिअरिंग एड विकत घेतली. साधारणत: मोठ्या आगपेटीच्या आकाराची (अमेरिकन टाईप) विकत घेतली. मशीननं ऐकू येत होतं पण त्यात इतर अनेक अननेसेसरी आवाजही आजूबाजूचे ऐकू यायचे. बोलणाऱ्याचं बोलणं प्रथम गोंधळल्यासारखं व्हायचं. शिवाय माझ्या सारखीचं अर्थात आकारांनी बरीच बोजड - टॉर्चेमधील बॅटऱ्यांनी, बोजड आकाराची कोटाच्या खिशात ठेवता येण्यासारखी हिअरिंग एड सिनीअर शिक्षक श्री. अभ्यंकर वापरीत होती. त्या मानानं माझी फारच सुटसुटीत, कोणाला न दिसून पडणारी व त्यांच्या मशिनपेक्षा जास्त सेनसेटीव्ह अशी होती. हिअरिंग एड घालणे सुरू करून शिकवू लागलो. प्रथम विद्यार्थ्यांनां जरा औत्सुक्यच वाटत होते. पण पुढे सवय झाली व शिकवण्यात अडचण येत नव्हती. स्पष्ट ऐकून न आले तर विद्यार्थ्यांच्या जवळ जाऊन प्रश्न ऐकून घेऊन त्याची समर्थक उत्तरे देत असे. काम सुरू झालं. आमचे मुख्याध्यापक म्हणाले, "तुम्ही हिअरिंग एड घालून शिकवता त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकवण्यावर - अध्यापनावर परिणाम होतो. त्याशिवाय अध्यापकाचं काम करण्याऐवजी तुम्ही क्लार्कचा जॉब का करीत नाही. तुमचा ऐकण्यातला दोष तुम्ही हिअरिंग एड नी भरून काढण्याचा प्रयत्न करता पण ते मनाला बरं वाटत नाही. विद्यार्थ्यांचं लक्ष तुमच्या कानाकडे असतं."

मी त्यांना चोख उत्तर दिलं, "साहेब, जशी आपण आपल्या दृष्टीचा दोष चष्मा लावून काढून टाकण्याचा प्रयत्न करतो तद्वतच ऐकू येण्यातला दोष हिअरिंग एड वापरून काढून टाकता येतो. शिकवण्यावर परिणाम झाला असता तर रिझल्ट इतके उत्तम लागले नसते. शिवाय श्री. अभ्यंकर हिअरिंग एड लावून आज दहा वर्षे शिकवित आहेत. इकडच्या बाजूला हिअरिंग एड हे अगदी नवीन आहे व विशेष लोकांच्या पहाण्यात नाही. मुंबईला दर पंचवीस माणसात एक माणूस हिअरिंग एड वापरतो. हे नवीन संशोधन सुधारणा आहे. याचे कौतुक करावयास पाहिजे. शिवाय काही दिवसांनी प्रॅक्टीसपण होईल. एकदा सवय झाली की काही वाटणार नाही."

हे माझे उत्तर ऐकून त्यांचा चेहरा थोबाडीत मारलेल्या माणसासारखा झाला. वादावादीत माझ्या चपखल आर्गूमेन्टस् मुळे हा आपल्याला जड जाणारा अध्यापक आहे असे त्यांना वाटू लागले. शिवाय नंतर इनस्पेक्शन झाल्यावर सुपरिटेंडंट ऑफ एज्युकेशन ला काही तक्रार केली नाही. पण नाकापेक्षा मोती जड नको म्हणून खामगावला माझी संस्कृत शिकवण्याकरिता गरज असूनसुद्धा यांची बदली करायची अशा तीन शिक्षकात (जे त्यांना खूष करू शकले नाहीत; वृत्तीमुळे व स्वभावाने गरीब) माझा समावेश होता व माझी मंगरुळपीर येथे बदली झाली.

# (३९) मंगरुळपीर येथे बदली

(संतांची लक्षणे - आत्मज्ञानाचे स्वरूप ईश्वराचे अस्तित्व)

संस्कृतात एक वचन आहे -

**सुलभा पुरुषा राजन् सततं प्रियवादिनः।**
**अप्रियस्य तु पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः॥**

अर्थात - हे राजा नेहमी मनासारखे खूष करण्याच्या दृष्टीने गोड बोलणारे लोक पुष्कळ मिळतात, असे प्रिय व स्तुती करणारे लोक खूप आहेत. पण अप्रिय ज्यात स्तुती प्रशंसा नाही असे बोलणे की जे हितकारक व कल्याणाकरिता असे बोलणारे व ऐकणारे (हे बोलणं ऐकणारे) अत्यंत दुर्मिळ आहेत. थोडक्यात जे अप्रिय बोलतात ते कल्याणाकरता बोलतात. स्वत: च्या स्वार्था करता नव्हे. आमची अप्रिय व खूष ठेवणार; (अधिकाऱ्यांना) बोलणं नसल्यामुळे आमची (निवडक तिघांची) मंगरुळपीर येथे बदली झाली. मंगरुळपीर येथे बदली होणे ही एक शिक्षाच असते. जसं अकोला येथे बदली होणं म्हणजे वऱ्हाडात एक शिक्षाच समजतात तद्वतच मंगरुळपीर येथे बदली होणं होय. मंगरुळपीर हे गाव अकोल्याहून एस. टी. ने ३३ मैल आहे. माझी येथे बदली १९५८ जूनमध्ये झाली व मी येथील हायस्कूलमध्ये १९५८ ते १९६२ पर्यंत होतो. अर्थात तेथले उच्च माध्यमिक हायस्कूल नसून नुसतं माध्यमिक शासकिय हायस्कूल होते. म्हणजे येथे दहावीपर्यंत (लोअर मॅट्रिक) पर्यंतचे वर्ग होते. हे

खामगावसारखे वा बुलढाण्यासारखे बहुउद्देशीय उच्च माध्यमिक विद्यालय नव्हते.

जीवनक्रम लिहिताना काही - काही घटनांचा उल्लेखमात्र अनावधानाने सुटतो. खामगावला जशी एक अस्मानी आपत्ती बहिरा होण्याची कोसळली त्याचबरोबर एक अतीव व अपूर्व अशी आनंदाची घटना पण घडली. ती म्हणजे आम्हाला (मी व माझी पत्नी) लग्नानंतर सतत आठ वर्षे अपत्यहीन होतो, पण मला १९५७ साली मुलगा झाला. माझ्या पत्नीला मूल होणार नाही म्हणून कित्येक विद्वान डॉक्टरांनी सांगितले. दोष आहे म्हणून. आता कोणात माझ्यात की, पत्नीत तेरवाडकर घराण्यात वंशवेल वाढण्याच्या संधी फार कमी. काहींनी मला मुलाकरिता दुसरं लग्न करण्याचा सल्ला दिला होता, पण दुसरीलाही मूल झालं नाही तर काय करणार? मनात म्हटलं. "हा सर्व खुळेपणा आहे."

मग मुंबईचे प्रख्यात स्त्रीरोग तज्ञ (गायनॉकॉलॉजीस्ट) डॉ. पुरंदरे यांनी तपासल्यानंतर मात्र मूल नक्की होईल म्हणून सांगितले. अर्थात माझ्या पत्नीचे मी दोन क्यूरेटिंग ऑपरेशन्स करून घेतले होते. खामगावला आल्यानंतर शेगाव हे खामगावपासून आठ मैलावर एक श्री संत गजानन महाराज यांच्या वास्तव्यामुळे पुनीत झालेलं गाव होतं. त्यांच्या दैवी, चमत्कृतिजनक, सन्यस्त वृत्तीने राहणाऱ्या व भक्तांचं कल्याण करणाऱ्या मनोकामना पूर्ण करण्याच्या व सिद्धी हस्तगत करणाऱ्या श्री गजानन महाराजाबद्दल पुष्कळ ऐकलं होत. त्यांच्या भक्ती - विजय पोथीत मेलेल्या

कुत्र्याला जिवंत करणाऱ्या - नवऱ्याला होणाऱ्या दुर्धर रोगाच्या आपल्या भक्ताला त्यांनी बरं केले होते. अर्थात सर्वच संत काही ढोंगी नसतात. शंभरात एखादा खरा हिरा असतो. शिवाय 'खरा तोचि संत / जो सोशी जगाचे आघात / हिरा ठेविता ऐरणीं / वाचे मारि जो घणी /तोचि मोल पावे खरा / करणीचा होय चुरा / खऱ्या संताची लक्षणे श्री गजानन महाराजांच्या अंगात तर होतीच पण त्यांना प्रसिद्धी आवडत नसे. ते नंगे - वस्त्रहीन असे राहत. कुठलंही अन्न खात, कुठलंही पाणी पीत. नेहमी गांजा पीत, पण मोठ - मोठे सुशिक्षीत डॉक्टर, तज्ञ महाराजांचे भक्त होते व पुष्कळ भक्तांना त्यांच्या अपेक्षित कामना महाराजांच्या कृपेने पूर्ण झाल्याचा अनुभव आला होता. मनुष्य विज्ञानवादी, सुशिक्षीत, सुधारणावादी व अंधश्रद्धे विरुद्ध असला तरी यामुळे त्यानं नास्तिकवादी वृत्ती धरण्याचं काही कारण आहे. त्याला ही एक गोष्ट 'यावचंद्र दिवाकरो' राहणारी, अक्षय व अनंत या विश्वाचे नियमन व नियंत्रण करणारी एक सर्व शक्तिमान, विज्ञानालाही जिचा थांग लागला नाही अशी अगोचर दृष्टी असणारी पण वायूसारखी अथवा हवेसारखी सर्व विश्वात संचार करणारी अशी एक दैवी चैतन्य रूप शक्ती आहे की, जिचा शोध आत्मज्ञानाने आत्मविद्येनेच घ्यावा लागतो. विज्ञान हे आत्मज्ञानाच्या पासंगालाही पुरत नाही माझा हा दृष्टीकोन निश्चित पक्का कायमचा असा होण्याचं श्रेय मी दहावीच्या वर्गाला शिकविलेल्या 'गॉड इज' या महात्माजींनी लिहीलेल्या लेखामुळे झाला.

महात्माजींनी लिहिलेच की, एखाद्या राज्याचा कारभार सर्व एखादा सक्षम समर्थ राजा जसा सुसूत्रपणे नियंत्रण व नियोजन करून चालवतो तसा या विश्वाचा कारभार सुसूत्रपणे नियोजनाने व नियंत्रणाने चालविणारी एक अदृश्य शक्ती (मानवाला न दिसणारी) पण हवेच्या अस्तित्वासारखी भीमान होणारी अतुलनीय, वरिष्ठ व सर्वश्रेष्ठ (सुप्रिम) अशी एक शक्ती आहे हे खास. डॉ. जयंत नारळीकर म्हणतात त्याप्रमाणे आपल्या विश्वासारखीच अनंत विश्वे आहेत व जसे आपल्या विश्वाला एक सूर्य आहे तसे त्या अनंत विश्वांना अनेक सूर्य आहेत. आपण ज्याला स्वयंप्रकाशित तारा म्हणतो तो एक सूर्यच आहे. असे अनेक तारे आहेत म्हणजे अनेक सूर्यच आहेत. आणि जसे आपल्या सूर्याभोवती पृथ्वीसारखे व चंद्रासारखे अनेक ग्रह आहेत तसेच अनेक ग्रह दुसऱ्या विश्वाच्या सूर्याभोवती असतील आणि या अफाट विश्वाचं नियमन सुसूत्रपणे करणारी एक अज्ञात, अदृश्य पण भासमान होणारी प्रचंड चैतन्यशक्ती आहे. हिचा शोध व अस्तित्व शूद्र, सामान्य मानवाच्या रुपातील विज्ञानवादी कसा घेणार? म्हणून येथेच चार्वाकाचा नास्तिकवाद गळून पडतो. त्या सर्व शक्तिमान चराचरात भरून राहिलेल्या अतिश्रेष्ठ, सर्वश्रेष्ठ निसर्गातील चैतन्यरूप शक्तीचे दर्शन आत्मज्ञानात पारंगत झालेल्या माणसालाच की ज्याला आपण संत, महात्मा म्हणतो. त्यांना या आत्मशक्तीचा शोध लागलेला असतो. म्हणूनच ते मानवी स्वरूप घेऊन दीन, गरीब, निराधार, कोणत्या ना कोणत्या स्वरूप रंग व अगतिक भक्ताचे वा जनतेचे कल्याण

करताना या जगात उतरतात. दीन दुबळयाचं कल्याण. साधणे त्यांना प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे मार्गदर्शन करणे, हेच त्यांचे उद्दिष्ट व जीवन कार्य असते. त्यांचा अवतार जितक्या कालापर्यंत असतो तितक्या काळ ते राहतात व मग समाधी घेतात. समाधी घेतल्यानंतरही त्यांचे अव्यक्तपणे गरीबांचे दीनदुबळया भक्ताचे कल्याण करण्याचे त्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य सुरूच असते. अशाच कोटीतले वा या पद्धतीचेच श्री गजानन महाराज (शेगाव) होते आणि मी जेव्हा त्यांची भक्ती सुरू केली, शेगावला जाऊन त्यांच्या पोथीच पारायण केले व घरातसुद्धा माझ्या कुटुंबियांना श्री गजानन महाराज यांना जागृत देवाप्रमाणे वा शक्तीप्रमाणे त्यांची आराध्य पूजा, आरती हे करण्या परिपाठ ठेवला तेव्हा माझे ईप्सित साध्य झाले. मानवी प्रयत्न सुरू होतेच पण त्याच्या जोडीला देवी शक्तिचाही वापर सुरू केला, नी याचा परिणाम म्हणून मला आठ वर्षांनी पुत्र रत्न मिळाले. मुलगाही गोरा, दिसण्यात सुंदर, काही महिन्यांनी बाळसे धरलेला, सशक्त, सदृढ असा दिसू लागला व डोळयांचे पारणे फिटले. आपणाला पितृत्व लाभले हे श्री गजानन महाराज (शेगावचे) यांना गुरु मानल्यामुळे त्यांच्या पोथीचे पारायण केल्यामुळे, त्यांची भक्ती, आराधना, आरती केल्यामुळे व त्यांच्या समाधी दर्शनाकरिता शेगावला तीन - चार वाऱ्या केल्यामुळे हा लाभ पदरी पडला असे माझी मनोदेवता मला सांगू लागली. जसे अकरावीला मेघदुतांचे काही श्लोक शिकवल्यामुळे कवी कुलगुरू कालिदासाच्या प्रतिभापूर्ण उच्च साहित्यामुळे व

गगनस्पर्शी कल्पनामुळे त्याच्या साहित्याचा भक्त बनलो, त्याचप्रमाणे श्री गजानन महाराजांनी दिलेल्या प्रसादामुळे (सुंदर पुत्र रत्नाच्या स्वरुपात ) मी महाराजाचा भक्त बनलो. श्री. गजानन महाराजांचा तो प्रसाद असल्यामुळे व त्याचा अनंत चतुर्दशीला जन्म झाल्यामुळे त्यांचे आम्ही 'चंद्रशेखर' हे नाव ठेवले व मग नेहमी एवढे मोठे नाव न उच्चारता केवळ 'शेखर' असे म्हणू लागलो. माझी मंगरूळपीरला बदली झाल्यामुळे मी जरी खिन्न झालो होतो तरी हा खिन्नपणा अथवा विषादाचा ढंग पुत्र प्राप्तीच्या आनंदरूप प्रकाशामुळे नाहीसा झाला. दुःखात सुख हेच.

खामगावच्या जीवनातील दुसऱ्या एका घटनेचा उल्लेख करायचा राहिला. मुख्याध्यापकाच्या नाखुषीमुळे ही घटना घडली. शिक्षकांना ए. सी. सी. (ॲक्सीलेरी कॅडेट कोर्स) म्हणजे मिलिटरी शिक्षण एकवीस दिवसांचे शिक्षण एक आवश्यक (कंपल्सरी) करण्यात आला व हा कोर्स जो पूर्ण करणार नाही त्याला पुढचे इन्क्रीमेंट, पगारवाढ मिळणार नाही असा फतवा (आदेश) काढण्यात आला व तो कामठी येथे जाऊन मिलीटरी कॅम्पस् मध्ये एकवीस दिवसात पूर्ण करायचा. या करता त्या मानानं माझं वय झालं असताना मला जावे लागले. अर्थात मिलिटरी शिक्षण किती कडक शिस्तीचे कष्टाचे, ऊन - वारा - पाऊस यांना तोंड द्यावे लागणारे, शारीरिक कष्ट व कवायत व लेफ्ट राईट मार्च करायला लावणारे (५ - ५ मैल) याची कल्पना आता विस्ताराने द्यायला नको. पण ईश्वरकृपेने मी हे शिक्षण पूर्ण केल्यावर मग ए. सी. सी. कमांडर म्हणून उपाधी लागून

याबद्दल १०० /- रु. प्रत्येक महिन्याला जास्त वेतन म्हणून मिळत असे. तेव्हा या दुःखात सुख एवढेच की आर्थिक दृष्ट्या थोडा फायदा झाला मात्र मला पुढे जो बधिरपण आला तो याच शिक्षणाचा परिणाम होता, कारण सकाळी पाचला उठून जवळच्या धाम नदीच्या थंड पाण्यात स्नान करावं लागत असे अर्थात मंगरुळपीरला ए. सी. सी. शिक्षण नसल्यामुळे (तेथे कॅडेटची तुकडी शिकवायला नसल्यामुळे) पुढे हा भत्ता मिळणे बंद झाले.



# (४०) माझं मंगरूळपीरचं जीवन

(माझं स्वामी विवेकानंदावरचं भाषण)

मागे उल्लेख केल्याप्रमाणे मंगरूळपीर हे गाव खेडेवजा शहरच होतं अथवा एक मोठं खेडं होतं असं म्हणू. येथे सरकारी नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्याकरिता (विशेषत: शिक्षकांकरिता) कुटुंबाला घेऊन राहण्यासारखे घर अथवा फ्लॅटस् नव्हते. मी माझा मित्र जो प्रथम बुलढाण्यास होता व नंतर इथे बदलून आला होता. श्री. बोरकर यांच्याकडेच उतरलो होतो. येथे दहावीपर्यंतचे वर्ग असल्यामुळे मला दहावीला संस्कृत व इंग्रजी हे विषय शिकवावे लागत असतं. शिवाय दहावीला मराठी श्री. बोरकर यांच्या ओळखीमुळे मिसाळ वकील यांच्या घरात कशीबशी जागा मिळाली तिथे एकच फक्त वीट सिमेंटची १२ x १२ फूट खोली बऱ्यापैकी होती. बाकी आतला मोठा हॉल टिनपाट होता व तेथेच नाणीघर. स्वतंत्र संडास नव्हता तर मालकांच्या संडासच उपयोगात आणावा लागत होता. पण एकंदर घराचा आसमंत फार घाण, गलिच्छ असून घर मालकाला मुलेही बरीच होती. घरमालकाची बायको मोठी जहांबाज गर्विष्ट होती. येथे फार दिवस टिकाव लागणार नाही असे वाटल्यामुळे ते घर सोडलं व गावाच्या आत एका विधवा बाईचे (नानी बाई) माडीवरचं घर होतं ते विटा - मातीचे होते. घर मोठ होतं. तसे स्वच्छ होतं पण जमिनीला फरशी नव्हती. या घरात असतानाच श्री. बाळासाहेब खपली यांचं तीन  खोल्यांचा बऱ्यापैकी फ्लॅट होता. सिमेंटच्या जमिनी

असून घर टुमदार होते व ते रिकामे होणार होते असे कळविल्याबरोबर या फ्लॅटच्या मालकाला आधीच भाडं दिलं (रु. २५/) व रिकामं झाल्याबरोबर घर ताब्यात घेतलं. येथे घराचा प्रश्न मिटला.

एकदंर शालेय जीवनातील महत्त्वाच्या घटना म्हणजे मी एक वक्ता म्हणून व चांगला शिक्षक म्हणून ओळखण्यात येऊ लागलो. साधारणपणे टिळक पुण्यतिथी, यू. एन. ओ. हे, शिवाजी जयंती, स्नेह संमेलन यामध्ये तसेच गांधी जयंती प्रसंगी मला प्रमुख वक्ता म्हणून बोलावे लागे. महत्त्वाची घटना म्हणजे 'विवेकानंद जयंती' हा कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणात 'मंगलधाम' च्या वसतीगृहात पार पडत असे व विवेकानंदावर बोलायला नागपूरहून विवेकानंद आश्रमातून वक्ते बोलावीत असत. मी असताना हा 'विवेकानंद जयंती' कार्यक्रम पार पाडण्याकरिता योग्य वक्ता मिळेना तेव्हा कार्यवाही (मुख्य) यांना चिंता पडली. काय करावं? तेव्हा त्यांना आमच्या हायस्कूलमध्ये श्री. देवगांवकर हे शिक्षक वक्ता म्हणून योग्य होतील कारण त्यांना विवेकानंदाबद्दल पुष्कळ माहिती असून ते खूप चांगले बोलू शकतील. त्याप्रमाणे मला विचारणा करण्यात आली. माझ्या पुढेही हे एक आव्हान होते; कारण श्रोतृवृंदांत मोठ - मोठे अधिकारी, एस्. डी. ओ. व विद्वान, सुशिक्षित लोक येणार होते. तेव्हा मी ठासून "हो" म्हणून होकार दिला व स्वामी विवेकानंदावरचं चरित्रात्मक एक मोठ पुस्तक होते त्याच प्रमाणे त्यावेळेस स्व. प्र. के. अत्र्यांचं 'मराठा' वर्तमानपत्रातून एक लिडींग आर्टिकल अग्रलेख आला होता

या सर्वांचा अभ्यास करून पाऊणतास न थांबता ओघवत्या वाणीतून भाषण केले. सर्वजण स्तिमीत झाले व माझी पाठ थोपटून माझे कौतुक केले. शिवाय वर्तमानपत्रातही मी विवेकानंदावर माहिती पूर्ण भाषण केले असं छापून आले होते. त्यातल्या मंगरुळपीर या गावात रा. स्व. संघांचं प्राबल्य व भा. ज. प. च सामर्थ्य जास्त.

माझ्या विवेकानंदावरील भाषणात ज्या त्यांच्या विधानामुळे त्यांना सर्व जगाकडून सन्मान व गौरव मिळाला ते त्यांचे सर्वधर्म परिषदेतील अमेरिकेतल्या भाषणातील विधान तसंच शिवाजी जयंती उत्सवात केलेल्या भाषणात "शिवरायांचा आठवावा अवतार, शिवरायांचा आठवावा संक्षेप, शिवरायांचे कैसे बोलणे, शिवरायांचे कैसे चालणे, शिवरायांची सलगी देणे कैसे असे?" या समर्थ रामदासांनी केलेल्या वर्णनाचा भाषणात उपयोग केल्यामुळे सर्व मंगरूळपीर भरच काय पण आजूबाजूच्या गावात माझं 'एक उत्तम व्याख्याता' म्हणून मला प्रसिद्धी मिळाली.

नंतरची महत्त्वाची घटना म्हणजे चीन भारतावर हिमालयाच्या लागून असलेल्या प्रदेशावर आक्रमण केले होते. त्यावेळेस चीनने केलेल्या आक्रमणाचा, निषेध म्हणून व भारतीयांची चीन विरुद्ध मने तयार करण्याकरता राष्ट्रीय कविता वा गीते प्रसिद्ध होत असत. उद्देश जनतेत राष्ट्रीय वृत्ती निर्माण झाल्यामुळे सारी जनता एक होऊन (पक्ष - पक्षातील भेद बाजूला सारून) राष्ट्रीय वृत्ती निर्माण करण्याची व राष्ट्र संरक्षणाकरता लोकात स्फुरण व आवेश

निर्माण करण्याची गरज होती ही गरज राष्ट्रीय गीते अथवा कविता (ज्यात प्रखर राष्ट्राभीमान व राष्ट्रप्रेम आहे) निर्माण करण्याने भागत होती. आपणही एखादे राष्ट्रीय गीत ज्यांत आक्रमक राष्ट्राचा - चीनचा - धिक्कार करून चीनबद्दल असंतोष निर्माण करणारे असे गीत तयार करावे असे वाटले. ते मी खालील प्रमाणे केले. कवितेचे शीर्षक होते.

**हिमगिरी आक्रमु - चीन म्हणे**

आकाशाला हात लावणे / सूर्य झाकणे हाताने
धारिष्ट्याची फोल कृती ही /
हिमगिरी आक्रमु स्वाभिमान जो मानदंड जो चीन म्हणजे
मूर्त धवल यश हिंदभूचे,
स्वारी त्यावर, म्हणजे आतां दिवस संपले चिनियांचे
किरीट असता हिंद देविचा अजिंक्य ऐसा हिमाचल
स्वारी त्यावर खचित चिन्यांचा आत्मनाश हा ये जवळ.... १

धवलगीरीला आक्रमीन मी असे जरी हा मशक म्हणे
धारिष्ट्याची फोल कृती ही, हिमगिरी आक्रमु चीन म्हणे.
काय चीनला नसे माहिती भारतीयांचा इतिहास
आकाशाहूनि उंच जयाचया असती आकांक्षा आस
शिरा वेगळी शूर कबंध लढली ज्यांची राष्ट्रार्थ
अशा सर्वे मग लढणे म्हणजे हास्यास्पद जे नाशार्थ
सर्वस्वाचा होम करूनि जो लढे मराठा प्राणपणे
धारिष्ट्याची फोल कृती ही - हिमगिरी
काय चीनला नसे माहिती भारतीयांची परंपरा
देशरक्षणी धर्मरक्षणी शूरपणामधी सिंह खरा
देशरक्षणी जेथिल होती, हरिण बालके सिंह शिशू....

शत्रूंना जे खडे चारिती, अटकेवरि जे विजीगीशू

सिंहाशी या टक्कर देणे, मत्तलाल या हत्तीने
धारिष्ट्याची फोल कृती ही, हिमगिरी....
ही राष्ट्रीय वृत्तीने, राष्ट्रीय अस्मितेनं, राष्ट्रीयतेनं
भरलेली स्वत: च्या राष्ट्राच (मातृभूमीच) चिन्या
पासून रक्षण करण्याच्या वृत्तीने; आदेशानं, स्फुरण

अशा आविर्भावात भरलेली कविता 'तरुण भारत नागपूर' मध्ये ठळक अक्षरात छापून आली होती. त्यामुळे सर्व स्टाफने व सहकाऱ्यांनी माझे विशेष कौतुक केले. मंगरुळपीरच्या जीवनात आणखी एक चांगली उल्लेखनीय घटना घडली. ती म्हणजे कारंज्याच्या नगरपालिका हायस्कूलचे मुख्याध्यापक, श्री वामनराव मकासदार यांची माझी ओळख झाली व त्यांच्या ओळखीमुळे मला नागपूर माध्यमिक शिक्षण बॉडीकडून वार्षिक परीक्षेचे इंग्रजी विषयाचे पेपर्स तपासण्याची संधी मिळायला सुरुवात झाली. थोडक्यात मी इंग्रजीचा (दहावी मॅट्रिकचा) एक्झामिनर परीक्षक म्हणून झालो. आर्थिक प्राप्तीच्या दृष्टीने हे एक जास्तीचं साधन उपलब्ध झालं. साधारणत: ३०० पेपर्स तपासण्याकरिता यायचे. साधारण १७५ ते १८० रु. मिळायचे. अर्थात ही एक्झामिनरशिप दरवर्षी येऊ लागल्या. आजूबाजूच्या गावात वाच्यता होऊ लागली. तेव्हा एक सावधगिरी म्हणून मी पेपर्स तपासताना अगदी मागच्या स्वयंपाक घराच्या खोलीजवळ जाऊन बसायचो व कोणी मला भेटायला आल्यास आपल्या पाल्याच्या इंग्रजी विषयात पास करवून द्या ही विनंती करण्याच्या हेतूने - तर त्याला, "मी घरी नाही म्हणून उत्तर द्या." असं घरच्या

मंडळींना सांगून ठेवलेलं होते. पण एका श्रीमंत पाटलाने मला मध्येच गाठलं. तो वरील उद्देशानेच मला भेटला. घरी आल्यावर त्याच्याशी गप्पा गोष्टी करतानाच त्यानं आपल्या मुलाचा परीक्षा रोल नंबर कागदावर लिहून दिला.

"तेव्हा तुम्ही काही काळजी करू नका, तुमचा मुलगा पास होईल." असे मी त्याला सांगितल्याबरोबर त्याने माझ्यापुढे रु. ५००/ - ठेवले. त्याला मी सांगितले याची काही गरज नाही. तुम्ही निर्धास्तपणे घरी जा. अर्थात त्याच्या तात्पुरत्या समाधानाकरिता ही मला थाप द्यावी लागली. तो गेल्यावर रोल नंबरची चिठ्ठी फाडून टाकली. एस्. एस्. सी. बोर्डाकडून येणारे ॲन्सर बुक्स उत्तर पत्रिका तपासताना परीक्षकाला सारी नीति - नियम पाळावे लागतात व असल्या बाह्य लोभाला तिलांजली द्यावी लागते. कारण आपण नीति - नियमांचे उल्लंघन करणार नाही या एका श्रद्धेने व विश्वासने ते आपल्याकडे पेपर्स तपासण्याकरिता पाठवीत असतात. शिवाय आपण लोभाला बळी पडलो व ही बातमी फुटली व चौकशी सुरू झाली म्हणजे भ्रष्टाचाराचा कलंक लागून नोकरी जाण्याची (गमावण्याची) पाळी यायची. अति लोभ नको व भ्रष्टाचाराच्या रुपानं येणारा तर मुळीच नको.

अति लोभात् ब्राम्हणा नष्टा: ।
अति लोभात् रावणः नष्टा: ।
अति सर्वत्र वर्जयेत् ।

पुढे निकाल लागल्यावर तो मुलगा इंग्रजीत नापास झाला. तेव्हा मला हायसं वाटलं. ते पाटील भेटल्यावर त्यानं

जेव्हा विचारलं व मला म्हणाला, "माझा मुलगा तर नापास झाला."

तेव्हा मी उत्तरलो, "अहो त्यानं सर्व प्रश्न सोडवल्यावर त्यास गुण मिळतील. दोनच प्रश्न सोडवून बाकीचा पेपर कोरा देणारा कोणता मुलगा या भूतलावर पास होणार आहे?"

तेव्हा त्यांचं समाधान झालं. पण एक सिद्धांत मनात बिंबित झाला. माणसाकडे एखादे जबाबदारीचे कर्तव्य सोपविले म्हणजे त्या कर्तव्याचे नीति नियम ते बजावयास व पार पाडावयास पाहिजे. कर्तव्यात असलेली अंगभूत नीति प्रदेश सोडणं म्हणजे तो भ्रष्टाचाराचा प्रकार समजावा.

मंगरुळपीर हे गाव अगदी बाजूला आत (इंटेरिअर) आणि खेडंच म्हणजे शहरवजा खेडं असल्यामुळे व एकंदर मर्यादित स्वरूपाचे असल्यामुळे व लोकही संकुचित वृत्तीचे असल्यामुळे - करमणुकीची विशेष साधन नसल्यामुळे येथे स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्याला तसा फार (स्कोप) संधी नव्हती. खेडवळ विचारसरणीची येथील जनता असल्यामुळे जरा मोठ्या गावात बदली करून घेण्याचा माझा मानस होता. शाळेच्या (इन्स्पेक्शन) तपासणीनंतर भरलेल्या शिक्षकाने सभेत मी सुपरिंटेंडंट ऑफ एज्युकेशनला स्वत:च्या खर्चाची बदली मागून घेतली. त्याप्रमाणे माझी वाशीमला बदली झाली व मी हे गाव सोडले.

# (४१) वाशीमला मिळालेलं मोठं कार्यक्षेत्र

वाशीमला मी १९६३ जूनला बहुउद्देशीय उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये कामावर रूजू झालो. वाशीमला मंगरुळपीरपेक्षा स्वत:चे कर्तृत्व दाखविण्याकरिता कार्यक्षेत्र मोठे होते. शिवाय रहाण्यासारखी घरं किंवा फ्लॅटस् होते. त्यामुळे येथे मला शोध व विचारपूस केल्यानंतर डॉ. खरे यांच्या घराजवळचे एक चार खोल्यांचे घर मिळाले. त्यांच्या आवारातच हे घर होते. शेजारी माझे हायस्कूलमध्ये काम करणारे सहाध्यायी शिक्षक श्री. दत्ता कुलकर्णी सायन्स शिकवणारे राहत होते.

मी स्वत:च्या खर्चात बदली करून घेतल्यामुळे येथे माझ्या आधी संस्कृत शिकवणारे श्री. वाय. टी. जोशी यांची मंगरुळपीरला बदली झाली. संस्कृत शिक्षक म्हणून माझे येथे चांगले स्वागत झाले. मुख्याध्यापक श्री. उपाध्ये होते. तेही संस्कृत शिकवित असत. मी संस्कृत शिक्षक म्हणून आल्यावर त्यांनी मला दहावीचं व नववीचं संस्कृत दिले व स्वत: ते अकरावीचं संस्कृत शिकवित असत. अर्थात कधी - कधी त्यांना काम फार पडले अथवा गैरहजर असले तर मला अकरावीचं संस्कृत घ्यायला सांगत.

विशेष उल्लेख करण्यासारखी घटना म्हणजे वाशीमला ठरलेल्या पाच - सहा शिक्षकांचा एक गट होता व ते या गटातले, हे शिक्षक सुट्टीच्या दिवशी एकत्र जमत असत. त्यांचे आपापसात काही कॉमन इंटरेस्ट असावेत व त्या गटामध्ये इतर कोणत्याही शिक्षकाला आत प्रवेश

नव्हता. त्यातले श्री. वाय. टी. जोशी यांची मंगरुळपीरला बदली झाल्यामुळे ते निघून गेले होते. बाजूला पडले. याची खंत या विशेष गटातील शिक्षकांना फार वाटत होती. त्यांना परत बोलावून घ्यावं म्हणून त्यांनी मुख्याध्यापक श्री. उपाध्ये यांना अर्ज केला होता व त्यांच्या जागेवर मी आल्यामुळे माझी बदली करावी अशी शिफारस केली होती. वाशीम हायस्कूल हे उच्च माध्यमिक विद्यालय (हायर सेकंडरी हायस्कूल) असल्यामुळे तिथे अकरावीचा एक वर्ग होता आणि मला संस्कृत शिकवण्याचा अनुभव असल्यामुळे मुख्याध्यापकांना समाधान वाटले होते. मी वर उल्लेख केलेल्या गटाचा अर्ज आल्याबरोबर त्यांनी उघडपणे या गटातील शिक्षकांना माझी बदली करण्याचे नाकारले होते व त्यांचा अर्ज वर जाऊ न देता परत या गटाकडे पाठविला होता. हे पाहून या गटातील शिक्षक खाली माना घालून चालू लागले होते.

नंतरची महत्त्वाची घटना म्हणजे वाशीमला मला नागपूर बोर्डाची एक्झामिनरशिप तर होतीच पण पुणे बोर्डाचीसुद्धा एक्झामिनरशीप होती व पुण्याला एक्झामिनरच्या सेमिनारला व प्रशिक्षणाला जावे लागले होते. शिवाय माझी नागपूर बोर्डाचा वार्षिक परीक्षेचा पेपर सेटर (अर्थशास्त्र व संस्कृत या विषयाचा) म्हणून नेमणूक झाली होती. विशेषत: संस्कृतचा अकरावीचा पेपर सेटर म्हणून नागपूर बोर्डात नेमणूक झाल्यामुळे अकरावीला संस्कृत शिकविणाऱ्या मुख्याध्यापकाला आपल्या कनिष्ठ हाताखालच्या शिक्षकाला संस्कृत पेपर सेटरच संधी

मिळावी याबद्दल त्यांना अवमानित वाटत होते. मी जवळजवळ सहा वर्षे पेपर सेटर, एक्झामिनर नागपूर बोर्डाचा असल्यामुळे पेपर सेटिंगकरता नागपूरला लावे लागत असे. तसेच मॉडरेटरपण होतो ६ वर्षे.

पुणे बोर्डाचा इंग्रजी विषयाचा एक्सामिनर पण सहा वर्षे होतो. पुणे बोर्डाची मॉडरेटरशीप होती पण ती नाकारली. कारण कामाचा खूप बोजा आधीच होता, यात एकच लाभ म्हणजे थोडी आर्थिक प्राप्ती होती.

येथील सर्व शिक्षकांच्या डोळयात येण्यासारखी घटना म्हणजे मुख्याध्यापकांनी मी केवळ सहा महिन्यांनी माझ्याबरोबरचे सहाध्यायी शिक्षक श्री. शेवडेकर यांच्या पेक्षा सिनिअर होतो म्हणून मला होस्टेल सुपरिंटेंडन्ट होण्याची संधी दिली होती. मी बहुतेक ही नवी नेमणूक स्वीकारणार नाही माझ्या बहिरटपणामुळे (मशिन हिंअरिंग एड वापरीत होतो म्हणून) पण मी ती स्वीकारली व सर्वांनी आश्चर्याने तोंडात बोटे घातली. या सुपरिंटेडंटच्या नेमणुकीमुळे मला क्वॉर्टर्स मोठा बंगला राहण्यास मिळाला व माझे घरभाडे वाचले. पहिल्या सुपरिटेंडेंटची बदली, बदनामी झाल्यामुळे झाली होती. तशी बदनामी माझी पण करण्याचा प्रयत्न झाला; पण ईश्वर कृपेने मी तावून सुलाखून बाहेर पडलो.

**केवळ मत्सरामुळे आपल्याच माणसाचे पाय मागे खेचणे त्याची कोंडी करणे हा महाराष्ट्रीय लोकांचा विशेषतः ब्राम्हणांचा एक विशेष अवगुण आहे.** या अवगुणाचे दर्शन येथे मला मिळत असलेल्या उत्कर्षाच्या संधींचा लाभ

घेताना झाले. पण जितक्या एखाद्या माणसाच्या उत्कर्षाचा मत्सर केला जातो पण याचा परिणाम त्या माणसाचा अधिकाधिक उत्कर्ष होण्यात होत असतो हा एक दैवी सिद्धांत आहे. असो.

माझा उत्कर्षाचा मत्सर वाटायला आणखी दुसरंही एक कारण आहे. मी होस्टेल सुपरिटेंडंट झाल्यामुळे मी होस्टेलचा स्वतंत्र गणपती उत्सव सुरू केला; एकतर मी हा जो नवीन उत्सव सुरू केला त्यामुळे मुख्याध्यापक तर खुश झालेच कारण त्यांच्याही मनात मी असे काही होस्टेलमधील विद्यार्थांच्या हिताच्या दृष्टीने करावं असं होतं व त्यांची मला १०० टक्के मदत व साथ मिळाली.

पण कार्यक्रमांना इतर शिक्षक वर्ग होस्टेलमधील गणेशोत्सवाच्या कार्यक्रमांना हजर राहत नव्हते. अर्थात सर्व शिक्षकांची (गैरहजर राहणाऱ्या) त्यांनी खरडपट्टी काढली. मग मी हायस्कूलच्या टाईम टेबलमधील सहावा, सातवा पिरिअड या दोन तासात कार्यक्रमाचे प्रयोग केले व सर्व शहरातील मोठमोठ्या अधिकारी वर्गाच्या लक्षात यावं म्हणून जनरल डिबेटचा कार्यक्रम. खूप गर्दी होती कार्यक्रमाला.

होस्टेल सुपरिटेंडंटचं काम फार जोखमदारीचं व जबाबदारीचं असल्यामुळे मला डोळयात तेल घालून काम करावं लागते असे. हायस्कूलमधील शिक्षकाचं काम व त्याच्या जोडीला सुपरिटेंडंटचं काम. यामुळे माझ्या डोक्यावर कामाचा बोजा खूपच वाढला होता. मी बंगल्यामध्ये सिक्युरिटी सुरक्षिततेच्या दृष्टीने बऱ्याच

सुधारणा करून घेतल्या होत्या. लोखंडी खजिना (ट्रेझरी) होती त्यात कॅश असल्यामुळे पैशाची जबाबदारी. माझ्या जीवनाच्या दृष्टीनं विशेष लाभ म्हणजे माझ्या मोठमोठ्या लोकांच्या, पुढाऱ्यांच्या अधिकाऱ्यांच्या, समाज सेवकांच्या नवीन ओळखी होऊन मला नवनवीन अनुभव मिळत गेले की जी माझ्या आयुष्याच्या शिदोरीतलाच एक भाग होता. टक्केटोणपे खाल्यामुळे मनातली भिती नाहीशी झाली व कार्यक्षमता वाढून मनानं कणखर होत गेलो.



# (४२) होस्टेल बंद पाडलं

(पत्नी आगीत भाजून निघाल्यामुळे झालेला अपघात)

मी होस्टेल सुपरिटेंडंट असताना ते बंद पाडण्याच्या आमच्या हितशत्रूंच्या कारवाया सुरूच होत्या. मी मागे सांगितल्याप्रमाणे मानवी जीवनाच्या उत्कर्षाबरोबरच कालांतराने त्याची अपकर्षाचीपण वेळ येत असते. 'उन्नत्वाला अवनति असे चक्र नेमा' प्रमाणे -

**कस्कान्त सुखमुपगतं दुःखमे कान्तोवा ।**

**नीचैः गच्छति उपरिच दशा चक्रनेमिक्रमेणं ।**

उत्तम दशेनंतर वा परिस्थिती यावयाची असल्यास तशा घटना घडण्यात हळूहळू सुरुवात होत जाते. तशीच परिस्थिती झाली. मला ज्यांनी होस्टेल सुपरिटेंडंट केलं होतं ते मुख्याध्यापक श्री. उपाध्ये यांचे अकस्मात हाय ब्लड प्रेशरमुळे निधन झाले. त्यामुळे दुसरे मुख्याध्यापक श्री. काळे त्यांच्या जागेवर आले. या आधी होस्टेल बंद पाडलेच होते व तीन वर्षे होस्टेल चालल्यानंतर ते बंद पडले तरी कायद्याप्रमाणे मी पगाराच्या १०% भाडं देत असे. पण होस्टेल क्वॉर्टर्स सोडले नाहीत.

माझ्या हितशत्रूंशी नवीन मुख्याध्यापक श्री. काळे यांनी होस्टेल क्वॉर्टर्स यांना तुम्ही होस्टेलमध्ये राहण्याकरिता जी मुले वा विद्यार्थी येतील त्यांना सांगा की, पुन्हा होस्टेल सुरू होत नाही व होस्टेलमध्ये राहण्याकरिता कोणाही विद्यार्थ्याला परवानगी देण्यात येणार नाही. त्याप्रमाणे अर्थात होस्टेल बंद झाल्यामुळे मी पगाराच्या

दहा टक्के (शासनाच्या नियमाप्रमाणे) सुपरिंटेंडेंटच्या क्वॉर्टर्सचे भाडे भरून राहू लागलो. पण मुख्याध्यापकांना इतर शिक्षकांनी फूस दिल्यामुळे ते मला होस्टेलचे क्वॉर्टर्स त्यांना कुंटुंबियासहीत राहण्याकरिता रिकामे करून मागू लागले. अर्थात मी काही दिवस जरी नेट धरून राहु लागलो तरी शेवटी मी मुख्याध्यापकाचा सबॉर्डिनेट असल्यामुळे व ते माझे मुख्याध्यापकाच्या खुर्चीवर असलेले अधिकारी असल्यामुळे मला होस्टेल क्वॉर्टर्स सोडणं भाग पडले.

मग गावातही भाड्याची जागा ताबडतोब मिळेना म्हणून होस्टेलच्या स्वयंपाकाच्या हॉलमध्ये संसार थाटला. मी जरी हॉलमध्ये राहत होतो तेथे रात्री छपरावर दगड येऊ लागले (मुख्याध्यापकाच्या सूचनेवरून). थोडक्यात मी गावात घर पाहावे हा त्यांचा या पाठीमागे दडलेला हेतू. थोड्याच दिवसात शोधा - शोध करून मला देव पेठेत एक घर मिळाले पण ते अपुरे असून व समाधानकारक नसल्याने शुक्रवार पेठेजवळ नगरपालिकेजवळ नुकतेच नवीन बांधलेले तीन रूम्सचे सिमेंट काँक्रिटचे घर मिळाले. त्यात पण काही गैरसोयी होत्या. म्हणून शुक्रवार पेठेतच चार रूम्सचे मनाजोगते घर मिळाल्यावर घराचा प्रश्न सुटला.

पण या घरात रहावयाला आल्यानंतर माझी सख्खी बहीण व मेहुणे आले असताना; स्टोव्हचा भडका उडून माझ्या पत्नीला आग लागून फार मोठा अपघात झाला. (विशेषत: कमरेखालचा भाग) त्यावेळेस मी व माझे मेहूणे घरी नव्हतो. तिला आमच्या शेजारी राहणाऱ्या घरमालकाने वेळीच दक्षता दाखवून वाशीमला असलेल्या

मिशन हॉस्पिटलमध्ये अँडमिट करून घेतले. तिला कमरेखाली आगीने भाजल्यामुळे फार मोठ्या जखमा होऊन फार त्रास झाला. या अपघातातून बरी होण्यास व जखमा बुजून येण्यास जवळ - जवळ पाच - आठ महिने लागले. माझ्या पत्नीच्या आलेल्या या जीवावरच्या संकटातून ती श्री. गजानन महारांच्या कृपेने बचावली.

याच वेळेस रिपेट्रेशनमुळे (मी. झेड. पी. च्या हाताखालच्या नोकरीत न राहता सरकारी नोकरीचा ऑपशन दिल्यामुळे) माझी अमरावतीस दोन महिन्याकरता बदली झाली व नंतर माझी आकोल्यास बदली झाली.

पण मला वाशीम ट्रेनिंग कॉलेजमध्ये बदली पाहिजे असल्यामुळे ज्या अध्यापकाला आकोला पाहिजे होते पण वाशीम नको होते अशा शिक्षकाशी दरबदली करून वाशीमच्या लाखाळा (वाशीमपासून दोन मैल अंतरावर असणाऱ्या) ट्रेनिंग कॉलेजमध्ये बदली करवून घेतली; कारण या कॉलेजमधील लेक्चररला स्वतंत्र क्वॉर्टर्स होते व त्याप्रमाणे मी लाखाळा कॉलेजमध्ये लेक्चररच्या जागेवर रूजू झाल्यावर माझा नित्यनैमित्तिक कार्यक्रम सुरू झाला.

# (४३) माझे लाखाळयातील ट्रेनिंग कॉलेज जीवनातील अनुभव

वाशीमपासून साधारण दोन मैल अंतरावर शासकीय अध्यापक विद्यालय (गर्व्हमेंट ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन) होते. कॉलेजची इमारत भव्य व मोठी असून येथे शिक्षक (माध्यमिक व लोअर माध्यमिक) स्कूलमध्ये नोकरी करीत असलेले विद्यार्थी म्हणून शिकायला येत असत किंवा ज्यांना पुढे शिक्षकाची नोकरी करावयाची आहे असे विद्यार्थी येत असत. येथेच मी लेक्चरर (प्रशिक्षकीय अध्यापक) म्हणून बदली झाल्यामुळे कामावर रूजू झालो. आतापर्यंतच्या माझ्या उच्च माध्यमिक विद्यालयातील अध्यापकाच्या नोकरीपेक्षा ही नोकरी त्या मानानं सुखाची होती. ही नोकरी सुखाची होती असे मी का म्हणतो याची कारणे अशी एकतर येथे लेक्चरर करता राहावयास स्वतंत्र क्वॉर्टर्स होते. दुसरं कॉलेजची इमारत दोन मिनिटांच्या रस्त्यावर होती. तिसरं येथे कामाचे तास फार कमी दिवसातून दोन - तीन होते. माझ्याकडे 'अ' क्लासचा इतिहास - मराठी व 'क' क्लासचे मराठी. शिवाय संगीताला कोणी शिक्षक न दिल्यामुळे आठवड्यातून दोन पिरीयड घ्यायला लागायचे.

मुख्य विशेष की ज्याचा मी उल्लेख करण्याची गरज आहे तो म्हणजे मी ज्या अध्यापनाच्या प्रांतांत आलो तो प्रांतच वेगळा होता. येथे मला ज्या विद्यार्थ्यांना

शिकवावयाचे होते ते शिक्षकी पेशात असलेले अथवा शिक्षकी पेशा करू इच्छिणारे होते. त्यामुळे हे विद्यार्थी वयाने मोठे, थोडे अनुभव असलेले, २५ ते ३० च्या वयातील २ - २, ३ - ३ मुलांचे बाप असलेले असे होते आणि त्यांना कोण - कोणते विषय कसे - कसे समजावून द्यायचे याचे मुलांना कसे शिकवायचे प्रशिक्षण त्यांना द्यावयाचे होते. प्रौढांनी लहान मुलांना समजावून दाखवून देणारी विशिष्ट शिक्षण पद्धती त्यांना सांगावयाची होती. अर्थात माझ्याकडे शिक्षणाचा पेशा चार - पाच वर्ष करीत असलेले, विद्यार्थी (५० - ६०) होते. त्यांना मला त्यांनी कसे शिकवून दाखवावे हे सांगताना काही गोष्टी अथवा वैशिष्ट्ये खाली दिली आहेत.

पाठांतराची गरज: मुलांना विषय समजावून दाखवताना पाठांतराचा उपयोग करून सांगण्यात मुलांच्या मनावर तो विषय अथवा मुद्दा जास्त परिणामकारक रित्या ठसावा, मुलांचे विषयाशी तादात्म्य पावण्यास मदत होते. मी येथे सर्व विस्तृत माहिती देत नाही. पण थोडक्यात काही उदाहरणे देऊन सांगतो - अनुप्रासाचे उदाहरण देताना व महत्व सांगताना -

वाजीचे मन जाणता सकलही राजा शिपाई जया त्यांना होऊनिया द्विजास म्हणल्या जीधते घ्यावया त्याजी तो धनदापरी सुकृत जो त्यांची व असे गणी गाजी गाजी गुणाच्या गणी अधारे तो नळ भूपहूप धस्ती.

त्याचवेळी माझा मोठा मुलगा चि. शेखर हा नववीच्या वर्गात व धाकटा मुलगा पाचवीत बाकलीवाल

विद्यालयात गेला. लाखाळा ही ट्रेनिंग कॉलेजचीच एक वसाहत सर्वसाधारण दोन कि. मी. अंतरावर वाशीमपासून वसलेली आहे. लाखाळा वाशीम येथे आल्यानंतर मला तेथे राहण्याकरिता चार नंबरचा बंगला मिळाला. दरम्यानच्या काळात माझी एक दोन सर्दी, खोकला व ताप अशी दुखणी सुरू झाली. त्या पावसाळ्यातील हवेत मला अशा प्रकारचा त्रास नेहमीच होत असे.

त्यानुसार दिनक्रम सुरू असताना एके दिवशी माझे शेजारील बंगल्यातील स्नेही व मित्र श्री. बेलोकर सहज गप्पा मारण्यासाठी माझ्याकडे आले होते. बोलण्याच्या दरम्यान त्यांचा भाऊ एम्. एस्. सर्जन अमेरिकेत असून तो वाशीमला येणार असल्याचे त्यांनी मला सांगितले. मला पोटाचा विशेषत: अमेबीक डिसेंट्रीचा त्रास फार दिवसापासून होता. तेव्हा ते आल्यावर त्यांचा सल्ला घेण्याचा मानस मी बोलून दाखविला व त्यानुसार त्यांनी त्यांच्या भावास माझ्याकडे घेऊन आले. डॉ. बेलोकर यांनी मला त्या काळात उपलब्ध असणाऱ्या मेक्झॉफॉर्मच्या गोळ्या सहा महिने ते एक वर्षापर्यंत सततपणे घेण्याचा सल्ला दिला व त्यानुसार मी त्या गोळ्या घेऊ लागलो.

मधल्या काळात शासकीय शिक्षण खात्याने आमच्या सर्व ट्रेनिंग कॉलेजमधील व व्याख्यात्यांचे सेमीनार पुण्यास आयोजित केले होते व सर्वांना जाणे आवश्यक होते. त्याप्रमाणे मी पण पुणे येथे जाणेच्या तयारीला लागलो. परंतु पुण्याला जाण्यासाठी अकोला शहरात जाऊन रेल्वेने जाण्याचे आरक्षण केले असताना आदल्या दिवशी माझ्या

पोटात भयंकर व प्रचंड प्रमाणात दुखू लागले. वेदना अत्यंत प्रचंड प्रमाणात होत्या. सकाळी उठून आमचे नेहमीचे फॅमिली डॉक्टर डॉ. वि. त्र्य. पंचभाई, असिस्टंट सर्जन, वाशीम ह्यांच्याकडे जाऊन त्यांना दाखवल्यानंतर त्यांनी मला एक बॅरलगनचे इंजेक्शन दिले व पुण्यास जायला हरकत नाही असे सांगितले.

पुण्याला जाण्याकरिता आकोल्याला जाऊन रेल्वेमध्ये प्रवास करीत असताना रात्री पोट दुखण्याच्या वेदना फार मोठ्या प्रमाणात वाढल्या व रात्रभर रेल्वेमध्ये पोट दुखणे सहन करावे लागले.

साहजिकच पुण्याला पोचल्यावर सेमीनारसाठी जाण्याऐवजी मला माझे येथे पुण्यात त्यावेळी हिंदुस्थान अँटीबायोटीक्स, पिंपरी येथे कामाला असणारे साडू श्री. गोपाळराव देशपांडे यांच्या घरी, सदाशिव पेठ, टिळक रोड येथे जावे लागले. परंतु त्यांच्या डॉक्टरांनी उपचार करूनसुद्धा मला त्यावेळी कोणताही आराम पडला नाही व सरते शेवटी माझी मावस बहीण व तिचे पती डॉ. उर्सेकर व डॉ. सौ. बेबी उर्सेकर यांच्याकडे गेल्यावर त्यांनी रात्री तीन वाजता ससून सामान्य रुग्णालयात अॅडमिट होण्यास सांगितले व तशी चिठ्ठी दिली. त्यानंतर माझे साडू श्री. गोपाळराव देशपांडे यांनी मला मेल जनरल वॉर्डमध्ये रात्री अॅडमिट केले. पोटदुखीमुळे बऱ्याच कालावधीपर्यंत लघवी न झाल्यामुळे कृत्रीम मुत्रनलीका (कॅथेटर) घालून लघवी काढावी लागली. त्यावेळेस झालेल्या मरणप्राय वेदना अजूनही अंगावर काटा आणतात. कॅथेटर घालून लघवी

काढणेची प्रक्रिया अत्यंत वेदनामय असून त्यापेक्षा मरण बरे असे वाटते. परंतु नाईलाज असतो व आपल्या जीवनावरील व आपल्या बायको, मुलगे यांच्या प्रेमापोटी माणूस अतिशय तीव्र दु:ख व वेदना सहन करतो.

मला ज्या मेल वॉर्डमध्ये ठेवण्यात आले होते त्या वॉर्डची इनचार्ज पारशी मेहताबाई म्हणून होत्या. शस्त्रक्रिया व वैद्यकीय शास्त्रात अत्यंत तज्ञ व हुशार व कामात अत्यंत कडक अशी त्यांची प्रसिद्धी होती. सांगण्यासारखी एक गोष्ट वाटते ती म्हणजे डॉ. मेहताबाई या स्वत: एक मोठ्या सर्जन विशेषत: कॅन्सर सर्जन असूनसुद्धा त्यांच्या तोंडात नेहमी कायमपणे फोर स्क्वेअर किंग साईज सिगारेट असायची. त्यांना कधीही बघितले तरी त्यांच्या तोंडातील मोठ्या सिगारेटमधून त्या धूर सोडतच वॉर्डमधील राऊंड घेत असत व त्यावेळी त्यांचा दरारा फार मोठा होता. मला तपासल्यानंतर त्यांनी तात्पुरती उपचार योजना म्हणून टेबकॅटस् बॅरलगन व बेलाहीनल इन दिल्या होत्या. त्या वॉर्डमधील असणाऱ्या शिकाऊ डॉक्टरांनी (सर्जन्सनी) माझे निदान किडनी स्टोन म्हणजेच रिनल कॅलक्युलस असे केले व त्याप्रमाणे त्यावर शस्त्रक्रिया करण्याची पूर्ण तयारी केली होती.

दुसऱ्या दिवशी रिलन कॅलक्यूलसचे ऑपरेशन पूर्व राऊंडच्या वेळी डॉ. मेहताबाई सिगारेट ओढत आल्यावर नवशिकाऊ डॉक्टरांच्या निदानावर हास्यास्पद टिका केली व असे ऑपरेशन करण्याआधी आय. व्ही. पी. (इंट्रा व्हेनस पायलोग्राफी) केली का व केली नसल्यास का केली नाही

अशी विचारणा केली. त्यानंतर शिकाऊ डॉक्टरांनी ऑपरेशन कॅन्सल केले व आय. व्ही. पी. केल्यावर त्यात किडनी स्टोनचे निदान कोठेही न झाल्यामुळे डॉ. मेहताबाई यांनी बस्तीमा (एनीमा) ही तपासणी करण्यास सांगितले व त्यावरून मी दीर्घकालीन घेतलेल्या मेक्झाफॉर्म मुळे डिसेंडींग कोलायटीस (म्युकस कोलायटी व रोटेशन ऑफ किडनी) असे निदान चिकित्सा अत्यंत योग्यपणे करून त्यावर औषध योजना योग्यपणे केली व एका मोठ्या जीवघेण्या दुखण्यातून मी नशीबाने व माझे गुरु श्री. गजानन महाराज, शेगाव यांच्या कृपेने बचावलो.

दरम्यानच्या काळात माझ्याबरोबर आलेले स्टाफ मधील व्यक्ती वाशीमला जाऊन त्यांनी ही सर्व माहिती माझी पत्नी सौ. शकुंतला हिला सांगितली व दोन - चार दिवसात दोन्ही मुले व पत्नी पुण्यास आली व आल्यावर लगेचच मला भेटण्यास ससून हॉस्पिटलमध्ये आली. तेव्हा मी पूर्ण बरा झाला होतो. त्यानंतरच्या काळात मी परत लाखाळा वाशीम येथे आलो व पुन्हा माझा दिनक्रम सुरू झाला.

मधल्या काळात माझी दोन्ही मुले चि. शेखर व चि. राजेश यांची काही दुखणी, टॉयफॉईड वगैरे आले. इसवी सन १९७१ - १९७२ मध्ये माझा मोठा मुलगा मॅट्रिक म्हणजे दहावीच्या वर्गात गेला व धाकटा मुला चि. राजेश सहावीच्या वर्गात गेला. माझा मोठा मुलगा पहिल्यापासूनच अभ्यासात हुशार होता. तसेच त्याने सायन्स घेतले होते व डॉक्टर होण्याचा त्याचा मानस होता.

वर्गात तो नेहमी पहिला किंवा दुसऱ्या नंबरात येत असे. तसेच त्याची मार्काची टक्केवारी ७० - ८० (त्या काळात) एवढी होती. माझा मोठा मुलगा चि. शेखर याने एस्. एस्. सी. मॅट्रिकची परीक्षा दिली व आणखी एक अडचण त्यानंतर माझ्या पुढे उभी राहिली.

माझी पत्नी सौ. शकुंतला हिच्या आई स्व. सौ. ताईसाहेब या आजारी असल्याचे कळले. त्याकरिता माझी दोनही मुले, मी व माझी पत्नी मिरज येथे गेलो. त्या ठिकाणी स्व. सौ. ताईसाहेब यांना ॲडमीट केले होते. पत्नी व मुले यांना सोडून मी उन्हाळयाच्या सुट्टी आधी परत वाशीमला परत आलो. दरम्यानच्या काळात माझ्या सासूबाई व पत्नीच्या आई स्व. सौ. ताईसाहेब यांचे निधन झाले. त्यावेळी पत्नी व मुले कुरुंदवाडला असल्यामुळे मी परत उन्हाळयाच्या सुट्टीत कुरुंदवाडला परत गेलो.

दरम्यानच्या काळात माझा मोठा मुलगा ७१ टक्के पेक्षा जास्त मार्कस् मिळवून मॅट्रिक परीक्षा पास झाला. तसेच धाकटा मुलगा पण इयत्ता सहावीत चांगल्या मार्कानी पास होऊन इयत्ता सातवीत गेला. माझा मुलगा सायन्स कोर्सला असल्यामुळे पुढे कॉलेज शिक्षणासाठी मी त्याला अमरावती च्या व्ही. एम. व्ही. या कॉलेजात व वसतीगृहात ॲडमिशन घेतली व शिकण्यासाठी त्यास वसतीगृहात अमरावती शहरात ठेवले. माझा मोठा भाऊ स्व. राजाभाऊ व त्याची मुले व माझे पुतणे चि. विजय, चि. बंडू वगैरे पण अमरावती शहरातच स्थिर झाले होते. त्यामुळे मोठ्या मुलाला अमरावती शहरात ठेवण्यात मला योग्य वाटले.

माझा मोठा मुलगा अमरावती शहरात कॉलेज शिक्षणासाठी गेल्यानंतर माझ्या ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सीपॉल व्ही. टी. जोशी यांनी मी मुलाकडून अंगठी घेतली अशी तक्रार केली व त्याकरिता चौकशी करण्यासाठी शिक्षण उपसंचालक श्रीमती आयेशा बेगम ही बाई आली. वास्तविक पाहता हा व्ही. टी. जोशी प्रिन्सीपॉल माझा पहिल्यापासूनचा मित्र, शिवाय वेळोवेळी तो माझ्याकडून पैसे उसने घेत होता व परत देत नव्हता. माझ्याकडे असताना मला न विचारता अनेक शासकीय फर्निचर, बॅरल वगैरे मी मित्र या नात्याने त्याची नोंद न करता या प्रिन्सीपॉल व्ही. टी. जोशीने नेले होते. इतके उपकार करूनही हा माझ्याशी अत्यंत कृतघ्नपणे वागला.

शिक्षण उपसंचालक आयशा बेगम हिने चौकशी करूनही मला अंगठी मुलांनी दिलेली आहे हे सिद्ध झाले नाही परंतु तीन वर्षे पूर्ण झाली म्हणून तिने माझी बदली बुलढाणासारख्या दुर्गम ठिकाणी केली. मी बदलीस विरोध केला व अनेक वेळा अमरावतीस जाऊन मला बुलढाणा तब्बेतीस झेपत नाही व त्या ऐवजी दुसरे गाव देण्याचा आग्रह धरला. या प्रसंगातून न्याय मिळवण्याकरिता मला फार झगडावे लागले. शेवटी माझी बुलढाणा येथील बदली कॅन्सल करून मला अकोला या शहरात त्या बाईने बदलीची ऑर्डर दिली व आकोल्याला एका साध्या कौलारू घरात जठार पेठेत भाड्याने घर घेऊन मी अकोल्याच्या कॉलेजमध्ये कामावर रूजू झालो, कारण अकोला शहरात भाड्याने घरे मिळण्याची अत्यंत टंचाई व दुर्मिळ होते.

# (४४) मोठ्या मुलाला दत्तक दिले व अकोला शहरातील जीवन

माझ्या सासूबाई म्हणजे पत्नीच्या आई स्व. सौ. ताईसाहेब यांचे इसवी सन १९७१ साली निधन झाल्यानंतर माझे श्वशूर स्व. मुक्तेश्वर तेरवाडकर, इनामदार हे एकटेच पडले. त्यांच्या मदतीला म्हणून माझ्या पत्नीची धाकटी बहीण चि. निर्मला उर्फ नमू तिच्या पतीसह सासरे व त्यांच्या मदतीसाठी बेळगाव येथे येऊन राहिले. अर्थात माझे साडू बेळगावला असताना बेकार होते. त्यांचे नाव भालचंद्रराव. त्यांना स्वत:ची उपजीविका चालवणे अवघड झाले व त्यांनी सहकुटुंब कुरुंदवाडला स्थलांतर केले. माझे साडू स्वर्गीय भालचंद्रराव यांना दोन मुलीच होत्या, तर दुसरे साडू श्री. गोपाळराव यांना तीन मुली व एक मुलगा होता. परंतु ते सर्व वयाने अगदीच लहान होते. माझ्या वाशीम, अकोला बदलीच्या दरम्यानच माझे सासरे यांनी माझ्या पत्नीकडून 'माझा मोठा मुलगा त्यांना दत्तक देणार का?' याची विचारणा केली होती. याचे कारण साहजिक होते, एकतर आपल्या धर्माप्रमाणे पुत्राशिवाय सद्गती मृत्यूनंतर मिळत नाही अशी एक अंधश्रद्धा आहे, तसेच ते इनामदार असल्यामुळे त्यांच्याकडे बऱ्यापैकी प्रॉपर्टी व पैसा असेल अशी लोकांची समजूत होती. (प्रत्यक्षात त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्याजवळ फारशी कॅश किंवा प्रॉपर्टी निघाली नाही, फक्त ४० एकर कोरडवाहू व ६ ते ८ एकर बागाईत जमीन व राहते घर एवढीच प्रॉपर्टी निघाली. हा भाग

वेगळा). त्याबाबत मी माझा मोठा भाऊ स्व. राजाभाऊ, मधला भाऊ स्व. वसंत व माझी धाकटी बहीण सौ. बेबी ह्यांच्याकडे विचारणा केली असता धाकटी बहीण सौ. बेबी व मोठा भाऊ स्व. राजाभाऊ यांनी दत्तक देण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही असे कळविले. तसेच माझे मधले भाऊ स्व. वसंत याने पण त्याची कोणतीही हरकत नाही असे कळवून **'आफ्टर ऑल वुई आर सन्स ऑफ गॉड' (आपण शेवटी सगळेजण देवाचेच किंवा परमेश्वराचे लेकरे आहोत.)** अशा उत्कृष्ट शब्दात होकार व संमती कळवली. माझा मुलगा चि. शेखर यास दत्तक देण्यामागे माझा कोणताही पैशाचा किंवा आर्थिक फायदा मिळवण्याची आशा नव्हती. परंतु माझे सासरे यांनी वेळोवेळी अडचणीच्या काळात अनेक स्वरूपात मला मदत केली होती. तसेच मला मुलगी नसल्यामुळे आपल्याला कन्यादान करता येणार नाही त्याची भरपाई पुत्रदान करून करावी या एका उदात्त हेतूने मी माझ्या मोठ्या मुलास चि. शेखर यास माझे श्वशुर स्व. मुक्तेश्वर बापूजी तेरवाडकर इनामदार यांना दत्तक दिले व हा दत्तक विधी इसवी सन १९७२ सालच्या सर्वसाधारण ऑगस्ट महिन्यात पार पडला. त्यानंतर मी परत आकोल्याला आलो व माझा मोठा मुलगा दत्तक विधान झाल्यानंतर परत अमरावती येथे प्री - डिग्री कॉलेज शिकण्यासाठी परत गेला.

मधल्या काळात माझा पुतण्या मोठ्या भावाचा मुलगा चि. जयंत याचा प्रेमविवाह सोनार जातीतील मुलीशी झाला. त्याला पुराण मतवादी लोकांनी बराच

विरोध केला होता तरी मी स्वत: हून माझ्या पुतण्यासाठी पुढाकार घेऊन आंतरजातीय विवाह करण्यास प्रोत्साहन व संमती दिली. तद्नंतरच्या काळात अकोल्याला मी दोन घरे बदलली व तिसरे घर मला अकोला शहराच्या चांगल्या अशा रामदास पेठ व गड्डुम प्लॉटस्‌मध्ये चार खोल्यांचे आर. सी. सी. चे १२५/- रु. प्रति महिना भाड्याने मिळाले. घर प्रशस्त, मध्य वस्तीत, मोकळे, पुढे मागे अंगण वगैरे त्या काळातील घरानुसार चांगलेच होते.

माझा मुलगा १९७२ - १९७३ साली प्री डिग्री चांगल्या मार्कांनी पास झाल्यानंतर मी त्याला १९७३ - १९७४ साली बी. एस्सी. भाग येथे अकोला येथील आर. एल. टी. सायन्स कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. मी अकोल्यालाच राहत असल्यमुळे माझ्या मोठ्या मुलाजवळ अकोला सायन्स कॉलेजमध्ये आणणे सर्व दृष्टीकोनातून सोयीचे झाले. अकोला शहरात माझ्या मोठ्या मुलाला सायन्स कॉलेजमध्ये प्रवेश मिळाल्यानंतर त्याला अमेबीक डीसेंट्रीची सारखी तक्रार सुरू झाली. तशातच मी त्याला ड्रॉप इयर घेण्यास सांगणार, परंतु माझे श्वशुर मधल्या काळात कोकोनीक कारसीनोमा कोलॉनचा कॅन्सर यांनी आजारी पडले व माझा मोठा मुलगा चि. शेखर ज्याला मी दत्तक दिले होते तो व पत्नी या कुरुंदवाडला जाऊन आमचे श्वशुरांना पुण्यास आणून रूबी हॉल क्लीनीकमध्ये अॅडमीट करावे लागले. त्या ठिकाणी त्यांचे ऑपरेशन व कोलोस्टॉमी केल्यामुळे माझी पत्नी सौ. शकुंतला व मोठा मुलगा चि. शेखर यांना पुण्यातच दोन ते तीन महिने राहणे भाग पडले.

त्यामुळे मी व माझा धाकटा मुलगा चि. राजेश आम्हाला दोघांना एकटेच अकोल्यास राहावे लागले. त्यातच माझा धाकटा मुलगा चि. राजेश याची एस्. एस्. सी. ची परीक्षा व माझे दुखणे, स्वयंपाक घरीच करणे, धुणी भांडी करता बाई आमच्या घरात तेव्हा फक्त पुरुष माणसे असल्यामुळे येत नव्हती, त्यामुळे सर्व स्वयंपाक, भांडी घासणे, कपडे धुणे, मागील सर्व आवरणे या सर्व गोष्टी मी व माझा धाकटा मुलगा चि. राजेश यांना करावे लागले. मधल्या काळात मी पुण्याला जाऊन श्वशुरांना दोन वेळा बघून आलो, परंतु त्यांची तब्येत खालावतच गेली. माझे श्वशुरांनी कोणतेही मृत्यूपत्र करून ठेवले नव्हते. तेव्हा त्याची काळजी माझे पत्नीचे धाकटे मामा स्व. वसंतराव दाणी व मोठे मामा सरदार विंचूरकर यांना सततपणे भेडसावत होते. सरतेशेवटी धाकटे मामा स्व. वसंत मामा दाणी जे पुण्यातच रास्ता पेठेत राहत होते. त्यांनी माझे श्वशुराचे मृत्यूपत्र त्यांच्या आठ मुली व सर्व जावई (माझे साडू) यांच्याशी सल्लामसलत करून संमतीने तयार करून त्यावर सही घेतली व त्यानंतर लगेचच दोन दिवसात माझे श्वशुर यांचे दुःखद निधन झाले. त्यानंतरच्या काळात माझा मुलगा जमिनींना नावे लावणे, तसेच माझे श्वशुर यांचे निधन झाल्यानंतर प्रॉपटी व इतर गोष्टीचे व्यवस्थापन करण्याकरिता कुरुंदवाड येथेच राहिला. तशातच आणीबाणी जाहीर झाली होती व वीस कलमी कार्यक्रम व त्या अनुषंगाने कमाल जमीन धारणा कायद्यात आमच्या श्वशुरांची काही जमीन जी त्यांच्या मुलींच्या नावावर होती

ती सोडवून घेण्याकरिता माझा मोठा मुलगा दत्तक चि. शेखर यास न्यायालयीन लढा द्यावा लागला. मी, पत्नी व माझा धाकटा मुलगा चि. राजेश अकोल्यालाच राहिलो कारण मधल्या काळात पूर्ण कुरुंदवाडच्या ट्रिप केल्यामुळे रजा अजिबात शिल्लक नव्हती. या सर्व प्रकारामुळे माझा मोठा मुलगा चि. शेखर बी. एस्सी. भाग - ३ या पदवीच्या शेवटच्या परीक्षेस बसू शकला नाही. माझ्या दुसरा मुलगा चि. राजेश याची मार्च १९७६ साली एस्. एस्. सी. ची परीक्षा अकोला येथे संपली व मी, पत्नी व तो मे महिन्यात उन्हाळयाच्या सुट्टीत परत कुरुंदवाडला आलो.

कुरुंदवाडच्या जीवनात मला व माझे दोन्ही मुले यांना सर्व काही नवे होते. आमच्या घरात कोणाचीही शेती नव्हती, त्यामुळे शेतीबाबत कोणतीही माहिती आम्हाला नव्हती. तसेच शेतीचे व्यवस्थापन ती पिकवणे, त्यातून उत्पादन मोठ्या प्रमाणात कसे काढणे, त्यामध्ये लोक किती ढोंगी प्रकारचे असतात, गडी माणसे साळसूदपणे मालकाशी बोलून मालकाला कसे फसवितात, वरून गोड बोलतात व आतून करावयाची ती कारस्थाने करतात वगैरे अनेक अवलक्षणे आम्हाला माहिती नव्हते. तसेच माझा दत्तक मुलगा त्यावेळी फक्त १८ वर्षे वयाचा व नुकताच सज्ञान झाला असल्यामुळे त्याला व्यावहारिक जीवनाची फारशी जाणीव नव्हती. सरते शेवटी माझे नोकरीतील सेवानिवृत्तीचे दिवस असल्यामुळे मला परत अकोल्याला जाऊन कामावर रूजू होणे गरजेचे होते. त्यातच माझ्या पत्नीच्या बहिणी व त्यांचे पती यांनी आमच्या श्वशुरांकडे

भरपूर पैसा आहे व त्यांना मृत्युपत्रात योग्य ती वाटणी मिळाली नाही. मृत्युपत्रावर सासऱ्यांची सही जबरदस्तीने घेतली यावरून रोज घरामध्ये भांडणे सुरू केली त्यामुळे मानसिक स्वाथ्य फारच बिघडले. तशातच माझी रिटायर्ड व्हायच्या आधी अकोल्याहून बुलढाणा येथे बदली केली असल्याचे पत्र मला प्रिन्सीपॉल श्री. राव यांच्याकडून आले. वास्तविक पाहता रिटायर्डमेंटला येणाऱ्या कर्मचारी वर्गाची बदली करू नये असा नियम असताना माझे एक पूर्वीचे हितशत्रू श्री. काळे हे शिक्षण उपसंचालक कार्यालयात त्यांचे खासगी सचिव म्हणून आल्यावर त्यांनी देवगांवकर हे नाव बघून मागे झालेल्या संघर्षाचा परिणाम म्हणून बदलीचा आदेश स्वत: काढून त्यावर शिक्षण उपसंचालक श्री. पिंपळे यांना पूर्णत: कल्पना न देता सही घेतली. त्यामुळे माझा मुलगा अर्थातच दत्तक केलेला मोठा मुलगा चि. शेखर, माझी पत्नी व मी परत अकोल्याला गेलो. माझ्या दत्तक मुलाने बी. एस्सी. भाग - २ नागपूर विद्यापीठात केले असल्यामुळे त्याला बी. एस्सी. कोर्स पूर्ण करण्यासाठी कमीतकमी सहा महिने तरी अकोल्याला राहणे भाग होते.

त्याप्रमाणे आम्ही अकोल्याला जाऊन अमरावती येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयात जाऊन त्यांना सर्व माहिती मी व माझा मोठा मुलगा चि. शेखर याने सांगितल्यावर माझी बदली कॅन्सल केली व मला सेवानिवृत्त होईपर्यंत म्हणजेच ३१ डिसेंबर १९७६ पर्यंत अकोल्यात काम करण्याची परवानगी मिळाली, परंतु पत्नीच्या बहिणी व त्यांचे व नवरे यांची रोज सकाळी उठल्यापासूनची

प्रॉपटीकरीता भांडणे व त्यातच माझी बदली, मोठ्या मुलाची अर्धवट राहिलेली बी. एस्सी. ची डीग्री यामुळे बराच मनस्ताप झाला. वास्तविक पाहता आमचे श्वशुर स्व. मुक्तेश्वर तेरवाडकर इनामदार हे इनामदार असले व लोकांच्या दृष्टीकोनातून त्यांच्या जवळ बराच पैसा, कॅश, शेअर्स, इतर रोख गुंतवणूक, प्लॉटस् वगैरे स्वरुपाची कोणती ही प्रॉपटी नव्हती. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या बचत खात्यात केवळ रु. ५,०००/ - एवढी सुद्धा कॅश नव्हती. फक्त यूनिट ट्रस्ट ऑफ इंडिया मधील रु. १०,००० / - चे युनिटस् एवढीच त्यांची कॅश स्वरुपातील गुंतवणूक होती. इकडे कुरुंदवाडला खर्चाचा आवाका प्रचंड होता. बहुतेक सारी शेतजमीन ही कोरडवाहू असल्यामुळे त्यातून रोख उत्पन्न मिळत नव्हते. परंतु शेतीवरील व इतर खर्च सुरूच होता. सरतेशेवटी मी व माझा मुलगा चि. शेखर मुंबईला गेलो व युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया मधील निम्मे युनिटस् रु. ५००० / - रूपयास विकले. काय करणार पैशाच्या अडचणीला उपयोगी पडते ते केवळ आपली कॅश गुंतवणूकच कारण जमिनी एकतर कोरडवाहू त्यामुळे रोख उत्पन्न नाही व त्या कुळ कायद्यानुसार मिळाल्यामुळे शासकीय परवानगी काढल्याशिवाय विकता येत नव्हती. अर्थात मी अकोल्याला कामावर रूजू असल्यामुळे माझी पगाराद्वारे प्राप्ती चालू होती. माझा मोठा मुलगा त्याची बी. एस्सी. ही डिग्री नागपूर विद्यापीठात पूर्ण करण्यासाठी अकोला येथे माझ्या जवळ राहिल्यामुळे कुरुंदवाडला कोणीतरी राहणे भाग होते.

सरते शेवटी माझा धाकटा मुलगा चि. राजेश जो नुकताच, एस्. एस्. सी. झाला होता त्याने अकरावीला कुरुंदवाड कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व कुरुंदवाडचे सर्व व्यवस्थापन त्याच्यावर सोपवून मी, माझा दत्तक मुलगा व पत्नी अकोला येथे राहण्यास आलो. त्यानंतर मध्यंतराच्या काळात मी रिटायर होण्याच्या अगदी काही दिवस आधी एक दुर्घटना घडली. माझा मधला भाऊ स्व. वसंत जो नागपूरला युनियन बँकेत डेव्हलपमेंट ऑफिसर / रिजनल मॅनेजर होता त्याचे अचानक निधन झाल्याचे वृत्त आले व त्याचा परिणाम म्हणून मला फार मोठा मानसिक आघात सोसावा लागला. त्यानंतर त्याकरिता मी व माझी पत्नी नागपूरला जाऊन आलो. ३१ डिसेंबर १९७६ ला मी रिटायर झाल्यानंतर त्याच सुमारास माझा मोठा मुलगा नोव्हेंबर - डिसेंबर १९७६ च्या बी. एस्ससी. फायनल परीक्षेत चांगल्या मार्कांने पास झाला व आम्ही सर्वांनी माझ्या अकोल्याच्या सामानासकट कुरुंदवाडला स्थलांतर केले व माझ्या आयुष्यातील सेवा निवृत्तीचे पर्व सुरू झाले. मी पेन्शनचे काम आधीच केले असल्यामुळे मला १ - १ - १९७७ पासून २२०/ - रुपये पेन्शन दरमहा सुरू झाली. त्याकाळी २२०/ - रूपयास फार किंमत होती हे कोणाला सांगण्याची गरज नाही. त्याचबरोबर मला फंड व ग्रेच्यूटी असे मिळून एकूण त्या काळात म्हणजे अंदाजे २५ वर्षापूर्वी रु.२७,००० / - एवढी रक्कम मिळाली व माझे कुरुंदवाडचे जीवन सुरू झाले.

# (४५) कुरुंदवाडमधील सेवानिवृत्तीचा काळ

इसवी सन १९७७ सालाच्या जानेवारी महिन्यात मी आमच्या सर्व कुटुंबासह कुरुंदवाड येथे स्थलांतरित झालो व माझे विदर्भातील जीवनाचा जवळपास २५ वर्ष काळाचा शेवट झाला. त्याच दरम्यान आणीबाणी उठवून इंदिरा गांधी पंतप्रधान असता निवडणूका जाहीर केल्या व त्याच काळात लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्ष हा नवा पक्ष उदयास येऊन काँग्रेस पक्षाचा दारूण पराभव लोकसभेच्या इसवी सन १९७७ च्या निवडणूकीत झाला. त्याचा परिणाम असा झाला की, श्री. मोरारजी देसाई हे पंतप्रधान झाले व जनता पक्ष केंद्रामध्ये सत्तेवर आला.

सुदैवाने मी रिटायर झाल्यामुळे मला या निवडणूकीच्या काळात निवडणुकीच्या कामावर प्रेसायडींग ऑफिसर (केंद्राध्यक्ष) म्हणून जावे लागले नाही. या पूर्वीच्या माझ्या सरकारी नोकरीच्या काळात मला इच्छेविरुद्ध प्रेसायडींग ऑफिसर म्हणून इसवी सन १९७१ सालापर्यंत सर्व निवडणूक करता नाइलाजास्तव जावे लागले. मला कानाने ऐकू येत नसल्यामुळे व मला व तब्येतीची साथ नसल्यामुळे एवढी जबाबदारीचे काम करणे अत्यंत त्रासदायक होते, पण काय करणार? सरकारी नोकरीत नाही कसे म्हणणार? जीवनात माणसाला अनेक गोष्टी त्याच्या मनाच्या विरुद्ध कराव्या लागतात याचे हे बोलके उदाहरण आहे. मी कुरुंदवाडला राहण्यास आल्यानंतर माझा दत्तक

मुलगा चि. शेखर याची आर्थिक परिस्थिती फारच नाजूक झाली. तशातच माझ्या पत्नीच्या बहिणी व त्यांचे पती व इतर काही हितशत्रु यांनी नित्य नियमाने रोज सकाळपासून झोपेपर्यंत पैसा व प्रॉपर्टीसाठी भांडणे अव्याहतपणे सुरूच ठेवली त्याला एखाद्या दिवसाचा अपवाद म्हणजे आम्ही गावाला गेलो असेल तरच. कायमपणे प्रॉपटीकरिता वाद हा एक नित्याचा कार्यक्रम होऊन गेला होता. आमचे श्वशुरानी कोर्टात पण बरेच दावे गुदरले होते. तसेच त्यांचा तेरवाडचा वाडा त्यांनी एकास राहण्यास दिला असताना तो माझाच म्हणून बसला होता. त्याकरितापण दावे सुरू होते. या सर्व कारणाकरिता माझा दत्तक मुलगा चि. शेखर याने डॉक्टर होण्याचा नाद सोडून रोज वकीलाची गरज लागत असल्यामुळे वकीलाच्या कोर्सला प्रवेश घेतला व सांगली लॉ कॉलेजमध्ये प्रथम वर्ष एल. एल. बी. करिता रोज कुरुंदवाडहून सांगलीला जाऊन येऊन करू लागला.

मी मध्ये सांगितल्याप्रमाणे माझ्या दत्तक दिलेल्या मुलाची पैशाची परिस्थिती अत्यंत वाईट झाल्यामुळे व आमच्या घरच्या लोकांनी (म्हणजे माझे कुरुंदवाड येथील घरात राहणारे साडू वगैरेंनी) आमच्या विरुद्ध अपप्रचार केल्यामुळे माझ्या मुलास इतर वस्तू तर सोडाच पण माणसाला जगण्याकरिता लागतो तो किराणा माल उधार देण्याचे नाकारले. असे म्हणतात संकटे आली की, ती एखादे संकट म्हणून येत नाही तर बरीच संकटे एकदम मिळूनच येतात व त्यांचा पहाडच कोसळतो. इंग्रजीत याला फार

उत्तम म्हण आहे ती म्हणजे, ‘डिफिकल्टीज् नेव्हर कम सिंगलली, व्हेन दे कम दे आलवेज कम इन बटालियन्स.’

अशातच पूर्वग्रहदूषीत मी वर्णन केलेले माझे साडू स्व. भालचंद्रराव यांच्याकडून माझ्या दत्तक मुलाने बैलजोडी शेतकामाकरिता विकत घेतली होती. त्यांचे प्रॉपर्टीमुळे शत्रुत्व आल्यावर त्यांनी मुलाकडे लगेचच पैशाची मागणी केली. सरतेशेवटी माझे शस्त्र मी उपसले व मला मिळालेल्या फंड, ग्रॅच्युटी व मिळालेल्या पेन्शनचा उपयोग माझ्या दत्तक मुलगा चि. शेखर याचा घरखर्च व इतर संपूर्ण खर्च चालवण्याकरिता दिला. त्यात माझे सर्व रक्कम रु.२७,०००/ - फस्त झाली. अगदी किराणा मालाच्या बिलाचे पेमेंट तर पुढे बरेच दिवसापर्यंत मी माझ्या पेन्शनमधूनच करीत होतो. काय करणार?

माझ्या दत्तक दिलेल्या मुलाकडे पैसा व सेव्हिंग्ज तर काहीच शिल्लक नाही व घरखर्च व शेती खर्च अफाट व प्रचंड होता. शेवटी मी माझ्या दत्तक दिलेल्या मुलास कोरडवाहू जमिनी विकण्याचा व ते पैसे बँकेत ठेवून त्यावर येणाऱ्या व्याजावर घरखर्च व इतर खर्च चालवण्याचा सल्ला दिला. बागायती शेती तर फक्त सहा एकर होती व त्यातही तीन एकरच ऊस पीक होते. त्या काळी ऊसाला ८० / - रु. प्रती टन इतका कमी भाव होता. त्यामुळे - ऊसापासून येणारे उत्पन्न रु.१०,०००/ - व खर्च रु. ७,०००/ - असा ताळमेळ म्हणजे वर्षभराच्या खर्चाकरिता फक्त रु.३,०००/ - एवढेच उरत असतं. माझ्या सल्ल्यानुसार माझ्या दत्तक दिलेल्या मुलाने काही

कोरडवाहू जमिनी शेवटी विकल्या व मी व त्याने कोल्हापूरला जाऊन बरीच धडपड करून आवश्यक ती परवानगी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडून मिळविली. तशातच त्यावेळी दूधगंगा - वेदगंगा धरण प्रकल्पाचे काम सुरू असल्यामुळे धरणग्रस्ताचे पुनर्वसनाकरिता जमीन संपादनाचे काम सुरू झाले होते. त्यामुळे आमच्या कोरडवाहू जमिनींपैकी काही जमीन शासनाला देण्याचे कबूल करून आम्ही शेती विक्रीची परवानगी आणली व त्या काळात जो काही थोडा फार पैसा आला त्याच्या व्याजावर व माझ्या पेन्शनवर खर्च चालवणे सुरू झाले. इसवी सन १९७८ - १९७९ साली माझा दत्तक दिलेला मुलगा एल. एल. बी. प्रथम वर्ष पास झाला व दुसरा मुलगा बारावीत गेला. मधल्या या सर्व प्रकारात माझ्या दुसऱ्या मुलाचे एक वर्ष वाया गेले. माझा दत्तक दिलेला मुलगा एल्. एल्. बी. दुसऱ्या वर्षाला असताना अचानकपणे त्याला अनंत चर्तुदशीच्या दरम्यान ताप येऊ लागला. आमचे कुरुंदवाडचे फॅमिली डॉक्टर यांनी प्रथम टेरामायसीन हे अॅन्टीबायॉटीक देऊन दहा दिवस वाट पाहिली. परंतु ताप न उतरल्यामुळे त्यांनी क्लोरोमायसीटीन सुरू केले व ताप टॉयफाईडचा असल्याचे निदान केले.

त्याकाळी टॉयफाईडवर क्लोरोमायसीन शिवाय दुसरे प्रभावी औषध नव्हते व तेच औषध विषमज्वर तापाकरिता वापरीत असत. त्या उपचारानंतर मुलाचा ताप उतरला. परंतु काही दिवसांनी त्याला परत ताप येऊ

लागला. तेव्हा डॉक्टरांच्या मते त्याच तापाचा आहे म्हणून त्यांनी तेच औषध परत सुरू केले.

ही सर्वसाधारण इसवी सन १९७९ सालातील दसऱ्याच्या वेळेची घटना असेल. परंतु ताप उतरल्यानंतर परत काही दिवसांनी त्याचीच पुनरावृत्ती झाली व परत माझ्या दत्तक दिलेल्या मुलास ताप येऊ लागला. त्यावर डॉक्टरांनी सांगली येथे जाऊन तपासणी करून घेण्यास सांगितले व सांगली येथील डॉ. बी. एन. कुलकर्णी यांना दाखविल्यानंतर त्यांनी रक्त, लघवी, एक्स - रे वगैरे सर्व तपासणी करून एन्टेरीक फिव्हर म्हणजेच टॉयफाईड असल्याचे पुन्हा निदान करून परत क्लोरोमायसीटनचा कोर्स घेण्यास सांगितले व त्यानंतर त्याचा ताप उतरला.

मी मागे सांगितल्याप्रमाणे माझी धाकटी बहीण सौ. कला बोपर्डीकर, मुंबई येथे शिवाजी पार्कला राहते. आम्ही तिला टोपण नावाने बबी, बबे असेच बोलवतो. तिच्या दोन मुलांपैकी मोठ्या मुलाचा प्रेमविवाह तो शिकवत असणाऱ्या त्याच्या विद्यार्थिनीबरोबर जमून झाला. माझी बहीण सौ. बबीचा मोठा मुलगा चि. कौस्तुभ हा त्यावेळी कोचिंग क्लासेस म्हणजेच खाजगी शिकवण्या करण्याचा (विशेषत: गणित, सायन्स) व्यवसाय करीत होता तो गणितात बुद्धिमान व हुशार असल्यामुळे त्याच्या मित्राची बहीण व आत्ता त्याची पत्नी सौ. प्रज्ञा त्याच्याकडे गणित व इतर सायन्स शिकण्यासाठी येत होती. त्यातच त्यांचे प्रेम जमले व त्यांचा प्रेमविवाह २५ डिसेंबर १९७९ ला नाताळ म्हणजे ख्रिसमसच्या दिवशी मुंबईत ब्राम्हण सहाय्यक संघ, दादर

येथे घडून आला. माझ्या दत्तक दिलेल्या मुलाच्या दीर्घ आजारपणाने त्याला व माझ्या पत्नीला या विवाहास जाता आले नाही. परंतु मी मामा असल्यामुळे मला मात्र माझ्या धाकट्या मुलाबरोबर सौ. बबीच्या मोठ्या मुलाच्या लग्नास मुंबईला जावे लागले. लग्न झाल्यानंतर माझा धाकटा मुलगा चि. राजेश लगेचच कुरुंदवाडला गेला.

मी मात्र मुंबईला बहिणीकडे काही दिवस राहिलो. एक दिवस अचानक तार आली की, माझा दत्तक दिलेला मुलगा चि. शेखर यास परत ताप आला आहे व त्या करिता मला कुरुंदवाडला बोलवले आहे.

त्याप्रमाणे मी दुसऱ्या दिवशी कोयना एक्सप्रेसने दादरहून रात्रीपर्यंत कुरुंदवाडला गेलो व विचार करून फॅमिली डॉक्टर बदलला. त्यानंतर त्या दुसऱ्या फॅमिली डॉक्टर सर्व तपासणी करून परत टॉयफाईडचाच रिलॅप्स असल्याचे सांगून परत क्लोरोमायसीटीन घेऊन ते एकदम न थांबवता टेपरींग करीत म्हणजे हळूहळू डोस कमी करीत बंद करावयास पाहिजे होते, कारण तसे केल्याने शरीरात प्रतिकारशक्ती निर्माण होते व इतक्या उच्च दर्जाची ॲन्टीबायॉटीक्स (अर्थातच त्या काळातील) एकदम बंद केल्यास त्या रोगाचे जंतू त्या औषधास पुढे दाद देत नाहीत व रेजिस्टंट बनतात असे सांगितले. या दुसऱ्या फॅमिली डॉक्टरांनी ट्रिटमेंट दिल्यानंतर मात्र परत माझ्या दत्तक दिलेल्या मुलास टॉयफॉईडचा रिलॅप्स आला नाही व इसवी सन १९७९ मध्ये तो द्वितीय एल. एल. बी. परीक्षा एवढ्या अडचणीतसुद्धा उत्तीर्ण झाला.

# (४६) माझे मेघदूताचे रूपांतर

मी मागे सांगितल्याप्रमाणे माझ्या मोठ्या मुलाने एल्. एल्. बी. (स्पेशल) पूर्ण करून ॲडव्होकेट म्हणून प्रॅक्टीस सुरू केली व धाकटा मुलगा बारावी उच्च मार्कांने पास होऊन कॉलेजातून त्याचा दुसरा क्रमांक लागला. इंग्रजी, इकॉनॉमिक्स व पोलीटीकल सायन्समध्ये तर त्याला विशेष प्रावीण्य मिळाले व त्याला त्या विषयात माझ्या आठवणी प्रमाणे जवळपास ८० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले. त्याने. पण बी. ए. भाग - १ येथे कुरुंदवाड कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. पोलीटीकल सायन्स इंग्रजी व इकॉनॉमीक्स हे त्याचे अत्यंत आवडते विषय. खरेतर मी इकॉनॉमीक्स मध्ये एम. ए. केले असले तरी मला तो विषय मनापासून कधीच आवडला नव्हता. उलट मनी ॲण्ड बँकिंग, चलन संख्यामान सिद्धांत, इंटरनॅशनल ट्रेड, टेरीफ करन्सी एक्सचेंज वगैरे विषय मला क्लिष्ट वाटत, परंतु माझा धाकटा मुलगा याला त्यामध्ये तसेच इंग्रजी साहित्य व पोलीटीकल सायन्स यामध्ये फार उत्साह होता. मोठ्या दत्तक दिलेल्या मुलाने वकील म्हणून प्रॅक्टीस सुरू केल्यावर व धाकटा मुलगा उत्तम तऱ्हेने पास होऊन पदवी संपादन करून लागल्यावर मला काहीसा निवांत वेळ मिळू लागला. सेवानिवृत्तीच्या पहिला काही काळात माझ्या दत्तक दिलेल्या मुलाच्या घरच्या कटकटी, त्याच्या आर्थिक अडचणी, माझी व त्याची सातत्याने बिघडणारी तब्येत या गेल्यामुळे माझ्या व्यक्तिगत छंद व जीवनातील सेवानिवृत्ती

नंतरच्या ध्येयाकडे लक्ष देण्यास मला निवांत असा वेळच मिळाला नव्हता. तेव्हा मी माझ्या आवडीच्या विषयाला हात लावला आणि कवी कुलगुरू जगविख्यात संस्कृत साहित्यिक कालिदासाच्या 'मेघदूत' या महाकाव्याचे रूपांतर (भाषांतर) करण्यास प्रारंभ केला. कवी कुलगुरू कालिदासाची प्रतिभा व कल्पनाविलास इतक्या उच्च प्रतिचा व अफाट बुद्धीचातुर्याने भरलेला आहे की, त्याच्या या महाकाव्याचे भाषांतर अत्यंत हुशार, बुद्धीवादी भारतीय व्यक्ती व रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाचे पहिले भारतीय गव्हर्नर सी. डी. देशमुख यांच्यापासून रविंद्रनाथ टागोर यांनी इंग्रजीमध्ये केले आहे. इतक्या विद्वान व हुशार व्यक्ती त्याचे भाषांतर केले असताना माझ्यासारख्या माणसाला ते जमेल की नाही असा विचार मी केला. परंतु कवी कुलगुरू कालिदास हा माझा अत्यंत आवडता साहित्यिक असल्यामुळे तसेच माझी दुर्दम्य इच्छा यामुळे मी भाषांतर करण्याचा प्रयत्न करण्याचा निश्चय केला. शिवाय मेघदूत हे कवी कुलगुरू कालिदासाचे काव्यात्मक आत्मचरित्रच आहे; असे म्हणतात. कालिदासाच्या या महाकाव्याचे मराठीत रूपांतर करणे म्हणजे एक महाकठीण काम होते. एकतर त्याकरिता मराठी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे. तसेच भाषांतराकरिता मराठी शब्दसंग्रह मोठ्या प्रमाणात असला पाहिजे. संस्कृत या भाषेचे स्वरूप पाहता ती भाषा पूर्णत: परिपूर्ण आहे, परंतु मराठीचे तसे नाही. संस्कृत भाषेत थोड्याच काही अक्षरामध्ये आपण बराचसा अर्थ सामावून घेऊ शकतो. मात्र त्याचेच मराठीत रूपांतर

करण्यास अक्षरांची संख्या, कडवी ही जास्त प्रमाणात सांगावी लागतात. संस्कृतच्या या गुणधर्मामुळे संस्कृत हे काव्यात्मक ते पण समवृत्त व समश्लोकी रूपांतर करण्यास बरेच कष्ट घ्यावे लागतात. मी ज्यावेळी मेघदूत या महाकाव्याचे मराठीत रूपांतर करण्याचे ठरविले तेव्हा त्या महाकाव्याच्या कथासुत्राला अनुसरून असणाऱ्या विप्रलंभ शृंगाराकरिता (विप्रलंभ शृंगार म्हणजे वियोगातून निर्माण झालेला शृंगार) मंदाक्रांत हेच वृत्त योग्य असल्यामुळे त्यातच रूपांतर करण्याचा निश्चय केला. सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे या महाकाव्याच्या रुपांतराला जेव्हा मी सुरुवात केली तेव्हा आपल्या पाठीमागे प्रेरणा आहे एवढ्या उत्स्फूर्तपणे मला रुपांतरीत काव्य सुचू लागले व त्याचा गद्यात मराठीत अर्थ मी उत्कृष्टपणे देऊ शकलो. अशा रीतीने अंदाजे सहा महिन्याच्या कालावधीत माझे मेघदूत या महाकाव्याचे रूपांतर मराठी अर्थासकट पूर्ण झाले. तसेच मी केलेले समांतर इतर भाषांतरकाराएवढे क्लिष्ट व कठीण नसून सुबोध, सुलभ व अत्यंत अचूकपणे कालिदासाच्या कल्पना विलासाचे व प्रतिभेचे प्रकटन त्यात झाले आहे. असाच सूर व मत अनेक तज्ञ लोकांनी व्यक्त केला अनेक वृत्तपत्रात त्याचे समीक्षण संस्कृत महाकाव्याच्या व कालिदासाच्या कल्पनाविलास, प्रतिभाविलास, निरिक्षणशक्ती या सर्वांच्या रुपांतराचे उत्कृष्ट उदाहरण आहे असे म्हटले आग्रह होते. धर्नुधारी मासिकात तर लीला गांगल यांनी अक्षर वाङ्मयातील एक अजरामर कृती असे त्याचे परिक्षण केले आहे. अर्थात वृत्तपत्रे व मासीके ह्यांनी

केलेली परिक्षणे माझे पुस्तक प्रकाशित झाल्या नंतरचे आहेत. मेघदूत रूपांतर करण्याच्या काळात मला माझी बहीण सौ. कला बोपर्डीकर हिची एक मैत्रीण व श्री गजानन महाराजांची भक्त, शिवाजी पार्क, मुंबई येथे राहणारी श्रीमती येळगांवकर यांनी श्री. गजानन महाराजावर चित्रपट कथा लिहील्यास श्रीमती येळगांवकर त्यांच्या ओळखीने चित्रपट निर्माता गाठून देतील असे सांगितले व तशी कथा लिहीण्याकरिता सातत्याने आग्रह केला. अर्थात निवृत्ती काळात रुपांतराबरोबर एक आणखी चांगले कार्य होईल म्हणून मी श्री. गजानन महारांच्या चमत्कारांना अनुसरत व त्याला माझे स्वत:चे उपकथानक घालून काही दिवसातच चित्रपट कथा व संवाद लिहिले. त्यामध्ये मी अनेक माझ्या गीत गजानन या श्री. गजानन महाराजावर केलेल्या कवितेचा समावेश त्यात केला होता. जानेवारी इसवी सन १९८१ साली मी व माझा मोठा मुलगा मुंबईला गेलो. त्या ठिकाणी प्रसिद्ध चित्रपट अभिनेता राजा गोसावी व दिग्दर्शक रमेश साळगांवकर यांच्याशी चर्चा झाली, परंतु पैसा खर्च करण्यासाठी निर्माता कोणीच मिळेना. सिगमॅजेस्कोपी अत्यंत कौशल्याने केली होती व डॉ. कुलकर्णी त्यांची व माझी तशी पूर्वीपासूनची ओळख होती.

त्यांनी सांगली येथे डॉ. रणभिसे यांच्या दवाखान्यात नवीनच प्रायव्हेट प्रॅक्टीस सुरू केली होती. त्यांच्याकडे गेल्यावर त्यांनी डॉ. रणभिसे हॉस्पिटलमध्ये माझे प्रोस्टेटचे ऑपरेशन करतो म्हणजेच वाढलेली प्रोस्टेट ऑपरेशनने काढून टाकतो असे सांगितले व डॉ. रणभिसे यांच्या

दवाखान्याच्या जवळच विश्रामबाग या सांगलीच्या भागात आऊट हाउसमध्ये जागा दिली. तेथून माझ्या दत्तक दिलेल्या मोठ्या मुलाचा मित्र अ‍ॅड. मुंकुद वाघ राहत होता. आऊट हाउस (कॉटेज) मध्ये राहिल्यानंतर ऑपरेशनपूर्वी तपासणीत माझ्या आवश्यक तपासण्या केल्या. त्यामध्ये इ. सी. जी., जनरल अ‍ॅनेस्पेशीयास योग्य वाटत नाही असे डॉ. एस. एच. कुलकर्णी यांनी सांगितले व तुमचे प्रोस्टेटचे ऑपरेशन कोठेतरी मोठ्या शहरात करणे योग्य होईल असे मत व्यक्त केले. आता काय करणार? मोठी संभ्रम अवस्था निर्माण झाली. अर्थात डॉ. एस. एच. कुलकर्णी यांनी पहिल्या दिवशी मला त्रास न होता हळुवारपणे कॅथेटर घालून डायलेटेशन केले होते. त्यामुळे त्यावेळी लघवीचा प्रश्न सुटला होता व लघवी सुरळीतपणे सुरू होती. परंतु मोठ्या शहरात जाऊन ऑपरेशन करून घ्यावे व तेथील तज्ञ लोकांचा सल्ला घ्यावा या उद्देशाने मी व माझा मोठा मुलगा आम्ही मुंबईला माझी बहीण सौ. बबी हिच्याकडे गेलो. तो सर्वसाधारण जून १९८२ चा काळ असेल.

# (४७) मी डॉक्टरांच्या तडाख्यात सापडलो

मुंबईला जाऊन तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून घेऊन त्यावर विचार - विनिमय करून मग माझ्या धाकट्या मुलाला चि. राजेशला व पत्नीला मुंबईला बोलावून घेण्याचा मानस ठरवून मी व माझा मुलगा (मोठा दत्तक मुलगा) चि. शेखर मुंबईला माझ्या बहिणीकडे सौ. बबीकडे गेलो. वास्तविक पहाता आधी डॉक्टरांचा सल्ला घेऊन मग पत्नी व धाकट्या मुलाला बोलावण्याचे ठरले असताना घडले; अर्थातच असे घडावयाचे होते असे काही लोकांनी म्हटल्यास हरकत नाही. मी मुंबईला गेल्यावर लघवी होत नाही तेव्हा ताबडतोब सर्जन किंवा डॉक्टरना दाखवण्याचा आग्रह केला व इर्मजन्सी असल्याचे सांगितल्यामुळे माझ्या बहिणीचा मोठा मुलगा चि. कौस्तुभ यांच्या माहितीतील चांगल्या परिचयाचे डॉ. मथुरे यांना दाखविण्याची घाई केली असे अनेक लोकांचे म्हणणे आहे. मला तरी ते योग्य वाटत नसले तरी कदाचित ते बरोबर असू शकते. कारण माणसाला स्वत:च्या चुका मान्य करण्याची सवय नसते. परंतु आत्मवृत्त लिहिताना माणूस प्रामाणिकपणे सगळ्या चुका मान्य करतो असे म्हणतात. त्या बाबतीत मात्र अजूनही मी इमर्नजन्सी लघवी आल्याची परिस्थिती निर्माण केली किंवा नाही यात माझी कितपत चूक झाली याचा निष्कर्ष मी काढू शकलो नाही. माझी बहीण सौ. बबीच्या मोठ्या मुलाच्या परिचयाचे व जवळचा संबंध असलेले डॉ. मथुरे यांच्या माहिमच्या क्लिनिकमध्ये आम्ही

दाखवण्यासाठी गेलो. माझ्याबरोबर माझी बहीण सौ. बबी व मोठा मुलगा चि. शेखर हेपण आले होते. डॉ. मथुरे हे एम्. एस्., एफ. आर. सी. एस्. फॉरेन रिटर्न व रॅडीकल सर्जरीज करण्यात त्यांचा हातखंडा होता अशी ख्याती मुंबईत त्यावेळी त्यांची होती. त्यांनी तपासून ताबडतोब प्रोस्टेट काढून टाकावी लागेल व त्याकरिता ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले. तसेच त्याकरिता बांद्रा येथील पाली हिल रोडवरील डायमंड नर्सिंग होम मध्ये ॲडमीट होण्याकरिता पत्र दिले व त्यांना लगेचच फोन केला. तसेच ऑपरेशनकरिता लागणाऱ्या रक्ताची योजना मी करतो असे सांगून त्यांनी लगेचच पॅथोलॉजीस्ट कारखानीस यांना फोन करून बुधवारी सकाळी ऑपरेशनच्या वेळी दोन बाटल्या रक्ताची गरज लागेल असे सांगितले. माझा रक्त गट बी आर. एच. पॉझिटीव्ह होता. त्यानुसार सोमवारी सकाळी मी बांद्रा येथील डायमंड नर्सिंग होम मध्ये रूम नं. ५ मध्ये ॲडमीट झालो. डायमंड नर्सिंग होमचा मालक स्वत: डॉक्टर नसून नर्सिंग होमची जागा त्याची होती व तो व्हिजिट डॉक्टर्सना आपले पेशंट तेथे ठेवण्याची सोय करत असे. त्याचे नाव तलवार असे होते. मी ॲडमिट झाल्यानंतर माझ्या मोठ्या मुलाने माझी पत्नी व धाकटा मुलगा चि. राजेश यांना तार करून ऑपरेशन नक्की केल्याचे कळविले कारण त्या काळी कुरुंदवाडला आमच्या घरात टेलिफोन नव्हता. त्यांनाही अचानक ऑपरेशन कसे ठरले याचे आश्चर्य वाटले. कारण आम्ही फक्त सल्ला घेण्यासाठी मुंबईला माझी बहीण सौ. बबी हिच्याकडे आलो होतो. तसेच माझे दोघेही

सख्खे मावस भाऊ डॉ. चंद्रकांत जोशी व डॉ. मोहन जोशी हे पेशाने व व्यवसायाने उच्च शिक्षित डॉक्टर होते. कर्मधर्म संयोगाने म्हणा किंवा नशीब म्हणा मला किंवा इतर कोणालाही त्या माझ्या दोन्ही उच्च शिक्षित सख्खे डॉक्टर मावस भावांना विचारून ऑपरेशन व डॉक्टर निवडण्याचा निर्णय सुचला नाही. तारेप्रमाणे पत्नी व धाकटा मुलगा मंगळवारी रेल्वेने मुंबईस आले व बुधवारी माझे प्रोस्टेटचे ऑपरेशन झाले. ऑपरेशन नंतर मला लवकर आराम पडला नाही. प्रत्यक्षात माझी प्रोस्टेट मोठी झालेली नव्हती, परंतु लहान झाली होती व त्यामुळे मला लघवीचा त्रास होत होता. त्यामुळे सर्जन डॉ. मथुरे यांनी प्रोस्टेट काढली नाही उलट मुत्रनलीका मोठी करून मुत्रपिंडाला छिद्र पाडून एक कॅथेटर व मूत्र मार्गातील एक कॅथेटर घालून ठेवले. परंतु मूत्र मार्गातील कॅथेटरमुळे मला प्रचंड मुत्रनलिकेचा दाह सुरू झाला. मी हॉस्पिटलमध्येच चोवीस तास वेदनेने व इंरिटेशनमुळे तडफडत होतो. वेदनेची तीव्रता एवढी प्रचंड होती की शिरेतून काम्पोज मॉरफित पेथिहीन हफरविन सारखे वेदना शामक व झोप येणाऱ्या औषधांनीसुद्धा वेदना व दु:ख कमी होत नव्हते. शेवटी एखाद्या जनावरासारखे दु:ख मला असह्य झाल्यामुळे मी डॉ. मथुरे यांना वारंवार विनंती करून मूत्र मार्गातील कॅथेटर काढण्यास सांगितले व तो शेवटी वेदनेमुळे डॉक्टरांनी काढला. एवढे प्रचंड दु:ख श्री. गजानन महाराजांचे नाव घेत कायमपणे पंधरा दिवस सहन केले. त्याची आठवण झाली तरी अजूनही अंगावर काटा उभा राहतो. डॉक्टर मथुरे यांनी दोन चार

दिवसानंतर मूत्र मार्गातून परत कॅथेटर घातला. त्यावेळेससुद्धा मला वेदना असह्य झाल्या. तसेच तो कॅथेटर मुत्रमार्ग भेदून पेरी तोनियम पोकळीत गेल्यामुळे इंन्फेक्शन झाले व मला जबरदस्त ताप व पोटदुखी सुरू झाली. त्यावेळी डॉक्टर मथुरे यांनी ब्लॅडर वॉश करताना माझा मोठा मुलगा चि. शेखर यांस पेरी टॉनायटीस झाला असल्यास परत दुसरे ऑपरेशन करण्याची गरज पडली असे सांगितले. मला तोंडावाटे सर्व अन्न बंद करन राईल ट्यूब म्हणजेच नासिका जठर नलिका आत घातले; व त्यातूनच जेवण व खाद्य पदार्थ देणे चालू होते. तसेच कायमपणे सलाईन पण देणे चालू होते. सुदैवाने म्हणा किंवा श्री. गजानन महाराजांच्या कृपेमुळे माझ्या पेरी टोनायटीस पुढे वाढला नाही व जहाल अशा एन्टिबायटिक्सने कमी झाला. लघवीच्या विकारात सुधारणा होण्यात कुठलेही चिन्ह दिसेना. मी डायमंड नर्सिंग होममध्ये ॲडमिट होऊन तीन आठवडे उलटून गेले. शेवटी सख्या मावस भाऊ व सख्या बालरोग तज्ञ डॉ. मोहन जोशी यांनी माझी दोन्ही मुले व इतर नातेवाईक यांचेबरोबर चर्चा करून वामनाला डायमंड नर्सिंग होममधून डॉक्टरांच्या सल्ल्याविरुद्ध डिस्चार्ज घेऊन घरी आणून व नंतर माझ्या ओळखीने दुसरे प्रख्यात मूत्ररोग तज्ञ डॉ. शरद बापट यांना घरी बोलावले पण डॉ. मोहन जोशी यांनी सल्ला दिला त्यानुसार माझा मुलगा व माझ्या बहिणीचा मोठा मुलगा यांनी डॉक्टरांना आम्ही आता मला हॉस्पिटलमधून घरी घेऊन स्वतंत्र नर्स ठेवून तेथेच औषधोपचार करतो व कॅथेटर परत घालणेच्या वेळेस

ॲडमिट करतो असे सांगून त्यांचे बिल देऊन डिसचार्ज घेतला व माझी बहीण सौ. बबी हिच्या घरी शिवाजी पार्कला परत आलो. त्यानंतर माझे दोन्ही सख्ये मावस भाऊ डॉक्टर असल्यामुळे त्यांनी डॉ. बापट यांना घरी बोलावले. त्यांनी एक - दिड महिन्याच्या काळानंतर दुसरे ऑपरेशन करतो असे सांगून शक्तीवर्धक औषधे दिली. त्यानंतर इसवी सन १९८२ सालाच्या गणपतीच्या वेळेस डॉ. बापट यांनी माझे दुसरे ऑपरेशन नवीन पद्धतीने केले. त्यात मला कसलाही त्रास झाला नाही व मी लघवीच्या त्रासातून मुक्त झालो.

या सर्व घटना घडल्यानंतर माझी पत्नी व धाकटा मुलगा कुरुंदवाडला परत गेले. मी माझा मोठा मुलगा काही दिवसांनी कुरुंदवाडला परत जायचे म्हणून बहिणीकडे काही दिवस मुक्काम केला, परंतु माणूस चिंतितो एक व घडते भलतेच. मला पहिल्या ऑपरेशनच्या वेळी दिलेल्या दूषित रक्तामुळे रक्तातील काविळीचे निदान २० सप्टेंबर १९८२ ला झाले व त्यानंतर सततपणे चार महिने काविळीचा त्रास मला झाल्यामुळे माझा व माझ्या मोठ्या मुलाचा मुक्काम वर्षाअखेर म्हणजेच डिसेंबर १९८२ पर्यंत मुंबईत झाला. त्यात मला शारीरिक, मानसिक त्रास व वेदना झाल्याच परंतु माझा मोठा मुलगा चि. शेखर यास सातत्याने सेवा व शुश्रुषा व त्याबरोबरच मानसिक व शारीरिक त्रास यास तोंड द्यावे लागले.

अशा रितीने मी डॉक्टरांच्या कचाट्यात असा सापडलो की, त्यामुळे माझी लिव्हरची कार्यक्षमता

कायमची कमी झाली. तसेच माझी शारीरिक परिस्थिती इतकी प्रचंड घसरण झाली. मला त्यातून बाहेर पडण्यासाठी परत दोन ते तीन वर्षे लागली. तसेच मुंबईसारख्या ठिकाणी दुखण्यामुळे येणारा प्रचंड खर्च व घरातील सर्व मंडळींना विशेषत: माझा मोठा मुलगा व पत्नी यांना झालेला मनस्ताप, शारीरिक त्रास यामुळे मी व माझ्या कुटुंबातील सर्वांचा उत्साह कमी झाला. या माझ्या दुखण्यात माझ्या मोठ्या मुलाला चि. शेखर यास फार त्रास सहन करावा लागला व पैशाची अडचण भरून काढण्यासाठी तीन एकर जमीन विक्री करावी लागली. श्री. अण्णा हरी मगदूम यांचे नातेवाईक यांनी ती जमीन विकत घेतली व त्यांचा भाचा श्री. जयपाल बाबू शेट्टी त्या वेळेपासून आमच्याकडे येऊ लागला व आमच्या शेतीकडे लक्ष देण्याचे काम माझा मोठा मुलगा चि. शेखर याने त्याच्याकडेच सोपविले. तेव्हापासून जयपाल हा आमच्या घरातलाच एक सदस्य झाला. रोज संध्याकाळी येऊन बसणे व माझ्या दोन्ही मुलाशी बोलणे हे नित्याचेच होऊन गेले. मी गंमतीने त्याला राज्यपाल असे म्हणत असे. अशा रीतीने मुंबईला वर्षभर मला झालेल्या आजारपणाचा त्रास हळुहळू कमी होऊ लागला. त्यावेळेस मला परत मेघदूताच्या माझ्या पुस्तकाचे प्रकाशन करण्याचे काम परत सुरू करावे असे वाटले व त्या अनुषंगाने माझा मोठा मुलगा चि. शेखर व माझे सांगलीतील स्नेही व मित्र गं. गो. तथा बापूसाहेब बिनीवाले यांची खूप मदत झाली. मेघदूताच्या या प्रकाशनाकरिता मी प्रसंग अनुरूप चित्रे तर आधीचे प्रसिद्ध

चित्रकार स्व. बापूसाहेब बिनीवाले यांचे परिचित यांच्याकडून काढून घेतली होती व त्याचे ब्लॉक्सपण तयार केलेले होते. राहिलेले काम फक्त छपाईचे. त्यावेळेस कॉम्पुटर छपाई अस्तित्वात नव्हती, तेव्हा स्व. बापूसाहेब बिनीवाले यांच्या ओळखीचे मिरज येथील कोयना प्रिंटींग प्रेसमध्ये छपाईचे काम सुरू झाले. त्याचे मालक श्री. जयंत मुरारी करंदीकर हे होते. सर्वसाधारण छपाईच्या कामात कम्पोजिंग व प्रूफरीडिंग करावे लागतात. ते मी करून दिले व मुखपृष्ठाबाबत सर्वांनी विचार करत त्याचे डिझाईन निश्चित केले. इसवी सन १९८३ सालच्या अक्षय तृतीयाच्या मुहूर्तावर माझ्या 'मेघदूताचा नवा अवतार' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्रत्यक्षात हे प्रकाशन त्यावेळचे विधान परिषदेतील सभापती श्री. जयंतराव टिळक यांच्या हस्ते सांगलीला कन्या महाविद्यालयाच्या कार्यक्रमात व्हावे अशी इच्छा माझा मोठा मुलगा व स्व. बापूसाहेब बिनीवाले यांची होती, पण काही संधि साधू व ढोंगी व त्याचे अवडंबर माजवून दि विमेन्स एज्यूकेशन सोसायटीचे मुख्य पदाधिकारी यांनी केवळ द्वेषापोटी व आपल्याला असे काव्य करता येत नाही ही खंत मनात ठेवून माझ्या प्रकाशनाच्या आड आले. कारण त्या आधी काही दिवसापूर्वीच मला कन्या महाविद्यालयात आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी कालिदास दिनी प्रमुख पाहुणे म्हणून व्याख्यान देण्यात बोलवले होते. त्या दिवशी मला सर्दी झाली असतानासुद्धा मी सातत्याने कालिदास व संस्कृत भाषेचे संवर्धन या विषयी दोन तास व्याख्यान दिले होते. तो कार्यक्रम संस्कृत

संवर्धन मंडळाने आयोजित केला होता. अर्थात पुढे त्यातील काही व्यक्ती जे दि विमेन्स एज्यूकेशन सोसायटीचे पदाधिकारी होते त्यांची मते बदलली. माझे कालीदासावर व संस्कृत संर्वधनावर प्रभावी व अभ्यासपूर्ण भाषण झाल्यानंतर हा माणूस पुढे आपल्या डोक्यावर चढेल व आपली किंमत त्यामुळे कमी होईल अशी शंका त्यांना आली असावी कारण अशी संवर्धन मंडळे ही स्वत:च्या प्रसिद्धी करिता असतात.

भाषा मंडळे ही सर्वसामान्यापर्यंत पोचण्याकरिता आणि वाढविण्याकरिता नसतात. तर अशा तऱ्हेने माझे **'मेघदूताचा नवा अवतार'** हे पुस्तक मसुद्यात आले आणि सर्वमान्य जनता व बहुजन समाज ज्यांना संस्कृत कळत नाही व ज्यांच्यासाठी मी हे पुस्तक लिहिले. त्यांनी त्याचे उदार व उदात्त अंत:करणाने मन:पूर्वक स्वागत केले. इतकेच काय पन्हाळा येथे झालेल्या अखिल महाराष्ट्र मुख्याध्यापक संघाच्या अधिवेशनात माझा धाकटा मुलगा चि. राजेश पुस्तक दाखवण्यासाठी काही प्रती घेऊन गेला होता, त्या प्रती तर सर्व खपल्याच परंतु येताना आणखी शंभर दिडशे प्रतींची ऑर्डर घेऊन आला. या प्रकारावरून माझ्या मराठीत सर्व सामन्याकरिता असणाऱ्या पुस्तक किती लोकप्रिय झाले याची कल्पना येईल. अजूनही महाराष्ट्रातल्या बहुतेक सर्व शाळा, कॉलेज व ग्रंथालयात त्याच्या एक किंवा दोन कॉपीज बघण्यास मिळतात.

इसवी सन १९८४ च्या सुमारास माझा धाकटा मुलगा इंग्रजी व पोलिटीकल सायन्स घेऊन बी. ए. (ऑनर्स)

पास झाला व त्याने एम. ए. करून इंडियन ॲडमिनीस्ट्रेटीव्ह सर्व्हिससाठी प्रयत्न करण्याचा मनोदय बोलून दाखविला. त्याचा इंग्रजी हा विषय जरी चांगला होता तरी आधुनिक जगात पोलिटीकल सायन्सला महत्व असल्यामुळे तोच विषय एम. ए. ला घेण्याचा सल्ला मी त्याला दिला. शिवाय स्पर्धात्मक परीक्षेकिरता पोलिटीकल सायन्सच जास्त उपयोगी पडणारे होते. त्याप्रमाणे त्याने एम. ए. भाग - १ करिता इसवी सन १९८४ साली शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेतला व तेथील वसतिगृहात तो राहू लागला. इकडे माझा मोठा मुलगा चि. शेखरची वकिलीची प्रॅक्टीस पण बऱ्यापैकी सुरू झाली होती व काही संस्थांची कामे त्याच्याकडे येऊ लागल्यामुळे त्याचे प्रॅक्टीसमध्ये बस्तान बसू लागले होते.

त्याच दरम्यान आम्ही त्याच्या लग्नाचा विचार सुरू केला व त्याच्याकरिता मुली बघण्याचे कार्यक्रम इसवी सन १९८४ पासून सुरू झाले. अनेक लोकांनी माझ्या मोठ्या मुलाकरिता मुली सुचवल्या. माझ्या मुलाचे मित्र सांगली येथील सिव्हील जज्ज यांनी बऱ्याच मुली सुचवल्या. श्री. गिरीश टंकसाळी हे माझ्या मुलाचे चांगले मित्र तर होतेच शिवाय त्यांच्या पत्नी सौ. अंजली टंकसाळी मला व माझ्या पत्नीला आई - वडील व माझ्या मोठ्या मुलास भाऊ मानत होती. सांगली आमचे नेहमी जाणे - येणे असायचे, त्यावेळी प्रत्येकवेळी श्री. गिरीश टंकसाळी व सौ. अंजली टंकसाळी यांच्याकडे तासनतास गप्पा मारत बसत असू. त्याकाळी त्यांच्या कंपनीत वेळ खूपच मजेत जात होता. तसेच

त्यावेळी माझा मोठा मुलगा चि. शेखरने त्याच्या मित्राची फियाट गाडी विकत घेतली होती, त्यामुळे आमची कुरुंदवाड - सांगली ट्रीप सारखी होत असे व स्वत:च्या गाडीतून प्रवास करण्यात कोणताच त्रास होत नव्हता. ही गाडी माझा मोठा मुलगा चि. शेखरचे उपजिल्हाधिकारी मित्र श्री. बी. जी. जोशी यांची होती. ती जुन्या पद्धतीची निळया रंगाची फियाट असली तरी त्या गाडीचे इंजिन फारच उत्तम प्रतिचे होते; तसेच तिचा पत्रा पण चांगला होता. माझ्या मोठ्या मुलाचा पक्षकार श्री. आण्णाप्पा माळी हा व्यवसायाने ड्रायव्हर होता व आम्ही त्यास ज्यावेळी आम्हाला गाडीतून जाण्याची गरज असे त्यावेळी बोलावून घेत होतो. ही निळी फियाट आम्ही जवळपास तीन वर्षे वापरली. नंतर मग मी मुंबईला लिव्हर स्पेशालिस्ट डॉ. जे. एम. मेहता यांना दाखवण्याकरिता 'कोयना एक्सप्रेस' च्या प्रथम वर्ग चेअरकारने गेलो होतो त्यावेळी माझा मोठा मुलगा व धाकटा मुलगा यांनी माझी बहीण सौ. बबीच्या मोठा मुलगा चि. कौस्तुभ याच्या ओळखीने मॉडल जुने परंतु एक उत्कृष्ट काम केलेली अॅम्बॅसिडरकार विकत घेतली. मुंबईहून येताना आम्ही कारमधूनच आलो तो दिवाळी १९८५ सालचा काळ असेल. एक मुक्काम आम्ही पुणे येथे केला, कारण माझा मोठ्या मुलाचा पुणे शहरात बिबवेवाडी भागात जोड बंगला बांधण्याचे काम सुरू होते. माझे श्वशुर स्व. मुक्तेश्वर तेरवाडकर यांनी इसवी सन १९६६ मध्ये रेणुका हौसिंग सोसायटीमध्ये एक फ्लॅट बुक केला होता. परंतु माझा

मुलगा दत्तक गेल्यानंतर माझ्या पत्नीच्या बहिणी व त्यांचे नवरे यांनी तो फ्लॅट माझ्या मुलास द्यायचा नाही अशी भूमिका घेतली. परंतु माझा मुलगा वकील असल्यामुळे त्याने हौसिंग सोसायटीस पाठविलेल्या पावत्या, त्याचे पेमेंट तसेच मृत्युपत्राचा पुरावा व सगळयात महत्त्वाचे म्हणजे माझा मोठा मुलाचा वकील मित्र ॲड. वाघ यांचा सख्खा भाऊ पुणे येथे जिल्हा सहकारी प्रबंधक या क्लास - १ पोस्टवर होता व को - ऑप. हौसिंग सोसायटीचे सर्व काम त्याच्याकडूनच मंजूर होत असे. त्यामुळे माझ्या मुलाने धडपड करून फ्लॅटला नाव लावून घेण्यास सोसायटीची सर्वसाधारण सभेत हजर राहून मंजूरी घेतली व त्याचे नाव लागले. त्या प्लॉटच्या बदल्यात रेणुका हौसिंग सोसायटीने प्रत्येक सभासदास एक जोड बंगला मिळण्याचा करार केला व त्यानुसार त्याला १५ ए या नंबरचा जोड बंगलाची अलॉटमेंट झाली होती. सांगण्याचे प्रयोजन असे की, आम्ही पुण्याला माझा पुतण्या चि. जयंत उर्फ बंडू यांच्याकडे उतरून त्यावेळी साईटवर जाऊन बंगल्याचे बांधकाम बघून आलो व दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी नवीन कारने कुरुंदवाडला निघालो. मात्र मध्ये गाडीचा इंजिन बाबत काही प्रॉब्लेम आला व शेवटी मी आधी सांगितले ती सौ. अंजली टंकसाळी जी मला तिचे वडील मानते तिचे वडील सातारा येथील प्रख्यात वकील स्व. बेगमपूरे यांच्याकडे गेलो. तेथे काही वेळ मुक्काम करून भाड्याची दुसरी गाडी घेऊन आम्ही कुरुंदवाडला परत आलो. नंतर ती आमची कार दुरूस्त करून श्री. गिरीश टंकसाळी सिव्हील जज्ज यांनी

कुरुंदवाडला आणली. माझ्या मोठ्या मुलाकरिता मुली पाहणे सुरूच होते व म्हणतात ना की, विवाह जुळण्याकरिता किंवा कोणती ही घटना घडून येण्याकरिता वेळ व योग यावा लागतो. माझा योगायोगावर तसा विश्वास आहे. आमची नवीन गाडी दिसायला तशी उत्तमच होती. शिवाय नवीन काम केल्यामुळे व त्याच्या सफेद पांढऱ्या एक्झिक्युटीव्ह रंगामुळे ती शोभून दिसत होती. मागे सांगितल्याप्रमाणे आमच्याकडे येणारा जयपाल ज्याला मी विनोदाने राज्यपाल म्हणतो तो आमची मळयातील शेती बघत होता, त्यामुळे शेतीची चिंता नव्हती. तसेच त्याचे काम माझ्या मुलाकडे होते व त्यामध्ये यश मिळवून माझ्या मुलाने त्याचे दरखास्तीचे काम कोर्टात १२ वर्षानंतर होते. मुदत संपल्यानंतरसुद्धा अभ्यास करून ॲडमीट करून दिले होते. त्याचा परिणाम म्हणून जयपाल (राज्यपाल) ला त्याचा नृसिंहवाही औरवाड जवळील प्लॉट पण ताब्यात मिळाला होता. श्री. जयपाल नित्य नियमाने संध्याकाळी येत होता. शेतीबाबत माहिती देत होता, गप्पा गोष्टी होत होत्या. मधल्या काळात आम्ही एक छोटा पोर्टेबल टी. व्ही. घेतला होता. संध्याकाळच्या वेळी जयपाल आला की टी. व्ही वर बातम्या, आमची माती - आमची माणसे वगैरे कार्यक्रम पाहाणे, माडीवर जयपालशी माझी दोन्ही मुले, पत्नी व मी गप्पा गोष्टी करणे याची जणू सवयच झाली होती. थोडाफार प्रश्न येऊ लागला तो ड्रायव्हरचाच. कारण माझ्या मुलाचा पक्षकार आण्णाप्पा माळी हा दुसऱ्या एका टेम्पोवर नोकरी करीत होता त्यामुळे

आम्हाला पाहिजे त्यावेळी ड्रायव्हर उपलब्ध होतच नव्हता. गाडीने (कारने) सांगली, कोल्हापूर येथे माझ्या तब्बेतीसाठी डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी वारंवार जावे लागत होते. तसेच माझ्या मोठ्या मुलाला मुली पहाण्याच्या कार्यक्रमासाठी व आम्हाला त्याच्याबरोबर जाण्यासाठी गाडीची वारंवार गरज पडत होती. त्याच दरम्यान कुरुंदवाडमधील एक प्रतिष्ठित नागरीक श्री. सिताराम कोकाटे यांची आमच्या कुरुंदवाडच्या बंगल्याच्या गेटजवळ मी एकदा सहजपणे उभा असताना भेट झाली. त्यांनी दत्त फॅक्टरीत पूर्वी काम करत असणारा युसुफ कमाल मखमाला या त्यांच्या ओळखीच्या ड्रायव्हरला पाठवून देतो व त्याच्या पगाराची काही काळजी करू नका. तसेच तुम्ही सांगाल तेवढाच पगार तो घेईल त्याकरिता तो आडवणार नाही असे सांगितले. अर्थात त्यानुसार दुसऱ्या दिवशी स्वत: श्री. कोकाटे युसुफला घेऊन घरी आले व तो अनुभवी असून कायमपणे ठेवण्यास सांगितले. त्याची पगाराची कुठलीही तक्रार नसल्याने लगेचच तो कामावर रूजू झाला व त्या दिवसापासून आमच्या ॲम्बॅसिडरकारला २४ तासाकरीता ड्रायव्हर मिळाला. काम नसले तरी तो आमच्या घरासमोर बसून असायचा व त्याचे घर अगदी जवळ असल्याने रात्री कधीही बोलावल्यास येत असे. माझा मुलगा, त्याच्याकडे असणाऱ्या अनेक बँकांच्या कामासाठी दिवसभर गाडीतून फिरत असे. तसेच मला दाखवण्यासाठी व मुलाच्या व्यवहाराकरिता, मुली पहाण्यासाठी आम्ही गाडीतून अनेक गावांना जात होतो व पुष्कळदा मोठ्या शहरात हॉटेलमध्ये

रहात होतो. परंतु ड्रायव्हर युसुफ याची कोठेही कितीही दिवस रहाण्याबद्दल काही तक्रार नव्हती. त्याला कुठलेही व्यसन नव्हते व गाडीची कंडीशन उत्तम ठेवणे हा त्याचा हातखंडा होता. तसेच सा. रे. पाटील, चेअरमन यासारख्या मोठ्या व्यक्तींकडे काम केल्याने त्याला वागण्याची पद्धत चांगली माहिती होती. तो मला वडीलच मानत असे. माझे कपडे तयार करण्यापासून मी गाडीत बसण्याआधी गाडीचे दार उघडण्यापर्यंत सर्व कामे तो विना तक्रार करत असे. इतकेच काय माझी दोन्ही मुले बरोबर नसता मी एकटा गाडीतून जात असतानासुद्धा मला लघवीला नेऊन धरून उभे राहण्यापर्यंत त्यांनी माझी सेवा केली.

त्यानंतरच्या काळात म्हणजे सर्वसाधारण सत्याऐंशी (१९८७) मार्च महिन्यात आम्ही चौघे व कुरुंदवाडमधील प्रख्यात वकील व माझ्या मुलाचे मित्र ॲड. आर. ए. पाटील गाडीतून मोठ्या मुलासाठी मुली पहाणेस कराड व सातारा येथे दोन दिवसाकरिता गेलो होता. त्या वेळीही ड्रायव्हर युसुफच होता. ॲड. आर. ए. पाटील व माझे संबंध पण अत्यंत जिव्हाळ्याचे होते. ते घरी आले म्हणजे माझ्याशी तासनतास गप्पा व चेष्टा - मस्करी करत असे. आम्ही साताऱ्याला मुली बघण्यासाठी त्यांना बरोबर घेऊन गेलो होतो व तेथे हॉटेल रजताद्रीमध्ये मुक्काम केला होता. २ ते ५ मुली तरी आम्ही बघून आलो तरी तेथील एकही मुलगी माझ्या मोठ्या मुलास पसंत पडली नाही.

सांगता - सांगता एक गोष्ट राहून गेली ती त्या काळातील बँक ऑफ इंडिया शाखा कुरुंदवाड येथे काम

करणाऱ्या श्री. प्रभू व केश कामत यांच्याशी पण माझी कंपनी चांगलीच जमली होती. शिवाय माझा मोठा मुलगा बँक ऑफ इंडिया, कुरुंदवाड व जयसिंगपूर शाखेचा कायदा सल्लागार असल्यामुळे जयसिंगपूर शाखेचे व्यवस्थापक श्री. मन्सूर मुजावर यांचा स्वभाव माझ्या स्वभावाशी चांगलाच जुळला होता. श्री. मुजावर यांना कवितांची अत्यंत आवड होती व त्यांना माझे मेघदूतावरील रूपांतर फार आवडले होते. तसेच प्रजापिता इश्वरीय अवतार ब्रम्हकुमारी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या इंग्रजी प्रबंध लेखन स्पर्धेत मी सहभाग घेतला होता. प्रबंधाचा विषय 'फिलॉसॉफी ऑफ रिबर्थ' म्हणजे 'पुर्नजन्माचे तत्वज्ञान' असा कठीण होता. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक सहभागात मला त्याबाबत प्रशस्तीपत्रक मिळाले होते.

श्री. केश कामत, मुजावर यांना यांच्यामध्ये खूपच रस होता व ते सर्व लोक घरी आले म्हणजे कुरुंदवाडला आमच्या माडीवरील प्रशस्त हॉलमध्ये या सर्व व्यक्तींशी मन मोकळेपणाने गप्पा व थट्टा मस्करी आमच्या घरातील सर्व लोकांशी होत असे. वैचारिक देव घेव व माणसांचे सारखे येणे जाणे व गप्पा यामुळे वेळ चांगला जात होता व मला सातत्याने त्रास देणाऱ्या तब्येतीकडे थोड्याफार प्रमाणात दुर्लक्ष होत होते.

सर्वसाधारण इसवी सन १९८७ सालच्या एप्रिल महिन्यात आमच्या म्हणजे माझ्या मोठ्या मुलाच्या, पुण्याला रेणुका सोसायटीने बिल्डरकडून बांधून घेतलेल्या जोड बंगल्याचा ताबा देण्याचा कार्यक्रम २२ एप्रिल

असल्याचे पत्र त्या सोसायटीतील त्या वेळेचे पदाधिकारी स्व. वामनराव भीमराव कुलकर्णी यांचेकडून आले. त्याचे पझेशन घेण्यासाठी माझ्या मोठ्या मुलाने माझ्या धाकट्या मुलास प्रापर्टी (प्रतिनिधी) म्हणून पाठविले व दोन दिवसात धाकटा मुलगा या तयार जोड बंगल्याचे पझेशन घेऊन किल्ल्या घेऊन परत आला. त्यानंतर त्या १९८७ सालाच्या उन्हाळयात आम्ही पुण्याला त्या बंगल्यात राहण्यासाठी काही दिवस गेलो व तेथे काही फर्निचर व सामान विकत घेतले. मे १९८७ ला पुण्याच्या बंगल्यात राहण्याच्या आधी माझी पत्नी सौ. शकुंतला जिच्या बहिणीबरोबर सांगलीच्या भगिनी निवेदिता येथे काही चौकशी करण्यासाठी गेली असता त्या संस्थेत काम करणारी एक मुलगी माझी पत्नी सौ. शकुंतला यांच्या दृष्टीक्षेपात आली व तीला ती मुलगी पसंत पडली.

त्या सगळयांची कल्पना तिने मला व माझा मोठा मुलगा यांस दिल्यावर मी पुण्याला असताना माझ्या मोठ्या मुलाने त्याच्या मित्राबरोबर जाऊन ती मुलगी बघितली व नंतर पुण्याला आल्यावर ती पसंत असल्याचे सांगितले त्याच काळात आम्ही पुण्याला येण्याच्या आधी चिपळूण येथील डॉ. सावळे यांची मुलगी आम्ही कुरुंदवाडला दाखवण्यास आणली असताना बघितली होती. तीपण माझ्या मुलास बऱ्या प्रमाणात पसंत होती. त्यामुळे त्यांनी कोणताही निर्णय दिला नव्हता. परंतु तिला काही दिवसापूर्वी कावीळ झाली या कारणावरून माझ्या मुलाने तिला पसंती क्रमात मार्कस् कमी दिले होते. शेवटी मुलाची

पसंती महत्त्वाची असते, कारण लग्न त्यांना करायचे असते. त्यानुसार आम्ही पुण्याहून माझ्या मुलाला डॉ. सावळे पेक्षा थोडी जास्त पसंत पडलेली मुलगी आम्ही सर्वानी कुरुंदवाडला पाहिली. तिच्या वडिलांचे नाव श्री. बाळकृष्ण सीताराम शिरटीकर असे होते व ते बरेच दिवसापासून सांगलीला स्थायिक झाले होते. त्यांच्या मुलीचे नाव कुमारी विद्या बाळकृष्ण शिरटीकर असे आहे व तिला एकच धाकटा भाऊ होता. त्या मुलीला परत बघितल्यानंतर माझ्या मुलाच्या पसंती करण्यात तिचा वरचा क्रमांक लागल्यामुळे मी माझ्या मुलाच्या इच्छेविरुद्ध काहीही करण्याचे नाही असे ठरवून त्याच्या पसंतीस मान्यता दिली व त्यावर शिक्कामोर्तब केले.

माझ्या पत्नीने पत्रिका जुळते का ते बघूया व मग नंतर निर्णय देऊ असे मत व्यक्त केले, परंतु माझा पत्रिकेवर विश्वास नसल्यामुळे व मुलाची पसंतीस मी अग्रक्रम देत असल्यामुळे लगेचच त्याच दिवशी संध्याकाळी लग्न ठरले व याद्या झाल्या. त्यावेळी पुण्यातील आमच्या बंगल्याच्या सोसायटीचे खजीनदार (त्यावेळचे) स्व. वामनराव भीमराव कुलकर्णी हेपण हजर होते व त्यांचीपण यादीवर सही होती .

तसेच लग्न कोल्हापूरला करण्याचे ठरवून ४ जुलै १९८७ रोजी लग्नाची तारीख निश्चित करण्यात आली. त्यानुसार अनेक मुली बघून शेवटी तारीख ४ जुलै १९८७ रोजी माझा मोठा मुलाचा चि. शेखर याचा विवाह लक्ष्मी मंगल कार्यालय, कोल्हापूर येथे यथार्थ संपन्न झाला.

विवाहात माझ्या मुलाने माझ्या मोठ्या सुनेचे नाव सौ. विद्या बदलून सौ. शिल्पा असे ठेवले व ती दोघेही हनिमूनसाठी पुण्यास रवाना झाली. शेवटी मी एकदाचा सुटकेचा निश्वास टाकला.



# (४८) मी परत आजारी पडलो.

माझ्या मोठ्या मुलाचा विवाह सौ. शिल्पा शिरटीकर हिच्याबरोबर झाल्यामुळे मला बऱ्याच प्रमाणात मानसिक समाधान मिळाले. तशातच या लग्नाच्या आधीपासून माझा धाकटा मुलगा चि. राजेश हा एम. ए. राज्यशास्त्रात संपूर्ण विद्यापीठात प्रथम वर्गात पास झाला व त्याचे पेपरमध्ये नाव आणि फोटो आला होता. त्याच्या उत्कृष्ट गुणवत्तेमुळे त्याला लगेचच कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून नोकरी मिळाली. मोठ्या मुलाचा बराच लांबलेला विवाह व धाकट्या मुलाला मिळालेले उत्कृष्ट यश यामुळे मी जरासा सुटकेचा नि:श्वास टाकला व निश्चिंत झालो, पण.... पण या शब्दामुळे जगातील अनेक समीकरणे व यश व अपयशाचे प्रदान नेहमीच बदलत असतात.

ऑगस्ट १९८७ च्या सुरुवातीला गणपतीच्या काळात मला रोज ताप येऊ लागला. मोठ्या मुलाचे झालेले नवीन लग्न व धाकट्या मुलाला मिळालेली नवीन नोकरी तशातच गाडी व ड्रायव्हर, जयपालचे शेतीचे चांगले नियोजन व माझा धाकटा मुलगा यानं प्रयत्न करून बोअर मारलं. अकरा एकर असणारी कोरडवाहू जमीन बागायती केल्याने पहिले काही दिवस तापाकडे किरकोळ म्हणून दुर्लक्ष झाले. सर्व बाजूंनी यश मिळत असल्यामुळे माणसाच्या मनात वाईट विचार सुचतच नाहीत.

कुरुंदवाड येथील फॅमिली डॉक्टर यांनी ताप साधाच असेल, आज उद्या कमी होईल असे सांगून अनेक औषधे

दिली. माझ्या मुलाचा मित्र डॉ. पटेल रोज दोन - तीन वेळा येऊन बघत होते. परंतु त्यालाही योग्य निदान लागले नाही. ताप वाढतच राहिला व दुपारी दोन वाजता नित्य नियमाने येऊ लागला. त्याचा परिणाम म्हणजे माझ्या मोठ्या मुलाने कोर्टात जाणे बंद केले व धाकट्या मुलाने नोकरी सोडून तो कुरुंदवाड येथे येऊन थांबला. आमचे नेहमीचे फिजिशीयन डॉ. व्ही. व्ही. देसाई हे सांगलीला असल्यामुळे त्यांचा सल्ला घेण्यासाठी आम्ही सांगली येथील हॉटेल रत्ना येथे जवळपास तीन आठवडे राहिलो.

डॉ. देसाई यांनापण तापाचे निदान लागले नाही व त्यांना लिव्हर कॅन्सरची शक्यता वाटू लागली. त्याकरिता त्यांनी लिव्हर बायोप्सी करण्यासाठी ॲडमिट होण्याचा सल्ला दिला. माझा मोठा मुलगा मला ॲडमिट करण्याच्या तयारीत होता कारण त्याच्या मते आपण डॉक्टरांच्या सल्ल्याने वागणे जरूरीचे आहे असे होते. मात्र माझ्या धाकट्या मुलाने त्यास विरोध केला व दुसऱ्या डॉक्टरांचा सल्ला घेऊ व मुंबईस जाऊ असे मत व्यक्त केले.

शेवटी दुसऱ्या डॉ. प्रधान यांचा सल्ला घेतल्यावर त्यांना लिव्हर कॅन्सरची शक्यता वाटली नाही. त्यांचे मते माझ्या पोटात पाणी असून त्यात टी. बी. च्या जंतुचे इन्फेक्शन झाले आहे. मात्र माझ्या मोठ्या मुलाला डॉ. देसाई यांच्या सल्ल्याप्रमाणे वागण्याची इच्छा होती. शेवटी माझ्या सांगण्यावरून माझ्या मुंबईच्या बहिणीला व मेहुण्यांना माझ्या मुलांनी बोलावले व स्पेशल टॅक्सी करून आम्ही मुंबईला गेलो. जाताना पुण्याला आमच्या नुकत्याच

ताब्यात मिळालेल्या जोड बंगला १५ - ए मध्ये मुक्काम केला. त्यावेळेस व माझ्या मोठ्या व धाकट्या मुलाने कोणत्याही डॉक्टरांचा सल्ला न घेता पुण्यातील के. ई. एम. हॉस्पिटलमध्ये डॉ. राहाळकर यांच्याकडून पोटाचा स्कॅन काढून घेतला. त्यांनी लगेचच रिपोर्ट दिला व त्यानुसार लिव्हर कॅन्सर नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच पोटात पाणी साचल्याचे त्यांनी रिपोर्टमध्ये सांगितले. नंतर आम्ही मुंबईला गेलो व डॉ. मेढेकर यांचा सल्ला घेतला. स्कॅनमुळे त्यांना निदान करणे सोपे गेले तरीसुद्धा त्यांनी माझ्या पोटातील थोडेसे पाणी तपासणेस काढले व पोटातील इन्फेक्शन टी. बी. च्या जंतूमुळे झाले आहे असे निदान करून ट्रिटमेंट चालू केली.

ट्रिटमेंट मला लवकर लागू पडली नाही व सारखी चालू करावी लागली. सरतेशेवटी डिसेंबर महिन्यात ट्रिटमेंट लागू पडली. या ट्रिटमेंटच्या काळात दिवाळीपासून एप्रिलपर्यंत मी माझा धाकटा मुलगा, माझी पत्नी व माझी मोठी सून सौ. शिल्पा पुण्याला आमच्या बंगल्यातच राहिलो. पुढे - पुढे माझी प्रकृती सुधारू लागली व मी माझ्या मुलांशी व माझी सून सौ. शिल्पाशी कॅरम वगैरे खेळून वेळ घालवू लागलो. माझा मोठा मुलगा कुरुंदवाडहून जाऊन येऊन करीत होता.

एप्रिल १९८८ मध्ये पुण्याला उन्हाळा जास्त जाणवू लागला व सोईच्या दृष्टीने कोल्हापूरला जाण्यावर निर्णय डॉ. मेढेकर यांना विचारत घेतला. त्यावेळी माझ्या मोठ्या मुलाचे मित्र श्री. प्रभू यांनी बँक ऑफ इंडिया सोसायटीत

कोल्हापूरला आमच्या करता भाड्याने फ्लॅट घेऊन ठेवला व मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आम्ही पुण्यातील आमच्या बंगल्यातून कोल्हापूरला स्थलांतरित झालो. कोल्हापूर शहरात माझ्या मोठ्या सुनेच्या मावस बहिणीचे मालक डॉ. आनंद कुलकर्णी हे नात्यातलेच असल्यामुळे त्यांचा सल्ला मी घेऊ लागलो. त्यानंतर एकच महिन्यात या फ्लॅटच्या जवळच साई हौसिंग सोसायटीमध्ये प्रशस्त व मोठा फ्लॅट माझ्या मुलाच्या ओळखीने मिळाला व त्यात आम्ही स्थलांतरित झालो.

त्यानंतर डॉ. आनंद कुलकर्णी यांच्या म्हणण्यानुसार कोल्हापूर मेडीकल सेंटर येथे सोनोग्राफी करून पोटात पाणी नसल्याचे निदान निश्चित झाल्यावर माझी सलगपणे तीन महिने चालणारी ट्रिटमेंट संपली. एवढे झाले तरी पोटाचा त्रास सुरूच होता. मी यात प्रत्येक ठिकाणी लिहिले नाही, परंतु या माझ्या पूर्ण दुखण्याच्या काळात मला शारीरिक त्रास कायमपणे अखंडितपणे सुरू होता व त्याकरिता मी अनेक वेळा डॉक्टरांना बोलावून त्यांचा सल्ला घेणे व अनेक स्वरुपाच्या तपासण्या करणे चालूच होते. कोल्हापूरच्या या साई को - ऑप. हौसिंग सोसायटीच्या फ्लॅटमध्ये आम्ही म्हणजे मी, पत्नी व धाकटा मुलगा चि. राजेश जवळपास मे १९८९ पर्यंत होतो.

मधल्या काळात माझ्या मुलांनी शेतातील अनेक कटकटी मोजणी वगैरे करून सोडवली व जयसिंगपूर शहरात तीन रूम्सचे आर. सी. सी. अर्धवट बांधलेले १३ व्या गल्लीतील घर रूपये ९०,०००/ - ला विकत घेतले.

तसेच त्याच काळात माझ्या धाकट्या मुलाने जयपाल याची मदत घेऊन आमच्या मळयात बोअर मारला व त्यास चांगले पाणी लागले. मोठ्या मुलाने रेल्वे स्टेशनसमोर तपस्या अपार्टमेंटमध्ये बी - ४ हा फ्लॅट रु. १,५०,०००/ - रुपयात खरेदी केला व ताराबाई पार्क मधील साई को - ऑप. सोसायटीतील फ्लॅटमधून आम्ही स्वत: च्या फ्लॅटमध्ये मे १९८९ ला आलो.

मधल्या काळातील एक महत्त्वाची घटना सांगण्याचे राहून गेले ती म्हणजे २६ जानेवारी १९८९ गुरूवारी माझ्या मुलास पुत्ररत्न प्राप्त झाले. माझी सून सौ. शिल्पा हिची डिलिव्हरी अर्थात सिझेरीअन सांगली येथील डॉ. आडीगा यांचेकडे झाले. त्यावेळी माझ्या नातवाला बघण्यासाठी आम्ही सगळेच गेलो होता. त्यावेळी आम्हाला हॉटेल रत्नामध्ये जागा मिळाली नसल्यामुळे आम्ही माधवनगर रोडवरील हॉटेल प्रशांतमध्ये उतरलो.

माझ्या तब्येतीचा त्रास व वेदना व दुःख यामध्ये मला नातू व माझ्या मोठ्या मुलास मुलगा झाला ही अत्यंत सुखद व आनंददायक बातमी मला त्या वर्षाची भेट म्हणून जानेवारी १९८९ मध्ये मिळाली. माझी माझे गुरु श्री. गजानन महाराजावर पूर्ण निष्ठा असल्यामुळे मी त्याचे नाव चि. गुरुप्रसाद असे ठेवले ठेवावे असे सुचविले व त्याप्रमाणे त्याचे नाव चि. गुरुप्रसाद म्हणजे माझ्या गुरूंचा माझ्या मुलाला मिळालेला प्रसादच म्हणावा लागेल.

मे १९८९ काळात कोल्हापूरच्या आमच्या पहिल्या अपार्टमेंटमध्ये राहायला आल्यानंतर जयसिंगपूरचे अर्धवट

बांधकाम पूर्ण करण्याचा मनोदय माझा मोठा मुलगा चि. शेखर याने व्यक्त केला व त्यानुसार त्याच्याच ओळखीने आम्ही जयसिंगपूरला तात्पुरते राहण्यासाठी म्हणून गल्ली नं. १ मधील चैतन्य अपार्टमेंटमध्ये स्थलांतरीत झालो. ही सर्वसाधारण जून १९८९ ची घटना असावी. त्या ठिकाणी आम्ही काही दिवस राहिलो, त्यावेळी आमच्याकडे असणारी कारकरिता श्री. चव्हाण नावाचा ड्रायव्हर व त्याचा मुलगा प्रकाश कामाला ठेवला होता. पुण्याला १९८९ च्या मुक्कामात शेवटी - शेवटी युसुफची तब्येत बरी नसल्यामुळे तो गावाकडे कुरुंदवाडला गेला व आम्ही कोल्हापूरला आल्यावर त्याच्याऐवजी रघुनाथ कृष्णाजी चव्हाण व त्याचा मुलगा साई को - ऑप. सोसायटीच्या फ्लॅटमध्ये भाड्याने असताना ड्रायव्हर म्हणून व मुलाला घर कामाला गडी म्हणून ठेवला.

जयसिंगपूरला आम्ही आलो व चैतन्य अपार्टमेंटमध्ये १९८९ जून पासून राहिलो त्यावेळीपण तोच गाडी कामाला कायम होता. चैतन्य अपार्टमेंटमध्ये राहून आमचे १३ व्या गल्लीतील बांधकाम पूर्ण होण्याची काही चिन्हे दिसेनात. शिवाय चैतन्य अपार्टमेंटमध्ये पावसाळ्यात फार गारवा असल्यामुळे तब्येत वारंवार बिघडू लागली. मला सोनोग्राफी करण्याकरिता व डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी दोन - चार वेळा परत कोल्हापूरला जावे लागले. हिवाळ्यात तर आसपास ऊस असल्याने तो गल्ली नं. १ चा फ्लॅट फारच गार पडू लागला. त्यामुळे खोकला, फल्यु व पोटाचा त्रास व डॉक्टरांकडे फेऱ्या वाढल्या. शेवटी पोट

विकार तज्ञ डॉ. राजेश धरमसी यांचा सल्ला घेतला व त्यांना माझा पुणे येथे डॉ. रहाळकर यांच्याकडे काढलेला स्कॅन व रिपोर्ट त्यांच्याकडे बघण्यासाठी दिला तो माझ्या माहितीप्रमाणे आजतागायत त्यांच्याकडेच आहे. या सर्व प्रकारामुळे मी व माझी मुले, पत्नी, सून व नातू आम्ही काही दिवस पुण्याला जाण्याचे ठरविले व आमच्याच कारने चव्हाण ड्रायव्हर असताना डिसेंबर १९८९ मध्ये पुण्याला जाण्यास निघालो.

ड्रायव्हर चव्हाण हा म्हातारा झाला असल्यामुळे त्याला अंधारात गाडी चालविता येत नव्हती, त्यामुळे आम्ही एक दिवस सातारा येथे मुक्काम करून दुसऱ्या दिवशी पुण्याला गेलो. आम्ही चैतन्य अपार्टमेंटमध्ये असतानाच आमच्या फ्लॅटच्या समोरील फ्लॅटमध्ये शिरोळ येथील पी. एस. आय. श्री. स्वामी राहत होते. त्यांच्या पत्नी व माझी पत्नी व सून यांचे नेहमी येणे - जाणे असे.

श्री. स्वामी हे माझ्या दोन्ही मुलांच्या चांगल्याच परिचयाचे होते. त्यांची भेट पुढे काही दिवसांनी म्हणजे १९९३ मध्ये माझ्या दुसऱ्या मुलाच्या लग्नाच्या वेळी झाली. कारण माझे दुसऱ्या मुलाचे सासरे श्री. कुलकर्णी हे डी. वाय. एस. पी. होते व त्यावेळी श्री. स्वामी यांनी पण दोन्ही मुलांना ओळखले.

आम्ही पुण्यास पोचलो खरे पण त्यानंतर चार - आठ दिवसातच माझा मोठा मुलगा व सून सौ. शिल्पा परत जयसिंगपूरला गेले. त्यानंतर त्याचे काम आटपून माझा मोठा मुलगा परत आला व सून सौ. शिल्पा माहेरी

सांगलीलाच थांबली. नंतर माझा धाकटा मुलगा घराच्या व शेतीच्या काही कामासाठी कुरुंदवाडला गेले होते. त्यांच्या बरोबर माझी सून सौ. शिल्पा परत आली. या सर्व घडामोडीत माझी मुंबईची बहीण मला येऊन भेटून गेली. त्याचं ठिकाणी आम्ही आमच्या नातवाचे जानेवारी १९९० रोजी पुण्यात बारसे केले. त्या दिवशी गंमत अशी झाली की, मी नेहमी झोप येण्याकरिता घेत असणारी गोळी 'एटीवान' सकाळी पडली असता माझ्या नातवाने चावून खाल्ली. त्यामुळे बाकी सर्व लोक त्याच्या वाढदिवसाला आले असताना तो मात्र झोपेत पेंगाळत होता.

त्यानंतर आठवड्यातच माझ्या मोठ्या सुनेचे अॅबॉरशन झाले व त्याकरिता पुढे त्रास होऊ नये म्हणून ती, माझा मोठा मुलगा व सुनेचा भाऊ जो त्यावेळी नोकरी निमित्त पुण्यात होता, असे तिघेही श्री. यादव या आमच्या ओळखीच्या व्यक्तीची टॅक्सी घेऊन सांगलीला गेले व माझा मोठा मुलगा माझ्या मोठ्या सुनेला सोडून आला व माझी मुलं, पत्नी, ड्रायव्हर व त्याचा मुलगा, माझा धाकटा मुलगा चि. राजेश माझ्याजवळ पुण्यातच होते.

त्यानंतर माझ्या पत्नीने व माझ्या धाकट्या मुलाने रांजणगावचा गणपती व इंद्रायणी येथील ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे दर्शन घेण्याचे काम आटोपले. माझा मोठा मुलगा मोठ्या सुनेस सोडून आल्यावर माझी सोनोग्राफी डॉ. कामत यांच्याकडे पुण्यालाच केली. त्यांचा रिपोर्ट बरोबर वाटत नाही असा हट्ट माझ्या धाकट्या मुलाने केल्यावर परत माझी सोनोग्राफी मेडीनोवामध्ये केली.

(माझी यापूर्वी पुण्यात सोनोग्राफी १९८८ एपिलला मेडीनोवामध्ये केली होती.) दोन्ही सोनाग्राफीच्या रिपोर्टमध्ये फारसा फरक नव्हता व लिव्हरची परिस्थिती 'जैसे थे' अशीच होती. म्हणजे लिव्हरला डॅमेज जेवढा झाला होता तेवढाच होता. एप्रिल महिन्यापर्यंत पुण्याला राहिल्यानंतर उन्हाळयामुळे आम्ही परत कोल्हापूरला आमच्या फ्लॅटमध्ये आलो. तोपर्यंत माझ्या मुलाच्या असिस्टंटने जयसिंगपूर येथे राहण्याएवढे काम पूर्ण केले होते. शेवटी जयसिंगपूरचे घर पूर्ण करण्यासाठी व खालील तीन खोल्या लहान पडत असल्यामुळे १९८५ साली घेतलेला सांगलीचा प्लॉट मी विकला व त्या पैशात राहिलेले खालचे व वरील बांधकाम करण्याचे ठरले. त्या दृष्टीने सोयीचे जावे म्हणून १३ व्या गल्लीतील समोरील दोन ते तीन रूम्सचा मोठा ब्लॉक जो श्री. गायकवाड या मालकांचा होता तो आम्ही ओळख काढून महिना ८०० रुपये एवढ्या भाड्याने जुलै १९९० ला घेतला व आम्ही सर्व त्या घरामध्ये राहू लागलो. १३व्या गल्लीतील घर समोरच असल्यामुळे वरील बांधकाम करणे सोयीचे झाले. दरम्यानच्या काळात माझा धाकटा मुलगा चि. राजेश एल. एल. बी. दुसऱ्या वर्षी उत्तीर्ण झाला व त्याने एल. एल. बी. तिसऱ्या वर्षात प्रवेश घेतला.

त्याच दरम्यान त्याच काळात कायदा महाविद्यालयात प्रि - लॉकोर्ससाठी पहिल्या व दुसऱ्या वर्षाला राज्यशास्त्र हा विषय शिकवण्यासाठी त्याची व्याख्याता म्हणून नेमणूक झाली. जयसिंगपूरहून सांगलीला

नोकरीला जाणे त्याला सोईचे झाले. मी सांगलीच्या विकलेल्या प्लॉटमधून घराचे बांधकाम पूर्ण होण्यास जवळ - जवळ सहा ते सात महिने लागले. सर्व साधारण मार्च महिन्याच्या १९९१ साली १३व्या गल्लीतील 'मेघदूत' या इमारतीचे बांधकाम करून झाले. मध्यंतरी १७ डिसेंबर १९९० रोजी माझ्या मोठ्या मुलास दुसरे पुत्ररत्न डॉ. आडीगा यांच्या हॉस्पिटलमध्ये सिझरियन करून झाले. त्याचे नाव माझ्या मोठ्या सुनेने तिच्या इच्छेप्रमाणे चि. पुष्कर असे ठेवले.

१९९१ सालात नोकरीमुळे व बांधकाम आणि कुरुंदवाड येथील इतर कामामुळे माझा धाकटा मुलगा चि. राजेश तृतीय परीक्षा एल. एल. बी. स बसू शकला नाही. अर्थात त्याची नोकरी कायम स्वरुपी चालू होती. मात्र १९९२ च्या ऑक्टोबर महिन्यात माझा धाकटा मुलगा चि. राजेश एल. एल. बी. (स्पे.) चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाला व वकीलीची परीक्षा यशस्वीरित्या पास झाला. त्याच दरम्यान डिसेंबर महिन्यात राम जन्मभूमी व बाबरी मशीद या वादामध्ये बराच गोंधळ देशामध्ये झाला.

एल. एल. बी. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर माझ्या मोठ्या मुलाच्या हाताखाली धाकट्या मुलाने चांगले काम केले व मोठ्या मुलाकडे असणारे बँक ऑफ इंडिया, कुरुंदवाड, इचलकरंजी आणि स्टेट बँक ऑफ इंडिया, हातकणंगले वगैरे संस्थांची कामे स्वतंत्रपणे करू लागला. त्यामुळे त्याची प्राप्ती चांगली होवू लागली. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या तर १००, २०० नोटीसा एकाचवेळी काढून

त्याला १० ते १५ हजाराची फी एकाच झटक्यात मिळू लागली. तसेच बँक ऑफ इंडिया, कुरुंदवाड शाखाधिकारी श्री. कुलकर्णी व जयसिंगपूर शाखेचे मॅनेजर श्री. मिलींद देशपांडे यांनी पण अनेक दावे, नोटीसा वगैरे काम माझ्या मोठ्या मुलातर्फे धाकट्या मुलाकडे सोपविले.

एवढेच काय कुरुंदवाडला एकाचवेळी बँक ऑफ इंडिया १० ते १५ दिवाणी दावे माझा धाकटा मुलगा चि. राजेश याने माझ्या मोठ्या मुलातर्फे काम करताना दाखल केले. अगदी आश्चर्य वाटेल अशी घटना घडली ती ही की, माझा धाकट्या मुलाचा विवाह २४ फेब्रुवारी १९९३ रोजी ठरला असताना बँक ऑफ इंडिया, जयसिंगपूर शाखेचे मॅनेजर श्री. मिलिंद देशपांडे साहेब, (जे माझे पण अत्यंत जवळचे मित्र होते व त्यांचे आणि माझे अत्यंत जिव्हाळयाचे संबंध होते. तसे ते माझ्याकडे तासनतास गप्पा मारीत बसत असत.) यांनी २० फेब्रुवारी १९९३ रोजी म्हणजे धाकट्या मुलाच्या लग्नाच्या केवळ तीन दिवस अगोदर वीस लाखाचा दावा व त्याचे ड्राफ्टींग करून दाखल करण्याची विनंती माझ्या मोठ्या व धाकट्या मुलास केली. त्यावेळी अशाही परिस्थितीत माझ्या धाकट्या मुलाने दाव्याचे ड्राफ्टींग करून त्याला लागणारा स्टॅम्प चार ठिकाणाहून स्वत:च्या लग्नाच्या केवळ दोनच दिवस आधी कोल्हापूरला जाऊन दाखल केला. हा पुढील भाग मी एवढ्याकरिता सांगितला की, माझ्या धाकट्या मुलाचे चांगल्या प्रॅक्टीसमुळे व ओळखीमुळे चांगले बस्तान बसले होते. १९९२ ऑक्टोबर साली माझा धाकटा मुलगा अॅडव्होकेट झाल्यानंतर त्याच्या

विवाहाकरिता आम्ही मुली बघण्यास सुरुवात केली. त्यांच्या बाबतीत पण मोठ्या मुलाप्रमाणेच प्रश्न असा निर्माण झाला, की त्याला कुठलीही मुलगी १००% पसंत पडत नव्हती.

अनेक मुली दाखविण्याकरिता येत होत्या व आम्ही बघण्याकरिता जात होतो. पण त्याच्या पसंतीक्रमात कोणीच उतरत नव्हती. आपल्या समाजात दाखवून विवाह करण्याच्या पद्धतीने पसंतीचा फार मोठा प्रश्न निर्माण होतो. तसेच काहीच वेळा मुलगा - मुलगी एकमेकांना पाहून आयुष्याचा निर्णय घेणे हा मोठा यक्ष प्रश्न असतो ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्याला पर्याय नाही. माझ्या धाकट्या मुलाला मुली बघण्याच्या कार्यक्रमात विजापूरपासून नाशिकपर्यंत अनेक मुली पहाण्यासाठी जाऊन आलो.

शेवटी मुलगा कुठलीच मुलगी पसंद करत नाही म्हटल्यावर माझ्या अधिकाराचा उपयोग करण्याचा मी निर्णय घेतला. सांगली शहरातील डी. वाय. एस्. पी. श्री. वसंतराव कुलकर्णी यांची मुलगी चि. आरती हिचे स्थळ माझ्या मुलाकरिता आले होते. योगायोगाने त्यावेळचे सांगलीचे डी. एस्. पी. श्री. रामराव वाघ हे विदर्भातील होते. तसेच त्यांचा सख्खा भाऊ माझा मोठा मुलगा चि. शेखर याच्या वर्गात अमरावतीला कॉलेजमध्ये एकत्र शिकत होता व ते दोघेही एकाच होस्टेलमध्ये अमरावतीला रहात होते. त्यामुळेही एस. पी. श्री. रामराव वाघ यांची व माझी मोठ्या मुलाची चांगली ओळख निघाली व आताच्या आलेल्या मुलीचे वडील श्री. वसंतराव कुलकर्णी हेही एस्.

पी. रामराव वाघ यांच्या हाताखालीच डी. वाय. एस. पी. म्हणून काम पहात होते. सर्व मुलींना बघायला मी स्वत:च जात असे. तसेच या मुलीला पहाण्यासाठी आम्ही सर्वजण माझ्या धाकट्या मुलासहीत डी. वाय. एस. पी. वसंतराव कुलकर्णी यांच्या बंगल्यावर गेलो. ही मुलगी पहाण्याचा हा दुसरा कार्यक्रम होता. ही मुलगी पहाण्याचा कार्यक्रम त्यांच्या बंगल्यावर पार पडल्यानंतर ती मला माझ्या धाकट्या मुलाकरिता योग्य वाटली व घरी येताच मी अधिकारवाणीने धाकट्या मुलास, "ही मुलगी तुला पूर्णत: योग्य असून हिच्याशीच लग्न कर." असे ठासून सांगितले.

लग्नामध्ये तडजोडही करावीच लागते व आपल्या पूर्ण पसंतीची मुलगी कधीच मिळत नाही ही व्यवहारातील बाजू तो लहान असल्याने त्याला माहित नसेल.

शेवटी त्याने या मुलीस आपली पसंती दिली व डिसेंबर १९९२ साली मी व माझा मोठा मुलगा तसेच माझ्या मोठ्या सुनेचे वडील यांनी धाकट्या मुलाच्या म्हणजेच चि. राजेशच्या चि. आरती यांच्या होणाऱ्या लग्नाबाबत चर्चा केल्या. त्यानंतर जानेवारी १९९३ मध्ये साखरपुड्याचा कार्यक्रम पार पडला. कपडे खरेदी, देणे - घेणे वगैरे सर्व कामे माझा मोठा मुलगा व मोठी सून यांनीच पाहिली. मुलीकडील लोक सामाजिक व आर्थिकदृष्ट्या चांगल्या परिस्थितीत असल्याने त्यांना सांगलीतील त्यावेळचे उत्तम कार्यालय 'खरे मंगल कार्यालय' हे विवाहाकरिता हवे होते, परंतु मुहूर्त जास्त असल्याने व कार्यालय चांगले असलेने ते मिळविणेत थोडा त्रास झाला.

तशातच मुलीचे वडील श्री. वसंतराव कुलकर्णी यांची उस्मानाबादला बदली झाली, परंतु उशिरा का होईना २४ फेब्रुवारी १९९३ या दिवसाचे खरे मंगल कार्यालयाचे बुकींग मिळाले व त्या दिवशी माझ्या धाकट्या मुलाचे लग्न अत्यंत उत्साहाने, दिमाखाने व डामडौलाने पार पडले. अशा तऱ्हेचे लग्न फारच कमी लोकांचे होत असतील. माझ्या धाकट्या मुलाचा हा विवाह सोहळा खरोखर अभूतपूर्व असा होता. यात शंकाच नाही. माझा धाकटा मुलगा चि. राजेश व सून सौ. आरती म्हणजेच सौ. स्वप्ना हिचे लग्न झाल्यानंतर ते दोघेही माझ्या मोठ्या मुलाप्रमाणेच हनीमुनकरीता पुण्याला गेले.

खरेतर त्यांना हनीमुनला गोवा येथे जाण्याचा विचार होता, परंतु माझ्या धाकट्या मुलाचा अगदी जवळचा मित्र चि. पांडूरंग शंकर कौलापूरे हा गोव्याजवळ शिरोडा (वि. स. खांडेकर यांच्या जन्मगावी) ज्युनिअर कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून काम करीत होता. त्याने लग्नानंतर जाताना गोव्याला गेल्यावर बुकिंग करतो व फोन करतो असे सांगितले होते. दोन - चार दिवस त्याचा फोन येण्याची वाट बघून कदाचित हॉटेल्समध्ये बुकिंग मिळत नसेल या समजुतीखाली माझा धाकटा मुलगा व सून सौ. स्वप्ना पुण्याला हनीमुनसाठी गेले आणि त्याच रात्री त्यांचे बुकिंग झाल्याचे फोन आला. एकूण काय तर गोव्याला हनीमुनला जाण्याचा माझा धाकटा मुलगा चि. राजेश व सौ. स्वप्ना यांचा योगायोग नव्हता, असेच म्हणावे लागेल.

माझा धाकटा मुलगा पुण्याहून परत आल्यावर माझ्या डाव्या डोळयाचे मोती बिंदूचे ऑपरेशन सांगली येथे नेत्र विकार तज्ञ डॉ. दिलीप पटवर्धन यांच्याकडून झाले. खरे म्हणजे मोतीबिंदूचे ऑपरेशन आधीच होण्याचे होते, परंतु धाकट्या मुलाच्या लग्नाच्या वेळी विधी वगैरेच्या वेळी धुराजवळ बसता येणार नाही म्हणून मोतीबिंदूचे ऑपरेशन धाकट्या मुलाच्या लग्नापर्यंत पुढे ढकलले. माझ्या मोठ्या मुलाचे सासरे व माझे व्याही तर डॉ. पटवर्धन यांच्या दवाखान्यापासून जवळच राहत होते त्यामुळे त्यांची तर मदत झालीच, शिवाय माझ्या मोठ्या मुलाने स्वत: पुढाकार घेऊन त्यावेळी बरेच कष्ट घेतले. इतकेच काय माझ्या धाकट्या नवीन लग्न झालेल्या मुलाचे सासरे श्री. वसंतराव कुलकर्णी व सासूबाई म्हणजे माझे नवीन व्याही व विहीण उस्मानाबादहून मला पाहण्याकरिता खास सांगलीला आले. अशा रीतीने सर्वांच्या सहकार्याने माझे डोळयाचे ऑपरेशन पार पडले व माझी धाकटी सून सौ. स्वप्ना तिच्या आई - वडिलांबरोबर काही दिवस माहेरी राहण्यासाठी उस्मानाबादला गेली.

माझ्या धाकट्या मुलाचे लग्न झाल्यानंतर व धाकटी सून सौ. स्वप्ना माहेरहून परत आल्यानंतर ती माझ्याकडे पूर्ण लक्ष देत होती. माझे राहणे, झोपणे वरती म्हणजे 'मेघदूत' बंगल्याच्या आमच्या घरात वरतीचं असल्यामुळे माझे तापलेले पाणी, पथ्याचे जेवण इतर आवश्यक वस्तू, चहा देणे, औषधे देणे ही सर्व कामे सुरुवातीच्या काळात माझ्या धाकट्या मुलाची बायको म्हणजे सौ. स्वप्नाच करत

असे. ती एप्रिल महिन्यात परत आल्यानंतर आम्ही उन्हाळा जास्त जाणवू लागल्यामुळे परत कोल्हापूरच्या घरात राहावयास गेलो. अर्थात कोल्हापूरचे घर फ्लॅट लहान होता. तरीपण बदल म्हणून आम्ही सर्वजण म्हणजे माझा मोठा मुलगा, मोठी सून सौ. शिल्पा, धाकटा मुलगा व सून सौ. स्वप्ना, पत्नी व नातवंडे असे सगळेच जण एक ते दोन महिने कोल्हापूरला सुट्टीसाठी वास्तव्य करीत असू. कारण कोल्हापूर हे थंड हवेचे ठिकाण होते.

पावसाळ्याच्या सुरुवातीला आम्ही जयसिंगपूरातील आमच्या 'मेघदूत' या घरात परत रहाण्याकरिता आलो. त्यानंतरच्या काळात माझी धाकटी सून सौ. स्वप्ना (सौ. आरती) मंगळागौरी करिता १५ - २० दिवस आधी उस्मानाबादला गेली होती. प्रत्यक्ष मंगळागौरीच्यावेळी माझी पत्नी व माझा धाकटा मुलगा स्पेशल कार करून उस्मानाबादला जाऊन आले. आम्ही १९८५ साली घेतलेली ॲम्बेसिटर कारचा पत्रा खराब झाल्यामुळे व पेट्रोल इंजिन महाग पडत असल्यामुळे आम्ही ती गाडी पण वापरणे बंद करून भाड्याने टॅक्सी करूनच सर्व ठिकाणी जात होतो. माझा धाकटा मुलगा, सून व पत्नी स्पेशल कारने उस्मानाबादहून परत आल्यावर आणखी एक समस्या निर्माण झाली. माझ्या पत्नीची बहीण कुरुंदवाड येथे तिच्याबरोबर मदतीला असणाऱ्या बाई सौ. गोंदूबाई यांच्याबरोबर रहात असे. आम्ही कुरुंदवाडला असतानासुद्धा या गोंदूबाई १९७८ पासून आमच्याकडे स्वयंपाकास होत्या. त्यावेळी लहान मुलगा पण त्यांच्या

बरोबर होता. तो लहानपणी शाळेत कुरूंदवाडलाच शिकला होता. त्याचे नाव अभिजीत असले तरी आम्ही गंमतीने त्याला टिंकू रहमान अंतुले म्हणत असू. कारण त्यावेळी ए. आर. अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. पुढे त्याच्या मामाने त्याला डोंबिवली येथील एका दांपत्यास त्याला दत्तक दिले. मात्र त्याआधी माझ्या दोन्ही मुलाचे त्याच्यावर खूपच प्रेम होते व तो त्यांना मामा म्हणत असे. त्याच्या आजारीपणात माझ्या दोन्ही मुलांनी पैशासकट सर्व तऱ्हेची मदत केली. तर सांगण्याचा मतितार्थ असा की, ही माझ्या पत्नीची बहीण सौ. आशा हिला तीव्र स्वरुपाचा रक्तस्त्राव गर्भाशयातून सुरू झाला म्हणून फोन आला.

तेथील डॉक्टरांनी शहरात स्त्री रोग तज्ञ यास दाखविण्याचा सल्ला दिला. इमर्जन्सी म्हणून माझा मोठा मुलगा चि. शेखर व मोठी सून सौ. शिल्पा खास गाडीने कुरुंदवाडला गेले व तिला डॉ. आडीगा यांच्याकडे ॲडमीट केले. परंतु डॉ. आडीगा यांनी बी. पी. जास्त असल्यामुळे गर्भाशय काढण्याचे ऑपरेशन करण्यास नकार दिला. मिरज मिशन हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करून घेण्याची माझी मेहुणी सौ. आशा हिची तयारी नव्हती व त्यामुळे तिच्या इच्छेखातर तिला माझा मोठा मुलगा, मोठी सून व त्यांची मुले पुण्याला गेले व त्यांनी तेथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. (मिसेस) राव यांना दाखविले व जहांगीर नर्सिंग होममध्ये ऑपरेशन करण्याची तयारी केली. परंतु मेहुणी सौ. आशाच्या म्हणण्याप्रमाणे तो महिना अशुभ होता व तो झाल्यानंतर ऑपरेशन करते असे सांगून ती पुण्याला

आमच्या जोड बंगल्यात राहिली व माझा मोठा मुलगा, सून वगैरे मंडळी परत पुण्याहून जयसिंगपूरला आली. त्यानंतर दिवाळीच्या आधी ऑपरेशनसाठी येण्यास तिचा फोन आला तेव्हा माझा धाकटा मुलगा चि. राजेश, “मी पुण्याला जातो व ऑपरेशन करतो.” असे म्हणाला.

कारण त्याला त्यामुळे बाहेर फिरण्याची संधी मिळेल असे त्याचे म्हणणे होते. मलाही कोल्हापूरला डॉक्टरांना दाखविण्यासाठी जावयाचे होते. तेव्हा आम्ही आधी सगळेजण कोल्हापूरला गेलो व हॉटेल ओपलमध्ये राहिलो व नंतर आमच्या फ्लॅटमध्ये गेलो. तेथूनच माझा धाकटा मुलगा व सून पुण्याला एशियाड बसने गेले.

परंतु त्यात समस्या अशी आली की, डॉक्टरांना दाखवून परत जयसिंगपूरला जाणे अशक्य झाले कारण जयसिंगपूरच्या घराची किल्ली माझी धाकटी सून धाकट्या मुलाबरोबर पुण्याला गेली होती व किल्ली तिच्याबरोबर गेली होती. त्या करिता फोन केला असता माझ्या मोठ्या मुलाचा मित्र दोन दिवसात येणार होता त्याच्याबरोबर पाठवतो असा निरोप दिला. त्यामुळे डॉक्टरांना दाखवून कोल्हापूरचे आमचे काम संपल्यानंतरसुद्धा आम्हाला जयसिंगपूरला परत जाणे शक्य नव्हते. दरम्यानच्या काळात मी आमच्या कोल्हापूरच्या संडासात पडलो व माझा हात दुखावला गेला व त्यात फॅक्चर वगैरे काही आहे का हे बघण्यासाठी एक्स - रे काढावा लागला त्यामुळे माझ्या मोठ्या मुलाच्या चि. शेखर यास एकट्याला खूपच त्रास झाला व पुढे बरेच दिवस माझा खांदा दुखत होता.

पुण्याला गेलेल्या माझ्या दुसऱ्या मुलाचे काम मात्र पूर्ण होऊ शकले नाही, कारण मेहुणीने माझा मोठा मुलगा चि. शेखर आल्याशिवाय ऑपरेशन करून घेणार नाही असे सांगितले. त्यातच माझा धाकटा मुलगा पुण्यात आजारी पडला. मोठ्या मुलाच्या मित्राबरोबर किल्ली आणल्यानंतर आम्ही जयसिंगपूरला परत गेल्यावर मला खोकला, ताप, वगैरे येऊन मी आजारी पडलो.

धाकट्या मुलाला मी आजारी पडल्याचे मोठ्या मुलाने कळविताच एक आठवडा तो पुण्याला आजारी असताना तशातच रात्रीच्या एशियाडने जयसिंगपूरला आला. त्यानंतर माझे एन्टीबायोटीक बदलून सिफ्रान हे औषध दिल्यानंतर माझा खोकला ब्रॉययटीस कमी झाला व मी त्यातून बाहेर पडलो. मध्यंतरीच्या काळात माझी तब्येतीची तक्रार सारखी वाढू लागली व कमी जास्त होऊ लागली. रोजच्या रोज डॉक्टरांची गरज भासू लागली. माझा मोठा मुलगा चि. शेखरचे मित्र डॉ. इंगळे व डॉ. शेख बोलावल्यावर येत असत, परंतु खरे सांगायचं तर मला कोणाच्याही औषधाने आराम व गुण येत नव्हता. माझ्याकरिता माझ्या मोठ्या मुलाने परत दुसरी मला जाण्याकरिता लागेल म्हणून १९८१ मॉडेलची पांढरी ॲम्बॅसिडर घेतली व माझ्याकरिता खास ड्रायव्हर ठेवला होता. गाडीतून मी पोट विकार तज्ञ डॉ. राजेश धरमसी, मिरजेचे डॉ. प्रधान वगैरेंकडे जात होतो. तसेच माझ्या सुनेचे मेहूणे डॉ. अनंत कुलकर्णी, डॉ. विजय कर्नाड, डॉ. विवेकानंद कुलकर्णी, डॉ. अरविंद कुलकर्णी वगैरे अनेक

स्पेशालिस्ट डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार औषधे घेत होतो. एक तर माझी लिव्हर आधी झालेल्या रक्तातील काविळीमुळे म्हणावी तेवढी पचनक्रिया साथ देत नव्हती.

तशातच माझ्या आय. बी. एस. च्या दुखण्याने १० - १५ दिवसापूर्वी जी उचल खाल्ली होती त्यामुळे कोणत्याही डॉक्टरांचा औषध उपचारास १०० टक्के गुण येत नव्हता. लोकांना मात्र (इतर व्यक्तींना) माझा त्रास जाणवत नसे व सर्वजण अगदी माझ्या मुलांपासून ते बहिणींपर्यंत माझा त्रास मानसिक आहे मी मुद्दामहून करतो अशी समजूत झाली होती.

इसवी सन १९९४ सालच्या उन्हाळयात आम्ही सर्वजण कोल्हापूरला राहायला गेलो. त्यावेळी आमच्याकडे माझ्या मोठ्या मुलाने घेतलेली नवीन ॲम्बॅसिडर कार व ड्रायव्हर दोघेही कायमपणे उपलब्ध होते. कोल्हापूरचा फ्लॅट लहान असल्याने तेथील सोसायटीचे चेअरमन श्री. जेकब जाधव यांच्या ओळखीमुळे आम्हाला आमचा व त्यांच्या वरचा फ्लॅट पण वापरण्यास मिळाला.

इसवी सन १९९४ साली पावसाळयात आम्ही नेहमीप्रमाणे जयसिंगपूरला परत आलो. परंतु तब्येतीचा त्रास सुरू झाला असल्याने डॉक्टरांकडे जाणे सुरूच राहिले. त्याचवेळी माझ्या मोठ्या मुलाने लोखंडी जिना तयार करून तो मेघदूतच्या घरावरील गच्चीवर जाण्यासाठी बसवला व वरती एक खोली पण बांधली. त्या मागील हेतू हा होता की मी वर गच्चीवर जावून फिरू शकेन. परंतु प्रत्यक्षात गच्चीवर जाणे व तब्बेतीच्या अस्वास्थामुळे फार

वेळा जमत नव्हते. शेवटी थोडा बदल व्हावा म्हणून कारमधून मी माझा धाकटा मुलगा, धाकटी सून व पत्नी पुण्याला आमच्या जोड बंगल्यात राहण्यासाठी गेलो. ही सर्वसाधारण नोव्हेंबर १९९४ च्या सुरुवातीची घटना असावी. माझ्या आठवणीप्रमाणे मी चालता - बोलता व चांगला असेपर्यंत पुण्याला जाण्याची ही शेवटचीच वेळ असावी. पुण्याला त्यानंतर काही दिवसांनी माझा मोठा मुलगा व नातवंडे पण येऊन आम्ही जयसिंगपूरच्या तुलनेने पुण्याला माझ्या तब्येतीचा त्रास कमी झाला होता असे वाटते.

गाडी व ड्रायव्हर असल्याने रोज संध्याकाळी सगळे मिळून गाडीतून फिरायला जात असल्याने तब्येतीच्या त्रासाकडे थोडे फार दुर्लक्ष होत होते. तशातच होमिओपॅथीक डॉक्टर यांचा दवाखाना डेक्कन जमखाना येथे आहे. त्यांच्या होमिओपॅथीक औषधाने बऱ्यापैकी गुण आला होता. मध्यंतरीच्या काळात माझा मोठा मुलगा व सून कुरुंदवाडला दत्त जयंती उत्सवाकरिता जाऊन आले. दत्त जयंतीचा उत्सव माझ्या दत्तक दिलेल्या मुलाच्या घराच्या कुरुंदवाड येथे नित्य नियमाने प्रत्येक वर्षी करतात. त्यानंतर माझे धाकट्या मुलाचे सासरे व माझे व्याही श्री. वसंतराव कुलकर्णी मुंबईहून उस्मानाबादला जाताना मला भेटण्याकरिता आले. तसेच त्यांच्याबरोबर माझी धाकटी सून उस्मानाबादला माहेरी गेली.

२८ डिसेंबर हा माझा वाढदिवस असल्याने व १९९४ साली मला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने माझ्या

बहिणीचा मोठा मुलगा चि. कौस्तुभ व त्याची पत्नी सौ. प्रज्ञा मला खास भेटण्याकरिता म्हणून पुण्याला आले. त्यानंतर पुण्यातील एक - दोन महिन्याचा काळ असाच गेल्यावर पुण्याच्या घरात उन्हाळा जाणवू लागल्यामुळे माझ्या मोठ्या मुलाबरोबर सर्व साधारण मार्च १९९५ च्या दरम्यान आम्ही जयसिंगपूरला परत आलो. त्यावेळी या नव्या घेतलेल्या गाडीचे काम सारखे निघू लागल्यामुळे आम्ही ती गाडी विकून टाकली.

त्याच काळात हास्यकथा लेखक द. मा. मिरासदार हे मालू हायस्कूलमध्ये स्नेहसंमेलनाकरिता आले होते. त्यांच्याशी ते साहित्यिक असल्याने माझी चर्चा झाली व त्यांना मी माझे मेघदुताचे पुस्तक भेट म्हणून दिले. त्याच काळात माझ्या मानेचा त्रास जास्त झाला. एक्स - रे वगैरे आधी काढलेलेच होते, त्याप्रमाणे मानेचे दुखण्याचे निदान 'सव्हायकल स्पाजीलॉसिस' असे केले होते. त्याकरीता माझ्या मोठ्या मुलाला गाडीतून प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. नितीन देशपांडे यांना कोल्हापूराहून आणले होते. त्यांनी ट्रॅक्शन लावण्यास सांगितले, परंतु ट्रॅक्शन लावूनही मानेचे दुखणे कमी झाले नाही व सांगलीतील अस्थिरोग तज्ञ डॉ. आरवडे यांचा सल्ला घेऊन औषधे घ्यावी लागली.

इसवी सन १९९५ च्या मे महिन्यात नेहमीप्रमाणे आम्ही कोल्हापूरला रहायला गेलो. माझी मुंबईची बहीण, मेहूणे मला भेटण्याकरिता तेथे आले होते. आमची जागा लहान असल्याने आम्ही त्यांच्या रहाण्याची सोय जवळच असलेल्या एस्. व्ही. लॉजमध्ये केली होती.

कोल्हापूरातसुद्धा रवी जाधव या होमीओपॅथीक डॉक्टरांची औषधे मी घेऊन पाहिली, परंतु पुण्याच्या औषधासारखा गुण आला नाही. किंबहूना माझे सततपणे चालणारे व लोकांना त्रास देणारे दुखणे व आजारपण यामुळे माझ्या मुलासह व सुनासह घरच्या व्यक्ती त्रस्त झालेल्या होत्या. सारखे डॉक्टरांकडे जाणे, डॉक्टरांना घरी बोलावणे व तरीसुद्धा आराम न मिळणे या घटनांमुळे माझी मुले व घरची सर्व मंडळी मला कंटाळून गेली आहेत असे त्यांच्या वागण्यावरून स्पष्ट दिसत होते.

इसवी सन १९९४ च्या जून महिन्यात मुंबईला जाऊन एखाद्या चांगल्या पोटविकार तज्ञास दाखविण्याकरिता मी, माझा मोठा मुलगा, धाकटा मुलगा, धाकटी सून, पत्नी, माझ्या धाकट्या मुलाचा मित्र मी मागे सांगितल्याप्रमाणे श्री. पांडूरंग शंकर कौलापूरे व जयपाल म्हणजे राज्यपालचा मुलगा चि. सुनील खास गाडीने मजल दर मजल करीत मुंबईला गेलो.


जाताना वाटेत आम्ही कराड, पुणे येथे थांबलो तसे. पुणे मुंबई ट्रफिक जाममुळे पण बराच वेळ गेला. त्यावेळेस मी माझ्या धाकट्या सुनेच्या सौ. स्वप्ना हिच्या वडिलांचा मुलूंड बेट (पूर्व) मुंबई येथे फ्लॅट रिकामा होता त्या ठिकाणी एक आठवडा राहिलो. त्यावेळी माझा सख्खा मावस भाऊ डॉ. मोहन के. जोशी याच्या ओळखीने आम्ही प्रसिद्ध पोटविकार तज्ञ डॉ. निरंजरप्रसाद बांका ज्यांचा दवाखाना अंधेरी येथे ऑस्कर अंबर सिनेमा जवळ आहे त्यांच्याकडे दाखविले. तेव्हा त्यांनी तपासणीची भली मोठी लिस्ट

म्हणजे ग्रेस्ट्रोडी ओडेनेस्कोपी, कोलोनोस्कोपी वगैरे तपासण्या करण्यास सांगितल्या. पण माझा सख्खा मावस भाऊ डॉ. मोहन जोशी यानेच मला तुला तपासण्या सहन होणार नाहीत तेव्हा तपासण्या न करता औषधे देण्याचा फोन डॉ. बांका यांना केला व त्यांनी औषधे लिहून दिली. त्यावेळी मी ठाणे येथील डॉ. मना यांना पण दाखविले, परंतु त्यांनी औषधे घेण्याऐवजी सूप घ्या, ज्यूस घ्या असा सल्ला दिला. त्या ठिकाणी माझे व्यायांच्या फ्लॅटमध्ये मुलुंड येथे माझा कॉलेजपासूनचा अगदी जवळचा मित्र नांदेडकर भेटावयास आला होता. कॉलेज जीवनात मला व त्याला इनसेपरेबल्स् म्हणत असतं.

त्यानंतर एक दिवस माझी बहीण सौ. बबीकडे शिवाजी पार्क येथे राहून आम्ही सह्याद्री एक्सप्रेसने परत जयसिंगपूरला आलो. त्यावेळी माझी धाकटी सून काही दिवसांकरिता माहेरी मुलूंड (मुंबई) येथे राहिली.

इसवी सन १९९६ साली सांगलीला माझ्या मुलाने घेतलेल्या छोट्या फ्लॅटमध्ये आम्ही रहाण्यास गेलो. त्यावेळी माझ्या उजव्या डोळ्याचे बरेच दिवसांपासून लांबलेले ऑपरेशन करण्याचा पाठपुरावा व आग्रह मी मुलांना सातत्याने केला. त्याचा परिणाम म्हणून की, काय माझा धाकटा मुलगा मी मागे सांगितल्याप्रमाणे श्री. पांडूरंग कोल्हापूरे यांनी रविवारी संध्याकाळी डॉ. दिलीप पटवर्धन यांच्या दवाखान्यात जाऊन अपॉइंटमेंट नसताना सोमवारी सकाळी ऑपरेशनचे नियोजन अचूकपणे केले. सोमवारी सकाळी १२ वाजता लेन्स घालून माझ्या

डोळ्याचे ऑपरेशन डॉ. दिलीप पटवर्धन यांनी केले. परंतु शेवटी - शेवटी थकल्याने माझ्या मोठ्या मुलास ऑपरेशन थिएटरमध्ये बोलवा असे डॉक्टरांनी सांगितल्यावर त्यांनी माझ्या मोठ्या मुलास आत बोलाविले व ऑपरेशन व्यवस्थितपणे पार पडले व दुपारीच डिसचार्ज मिळाला. ऑपरेशन दरम्यान दिलेली काही औषधे, इंजेक्शनमुळे लघवी मात्र बराच काळ अडून राहिली. त्यानंतर जवळपास एक महिना आम्ही राहण्यास सांगलीलाच होतो.



# (४९) माझ्या जीवनाची खडी संध्याकाळ

माझे दुसरे डोळयाचे ऑपरेशन झाल्यानंतर त्या आधी मी कोल्हापूरला असताना माझा मोठा मुलगा व त्याची पत्नी सौ. शिल्पा यांनी दुसरे पाच खोल्यांचे घर इंदिरा को - ऑप. हौसिंग सोसायटीत विकत घेतले. माझ्या धाकट्या नातवंडाला दम्याचा विकार असल्यामुळे व 'मेघदूत' या आमच्या १३व्या गल्लीतील घरामध्ये व्हेन्टीलेशन व खेळती हवा बरोबर नसल्यामुळे त्यांनी या दुसऱ्या घराची पसंती केली व या नवीन घरात मला स्वत:करिता खास खोली मिळाली त्या नवीन घराची रंगरंगोटी करून त्या घराला माझ्या मुलाने काय नाव द्यावयाचे असे विचारले असता मी माझा आवडीचा कवी व संस्कृत कवी कुलगुरू कालिदासाचे नाव या नवीन बंगल्यास देण्याचा मनोदय व्यक्त केला व त्यानुसार त्याने नवीन बंगला रंगवल्यांनंतर 'कालिदास' हे नाव दिले.

मी नवीन बंगल्यात डोळयाचे ऑपरेशन झाल्यानंतर राहण्यास आलो खरा परंतु तब्येतीचे अस्वस्थ व सातत्याने भेडसावणारी तब्येतीची समस्या सारखे - सारखे डॉक्टरांना बोलावण्यास लागणे, आय. बी. एस. व इतर कारणामुळे होणाऱ्या मरणप्राय वेदना यामुळे जीव त्रासून गेला. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे घरचे सर्वजण तर माझ्या कायमच्या दुखण्याला कंटाळून गेले होते. मुले, सुना, पहिल्यासारखे लक्ष देईनात, तक्रारी सांगितल्या तरी नुसत्या तक्रारी ऐकून घेत होते. सारखे - सारखे डॉक्टरांना बोलावून

काय होणार? मला एक गोष्ट स्पष्टपणे सारखी सांगावी वाटते ती म्हणजे माझे नशीब म्हणा किंवा योगायोग म्हणा बाहेरील व्यक्तीच काय परंतु घरातील व्यक्ती पण, अगदी लहानपणापासून मला मूर्खात काढत असत.

'वामनाला कळत नाही.'

'वामन नादिष्ट आहे.'

'वामनाची तब्येतीची सारखी तक्रार असते.'

'वामन कोणाच्याही नादी लागतो.'

'त्याला सर्व बाबतीत घाई करण्याची सवय आहे.'

अशा अनेक गुणांपेक्षा दोषांनी भरलेले व्यक्तिमत्व म्हणून सर्वजण माझ्याकडे पाहत असत. मी माझ्या दुसऱ्या प्रकरणात अस्मादिकांच्या अवतारामध्ये मी किती सर्वसामान्य, कमनशिबी, गुणापेक्षा दोष जास्त असणारा असा अत्यंत साधा माणूस म्हणून जन्मास आलो होतो. जन्माला येणे, त्याचबरोबर सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्व व उत्तम नशीब घेऊन जन्माला येणे हे काही माणसांच्या हातात नाही व त्याला काही पर्यायही नाही. **परमेश्वर म्हणा किंवा निसर्ग म्हणा तुम्हाला ज्या परिस्थितीत जन्माला घालतो त्याच परिस्थितीत तुम्हाला जीवन जगावे लागते. धडपड तर प्रत्येक व्यक्ती करीतच असते. पण यश - अपयशाचे समीकरण, बीजगणितात जेवढी लवकर सुटतात व अचूक असतात तेवढी ती मानवी जीवनात चटकन सुटत नाहीत व अचूकपण असत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.**

याच प्रसंगातून मला आचार्य अत्रे यांची एक वैचारिक बैठक आठवते ती म्हणजे **कोणताही व्यवसाय करणे,**

**कोणत्याही विशिष्ट परिस्थितीत राहणे, कोणत्याही विशिष्ट स्वरूपाचे जीवन जगणे हा काही माझा जीवन जगण्याचा उद्देश किंवा व्यवसाय नाही तर जीवन जगणे मग ते कसेही असो हा माझा खरा व्यवसाय आहे.** या बाबत संस्कृतातील एक सुभाषित मला उदघृत करावेसे वाटते.

अमंत्रा: अक्षः रा नास्ती
नास्ति मुलीम औषधमः
योग्यतो पुरुषः नारित योजकः तत्र: दूर्लभः

म्हणजे जगात असे एकही मंत्र नाही ज्यामध्ये अजर नाही. असे एक झाडाचे मूळ नाही की, जे औषधी नाही, असा एकही पुरुष नाही ज्यामध्ये योग्यता नाही व या सर्व गोष्टी समज सुसंगतपणे योजना करणे दुर्लभ आहे.

सांगण्याचा अर्थ असा की, **प्रत्येक व्यक्तीमध्ये गुण व दोष याचे मिलन अस्तित्वात असते व ते असणे स्वाभाविक व नैसर्गिक आहे. कारण दोष आहेत म्हणूनच गुणांना किंमत आहे.**

नवीन घरात आल्यावर मधल्या काळात आम्ही सांगलीच्या माझ्या मुलाने नवीन घेतलेल्या नवीन घरात राहावयास मे १९९७ मध्ये गेलो. त्यावेळी माझा मोठा मुलगा व सून यांनी दत्त मंगल कार्यालयात माझ्या दोन्ही नातवंडाच्या मुंजी करण्याचे ठरविले व त्याकरिता "मंगलाष्टके करण्यास जमेल का?"

अशी विचारणा केली. परंतु सततच्या आजारपणाने मी फक्त तीनच कडवी करू शकलो व बाकी दोन कडव्यांची

पूर्तता माझ्या धाकटा मुलगा राजेश याने केली. मुंजीच्या वेळी ती मंगलाष्टके माझ्या मोठ्या मुलाने स्पिकरवर म्हटली. मी नातवंडांच्या मुंजीला स्वत: सुट घालून हजर होतो. त्यानंतर काही दिवस सांगलीत मुक्काम केल्यावर परत जयसिंगपूरला आल्यावर तब्येत बऱ्याच प्रमाणात बिघडू लागली. सारखे डॉक्टरांना बोलवावे लागत होते. डॉक्टर येण्यास तयार नसत. त्यास्तव माझी व घरातील लोकांची बोलाचाली, भांडणे होऊ लागली. मोठ्या मुलाचे पक्षकार श्री. कोरे (त्यांना तशाही परिस्थितीत मी विनोदाने तोरो म्हणत होतो.) श्री. रामकृष्ण झोपायला येत होते. बाळू नावाचा मुलगा माझे जेवण, चहापाणी व बाकी आवश्यक गोष्टींकडे लक्ष देत होता. तो राहावयास आमच्याकडेच होता. डॉक्टर आले नाहीत व त्रास सुरू झाला की, बाळूला डॉक्टरला सारखे फोन करावे लागत, तरी डॉक्टर आले नाहीत तर मी त्याला डॉक्टरांकडे प्रत्यक्ष जाऊन येण्यास सांगे. त्यावरून घरात सातत्याने माझी मुले, सुना यांच्यामध्ये भांडणे होऊ लागली. मुले व सुना दारे लावून झोपत / रात्री झोपत असत व मी बऱ्याच वेळा दार ठोठावल्यावर उठत असत. मला तर रात्र - रात्र झोप येत नव्हती. अनेक प्रकारची औषधे रोज घेतली जात होती. तरीही आराम मिळत नव्हता. पोटात कायमपणे दुखत होते तसेच पोटात प्रचंड आग झाल्यासारखे होत होते. टूसिकॉक, ॲन्टासीड, थंड फ्रीजमधील दूध घेऊनही आग कमी होत नव्हती. त्याच दरम्यानच्या काळात माझ्या धाकट्या मुलाने लिहिलेले 'वैद्यकीय निष्काळजीपणा' व 'लिगल ॲस्पेक्टस्

ऑफ मेडीकल निग्लीजन्स' त्या पुस्तकाकरिता एप्रिल १९९८ मध्ये पुण्याचा प्रकाशक श्री. अरोरा आला होता. त्याला ते पुस्तक ताबडतोब पसंत पडले व त्याने छापण्याकरिता व प्रसिद्ध करण्यासाठी माझ्या धाकट्या मुलाशी लगेचच करार केला व त्याला ॲडव्हान्स म्हणून रु. ५,०००/ - दिले. त्यानंतर त्याने त्या पुस्तकाचे मुखपृष्ठ पसंतीकरिता पाठविले. ते पण उत्कृष्टपणे डिझाइनिंग करण्यात आले होते. त्यावरील 'देवगांवकरर्स', 'लीगल ॲसपेक्टस् ऑफ मेडीकल निग्लीजन्स्' या देवगांवकरर्स या नावामुळे - 'देवगांवकर' हे नाव सर्व देशभर गाजणार होते व नावाजणार होते ही अत्यंत समाधानाची व अभिमानाची घटना होती.

मी मे १९९८ मध्ये कोल्हापूरला थंड हवा असल्यामुळे गेलो असताना माझा मोठ्या भावाचा मोठा मुलगा व पुतण्या चि. विजय त्याची पत्नी सौ. कुसुम व माझ्या मोठ्या वहिनी मला भेटून गेल्या. मला वाटते माझी व माझ्या मोठ्या पुतण्याची चि. विजयची ती शेवटचीच भेट असावी. कारण मधल्या पुतण्या चि. बंडू उर्फ जयंत याच्या मोठ्या मुलाच्या लग्नाला आग्रहाचे निमंत्रण असूनही मी व आमच्यापैकी कोणीही माझ्या तब्येतीमुळे जावू शकलो नाही. उन्हाळा संपल्यावर मी जयसिंगपूरला परत आलो. १९९८ सालच्या ऑगस्ट महिन्यात एकाएकी माझ्या डोळयांच्या पापण्या उघडणे बंद झाले व त्या मिटूनच राहू लागल्या. जबरदस्तीने उचलली तर तेवढ्याच वेळ पापणी उघडी रहात होती. मोठ्या मुलाचे मित्र नेत्र रोग तज्ज्ञ डॉ.

शेख यांना घरी बोलविले व औषधे दिली. परंतु काहीही उपयोग झाला नाही. शेवटी न्यूरो फिजीशियन यांचा सल्ला घेतला त्यांनी दिलेल्या गोळयांनी तर मला उलटच त्रास झाला व मी अर्धा पाऊण तास बेशुद्ध अवस्थेत करतात तसे काही कळत नसल्यासारख्या क्रिया केल्या. त्यानंतर सी. टी. स्कॅन करण्यासाठी माझ्या मुलाने चि. शेखर व चि. राजेश यांनी बाळूबरोबर व श्री रामकृष्ण यांच्याबरोबर सांगलीला डॉ. अनिल जोशी यांच्याकडे नेले. त्यावेळी श्री. रामकृष्ण (बुरसे) हे पण आमच्याबरोबर होते.

या सर्व काळात माझ्या मुलांनी, माझी बहीण सौ. बबी व मेहुणे श्री. नानासाहेब यांना बोलावून घेतले व गाडीतून मुंबईला जाणेचे ठरले परंतु माझी बहीण सौ. बबी हिच्याकडे घरात फर्निचरचे काम चालू असल्यामुळे हॉटेलमध्ये किंवा एकदम हॉस्पिटलमध्ये जाण्याचे ठरले. मधल्या काळात मला कोणतीही पातळ वस्तू अगदी पाणीसुद्धा पिता येणे बंद झाले व पिण्याच्या प्रयत्न केल्यास जबरदस्त ठसका लागत असे. माझ्या मुलांनी तीन - चार दिवस चमच्या चमच्याने हळुहळू पाणी, बोर्नव्हीटा, चहा, पेय जले, इलेक्ट्रॉल वगैरे देणे सततपणे सुरू ठेवले, त्यामुळे पातळ पदार्थ काही प्रमाणात पोटात जात होते; परंतु ठसका जीवघेणा लागत असे व ठसका लागला की, जीव घाबरून जाई त्यामुळे लघवीचा पण त्रास सुरु झाला व लघवीला खूप वेळ लागू लागले. आम्ही गाडीतून मुंबईला जात असतानासुद्धा मला लघवीकरता व चमच्याने पाणी पिण्याकरिता बराच वेळ थांबावे लागले. आमच्याबरोबर

माझे मोठे व्याही श्री. शिरटीकर, रामकृष्ण, बाळू, माझी दोन्ही मुले, पत्नी व धाकटी सून सौ. स्वप्ना एवढे लोक होते.

पुण्यात जाण्यास संध्याकाळ झाली म्हणून आम्ही सर्वजण माझा पुतण्या चि. जयंत यांच्याकडे कोथरुड येथे उतरलो. त्यावेळी मी चि. जयंत व त्याची पत्नी सौ. सुनिताला ओळखले.

मात्र त्या रात्री मला खूप त्रास झाला व रात्रभर झोप लागली नाही. चमच्याने पाणी, पेये पिणे जास्त त्रासदायक ठरू लागले. खोकला होऊन छाती खोकल्याने भरली व काही वेळानंतर काहीच कळणे बंद होऊ लागले.

समोर फक्त अंधार दिसू लागला. फक्त अंधार दिसू लागला आणि मी मोठं - मोठ्याने मुलांना हाका मारत होतो.

अंधार वाढत होता....
वाढत गेला....
मी अंधारात डुंबून गेलो....
सर्व काही अंधकारमय झाले....

- - पुस्तकासाठी संपर्क - -


# अॅड. शेखर एम. तेरवाडकर

चर्च रोड, इंदिरा हाऊसिंग सोसायटी,

**जयसिंगपूर - ४१६१०१,**

तालुका - शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर

फोन - ९५२७७७७०९४, ९४२२०७५६०३


15.5 Arial Unicode MS Words 61,789



## वामन गोविंद देवगांवकर

बी. ए. ऑनर्स, एम. ए. बी. टी.

व्याख्याते म्हणून त्यांनी विदर्भातील अनेक ठिकाणी जसे की, अकोला, वाशिम आणि अमरावती येथे सेवाकार्य बजावले. संस्कृतमधील साहित्य सर्वसामान्य जनतेला समजेल, या उद्देशाने त्यांनी त्याचे सोप्या मराठी भाषेत रुपांतर केले. त्याच हेतूने 'मेघदूताचा नवा अवतार' हे पुस्तक त्यांनी 1983 मध्ये प्रकाशित केले. सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक विषयांवर त्यांनी विपुल लेखन करुन साहित्यसेवा केली.

समाजातील तळागाळातील लोकांची जाती-धर्माचा विचार न करता प्रगती व्हावी, ही त्यांची आयुष्यभराची मूळ भूमिका होती. प्रसिद्धीची हाव न धरता त्यांनी विद्यार्थ्यांना मनोभावे शिकवले आणि त्यांच्या प्रगतीसाठी अखंड प्रयत्न केले.

आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी कुरुंदवाड-जयसिंगपूर येथे वास्तव्यास राहून अविरत साहित्यसेवा चालू ठेवली. 14 ऑगस्ट 1998 रोजी पुणे येथे त्यांचे निधन झाले. ते श्री गजानन महाराज, शेगाव यांचे परमभक्त होते. त्यांच्या विपुल साहित्याचा आजही वाचक मनोभावे आस्वाद घेत प्रेरणा मिळवतात.


न फुलू दिलेलं फूल (आत्मवृत्त)

ISBN 978-81-949979-0-0

वा. गो. देवगांवकर (कोल्हापूर)

कवितासागर साहित्य अकादमी, जयसिंगपूर

+91 8484986064 I +91 9975873569

sunildadapatil@gmail.com

ISBN 978-81-949979-0-0

9 788194 997900

An Imprint of KavitaSagar